म. ग्रं. ठाणें
विषय
सं. नं.

# प्रसंगरत्न

किंवा

# बुद्धिवैभव

दत्तात्रय गोविंद सडकर

यांनीं

बेळगांव "धुंडिराज" छा. छा.

---

आवृत्ति १ ली

---

किंमत १२ आणे.

पुस्तकनंबर
शिवडी.

अनु ७६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

से. को. १०१

# प्रसंगरत्नावली

किंवा

# बुद्धिवैभव.

हें पुस्तक

## दत्तात्रय गोविंद सडेकर

म्यानेजर लोकमित्र

मु० खानापूर

यांनीं

बेळगांव "धुंडिराज" छापखान्यांत छापविलें.

सन १९०५.

किंमत १२ आणे.

या पुस्तकासंबंधीं सर्वप्रकारचा हक्क मालक दत्तात्रय गोविंद रहेकर
म्यानेजर लोकमित्र, पोष्ट खानापूर-बेळगांव, यांनीं
आपल्या स्वाधीन ठेविला आहे.

# प्रस्तावना.

ह्या संसारामध्यें मनुष्यास बहुश्रुतपणा हा गुण अवश्य संपादन केला पाहिजे. विद्वान असो किंवा अविद्वान असो, त्याला बहुश्रुतपणाचें ज्ञान नसेल तर त्यानें मिळविलेली इतर विद्या कदापि उदयाला येणार नाहीं. असें जाणून विविधज्ञानबोधक गोष्टींसंबंधीं जितकी माहिती देववली तितकी अनेक पुस्तकांधारें येथें दिली आहे.

होतकरू मंडळीला तिजपासून थोडाबहुत लाभ झाल्याचें जेव्हां माझ्या कानीं पडेल, तेव्हां केलेल्या सर्व श्रमाचा परिहार झाला असें मी समजेन.

### श्लोक

घे घे सभ्यपणा, सुयुक्त अशना. आरोग्य संवर्धना ॥
तुष्टत्व गुणा मितव्ययपणा, लोकोपकारी मना ॥
अक्रोधादिक शांति हीच सुमना भोगी क्षमा सद्धना ॥
सौम्यत्वादिक भूषणा धरि, रमे या सद्गुणांच्या वना ॥

नीतिग्रंथ.

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| मंगलाचरण | १ |
| हरिनामस्मरण. | ३ |
| आयुष्यक्रम | ८ |
| बोधरत्नाकर. | २० |
| धर्मानुज्ञा | २७ |
| बोध, रूढि, आचार वगैरे. | २८ |
| महाराष्ट्रभाषेंतील वेंचीव ह्मणी. | ३० |
| मानस बोध. | ३४ |
| कारणापुरतें ज्योतिष | ३७ |
| शतमूर्खाचीं लक्षणें. | ४४ |
| ऑंग्ल सुभाषितें. | ४८ |
| श्रीमंत होण्याचा उपाय. | ५० |
| लक्षांत ठेवण्यासारखे तीन. | ५१ |
| यक्षप्रश्न. | ५३ |
| सुबोध प्रश्नावली. | ५६ |
| लक्षांत ठेवण्यासारखे बोल. | ५७ |
| सज्जन व दुर्जन. | ५८ |
| बोधाचा एक सुरस मासला. | ६० |
| घड्याळ कसें वाळगावें. | ६२ |
| कर्मणूकसंग्रह. | ६३ |
| व्यवहारिक शब्दज्ञान. | ९२ |

| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |
| दृष्टिसंरक्षणाचे नियम | ....९९ |
| अंकानुक्रम शब्दबोध | ....१०१ |
| प्रश्नोत्तर रत्नमाला | ....१०९ |
| प्रासंगिक युक्ति..... | ....१११ |
| सुगंधी कामाची माहिती..... | ....११३ |
| बोधामृतसार. | ....११७ |
| ऐंद्रजाल प्रकरण. | ....१२२ |
| पदार्थांचे गुणदोष..... | ....१२८ |
| बोधसुधा. | ....१४० |
| चमत्कारिक गोष्टी. | ....१५० |
| खुबीदार आख्याइका. | ....१६९ |
| आपला विश्रांतिचा वेळ कसा घालवावा. | ....१७८ |
| मनुस्मृतिपैकीं उपयुक्त वेंचे. | ....१८१ |
| गंगास्तव. | ....१८८ |
| कलिप्रशंसा. | ....१८९ |
| गृहस्थाश्रम. | ....१९० |
| सुखाचें इंगीत | ....१९१ |
| वाचनाविषयीं..... | ....१९२ |

श्री दत्त प्रसन्न.

# प्रसंगरत्नावली

किंवा

# बुद्धिवैभव.

---

## मंगलाचरण.

श्लोक.

आमितगिरिसमं स्यात्कज्जलं सिंधुपात्रे ॥
सुरतरुवर शाखा लेखनी पत्र मूर्वी ॥
लिखित यदि गृहीत्वा शारदा सार्वकालं ॥
तदपि तव गुणांनामीश पारं नयाति ॥ १ ॥

महिम्न.

अर्थ—हिमांचलासारखा कज्जलपर्वत आणून जरी समुद्ररूपी विस्तीर्ण पात्रांत शाई केली, अठरा भार वनस्पतींच्या लेखण्या केल्या, पृथ्वीचा कागद केला; आणि प्रत्यक्ष सरस्वती रात्रंदिवस लिहीत बसली, तरी हे परमेश्वरा! तुझ्या गुणांचा अंतपार लागावयाचा नाहीं. असा जो तूं त्या तुजला प्रथमारंभीं साष्टांग प्रणिपात असो.

## अहोरात्रीच्या २४ तासांचा व्यय.

सकाळीं ५ ते ७ वाजेपर्यंत शुचिर्भूत व्हावें, प्रातःस्मरण करावें, आज काय काय कामें करावयाचीं त्यांचा निश्चय करावा, अभ्यास करावा व उपहार करावा.

७ पासून ११ वाजेपर्यंत कामधंदा.

११ पासून दोनप्रहरचा १ वाजेपर्यंत ग्रंथावलोकन, खरचा हिशोब ठेवणें व भोजन करणें.

१ पासून ५ पर्यंत कामधंदा.

५ पासून रात्रीचे १० वाजेपर्यंत वस्तु जागचे जागीं व्यवस्थित ठेवणें, संध्याकाळचें भोजन, वाद्य, गान, संभाषण, कर्मणूक, आजच्या दिवसांत आपण काय काय केलें त्याचा हिशोब.

१० पासून ५ पर्यंत रात्रीं झोंप घेणें.

राजनीतींत किंवा थोर पुरुषांच्या वागणुकींत कालाचा सद्व्यय करण्याचे अशाच प्रकारचे नियम सर्वत्र आढळतात व ह्या किंवा अशा प्रकारच्या नियमांस अनुसरून जे चालतात, त्यांचाच जगांत उदय होतो. आपली स्थिति बदलावी व आपणास उत्तम स्थिति प्राप्त व्हावी अशी इच्छा बाळगिणारे पुरुष, स्त्रिया व विद्यार्थी ह्यांनीं ह्या नियमाप्रमाणें किंवा आपापल्या सोईप्रमाणें कालाच्या व्ययाचें अनुकरण आपणांमध्यें करण्याची संवय ठेविलीच पाहिजे.

---

## बेन्जामिन फ्रांकलिनचें वेळापत्रक.

सकाळीं ५ पासून ८ पर्यंत—निजून उठणें, प्रातः-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

स्मरण, उद्योगाविषयीं विचार, त्याविषयीं [illegible] अभ्यास, न्याहारी, आज सत्कृत्य कोणतें करावयाचें, ह्याचा विचार करणें.

**८ पासून १२ पर्यंत**—उदरनिर्वाहाचा उद्योग करणें.

**१२ पासून २ पर्यंत**—वाचणें, घरचा हिशोब पहाणें, जेवणें.

**२ पासून ५ पर्यंत**—उदरनिर्वाहाचा उद्योग करणें.

**५ पासून ९ पर्यंत**—वस्तु जागचे जागीं ठेवणें, संध्याकाळचें जेवण, गानवादन, खेळणें, संभाषण, दिवसा काय सत्कृत्य केलें, त्याचें मनन.

**९ पासून ५ पर्यंत**—निद्रा.

ह्यामध्यें आज सत्कृत्य कोणतें करावयाचें हें प्रातःकाळीं ठरविणें, आणि आज आपण कोणतें सत्कृत्य केलें हें सायंकाळीं पहाणें, ह्या दोन गोष्टी फार विचार करण्यासारख्या आहेत. ह्या प्रत्येक मनुष्यानें पहाव्या; ह्मणजे त्याचें हित होईल.

---

## हरिनामस्मरण.

**गति तेचि मुखीं, नामाचें स्मरण ॥**
**अधोगति जाण, विन्मुखता ॥ १ ॥**

सतत ईश्वरस्मरण केल्यानें मोक्षप्राप्ति होते व जेथें नामस्मरणाचा कंटाळा तेथें अधोगति आहे, असा भावार्थ वरील तुकारामाच्या अभंगाचा आहे.

प्रत्येक मनुष्याच्या मरणानंतर आपणास अन्य स्थिति प्राप्त होणार असा समज झालेला असतो, व याशिवाय कांहीं तरी स्थिति प्राप्त होणार हें निर्विवाद आहे. आत्म्यास चांगली किंवा वाईट स्थिति प्राप्त होणें हें त्याच्या इहलोकींच्या कर्तव्यावर अवलंबून आहे. प्राण्याची इच्छा मरणोत्तर उत्तम स्थिति प्राप्त व्हावी, अशी असते. मुमुक्षुजनांस पुढें उन्नत स्थिति प्राप्त व्हावी एतदर्थ चांगलीं साधनें अनेक आहेत. नामस्मरण हें अनेक साधनांपैकीं एक होय. भक्तिपंथाचा पाया भजनावर विशेष आहे. तुकारामानें 'नामस्मरण हें फारच सोपें परमार्थसाधन आहे' असें निरूपण केलें आहे. ज्यास परमार्थसाधन करावयाचें असेल, त्यास भजनासारखा सुलभ मार्ग दुसरा नाहीं. या संसारांत मोक्षसाधनाच्या आड अनेक वस्तु येत असतात. काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे तर प्रत्येकास मित्र करून घेतल्याशिवाय प्रपंचामध्यें परमार्थसाधन दुर्लभ आहे.

वरील षड्रिपूंचें सर्वथा दमन करणें कदाचित् कोट्यावधि लोकांत एखाद्यास शक्य होईल. शुक्राचार्यासारख्याचें तप मेनकेनें भंग केलेलें आपण ऐकतों, महादेवासारख्या तपस्व्याची जपमाला रंभेस पहातांच जिकडच्या तिकडेच राहिली हेंही आपण ऐकतों, ब्रह्मा, विष्णु, महेश यांस अनुसूयेच्या कडकडीत पातिव्रत्याचा मत्सर उत्पन्न झालेला दत्तचरित्रांत आपण वाचतों, ध्रुवाच्या तपापासून इंद्रादिकांस मत्सर उत्पन्न झालेला आपण कीर्तनांत श्रवण करितों, विश्वामित्र ऋषीच्या अभिमानाविषयींच्या गोष्टीही आपण ऐकतों. जर या शत्रूंस अशा थोर पुरु-

घांकडूनही जिंकिलें गेलें नाहीं; तर सामान्य जनापासून ते जिंकिले जातील अशी आशा करणें व्यर्थ आहे. तर मग त्यांस आपणास जिंकूं द्यावें कीं काय ? तसें झाल्यास कोणत्या प्रकारचे अनिष्ठ परिणाम होतील हें कोणीही सांगूं शकेल. कामाधीन पुरुषाची अवस्था काय होते, अत्यंत क्रोधी मनुष्यास काय दुःखें सोसावीं लागतात, अत्यंत लोभी व मत्सरी पुरुषाच्या वर्तनाचा परिणाम समाजावर काय होतो इत्यादि गोष्टी मनांत आणल्यावर षड्रिपूंचें वर्चस्व कां होऊं देऊं नयें हें कळून येणार आहे. तर मग आपणही शत्रूंस जिंकूं शकत नाहीं व शत्रूंनेंही आपणास जिंकतां नये; असें जर आहे तर पुढें करावें तरी काय ? असा प्रश्न उत्पन्न होतो. तेव्हां अशा प्रसंगीं षड्रिपूंस आपले मित्र करून घेण्याचा यत्न करणें हेंच आपलें कर्तव्य आहे. ह्मणजे शांति, क्षमा, दया, धृति इत्यादिकांची काम, क्रोध, लोभादिकांबरोबर सांगड घालून घेणें हें होय. कबिरानें ह्मटलें आहे—

**कनक और कामिनी दोनो बडी तीखटजाल ॥**
**जाते है हरी मिलनकूं तो बिचमे पडे मार ॥ १ ॥**

हा दोहरा स्त्रियांसंबंधीं कुत्सित बुद्धि धरून लिहिलेला नाहीं. याचा अर्थ भलताच करितां नये. द्रव्य व स्त्री यांवरच कायतो प्रपंच आहे व येथें अत्यंत आसक्ति असली ह्मणजे परमार्थ दुर्मिळ होतो. सर्वलोक स्त्रीचा आणि द्रव्याचा निषेध करून बसले तर जग दोन दिवसही राहणार नाहीं. तर संसारांत राहून दारा, पुत्र व संपदादि

संभाळून परमार्थ करावा ह्मणून नामस्मरण भजनादिक स्वल्प साधनांचा उपयोग जनांनीं करावा असें तुकाराम साधू सांगतात. व हाच मार्ग सर्वांस श्रेयस्कर आहे.

**माया बडी चोरटी । फांसले बैठी बाट ॥**
**निर्गस्त फांस पडे । कबिरा गये काट ॥**

याप्रकारें मायेमध्यें गुंतलेल्या मनुष्यानें तिचे पाश तोडून कबिरासारखे सुटलेले फारच थोडे आढळतील. हें जरी खरें आहे, तथापि मनुष्यास मायाजालांत न फंसतां प्रपंचांत परमार्थ करितां येणार नाहीं असें नाहीं. एकदां मनाचा धडा मात्र केला पाहिजे. जनक राजा देही असून विदेही होता ह्मणतात त्याचें तात्पर्य हेंच आहे. प्रपंचांत राहून राज्यकारभार चालवूनही तो कधीं परमेश्वरास विसरला नाहीं. त्यानें प्रपंचासच परमार्थ करून सोडला. काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर ह्यांची सर्वांस गरज आहे; परंतु त्यांचें सहाय नियमित वेळीं, नियमित ठिकाणीं व नियमितपणाचें असलें तरच प्रपंचास परमार्थाचें रूप येणार आहे. आणि यास साधन परमेश्वराचे अंतःकरणपूर्वक गुणानुवाद गावे ह्मणजे वरोवरीं त्याचें भजनपूजन करावें हेंच आहे.

जेथें त्याच्या नामाचा तिटकारा आहे तेथें अधोगति आहे. संसारतापापासून संतप्त झालेल्या प्राण्यास ईश्वरनामसंकीर्तन हें उत्तम जीवन होय. तेणेंकरून तप्त झालेलीं इंद्रियें शांतता पावतात, मन ईश्वरचरणीं गढून जातें व नानाप्रकारच्या भवदुःखाचा विसर क्षणभर तरी

त्यास पडतो. परंतु, ज्यास नामस्मरणाचा कंटाळा, त्याचें मन संकटावस्था प्राप्त झाली असतां अत्यंत उद्विग्न होतें. त्यास शांति नसते. पाण्याशिवाय जसा मच्छ तळपळतो, तसा हरिनामजीवन जो प्राशन करीत नाहीं, तो प्राणी या भवामध्यें अत्यंत क्लेशी होतो. भगवंतानें आपणांस कान दिले आहेत, तोंड दिलें आहे, तर त्यांचा उपयोग चांगल्या वस्तूकडे अवश्य केला पाहिजे. कानांनीं हरिनामाचें श्रवण केलें पाहिजे व तोंडानें हरिनामाचा गजर केला पाहिजे.

मुख कियो सूमरनकूं, सुननेकूं कियो कान ॥
तरनेकूं कियो लीनता, डुबनेकूं अभिमान ॥

या प्रकारचा उपदेश कबिरानें केला आहे. परंतु, सर्वकाल अनीतीचें वर्तन करून हरिनामस्मरण केल्यानें गति मिळेल काय? नाहीं. कारण तसल्या प्रकारची भक्ति ती दांभिक भक्ति होय. जेथें अंतःकरणांत परमेश्वरासंबंधीं कळकळ नाहीं; तें स्मरण सर्व चावटीचे बोलानें भरलेलें आहे. मनुष्य चुकीस पात्र आहे, वारंवार त्याच्या हातून चुका घडत असतात. तर चुकून कोणाकडून वाईट कर्म घडलें व त्याच्या अंतःकरणापासून जर त्यास अनुताप झाला, व त्यापासून ईश्वरभजनाकडे प्रवृत्ति वळून जर प्राण्याचें अंतःकरण नामघोषानें द्रवून गेलें, तर त्यास जगताचा दयाळू पिता टाकून देणार नाहीं. ह्मणून त्या शांतिधाम जगन्नियंत्या पित्यास आपण नामभजनेंकरून स-

तत आळवूं व आपलें इहलोकचें आणि परलोकचें सार्थक करूं. यापेक्षां कल्याणकारक दुसरें कोणतेंच साधन नाहीं.

---

## आयुष्यक्रम.

**बालस्तावत्क्रीडासक्त स्तरुणस्तावत्तरुणिरक्तः ॥**
**वृद्धस्तावच्चिंतामग्नः परे ब्रह्मणी कोऽपि न लग्नः ॥**

चर्पटपंजरी.

सर्व सृष्टीमध्यें मनुष्यप्राणी श्रेष्ठ होय, हें अगदीं निर्विवाद आहे. तेव्हां त्यानें आपल्या योग्यतेनुरूप आयुष्याचा क्रम ठेविला पाहिजे हें त्याचें कर्तव्य होय. पण, त्याचें सर्व आयुष्य केवळ संसारांत गर्क होऊन त्याच्या सर्व आयुष्याचीही वांटणी झाली आहे. बालपण, तारुण्य आणि वृद्धपण या आयुष्याच्या तीन अवस्था होत. उपजल्यापासून तों अंत होईपर्यंत मनुष्य या तिन्ही अवस्थांतील संसारकर्मांत गुंतून जातो व त्यास ईश्वरानें दयाळू होऊन जी ज्ञानरूपी अमोलिक देणगी दिली आहे, तिचें सार्थक करण्याचें त्यास भान रहात नाहीं. आतां याजवर अशी शंका येते कीं, संसार करण्याला मनुष्यास ज्ञानाची गरज लागत नाहीं कीं काय? कारण, संसाराची ठाकठीक करण्यास आणि तो सुयंत्र चालविण्यास हजारों तऱ्हेच्या युक्ति आणि कल्पना लढवाव्या लागतात व शेंकडों तऱ्हेचीं हुन्नरें करावीं लागतात. तेव्हां या गोष्टी ज्ञानावांचून कशा होतील? आतां ही शंका सकृद्दर्शनीं खरी वाटेल. कारण, शेंकडों युक्ति लढवून आणि खऱ्या

खाण्याचा विधिनिषेध न बाळगतां धनार्जनाचे योगानें मनुष्य आपल्यास शहाणा व ज्ञानी ह्मणवितो, तेव्हां अशा शहाणपणानें संसार करणारास अज्ञानी ह्मटलें असतां तसें ह्मणणें लोकांस चमत्कारिक वाटेल. आतां संसारांत तरी ज्ञानाचा उपयोग लागत नाहीं असें नाहीं. त्यांतही शहाणपणाची गरज लागते. व मनुष्य आपल्या अकलेप्रमाणें संसार थाटतो हेंही खरें. पण, मनुष्याच्या ज्ञानाची परीक्षा केवळ संसाराचे थाटामाटावरून करितां येत नाहीं. संतति, संपत्ति, गाड्या, घोडे, वतनवाड्या वगैरे सर्व अनुकूळ असलें ह्मणजे तो मनुष्य ज्ञानी; आणि वेळेवर ज्याला खाण्यापुरतें अन्न आणि नेसण्यास वस्त्र मिळण्याची मारामार पडते तो अज्ञानी असें ह्मणतां येईल काय? शिवाजी राज्यपदावर अरूढ होऊन अनेक तऱ्हेचे भोग भोगीत होता व रामदास स्वामी कौपिन परिधान करून गिरिगव्हरांतून हिंडत होते. पण, यांत ज्ञानी ही श्रेष्ठ पदवी कोणाला होती? येवढा मोठा ऐश्वर्यसंपन्न शिवाजी राजा; पण तो स्वामीच्या मागें हिंडत असे, याचें कारण काय? आतां समर्थ ज्ञानी होते आणि शिवाजीला ज्ञान नव्हतें असें नाहीं. दोघेही ज्ञानसंपन्नच होते. पण, समर्थांच्या ज्ञानाचें सार्थक झालें होतें; आणि शिवाजीच्या ज्ञानावर संसारपटलाचें आच्छादन पडलें होतें. तेव्हां जो मनुष्य संसारसंबंधांतच आपल्या आयुष्याचा क्रम ठेवितो, त्यानें आपल्या ज्ञानाचें सार्थक केलें असें ह्मणतां येणार नाहीं. पण, या संसाररूप आमिषास भुलून देहाच्या त्रयावस्थांतच मनुष्य गोंधळून जातो. या अवस्थात्रयानें मनुष्याची वांटणी करून घेतली आहे.

मनुष्य उत्पन्न झाल्यानंतर बाल्यदशेंत असतो तोंपर्यंत अनेक तऱ्हेच्या क्रीडा करून आपलें रंजन करून घेतो. अनेक तऱ्हेचीं शास्त्रें, अनेक तऱ्हेच्या विद्या आणि अनेक तऱ्हेचीं कलाकौशल्यें त्यानें शिकावीं, ह्मणून त्याच्या आईबापांचा व त्याच्या पालकांचा त्याचे मागें मोठा तगादा असतो. बाल्यदशेचा कांहीं भाग तर मूत्रपुरीषादिकांत लोळूनच काढावा लागतो. त्या प्रसंगीं त्यास अनेक तऱ्हेच्या पीडा होत असतां स्वमुखानें सांगण्यास वाचा व समजण्यास अक्कल नसल्यामुळें त्या अवस्थेंत तो अनेक क्लेश पावतो. वैद्यानें अनुमानानें दिलेल्या औषधानें केव्हां केव्हां त्यास रोग असतो एक, व औषध पोंचतें भलतेंच; अशा अति अज्ञान स्थितींत कांहीं दिवस घालविल्यावर पुढें हा नरकांतील किडा बाहेर पडून शब्द व्यवहारादि करूं लागतो. त्यास थोडीशी अक्कल येऊन कांहीं धारणशक्ति अंगीं आली ह्मणजे विद्यासंपादनार्थ यत्न करावा लागतो. पुढें कांहीं काळ अनेक तऱ्हेचे खेळ खेळण्यांत व कांहीं विद्यासंपादनांत मिळून त्याची बाल्यदशा पूर्ण होते. या बाल्यदशेंत तो आपल्या बुद्धीप्रमाणें आणि धारणशक्तीप्रमाणें विद्या संपादन करितो. या विद्या किंवा कला त्यास पुढें प्रपंचांत गुंतविण्यास कारण असतात. यांत ईश्वरविषयक भाग फारच थोडा असतो.

अशा रीतीनें बाळपण निघून गेल्यावर तारुण्यदशेची छाया पडून त्याचें चित्त संसाराकडे लागतें. संसार ह्मटला ह्मणजे कांता आणि कनक यांचें मिश्रण होय. या दोन वस्तूंचे अंगीं इतकी मोहक शक्ति आणि इतका माद

आहे कीं, त्यांच्या तडाक्यांत सांपडलेल्या मनुष्याचें ज्ञान परमार्थाविषयीं आकुंचित झाल्यावांचून राहत नाहीं.

बापाचा सर्व व्यवहार मुलगा चालवूं लागला, खतेंपत्रें, देवघेवं वगैरे सर्व नीटनेटकीं करूं लागला, ह्मणजे मुलानें आपले डोक्यावरचा भार कमी केला असें बाप समजतो; आणि संसारसंबंधानें पहातां असें समजणेंही रास्त आहे. कारण सत्पुत्र हें संसारसुखाचें प्राधान्य अंगेंच आहे. संसारी पुरुषास सर्व गोष्टी अनुकूल असल्या ह्मणजे त्याचें संसारांत तरी सार्थक होतें. एका कवीनें ह्मटलें आहे—

**सूनुःसच्चरितः सती प्रियतमा स्वामी प्रसादोन्मुखः । सन्मित्रं सधनं स्वयोषिति रतिश्चाज्ञापराः सेवकाः ॥ आतिथ्यं शिवपूजनं प्रतिदिनं मिष्टान्नपानं गृहे । साधोः संगमुपासते हि सततं धन्यो गृहस्थाश्रमः ॥ १ ॥**

पुत्र सुशील, स्त्री पतिव्रता असून प्रीति करणारी, स्वामी प्रसन्नमुख, मित्र चांगला, संसारास यथेच्छ संपत्ति, स्वस्त्रीच्याठायीं विषयभोग, आज्ञाधारक असे सेवक, तसेंच अतिथीचा आदरसत्कार, शंकराची पूजा, सुग्रास भोजन आणि सत्पुरुषांचा समागम इतक्या सर्व गोष्टी गृहस्थाश्रमामध्यें ज्यास अनुकूळ असतील तो पुरुष खरोखर धन्य होय. तेव्हां अशा तऱ्हेचा जर संसार असेल, तर त्या संसारांत राहण्याचें कांहीं तरी सार्थक असतें. पण, अशा

अनुकूळ गोष्टी असणें फारच दुर्मीळ होय. मोठ्या सार्वभौम राजालाही त्यांची अनुकूलता नसते. संसारसुख हें अनेक वस्तूंवर अवलंबून असल्यामुळें त्यांत जर एखादे वस्तूची उणीव पडली, तर त्यापासून तो संसार तापत्रयास कारण होतो. मग जेथें सर्वत्र गोष्टींची उणीव असते, तेथें संसारसुख कशाला विचारावें? संसारांत दुःखानुभवच प्राधान्य असतो. एका कवीनें ह्मटलें आहे—

**क्रोशंतः शिशवः सवारिसदनं पंकावृतं चांगणं । शय्या दंशवती च रुक्षमशनं धूमेन पूर्णं गृहं ॥ भार्या निष्ठुरभाषिणी प्रभुरपि क्रोधेन पूर्णः सदा । स्नानं शीतलवारिणा हि सततं धिग्धिग्गृहस्थाश्रमम् ॥ १ ॥**

घरामध्यें पोरांची रडारड, घर ओलानें फिणफिणलेलें, अंगणांत खत पडलेलें, अंथरूण ढेंकूण पिस्वांनीं भरलेलें खाण्याला कदान्न, घरामध्यें धूरकोंड, कर्कश भाषण करणारी स्त्री, धनी क्रोधदृष्टी आणि नेहमीं थंड पाण्याचें स्नान अशा स्थितीच्या गृहस्थाश्रमाला धिःकार असो. पण, अशी स्थिति असतां मृगजळाला भुलून तृषाक्रांत झालेलें श्वापद ज्याप्रमाणें धापा टाकीत पाणी मिळेल या आशेनें तिकडे धांवत असतें, तद्वत या संसारांत सुखाशेनें मनुष्य आपल्यास जास्त जास्त गुंतवून घेत असतो. द्रव्यार्जनाचा एक यत्न फसला तर दुसरा करतो, दुसरा फसल्यास तिसरा करतो, एक बायको बिघडली किंवा मेली तर दुसरी, तिसरी, याप्रमाणें शेंकडों करतो, एक

पुत्र वाईट निघाल्यास नवीन संततीची आशा बाळगून क्रम चालवितो व एका कामांत नुकसान पोंचल्यास दुसऱ्या कामांत फायदा होईल ह्मणून यत्न करीत असतो. परंतु—

**सुख सुख ह्मणतां तें दुःख ठाकोनि आलें ॥**

या समर्थांच्या • सिद्धांताप्रमाणें आयुष्यमर्यादित याला सुखाचा अनुभव घडणें कठीण. भास सुखाचा आणि अनुभवे दुःखाचा अशी स्थिति होते. आतां या सुखोत्पादक वस्तूंत प्राधान्य कनक आणि कांता हीं दोनच हीत. त्यांतही कनकरूपी आमिष फारच मोहक आहे. या आमिषास भुलूनच संपन्न पुरुषाच्या भोंवतीं स्त्री, पुत्र, आप्त. मित्र वगैरे मंडळींचा वेढा पडलेला असतो. जोशीबुवांनीं आपल्या लावणींत ह्मटलें आहे—

**रांडा पोरें वंचक चोरें जंवर मिळविति तंवर थवा ॥ शितें तंवर तीं भुतें भोंवतीं कोण कुणाचा सखा जिवा ॥ जोंवरि पैसा तोंवरि वैसा मंचकिं ह्मणतिल ध्याल हवा ॥ वेटा वेटी हातिं नरोटी देतिल हा खुप समज ठेवा ॥ कनक धनाचा मद मदनाचा वोसरल्यावर रंग फिका ॥ रुका न पदरीं त्रिकाल घर मग विलास भरजरि कुडुन दुका ॥ गजरथ घोडा कलगी तोडा पायीं जोडा लाल झुका ॥ तोडा जाउन खोडा येइल बसेल**

एखादा धरम धका ॥ रांडा आतां मांडा धारिति खांदा ह्मणातिल करा चुना ॥ मूल कुणाचें मूल तुह्मांला चूल चालती तंवर ह्मणा ॥ दारजनांला हार नगांचे भाग मुलिस मुलग्यास तुरा ॥ द्याल पुनः जरि द्याल न देतिल तुह्मासि सांतिल जरा चुरा ॥ कां मरतां धनलोभें फिरतां पुरता याचा शोध करा ॥ कोण तुह्मांला वाली तो,वनमाळी लाविल पैल तिरा ॥ १ ॥

तेव्हां ज्या धनाशेनें स्त्रीपुत्रादिक भुतावळ भोंवतीं जमते, त्या धनार्जनासाठीं पुरुषांचें सर्व तारुण्य खर्च होतें. धनाप्रमाणेंच स्त्रियाही तरुण पुरुषांचें चित्त मोहित करून टाकितात. सारांश, कांता आणि कनक हे पुरुषाच्या चित्ताकर्षणास पाश असून त्यांत त्याच्या सर्व तारुण्याचें निमज्जन होतें. त्याच्या तारुण्यदशेमध्यें तो आपल्या भोंवतीं इतके व्याप संपादन करितो कीं, त्याची निरवानिरव करण्यास त्याचें तारुण्यही पुरत नाहीं. मग वृद्धावस्थेची छाया पडत चालली ह्मणजे त्यास तारुण्यांतील खटपटी उरकत नाहींशा होतात. आणि प्रारब्धकार्यें पुरीं झाल्यावांचून तर गत्यंतर नसतें; यामुळें त्याची सर्व त्रेधा उडून जाते. मग अशा स्थितींतील मनुष्य ह्मणत असतोः—काय करावें बुवा? आतां वयपरत्वें ही खटपट तर आह्मांला उरकत नाहीं आणि हा भार कोणाचे गळ्यांत घालण्यासारखा मनुष्यही नाहीं. असें ह्मणून नेहमीं

चिंता करीत असतो. तशांतून वृद्धावस्थेंत संतान वगैरे नसून कुटुंबही निवर्तलें, ह्मणजे मग त्या पुरुषास पुनः विवाहाची इच्छा होते. इकडे यमाजीभास्कराकडल्या ख्यात्याची तोंडमिळवणी होऊन राजश्रीचीं लांकडें तर स्मशानांत पोंचलीं असतात; आणि मग तरुण पत्नीशीं गांठ घालण्याची उमेद येते. तेव्हां त्या प्रसंगीं कशी फजिती उडते याचा अनुभव पुष्कळांस आहे. असो, तेव्हां तात्पर्य काय कीं, तारुण्यांतील संसारसंबंधी कामें अपुरीं राहूनच पुरुषावर वृद्धावस्थेची छाया पडते. सर्व तारुण्य कांता-कनकाच्या अभिलाषानें आणि उपभोगानें निघून जातें. मिळून बाल्यदशा आणि तारुण्य ह्या दोन्हीही अवस्थांत पुरुष केवळ संसारसंबंधांतच गर्क होऊन परमेश्वराविषयीं विचार करण्यास त्यास सवडच होत नाहीं. बहुधा तें काम ह्मातारपणावर लोटण्याची चाल आहे. वृद्ध पुरुष परमार्थमार्गास लागल्याचें पुष्कळांस माहीत असेल. पण, तो परमार्थमार्ग ह्मणजे कथा पुराण वगैरे ऐकण्याकारितां जाणें किंवा काशियात्रादिक करणें हाच होय. तो परमार्थमार्गास लागण्याचें कारण त्यास संसाराविषयीं उपरती झाली असते असें नाहीं. तर त्याची संसारेच्छा वृद्धींगतच होत असते. पण, संसारच त्याचा तिरस्कारा करितो. ह्मणजे वृद्ध पुरुषाची स्त्रीपुत्राविषयीं कळकळ कमी होते असें नाहीं. पण, तींच त्या वृद्धाला कंटाळतात. कारण, सर्व जन केवळ आपापले उपयोगार्थच झटत असतात. वृद्ध पुरुषाचा कांहीं उपयोग नसल्यामुळें तो तिरस्कारास पात्र होणें साहजीक आहे. एका कवीनें ह्मटलें आहे:—

जन हें सुखाचें दिल्या घेतल्याचें । शा अं-
तकाळींचें कोणी नाहीं ॥ झाल्या हीन श-
क्ती नाकडोळे गळती । सांडोनीया पळती
रांडा पोरें ॥ बाईल ह्मणे खर मरता तरी
बरें । नासीलें हें घर थुंकोनीया ॥ १ ॥

जोंपर्यंत इंद्रियें सदृढ आहेत, शरीरावर तेज आहे, चार पैसे मिळविण्याची अंगांत ताकद आहे, संसाराचा भार शिरावर घेऊन तो झेंपण्याचा जोर आहे, तोंपर्यंतच पुरुषावर कुटुंबांतील मनुष्यें प्रीति करितात. पण, वृद्धावस्थेंत इंद्रियेंच गलित होतात. वृद्धावस्थेमध्यें मनुष्याची स्थिति अशी होते—

गात्रं संकुचितं गतिर्विगलिता भ्रष्टाच दंता-
वलि-र्दृष्टिनश्या वर्धते बधिरता वक्त्रंच लाला-
यते ॥ वाक्यं नाद्रियतेच बांधवजनैर्भार्या न
सुश्रूषते । हा कष्टं पुरुषस्य जीर्णवयसः
पुत्रोप्यमित्रायते ॥ १ ॥

शरीर निस्तेज होऊन त्याजवर सुरकुत्या पडल्या, चालतांना अडखळूं लागला, तोंडाचें बोळकें झालें, मांद्य आलें, कानानें ऐकूं येत नाहींसें झालें, तोंडांतून लाळ गळूं लागली, बंधुवर्ग उपमर्द करूं लागले, स्त्री सेवा करीत नाहींशी झाली व पुत्रही शत्रुत्वानें वागूं लागले. तस्मात वृद्धावस्था ही पुरुषास अतिशय दुःखदायक होय. परंतु,

अशी स्थिति प्राप्त झाली असतांही पुरुषाची संसारसंबंधी उमेद कमी होत नाहीं. त्याची आशा दिवसेंदिवस वाढतच असते. एका कवीनें ह्मटलें आहे कीं:—

> अंगं गलितं पलितं मुंडं दशनविहीनं जातं तुंडं ॥ वृद्धो याति गृहीत्वा दंडं तदपि न मुंचत्याशा पिंडं ॥ १ ॥

तेव्हां आशापाशानें मनुष्य अशा तऱ्हेनें ग्रस्त होऊन अंतकाळपर्यंत खपतच असतो. परंतु, परमार्थाकडे यत्किंचितही लक्ष्य देत नाहीं. स्त्रीपुत्रादिक मरण पावलीं ह्मणून शोक करितो. परंतु, स्वतःचे आयुष्याचा जो नाश होत असतो, त्याजबद्दल विचार करीत नाहीं. आणि मरणाची घडी जवळ आली ह्मणजे यमदूतांची जाचणूक मनांत आणून भयाभीत होतो. पण, मृत्यूची ती पर्वा काय ह्मणून करावी? कारण, मृत्यूनें कोणासही सोडलें नाहीं. समर्थांनीं ह्मटलें आहे—

> कोणें कोणासीं रडावें । एका मागें एकें जावें ॥ एक वेळ गेली माता । एक वेळ गेला पिता ॥ द्रव्य दारा जाती पुत्र ॥ जिवलग आणि मित्र ॥ प्राणी संसारासीं आला । तितुका मृत्युपंथें गेला ॥ पूर्वज गेले देवापाशीं । तोच वाट आपणांसीं ॥ १ ॥

तेव्हां मृत्यूचा हा असा क्रमच आहे. जो प्राणी उत्पन्न

झाला, तो मृत्युपंथास जावयाचा हा सिद्धांतच आहे. याकरितां मनुष्यानें जन्मास आल्याचें कांहीं तरी सार्थक केलें पाहिजे. उदरपूरण आणि विषयोपभोग हे पशुपक्षांतही आहेत. तीं कृत्यें करण्यांत मनुष्याचा मोठासा धोरपणा नाहीं. स्त्रीपुत्रादिकांचा अंतीं कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं. याकरितां त्यांच्या पाशांत गुंतून राहणें व्यर्थ होय. ह्मटलें आहे:—

**व्यर्थ मायाजाळीं गुंतोनी राहसी । हित गमाविसी आपुलें तें ॥ गृह दारा सुत नव्हेत अंतींचीं । मग इतरांची काय आशा ॥ सर्व हें सांडोनी जाशी बा ह्मणीं । काळ तो बांधोनी नेई तूज ॥ १ ॥**

तेव्हां अंतीं यांपैकीं कोणीही उपयोगीं पडावयाचीं नाहींत. जोंपर्यंत प्राणी संसारांत असतो व जोंपावेतों त्याची चलती असते, तोंपर्यंत त्या पुरुषापासून ज्या आप्तादिकांस वगैरे लाभ असतो, तीं त्यास जीवापरता लेखितात. परंतु. अंतकाळीं यांच्यापैकीं कोणाचाही उपयोग होत नाहीं. अशा मनुष्याच्या मरणानंतर स्वतःचे नुकसानीकरितां मात्र सारीं रडतात. पण, त्या पुरुषानें यावज्जीव कुटुंबपोषण करून आत्म्याचें कांहींएक कल्याण केलें नाहीं; ह्मणून कोणास यत्किंचित्‌ही दुःख होत नाहीं. अंतकाळीं दुःखाचा भोक्ता प्राणी एकटाच होय. त्या दुःखाचा वांटा घेण्यास कोणीही उपयोगीं पडत नाहींत.

तेव्हां तात्पर्य काय कीं, पुरुषानें आपल्या सर्व आयु-

ष्याचा क्रम केवळ संसारांतच ठेवून उपयोग नाहीं. वया-च्या तीनही अवस्था जर प्रपंचाचेच खटपटींत संपल्या, तर मग आत्मकल्याण करण्याची वेळ ती कोणती? आतां या आत्मविचारास संसाराचा त्याग केला पाहिजे, असें नाहीं. संसारांत राहूनच ईश्वराकडे लक्ष्य दिलें पाहिजे. ज्यानें ही सर्व सृष्टी निर्माण केली, त्यास ओळखिलें तरच त्याला मनुष्य ह्मणावें. समर्थांनीं ह्मटलें आहेः—

**कोणें केलें चराचर। कोण विश्वाचा आधार॥ ब्रह्मादिकांचा निर्मिता। कोण आहे त्या परता॥ जया ज्ञान हें नेणवे। पशु तयासीं ह्मणावें॥ १॥**

तेव्हां तात्पर्य काय कीं, आत्मकल्याणाकडे लक्ष्य देणें हें मनुष्याचें कर्तव्य होय. कारण, मनुष्यास जी विचार-शक्ति दिली आहे, तिचा मुख्य उपयोग ह्मटला ह्मणजेः— मी कोण, हें सर्व दृश्य जगत् कसें उत्पन्न झालें, याचा कर्ता कोण वगैरे गोष्टींचा विचार करणें हाच खरोखर विचार होय. आज पोट भरलें उद्यां कसें भरेल, बायको कशी मिळेल, मूल कसें होईल, संसार कसा चालेल, माझ्या मरणानंतर बायका-पोरांचें संरक्षण कसें होईल, वतनवाडीची देखरेख कोण करील इत्यादि विचार खरो-खर व्यर्थ होत. कारण, ज्या गोष्टी मनुष्याचे हातांत नाहींत, सहजगत्या होणाऱ्या असतात, त्याजबद्दल वि-चार करण्यांत अर्थ काय? तर ज्या विचाराच्या योगानें आत्मकल्याण होण्यासारखें असतें व त्याच कामाकरितां

जर ईश्वरानें विचार दिला आहे, तर त्याचा योग्य विनियोग झाला पाहिजे. ह्मणजे विचार करण्याची शक्ति उत्पन्न झाल्यापासून मनुष्यानें संसारांत असूनही क्षणोक्षणीं हा विचार केला पाहिजे. संसारांत राहूनच विरक्त असलें पाहिजे. परंतु, मनुष्याच्या आयुष्याचा क्रम केवळ संसारसंबंधानेंच असतो. साठ घटिकांचें जर वेळापत्रक केलें, तर त्यांत ईश्वरचिंतनाच्या घटिका किती बरें निघतील? ज्यानें उत्पन्न केलें, त्याचें स्मरण करण्यास अहोरात्रींतून एक घटिका तरी खर्चावयास नको काय? तुकारामबुवा ह्मणतातः—

**ठायींच बैसोनी करा एक चित्त ॥ आवडी अनंत आळवावा ॥ १ ॥ नलगे सायास जाणें वनांतरा ॥ सुखें येतो घरा नारायण ॥ २ ॥**

---

## बोधरत्नाकर.

( यांतील बोध स्मरणांत ठेवून आचरणांतही आणावा. )

दीनदयाळ अशा सर्वव्यापी परमेश्वरानें जगांतील सर्व प्राण्यांस मोठ्या दयाळूपणानें उत्पन्न केलें आहे. तरी पण, हा मनुष्यदेह निर्माण करण्यांत त्याचे अनेक इष्ट हेतु असावेत. बोलतां येणें, शहाणपणानें वागणें, हातानें पाहिजे तें काम करितां येणें, अनेक भाषा शिकणें, परमेश्वराचे गुणानुवाद गाणें, त्याची प्राप्ति करून घेणें, पाहिजे त्या प्राण्यास आपल्या ताब्यांत ठेवणें वगैरे अनेक

चांगल्या गोष्टी करण्याची शक्ति मनुष्यमात्रास देवानें दिली आहे. ह्मणून तिचा योग्य उपयोग आपण करून सकाळीं, मध्याकाळीं आणि जेव्हां वेळ रिकामा मिळेल तेव्हां त्या सच्चिदानंद प्रभूचें स्तवन केलेंच पाहिजे.

१ आपलें मन व आपली वासना सार्वकाल पापानें मलिन होत असते; ह्मणून माशी जशी पायानें आपले पंख साफ करीत असते, तसें आपलें मन व वासना विचारानें साफ करीत असा.

२ ईश्वरास व पापास भिणाऱ्या मनुष्यास लोक भोळा समजतात; आणि त्याचा अधिक छळ करूं लागतात. तथापि, तुह्मीं ईश्वरास व पापास भिणें कधींही सोडूं नका. त्यांतच शेवटीं सुख व समाधान आहे, असें तुमच्या अनुभवास येईल.

३ मोठ्या श्रीमंतांचीही मर्जी एक आण्यासाठीं जाईल, ह्मणून त्यांच्या आण्याकरितां तुमचे चार आणे पाहिजे तर घालवा; पण त्यांचा एक आणा राखा. हे श्रीमंत आहेत, यांस एक आणा ह्मणजे काय आहे? असें कधींही मनांत आणूं नका. कारण, तुमच्यापेक्षां त्यांस एक आणा जास्त आहे, हें पक्कें समजा आणि तसा हिशेब ठेवा.

४ पापी व दुर्व्यसनी मनुष्यांच्या वाऱ्यासही उभे राहूं नका. त्यांच्या अंगावरचा वाराही तुह्मांला त्यांजवळ ओढून नेईल. तो सुगंध असला तर दुर्गंध समजा; आणि त्यापासून दूर रहा.

५ थोडें बोला, पण गोड आणि खरें बोला.

६ कोणाबरोबर पैशाचा अथवा देण्याघेण्याचा व्यवहार

करितांना तो जरी भला दिमत असला, तरी समयास तो बदलला तर कसा परिणाम होईल हें मनांत आणून व्यवहार करा. गरजेच्या वेळेस मनुष्यें एक प्रकारचीं असतात व गरज सरतांच दुसऱ्या प्रकारचीं होतात.

७ खऱ्यास धोका नाहीं व खोट्यास निश्चितपणा नाहीं. ह्मणून जर तुह्मांस शांति व सुख पाहिजे, तर चोख व्यवहार ठेवून मिळेल त्यांत संतुष्ट रहा.

८ पुढें होणाऱ्या मोठ्या लाभासाठीं तूर्त होत असलेला अर्धा लाभ सोडूं नका.

९ जोंपर्यंत सोसवेल तों नुकसान सोसा; पण कोर्टाची पायरी सहसा चढूं नका. संभावित मनुष्यास त्या बुडीपेक्षां कोर्टाच्या दगदगीचें दुःख जास्त सोसावें लागतें.

१० तुमची प्राप्ति कितीही असो; पण त्यांतील थोडी तरी शिल्लक ठेवून बाकीच्यांत कसाही निर्वाह करा. अडचणीच्या वेळेस तीच शिल्लक तुह्मांला उपयोगीं पडेल हें पक्कें लक्ष्यांत बाळगा.

११ कर्ज काढण्याचा प्रसंग कधींही आणूं नका. आलाच तर होतां होईल तों टाळा. या प्रपंचांत कर्जासारखीं कठीण दुःखें दुसरीं थोडींच आहेत. शिल्लक वाढविण्याकरितां कृपणपणा करूं नका. द्रव्याचा बरोबर खर्च करण्यास तर विचार व शहाणपणा पाहिजेच पाहिजे, पण धर्मकृत्यें करण्यांतही तो असला पाहिजे. बडेजाव मिळविण्याकरितां सनाथांस पुष्कळ धर्म करण्यापेक्षां अनाथांस थोडा धर्म करण्यांत जास्त फायदा आहे. निरोग्यास औषध देण्यापासून कांहीं एक उपयोग नाहीं.

१२ गरिबींत असून सर्व घरचीं मनुष्यें हंसून खेळून नुसती

मीठभाकर जरी खाऊन एकत्र मिळून असलीं, तरी तें कुटुंब मोठें भाग्याचें समजलें पाहिजे; आणि मोठ्या वाड्यांत राहून नित्य भांडण करून पोळ्यापक्वान्नाबरोबर दांत ओंठ खाऊं लागलीं, तर तीं कुटुंबें अगदीं दुर्दैवी समजलीं पाहिजेत. कारण, अशा गरिबीच्या मीठभाकरींत जें सुख आहे, तें तशा श्रीमंतीच्या पोळ्यापक्वान्नांत नाहीं.

१३ घरांत संसाराच्या उपयोगीं पडणारे असे पदार्थ व सामानसुमान थोडेंच असावें; पण तें नीटनेटकें व साफ असावें.

१४ ज्या जिनसा तुह्मांला तूर्त उपयोगीं नाहींत, त्या घेण्यांत उगीच पैसा घालवूं नका. निरुपयोगी पदार्थ घेणें व पदरचा पैसा घालविणें हें योग्य नाहीं.

१५ विद्या जशी द्रव्यसंपादनास अवश्य आहे, तशीच ती द्रव्यरक्षणासही उपयोगीं आहे. ह्मणून श्रीमंतांनीं व गरिबांनीं आपापल्या मुलांस विद्या शिकविण्याच्या कामीं आळस करूं नये.

१६ संपत्तीची विपुलता व धंद्यारोजगाराची भरभराट असली, तर सोयरेधायरे व इष्टमित्र यांस तोटा नसतो. परंतु, दुर्दैवाच्या फेऱ्यामुळें आपणास कदाचित् दारिद्र्य आलें, तर त्या वेळीं एकही सोयरा किंवा इष्टमित्र उपयोगीं पडत नाहीं. अशा वेळीं आई-बाप-बायको-मुलें-बहीण-भाऊ यांपैकींच कोणी टिकलें तर टिकेल. तळें किंवा विहीर भरलेली असेपर्यंत त्याजवळ माणसांच्या झुंडीच्या झुंडी जातात. तीच कोरडी पडली ह्मणजे तिकडे कोणी ढुंकूनदेखील पहात नाहींत.

१७ ज्वानींत असतां मनुष्याच्या मनास दोन ओढी सार-

ल्या लागलेल्या असतात. एकीकडे उदरनिर्वाहाकरितां धंदारोजगार करण्याचें कार्य व दुसरीकडे ख्यालीखुशाली व विषयोपभोग भोगण्याची अनावर इच्छा. जो विचारी असेल, तो पहिल्या ओढीकडे जाईल व सुख भोगील. अविचारी दुसरीकडे जाऊन हालअपेष्टांत दिवस घालवील.

१८ सर्व आयुष्यांत या ज्वानीच्या वेळीं ह्मणजे १२ वर्षें वयापासून तें २५ निदान ३० वर्षांपर्यंत फारच सावधपणें वागलें पाहिजे.

१९ परमार्थाविषयीं व ईश्वरभक्तीविषयीं काळाचा अगदीं नियम नाहीं. मरणाला वय सारखें आहे, हें ध्यानांत ठेवून ईश्वरभक्ति करण्यास अगदीं विलंब लावूं नका. शहाणे व विचारी, परमार्थ व ईश्वरभक्ति साधण्याविषयीं पुढल्या भरंवशावर मुळींच राहात नाहींत.

२० कांहींच न केल्यामुळें होणाऱ्या अपजयापेक्षां दीर्घ श्रम करून होणारा अपजय शोभतो.

२१ जेव्हां एखाद्या मनुष्याची निंदा होते, तेव्हां त्याच्या धैर्यावर पुष्कळ अवलंबून असतें. दुर्बळ मनाचे पुरुष निंदेनें खालीं बसतात; पण धैर्यवान पुरुष तसाच नेट धरून विजयशाली होतात.

२२ नित्य सत्य बोला. खोटें बोलण्यापेक्षां सत्य बोलणें पुष्कळ सोपें आहे.

२३ तरणे आपण काय करितों हें सांगतात, ह्मातारे आपण काय केलें हें सांगतात व मूर्ख आपण काय करणार हें सांगतात.

२४ जो मनुष्य आपल्या मुलांस उद्योगाची संवय लावतो, तो त्यांच्यासाठीं द्रव्यभांडारापेक्षांही जास्त पुरवठा करितो.

२५ दुसऱ्याच्या दुर्गुणाची लोक निंदा करितात; ते दुर्गुण जर ते स्वतः सोडून देतील, तर त्यांची मोठी कीर्ति होईल.

२६ तुह्मीं स्मशानांत जाण्यापूर्वीं तुमचे दुर्गुण स्मशानांत गेले कीं नाहीं, हें अगोदर पहा.

२७ कारणें सांगून केलेली स्तुति, दुप्पट स्तुति होय. व कारणें न सांगतां केलेली निंदा अर्धवट निंदा होय.

२८ रात्रीं निश्चय करणें सोपें; पण तेच दिवसा पाळणें फार कठीण.

२९ मनुष्याच्या बुद्धीवरून त्याची योग्यता मानूं नका, तर त्या बुद्धीचा तो जो उपयोग करितो त्यावरून माना.

३० माणसें जशीं दिसतात तशींच तीं असावींत; आणि जीं तशीं नसतील त्यांनीं तसें दिसूं नये.

३१ मनुष्यांत पांच लक्षणें आहेत; आणि पांचांचे पांच वैरी आहेत. पहिलें लक्षण विद्या, तिचा वैरी अहंकार. दुसरें दान, त्याचा वैरी शोक. तिसरें धैर्य, त्याचा वैरी लोभ. चवथें बुद्धि, त्याचा वैरी क्रोध. व पांचवें सत्य, त्याचा वैरी असत्य.

३२ मन आणि देह ह्यांमध्यें मन श्रेष्ठ आहे. एका कवीनें असें ह्मटलें आहे कीं, तें मनुष्याच्या पतनास आणि मुक्तीस कारण होत असतें.

३३ मनुष्य ज्या गोष्टींबद्दल दुसऱ्यांची थट्टा उडवितो, त्या गोष्टी नीट लक्ष्यांत धराव्या. कारण, त्याच गोष्टींबद्दल त्याची थट्टा केली असतां त्याला ती बिलकूल खपत नाहीं हें खास.

३४ अतिशयित संताप आला, किंवा अतिशयित दुःख झालें, ह्मणजे किंचित् भानावर येऊन असें मनांत आणा-

वें कीं, ह्या जगामध्यें आपल्याला फार वेळ रहावयाचें नाहीं, फार थोडा वेळ रहावयाचें आहे.

३५ आपला संबंध ज्या माणसांशीं पडतो, त्या माणसांच्या आंगच्या सद्गुणांचा मात्र आपण विचार करावा; त्यांच्या दुर्गुणांकडे पाहूं नये.

३६ तूं साधा, सरळ, सज्जन, अंतःकरणाचा निर्मळ, दंभरहित, निस्पृह आणि न्यायशील हो. असा एका कवीचा उपदेश आहे.

३७ प्रकाश आणि अंधःकार ह्यांमध्यें जितकी तफावत आहे, तितकीच ज्ञानी व मूर्ख ह्यांमध्यें आहे.

३८ अखिल जगाच्या तापत्रयांतून मुक्त होण्यासाठीं शय्यामंदिरांत जेव्हां निद्रादेवीची प्रार्थना करशील, तेव्हां दिवसभर केलेल्या सर्व कृत्यांचा हिशोब लाव. जर तुला दैव अनुकूल होऊन प्रत्येक गोष्टींत यश येऊं लागलें, तर एकदम नऊकोटनारायण होण्याची तूं हांव धरूं नको. थोडाच परंतु हळू हळू होणारा नफा, तुझें मन शांत ठेवून तुझ्या निर्वाहापुरता पैसा तुला सहज मिळवून देईल.

३९ मनाच्या तूं आधीन होऊं नकोस.

४० मनालाच तूं आपल्या स्वाधीन ठेव.

४१ वाजवीपेक्षां फाजील जेऊं नकोस.

४२ आरोग्याविषयीं दक्ष ऐस.

४३ ज्ञान संपादनार्थ सारखा झटत जा.

४४ चोर, चहाड, लबाड, मद्यपि, निंदक, अविचारी, दुर्वर्तनी, कपटी व भोंदू अशा लोकांशीं संबंध ठेवूं नको. कारण, असे लोक गोड बोलून केव्हां गळा कापतील व एखाद्या गरक्यांत आणून पाडतील याचा नियम नाहीं.

४५ आपलें वर्तन उत्तम प्रकारचें व्हावें अशी इच्छा असल्यास पुष्कळ श्रम करून मनोवृत्ति दाबांत ठेव, आणि स्वतःचें व दुसऱ्याचें यथाशक्ति कल्याण कर, ह्मणजे तुला 'कीर्तिमंदिरांत' अढळ असें उच्च पद मिळेल.

४६ निदानीचा आपला बाप, आई, धनी, इष्ट, सोयरा इ० परमेश्वराशिवाय कोणी नाहीं, असें निरंतर मनांत वागवून त्याचें स्मरण करण्यास जे चुकत नाहींत, त्यांस निरंतरचें सुख सहज मिळतें.

---

## धर्मानुज्ञा.

आमच्या या पूज्य व ईश्वरप्रणीत धर्मामध्यें सर्व जातींच्या स्त्री-पुरुषांस धर्मानुज्ञा सांगितल्या आहेत, त्यांपैकीं कांहीं येथें सांगतोः—

**सत्य**—निरंतर यत्नेंकरून सत्य भाषण करणें.

**दया**—दुर्बल प्राण्यांवर निष्कपटपणें यथाशक्ति उपकार करणें.

**तप**—एकादश्यादि व्रतोपवास करणें.

**शौच**—मृत्तिका, जल येणेंकरून गुद, हस्त, पाद व मुखादि प्रक्षालन करून शौच होणें.

**ईक्षा**—योग्य किंवा अयोग्य याचा विचार करून त्याप्रमाणें वागणें.

**अहिंसा**—कोणत्याही प्राण्यास शरीर, वाक्, मन यांहींकरून न दुखविणें.

**ब्रह्मचर्य**—परस्त्रीगमन निरंतर वर्ज करून स्वकीय

स्त्रीचे ठायीं ऋतुकाळींच गमन करावें. तसेंच स्त्रियांनीं परपुरुषांशीं अखंड गमन त्याग करून, लग्नाचा नवरा असेल त्याशींच ऋतुकाळीं रत होणें.

संतोष—प्रारब्धानें जें मिळेल त्यांत सुख मानणें.

श्रवण—ईश्वराच्या कथा श्रवण करणें.

कीर्तन—ईश्वराच्या कथा प्रेमपूर्वक गाणें.

स्मरण—परमेश्वराचें ध्यान करणें.

आत्मसमर्पण— आपलें शरीर बलिराजाप्रमाणें ईश्वरास अर्पण करणें व ईश्वराधीन राहणें.

इत्यादि धर्मानुज्ञा भागवतांत सप्तमस्कंधीं सांगितल्या आहेत. ह्या जितक्या यत्नेंकरून पाळतां येतील, तितक्या अबालवृद्धांनीं पाळाव्या.

---

## बोध, रूढि, आचार वगैरे.

आपल्या लोकांत प्रत्येक बाबतींत रूढि, आचार-विचार इत्यादि गोष्टींविषयीं जे नियम पाळले जातात, त्यांतील कांहींचा संग्रह आमच्या वाचकांकरितां येथें करितों.

१ आपणापेक्षां थोर माणसांबरोबर भाषण करिते वेळीं तें अनेकवचनीं असावें.

२ दिव्याची ज्योत दक्षिणेकडे करूं नये.

३ ढेंकर, जांभई किंवा शिंक आली असतां, तोंडावर पदर धरावा.

४ जांभईचे वेळीं हाताची चुटकी वाजवावी.

५ सुपारी फुंकून खावी. सगळी खाऊं नये.

६ पानाचें शेवट व शिरा काढून तें भक्षण करावें.

७ बिछान्यावर थुंकूं नये. व विझविते वेळीं ऊन पाणी ओतूं नये.

८ ग्रहणांत गर्भार बायकांनीं कांहींच चिरूं नये.

९ शौचास ऊन पाणी नेऊं नये.

१० दोघांमधून विस्तव नेऊं नये.

११ दाराची कडी वाजवूं नये.

१२ बाहेर गांवीं जाते वेळीं देवास नमस्कार करून जावें.

१३ तोंडानें दिवा फुंकूं नये.

१४ दूध गाळून उपयोगांत आणावें.

१५ शुक्रवारीं साखर मिसळून फुटाणे वांटावे.

१६ निजते वेळीं दक्षिणेस पाय करूं नये.

१७ दिव्याची वात हातानें सारूं नये.

१८ दिवा लावतांच 'शुभंकरोति' हा श्लोक ह्मणून दिव्यास व देवास नमस्कार करावा.

१९ रात्रीं आरशांत रूप पाहूं नये.

२० केरसुणीनें मारूं नये.

२१ शेंडीत नेहमीं गांठ असावी.

२२ सहाणेवरून गंध लावूं नये.

२३ न्हाण्याचे घरीं हजामत करवूं नये.

२४ पाण्यांत पाहूं नये.

२५ जातें किंवा मुसळ यांवर बसूं नये.

२६ उखळावर, उंबरठ्यावर किंवा जात्यावर सुपारी फोडूं नये.

२७ रात्रीं हिंग आणूं नये.

२८ लव्ही ओलांडूं नये.

२९ दहीं व गूळ एकत्र खाऊं नये.
३० कोणी निजलें असतां ओलांडूं नये.
३१ रात्रीं दहीं भक्षण करूं नये.
३२ प्रयाणकालीं दहीं भक्षण करावें.
३३ दांतानें नखें काढूं नयेत.
३४ तूप व तेल एका वेळीं आणूं नये.
३५ शनिवारीं त्रिव्यास शिवूं नये.
३६ भिंतीवर काळ्या रेघा काढूं नयेत.
३७ शौचास बसलें असतां बोलूं नये.
३८ गणेशचतुर्थी दिवशीं चंद्र पाहूं नये.
३९ दुधांत मीठ घालूं नये.
४० स्नान केल्यावर तिलक धारण करावा.
४१ पळसाचे पानावर चुना घेऊं नये.
४२ जेवतांना तोंड मटमट वाजवूं नये.

---

## महाराष्ट्रभाषेंतील वेंचीव ह्मणी.

अनुभवीक आणि उपदेशपर जीं वृद्धवचनें त्यांनाच ह्मणी असें ह्मणतात. ह्मणी हा भाषेचा अलंकार आहे. योग्य स्थलीं ह्मणींचा उपयोग झाल्यानें वक्त्याच्या भाषणास भारदस्तपणा येऊन श्रोत्यांच्या मनांवर त्याच्या भाषणाचा उत्तम ठसा वटला जाऊन उभय पक्षासही आल्हाद होतो. ह्मणींच्या योगानें भाषणांत चातुर्य विशेष दिसून येतें व ग्रंथास चमत्कारिक मनोरंजकता प्राप्त होते. ज्या भाषणांत ह्मणींचा उपयोग झाला नाहीं, तें

भाषण नीरस होतें. अन्न हें सामान्यतः गोड आहे. तथापि, त्यास मिठानें किंवा साखरेनें जशी विशेष गोडी येते, तसा म्हणींच्या योगानें भाषणास विलक्षण अलंकार प्राप्त होतो. जास्त पाल्हाळ न लावितां थोडक्यांत मतलब सांगणें झाल्यास म्हणींचा फारच उपयोग होतो. म्हणी ह्या उपदेशपर, मनोरंजक आणि अनुभवशीर असल्यामुळें किता घेण्यास योग्य आहेत.

नेहमींच्या भाषणांत म्हणींचा उपयोग होत असल्यामुळें त्या ऐकिव ज्ञानानेंच आजपर्यंत टिकल्या आहेत. स्त्रियांच्या भाषणांत तर ह्या म्हणींचा हरघडी उपयोग होतो. सारांश, वक्तृत्वशक्ति अंगीं येण्यास म्हणींची अतिशय अवश्यकता आहे, असें मनांत आणून येथें कांहीं म्हणींचा संग्रह केला आहे.

अक्कल नाहीं पण मुलगा तर दाणा आहे.

अचाट खाणें, मसणांत जाणें.

अभ्यास करील त्याची विद्या, जपेल त्याची लक्ष्मी, खपेल त्याचें शेत आणि मारील त्याची तरवार.

अरे तर कारे, अहो तर कांहो.

आधींच पिसें त्याचे हातीं दिलें कोलीत.

आधीं पहावें तोलून, मग दाखवावें बोलून.

आधीं बुद्धि जाते मग वैभव जातें.

आळशास दुप्पट काम आणि कृपणास दुप्पट खर्च.

आपभला तो जग भला.

उत्तम शेती पण धनी असावा खेतीं.

उंदराला मांजराची साक्ष.

एका मांडीवर चौऱ्यांशीं आसनें.

एकादशीच्या घरीं शिवरात्र.

कर्ज फार त्याला लाज नाहीं, उवा फार त्याला खाज नाहीं.

कसायास गाय धारजिणी.

काम ना धंदा आणि हरि गोविंदा.

कुत्तेकू खीर और गद्धेकू चपाती.

कुंभार तसा लोटा आणि बाप तसा बेटा.

कोणाच्या गाईम्हशी आणि कोणास उठाबशी.

खाईन तर तुपाशीं नाहीं तर उपाशीं.

खाऊन माजावें पण टाकून माजूं नये.

खाजवील त्याची खरूज, भांडेल त्याचा कज्जा.

खायास अगडबंब, म्हणण्यास मुखस्तंभ.

खालचीनें कुंथावें तों वरचाच कुंथतो.

गंध उगाळितां कष्टी पण आकडोनें भांग घोटी.

गातां गळा, शिंपितां मळा, लिहितां हातवळा.

गुरू पानतंबाखू मागे, शिष्या वाघाचें घर सांगे.

गेल्याचें घर आणि गेल्याची बायको.

घरचें मूल तसेंच ठेवून उपाध्या म्हणतो माझें आधीं लग्न करा.

घाईंत घाई, न्हाण आलें म्हातारे बाई.

घे आपली नथ, मी नाहीं बाईल होत.

जातीची सिदळ तीस कुंटण कशाला ?

ज्याची खावी भाकरी, त्याची करावी चाकरी.

ज्याच्या गळ्यांत सरी, तें सारी रात्र घोंकणी करी. आणि ज्याच्या गळ्यांत दोरी, तें सारी रात्र निद्रा करी.

ज्याला आहे भाकरी, त्याला कशाला पाहिजे चाकरी?

ज्यास बुद्धि नाहीं, त्यास भांडवल नाहीं.
तरुणपणीं शिंदळकी, आणि म्हातारपणीं कुंटणकी.
तुमचें तें आमचें, आणि आमचें तें आमचें.
तोंडापुर्ती आईबाई, आणि मागें शेण खाई.
दांट झालें पाणी घाला, पातळ झालें पीठ घाला.
दादल्यापेक्षां बाईल मोठी, मुसळ घेऊन लागली पाठी
दिवसा गंगाभागिरथी आणि रात्रीं सौभाग्यवती.
नपुंसकाच्या हाता पाद्मण.
नांव लक्ष्मी आणि वेंचिते गोंवऱ्या.
नांव सोनुबाई आणि हातीं कथलाचा वाळा.
नांव महीपती, तिळभर जागा नाहीं हातीं.
नेसेन तर पैठणीच नेसेन, नाहीं तर नागवीच बसेन.
पतिव्रता चांगुणा आणि शंभरांला एक उणा.
पाहिजे तें होतें, तर भिकारी भीक कां मागते ?
परस्त्री पराची माता.
पक्ष्यांत काऊ, माणसांत न्हाऊ.
पाट नाहीं बसायाला आणि रांगोळी कशाला ?
पानावर नाक आणि जानव्यांत हात.
पापाचा बाप पैका.
पोटासाठीं केलें ढोंग, तेथें कैंचा पांडुरंग.
फराळ केला म्हणजे जेवणाचें मात्र आणि अंगवस्त्र ठेविलें म्हणजे बायकोचें मात्र.
फाटकें नेसावें पण स्वतंत्र असावें.
फार झालें, हसूं आलें.
फुकटचा गाल आणि केला लाल.
फुकट दर्शन, देवळांत दाटी.

बायको वेडी, पोर पिसें, जांवई मिळाले तेही तसे.
बाहेर बरवा आंत हिरवा.
भटो, बायको कां कराना ? तर तुह्मीच कां व्हाना !
मन जाणे पापा आणि आई जाणे मुलाच्या बापा.
माता जाने पिता और भगवान् जाने गिता.
मूर्खापुढें वाचली गिता, तो ह्मणे रात्रीचा गोंधळ बरा होता.
मेंगा दादला थानांचा काळ.
ह्मातारा दादला जिवाला आधार.
ह्मैस धन्याला दूध देण्याकरितां फळत नाहीं.
मारून मुका मिळत नसतो.
राजाची राणी पण ती पाटलाची मेहुणी.
राजाचें नेसणें तें परटाचें गांडपुसणें.
राजानें लुटलें, पावसानें भिजविलें, दाद ना फिर्याद.
वृद्धा नारी पतिव्रता आणि ह्मातान्या बैला गुणवंता.
वाघ सांपळ्यांत सांपडे, बायका मुलें मारिती खडे.
श्रीमंत होणार होता पण माशी शिंकली.

## मनास बोध.

हे मना ! पुढें तरी तुझ्या सर्व कुचेष्टा सोडून हा खालीं लिहिलेला सुबोध वाचून त्याप्रमाणें आपलें वर्तन ठेव. हे मना, या बोधाप्रमाणें तूं जर चालला नाहींस तर तुझा शत्रु तूंच होशील; आणि जर चालशील तर तुझा परम हितकर्ता मित्र तूंच होशील.

हे मना ! तुला निरंतर लक्षांत ठेवण्याजोगी मुख्य गोष्ट सांगून ठेवितों कीं, आनंद ह्या प्रियमित्रास तूं कदापि विसंबूं नको. त्यास सदासर्वकाळ जवळ ठेवीत जा. त्याप्रमाणेंच धीर यासही घालवून न देतां गळ्यांतील ताईताप्रमाणें आपल्या फायद्यासाठीं निरंतर जवळ बाळग.

भक्ति, शांति, क्षमा, दया, ह्यांच्यावर अत्यंत प्रेम कर; आणि आनंदाची राणी विश्रांति हीस हृदयमंदिरामध्यें आणून मोठ्या सन्मानानें सन्निध ठेव.

मना, सुख झाल्यास हर्ष मानूं नको. दुःख झालें तरी त्याचा खेद मानून रंजीस होऊं नको. सदासर्वकाळ आनंदवृत्तीनें ऐस.

मना, जर तूं सुखदुःख मानून त्याजबद्दल हर्ष-शोक करशील, तर तुला व्यर्थ कष्ट मात्र होतील. ज्या ज्या वेळेस जें जें व्हावयाचें असेल, त्या त्या वेळेस त्या त्या गोष्टी घडल्यावांचून रहावयाच्या नाहींत, हा सिद्धांत ह्मणून समज. आपण करूंच, असें ह्मणून करावयास गेल्यानें होतेंच, असें समजूं नकोस. तूं निरंतर सहज स्थितीनें रहात जा. कोणत्याही गोष्टीची कदापि खंती मानूं नको. मनांत कोणाविषयीं द्वंद्व बाळगूं नको. जनांत राहून सदोदीत समाधानानें ऐस. ईश्वराच्या ठिकाणीं निष्ठापूर्वक लक्ष्य लाव. तेणेंकरून संसाराच्या बंधनाची बाधा होणार नाहीं. साधूंची संगत धर. श्रीगुरूची सेवा कर. हरिनामाची मनांत अखंड आवड असूंदे.

हे मना ! लोकांनीं क्रूर व दुष्ट भाषण केलें, ह्मणून त्यांचा सूड उगविण्याची खटपट करूं नको. कारण, क्रोधानें क्रोध वाढून अनर्थ घडतात. शरीर हें चर्म, रक्त,

मास मज्जा आणि अस्थि यांचें एक कुंड आहे. ह्मणून परस्त्रियांच्या बाह्य स्वरूपास भुलूं नको. आणि चंद्रमुखी! सिंहकटी! अशा रीतीनें स्त्रियांचें वर्णन करून त्यांजवर मोहित होऊं नको. तसेंच शरीर अशाश्वत असल्यामुळें स्वकीय बायका, मुलें, इत्यादिकांवरही जितक्यास तितकीच प्रीति ठेवीत जा. कोणाचाही धिक्कार करूं नको. सुखदुःख लाभालाभ किंवा जयापजय आपापल्या वेळेनुसार आपोआप प्राप्त होत असतात. ह्मणून परोत्कर्षामुळें तूं दुःखी होऊं नकोस; किंवा त्यांची विपरीत-स्थिति पाहून संतोष मानूं नकोस. निष्कारण न बोलतां कारण पडेल तेव्हां सत्य, मृदु आणि प्रीतियुक्त असें भाषण करीत जा. कारण, अशा भाषणानें परक्याचें मन न दुखतां व तंटा-भांडण न होतां आपला कार्यभाग सहज होईल.

मना, ह्यापुढें तुला कोणत्या रीतीनें वागावयास पाहिजे आहे, ह्याबद्दल मीं जी तुला तुझ्याच हिताची नीति सांगितली आहे, ती तूं नीट ध्यानांत ठेवून त्याप्रमाणें वाग; ह्मणजे तुला कदापि संताप व्हावयाचा नाहीं व तूं चिरकाळ सुखानें राहशील. मना, परमेश्वराचें नामस्मरण करणें सर्व प्रकारें हितावह आहे. नामस्मरणानें भक्ति उत्पन्न होऊन अंतीं मोक्षप्राप्ति होते. कीर्ति गाजत असते. आत्मज्ञान तरी नामस्मरणानेंच होतें. मना, तूं महा समर्थ आहेस. ह्मणून तुला पुनः पुनः बजावतों कीं, नामस्मरणासारखें दुसरें साधन नाहीं. तूं फार चंचळ आहेस, तरी नामाचा त्याग करूं नकोस. आतां तुला मी फार सांगण्याच्या भरीस पडत नाहीं. परंतु, मुख्यत्वेंकरून एक

इतकीच ह्मण सांगून ठेवितों कीं, तूं निश्चळ बनून राहशील, तरच तुला सुख होईल व तेणेंकरून तूं लौकिकास चढून स्तुतीस पात्र होशील.

---

## कारणापुरतें ज्योतिष.

चंद्राच्या अनुरोधानें जे महिने मोजिले जातात, त्यांस चांद्रमास ह्मणतात. शुक्ल प्रतिपदेपासून शुक्ल पौर्णिमेपर्यंत जो महिना त्यास पूर्णिमांत मास ह्मणतात. सूर्याच्या अनुरोधानें जे मास कल्पिले आहेत, त्यांस सौरमास ह्मणतात. प्रत्येक राशीवरून सूर्याच्या जाण्यास संक्रांति ह्मणतात. सौरमासांत सर्व महिन्याचे दिवस सारखे नसून अधिकउणे असतात. १२ सौरमास मिळून १ सौरवर्ष होतें. त्याचे दिवस ३६५, व चांद्रवर्षाचे दिवस ३५४ भरतात; ह्मणून सरासरी ३३ महिन्यांनीं १ महिना जास्त धरावा लागतो. ह्मणजे ३२ महिने, १६ दिवस, ४ घटिकांनीं एक अधिक मास येतो. अधिक महिना येतो त्या वर्षी १३ चांद्रमास येतात.

**शालिवाहनशक**—विक्रमसंवतांत १३५ वजा केले असतां शालिवाहन शक येतो. याचा आरंभ चैत्र शु० प्रतिपदेपासून आहे.

**संवत्सर काढण्याची रीत**— शालिवाहनशकांत १२ मिळवून साठांनीं भागावें. शेष उरेल तें संवत्सराचें नांव.

**शकावरून संवत् काढणें**— शकांत १३५ मिळवावे ह्मणजे संवत् येईल. कार्तिक शु० १ चा एक त्यांत

कमी करावा ह्मणजे चैत्र शु० १ चा संवत् येतो. (उदाहरणार्थ—शालिवाहनशक १८१८, यांत १३५ मिळविले ह्मणजे १९५३ बेरीज होते. याकरितां १९५३ हा संवत् झाला. ह्यांत एक वजा केला असतां १९५२ हा चैत्र शु० प्रतिपदेपासून आश्विन वद्य अमावास्येपर्यंतचा संवत् झाला.) संवत कार्तिक शु० प्रतिपदेपासून सुरू होतो.

**वार ७**—१ आदितवार (रविवार) २ सोमवार (इंदुवार) ३ मंगळवार (भौमवार) ४ बुधवार (सौम्यवार) ५ गुरुवार (बृहस्पतिवार) ६ शुक्रवार (भृगुवार) ७ शनिवार (मंदवार.)

**महिने १२ आणि ऋतु ६**—१ चैत्र, वैशाख—वसंतऋतु. २ जेष्ठ, आषाढ—ग्रीष्मऋतु. ३ श्रावण, भाद्रपद—वर्षाऋतु. ४ आश्विन, कार्तिक—शरदृतु. ५ मार्गशीर्ष, पौष—हेमंतऋतु. ६ माघ, फाल्गुन—शिशिरऋतु.

**पक्ष २**—१ शुक्लपक्ष—शुद्ध प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत. २ कृष्णपक्ष—पौर्णिमेपासून अमावास्येपर्यंतचा पंधरवडा तो.

**अयनें २**—१. उत्तरायण—मकर संक्रांतीपासून मिथुन संक्रांत संपेपर्यंत. ह्मणजे सुमारें अर्ध्या पौष्यापासून अर्ध्या आषाढापर्यंत सूर्य मध्यरेषेच्या उत्तरभागीं असतो, ह्मणून त्या काळास उत्तरायण ह्मणतात. २ दक्षिणायन—कर्क संक्रांतीपासून धन संक्रांतीपर्यंत. ह्मणजे सुमारें अर्ध्या आषाढापासून अर्ध्या पौष्यापर्यंत सहा महिने सूर्य मध्य रेषेच्या दक्षिणभागीं असतो, ह्मणून त्या काळास दक्षिणायन ह्मणतात.

दक्षिणायन झालें ह्मणजे रात्रीपेक्षां दिवस हळू हळू लहान होत जातात व उत्तरायण झालें ह्मणजे रात्र हळू हळू लहान होत जाऊन दिवस मोठा होत जातो.

आपल्या देशांत दिनमान व रात्रिमान यांजमध्यें सुमारें पांच साडेपांच घटिकांचें अंतर पडतें. परंतु, मध्य रेषेपासून जसजसें उत्तरेकडे किंवा दक्षिणेकडे जावें, तसतसें हें अंतर अधिकाधिक पडत जातें.

**उन्हाळा**—फाल्गुनापासून जेष्ठापर्यंत.

**पावसाळा**—आषाढापासून आश्विनापर्यंत.

**हिंवाळा**—कार्तिकापासून माघापर्यंत.

**तिथिसंज्ञा—नंदा** ( प्रतिपदा, षष्ठी, एकादशी. ) **जया** ( तृतीया, अष्टमी, त्रयोदशी. ) **भद्रा** ( द्वितीया, सप्तमी, द्वादशी. ) **रिक्ता** ( चतुर्थी, नवमी, चतुर्दशी. ) **पूर्णा** ( पंचमी, दशमी, पौर्णिमा, अमावास्या. )

**दिशा व त्यांचे स्वामी**—पूर्वेचा स्वामी इंद्र, पश्चिमेचा स्वामी वरुण, आग्नेयेचा स्वामी अग्नि, वायव्येचा स्वामी वायु, दक्षिणेचा स्वामी यम, उत्तरेचा स्वामी कुबेर, नैऋत्येचा स्वामी निऋति, ईशान्येचा स्वामी ईश्वर.

**ग्रहाच्या जाती**—गुरू–शुक्र हे ब्राह्मण, मंगळ–रवि हे क्षत्रिय, बुध–चंद्र हे वैश्य, राहु–केतु आणि शनि हे शूद्र ग्रह आहेत.

**स्मश्रुकर्म**—सोमवारीं हजामत करविली असतां ७ महिने आयुष्यवृद्धि, बुधवारीं ९ महिने, गुरुवारीं १० महिने, शुक्रवारीं ११ महिने. याप्रमाणें आयुष्यवृद्धि होते असें जोतिषशास्त्रांत सांगितलें आहे. स्मश्रुकर्मास पूज्य,

रेवती, अश्विनी, मृग, जेष्ठा, हस्त, चित्रा, स्वाती, पुनर्वसु श्रवण, धनिष्ठा व शततारका हीं नक्षत्रें उक्त आहेत.

**नवीन वस्त्रधारणास**—रोहिणी, हस्त, चित्रा, अनुराधा, स्वाती, विशाखा, अश्विनी, तिन्ही उत्तरा, पुनर्वसु, पुष्य, रेवती, धनिष्ठा या नक्षत्रांवर नवीन वस्त्रें धारण करावीं. आणि रवि, भौम, गुरु, शुक्र, सोम या वारांवर मोत्यें, सुवर्ण, मणि, पोंवळीं, नवे शंखाची पूजा करणें, तांबडीं वस्त्रें घेणें हीं कृत्यें योग्य होत.

**नांगर धरण्यास मुहूर्त**—श्रवण, उत्तराभाद्रपदा, पूर्वाभाद्रपदा, शततारका, श्रवण, अभिजित, उत्तराषाढा, हस्त, पुष्य, रोहिणी, अश्विनी, मूळ, मघा, विशाखा, या नक्षत्रांवर बैलांस मुष्की घालून प्रथम शेतांत नांगर धरावा.

**बीज पेरण्यास**—हस्त, अश्विनी, पुष्य, तिन्ही उत्तरा, रोहिणी, चित्रा, अनुराधा, मृग, रेवती, स्वाती, धनिष्ठा, मघा, मूळ, या नक्षत्रांवर बीजें पेरिलीं असतां उत्तम होत.

**वारपरत्वें वस्त्रधारण**—रविवारीं निळें, बुधवारीं पिंवळें, शनिवारीं काळें, गुरुवारीं पांढरें, मंगळवारीं तांबडें, सोमवारीं चित्र, याप्रमाणें वस्त्रधारण करून गमन करावें.

**अमृतसिद्धियोग**—आदित्यवारीं हस्त नक्षत्र, गुरुवारीं पुष्य नक्षत्र, बुधवारीं अनुराधा नक्षत्र, शनिवारीं रोहिणी नक्षत्र, सोमवारीं मृग नक्षत्र अथवा श्रवण, शुक्रवारीं रेवती, मंगळवारीं अश्विनी, याप्रमाणें वारांचे ठायीं नक्षत्रांचा योग झाला असतां तो अमृतसिद्धियोग जाणावा.

**शिंकापरत्वें पादछाया शकुन**—शिंकाशब्द ऐकून

आपली छाया पावलांनीं मोजून त्यांत १३ मिळवून ८ नीं भागावें. शेष राहील त्याचें फल—१ उरेल तर लाभ, २ उरले तर सिद्धि, ३ उरले तर दुःख, ४ उरले तर शोक, ५ उरले तर भय, ६ उरले तर लक्ष्मी प्राप्त, ७ उरले तर दुःख; शून्य आल्यास निष्फल असें जाणावें.

**दिशा परत्वें शिंकेचीं फळें**—पूर्वेची शिंक अशुभ, अग्नेयेची भयकारक, दक्षिणेची अरिष्टकारिणी, नैऋत्येची शुभ, पश्चिमेची मिष्टान्न भक्षण देणारी, वायव्येची धनदायक, उत्तरेची कलहकारिणी, इशान्येची शुभकारक, आत्म शिंकेचें मोठें भय. ऊर्ध्व झाली तर शुभ, मध्यें झाली तर भय, आसनावर, शायनस्थानावर व दान देतां किंवा भोजन करितां अथवा वामभागीं किंवा पृष्ठभागीं ह्या ठिकाणीं शुभ होय.

**सिंकेविषयीं सहदेवी मत—**

**डावी तारी उजवी मारी॥ पुढली करी घात॥**
**सहदेव ह्मणे भाडळी॥ पाठीं उभा जगन्नाथ॥१॥**

**पल्लिशब्द शकुन**—ऊर्ध्व दिशेस पाल चुकचुकली तर द्रव्यप्राप्ति, पूर्वेस कार्यसिद्धि, आग्नेयेस भय, दक्षिणेस अशुभ, नैऋत्येस क्षय, पश्चिमेस लाभ, वायव्येस मिष्टान्न भोजन, उत्तरेस लाभ, ईशान्येस कार्यसिद्धि, भूमिवर शब्द झाला तर भय, ह्याप्रमाणें फळ जाणावें.

**रोगीप्रश्न**—तिथी, वार, लग्न आणि प्रहर हीं प्रश्नदिवशीं एकत्र करून, ८ नीं भागावें. शेष उरेल त्याचें फळ—शेष १ अथवा ७ उरले तर देवतेची बाधा. २, ८

उरले तर पितरांची बाधा. ६, १, ४ उरल्यास भूतबाधा. १, ३, ९ उरले तर बाधा नाहीं असें जाणावें.

**अंकप्रश्न**—जोशानें प्रश्न करणारास १०८ अंकांचे आंत एका अंकाचें नांव घेण्यास सांगावें. तो जो अंक मागेल, त्यास १२ नीं भागावें. भागाकार येईल त्याचीं फळें:—एक, सात, नऊ उरले तर उशीरानें कार्य होईल. आठ, चार, दहा, पांच उरले तर कार्य होणार नाहीं. अकरा, दोन उरले तर त्वरीत कार्य होईल. सहा व शून्य उरलें तर तत्काळ कार्य होईल.

**गमनास मुहुर्त**—परगांवास जाणें प्राप्त झालें असतां घातवार व घातनक्षत्रें हीं वर्जावीं. हस्त, मृगशीर्ष, अनुराधा, श्रवण, रेवती, पुष्य, धनिष्ठा पुनर्वसु हीं नक्षत्रें व सोमवार, बुधवार, गुरुवार शुक्रवार हे वार प्रयाणास उक्त आहेत. सुमुहुर्तावर गमन करणें न होईल तर प्रस्थानीं वस्तु ठेवाव्या त्या अशा:—ब्राह्मणानें यज्ञोपवीत, क्षत्रियानें शस्त्र, वैश्यानें मधु आणि शूद्रानें फळ या क्रमानें जाणावें. राजे लोकांनीं प्रस्थान ठेवल्यापासून १० दिवसांचे आंत गमन केलें असतां चालतें. आणि इतरांस ९ दिवस तो मुहुर्त उपयोगीं पडतो.

प्रस्थान ठेवणें तें गर्गमतें दुसऱ्याचे घरीं. भृगुचे मतें शिमेचे अंतीं. वसिष्ठाचे मतें नगराबाहेर. प्रस्तान ठेवल्यावरही महादोष असतील त्या दिवशीं गमन करूं नये. गमनकाळीं गाय, फळ, मूळ, दूध, मोतीं, माणिक, हत्ती, छत्री, वारांगना, अग्नि, मांस, मासे, तरवार, ढाल, बंदूक, आरशी, कुमारिका, कन्या, हरीण, पालखी, मोर, बाल-

( कुणे)

कामह स्त्री, वाजंत्री, वाचें, धुतलेल्या वस्त्रांसहीत धोबी असे आले तर शुभ शकुन होत.

**गमनकालीं शकुनावरून काय करावें:—**

**भाऊ वीस, तेली तीस ॥ रांडकी आली तर उगाच बैस ॥ १ ॥**

"घरांतून बाहेर पडतांच जर मांजर आडवें आलें, तर वीस पावलें परत येऊन नंतर जावें. तेली समोर आला, तर तीस पावलें मागें येऊन परत जावें, आणि विधवा स्त्री पुढें आली, तर जागचे जागीं बसावें; पुढें जाऊं नये."

गमनास अशुभ:—**तेली, सोनार, न्हावी। गुरवीण नाहीं बरवी ॥ भाडळी ह्मणे गर्गमुनी, गमन करितां होय हानी ॥**

एकादशीविषयीं:—**नऊ चोवीस एकादशी ॥ कशाला हवा गांव जोशी ॥**

'मुसलमानी नऊ व चोवीस तारखेरोजीं एकादशी येते.'

गमनकालीं काय केलें असतां कार्य होईल:—**रविदर्पण, शशिचंदन, भौमियानंदन, बुधगूळ, गुरुराई शुक्रदधिभात, शनिवारवडिंग चावे ॥ भाडळी कहे सहदेवजी, परघरकी लछिमी आवे ॥ १ ॥**

"रविवारीं आरसा पहावा, सोमवारीं चंदनाचा टिळा कपाळीं लावून गमन करावें, मंगळवारीं धणे तोंडांत टाकावे, बुधवारीं गूळ खावा, गुरुवारीं मोहोऱ्या भक्षण कराव्या,

शुक्रवारीं दहींभात जेवून निघावें आणि शनिवारीं वाव-डिंगें खावीं. याप्रमाणें उपाय करून निघालें असतां कार्य-सिद्धि होईल.

मूल पाळण्यांत घालण्यासः—**पुत्र बारा, कन्या तेरा, भाडळी ह्मणे न पडा अन्य मुहुर्ताच्या विचारा॥**

" जन्मदिवसापासून पुत्र असल्यास बारा आणि कन्या असल्यास तेराव्या दिवशीं पाळण्यांत घालून नांव ठेवावें. "

---

## शत मूर्खांचीं लक्षणें.

पुढील ७१ लक्षणें मूर्ख मनुष्याचीं आहेत. त्यांपैकीं एखादें जरी अंगीं असलें, तरी मूर्खपण पदरीं येत असतें. मग सगळींच जर एके ठिकाणीं आढळलीं, तर तो मूर्खा-चा राजाच ह्मटला पाहिजे! तीं लक्षणें अशीं:—

१ सामर्थ्य असतां उद्योग न करणारा. २ पंडितां-च्या सभेंत आत्मस्तुति करणारा. ३ वेश्येच्या बोलण्या-वर विश्वास ठेवणारा. ४ दांभिकाच्या बोलण्याचा प्र-त्यय पाहणारा. ५ जुगाराच्या द्रव्याची आशा बाळग-णारा. ६ बुद्धिहीन असून मोठ्या कामास हात घालणा-रा. ७ एकांतीं रसिक भाषण करणारा. ८ ऋण का-ढून सण करणारा. ९ न ऐकलेल्या ग्रंथाचें व्याख्यान देणारा. १० शतावधि शत्रु असतां निःशंक राहणारा. ११ द्रव्य देऊन खुशाल झोंप घेणारा. १२ प्रसंग नस-तां वक्तृत्व दाखविणारा. १३ प्रसंग असतां मौन्य धर-

णारा. १४ लाभाच्या वेळीं कज्जा करणारा. १५ पुत्राच्या स्वाधीन केलेलें द्रव्य आपलें नव्हे असें मानणारा. १६ बायकोच्या माहेराकडील द्रव्याची याचना करणारा. १७ न होणारीं कर्में करूं इच्छिणारा. १८ अनुचित कर्म करून कुलीनपणा इच्छिणारा. १९ लेकीशीं बाप हास्यविनोद करीत असतां राग मानणारा. २० स्वस्त्रीशीं अमर्याद भाषण करून नवरेपणाचा मान इच्छिणारा. २१ पर स्त्रीशीं रत होऊन निर्भयता इच्छिणारा. २२ बायकोच्या रागानें पुनर्विवाह करणारा. २३ मुलाच्या रागावरून दत्तक घेणारा. २४ मर्मभेदक भाषण करून गर्व मानणारा. २५ लोभी राजापासून लाभ इच्छिणारा. २६ क्रूर मंत्री असतां निर्भय राहणारा. २७ दुष्टापासून प्रियकर्माची इच्छा करणारा. २८ अरसिकापाशीं आपल्या गुणांचा विक्रय करणारा. २९ शरीर स्वस्थ असतां वैद्यक्रियेस अनुसरणारा. ३० रोगयुक्त असतां वैद्याकडे न जाणारा. ३१ लोभाच्या हेतूनें आप्तांचा त्याग करणारा. ३२ मित्राच्या ठायीं कपट करणारा. ३३ मोठा समृद्ध असून कलहप्रीय. ३४ जोतिषाच्या वचनावरून राज्य इच्छिणारा. ३५ मूर्खांच्या मसलतीचा आदर करणारा. ३६ दुर्बळास पीडा देण्याविषयीं शूर. ३७ दोष प्रत्यक्ष पहात असतां स्त्रीवर प्रीति करणारा. ३८ संचय करण्याकरितां दुसऱ्याकडून खर्च करविणारा. ३९ मौन्यव्रत असतां खुणांनीं सर्व गोष्टी करणारा. ४० सुखाच्या वेळीं दुर्गतीस विसरणारा. ४१ नमुन्याकरितां विष खाणारा. ४२ क्रोधानें आत्मघातास प्रवृत्त होणारा. ४३ नित्य

विनाकारण प्रवास करणारा. ४४ शस्त्रादिकांनीं ताडीत असतां मौज पाहणारा. ४५ समर्थांशीं वैर करून सर्व नाश करणारा. ४६ मी पंडित हें दाखविण्याकरितां वाचाळतो तो. ४७ मी उत्तम योद्धा आहें असें जाणून निर्भय तो. ४८ हांसून मार्मिक भाषणानें दुसऱ्यास दुःख देणारा. ४९ दरिद्र्याजवळ आपलें सर्वस्व ठेवणारा. ५० द्रव्य मिळण्याचा संशय असतां पूर्वींच शिल्लक खर्च करणारा. ५१ आपण यथेच्छ खर्च करून हिशोबासाठीं कारकुनाशीं भांडणारा. ५२ दैवाची आशा धरून उद्योग सोडणारा. ५३ दुसऱ्याच्या गरिबीमुळें आपली दुर्दशा करणारा. ५४ सभेमधून उठून जाणारा. ५५ कबूल करून निरोप विसरणारा. ५६ खोकलेकरी असतां चोरून अपथ्य करणारा. ५७ कीर्ति वाढण्याकरितां भोजनखर्च पुष्कळ करणारा. ५८ अति अल्प भोजनांतच गोडी मानणारा. ५९ स्वस्त्रीचा त्याग करून परस्त्री जवळ करणारा. ६० दोघांची मसलत चालली असतां मध्यें जाणारा. ६१ अनीतीनें वागून श्रीमंती इच्छिणारा. ६२ गुप्त गोष्ट सर्व लोकांस कळविणारा. ६३ सर्व ठिकाणीं विश्वास ठेवणारा. ६४ लोकव्यवहार न जाणणारा. ६५ गुरु असून सर्व क्रिया न करणारा. ६६ कुकर्मांत नेहमीं निर्लज्जपणें वागणारा. ६७ हांसत हांसत बोलणारा. ६८ योग्य कारणावांचून रागावणारा. ६९ निरर्थक भाषण करणारा. ७० रस्त्यानें खात खात जाणारा. ७१ गेल्या गोष्टीचा शोक करीत बसणारा.

२—कविवर्य मुक्तेश्वर यांणींही एके ठिकाणीं मूर्खा-

[library stamp]

चीं कांहीं लक्षणें सांगितलीं आहेत, त्यांपैकीं कांहींचा येथें समावेश करितों; तीं अशीं:—

ओंव्या.

न बोलावितां परगृहा जाणें ॥ न पुसतां मत सांगणें ॥ समर्थ प्रभु सोयरा ह्मणे ॥ तो एक मूर्ख जाणावा ॥ १ ॥ आपण नेणे सारासार ॥ नायके श्रेष्ठांचा विचार ॥ बोले तांतडी भरें थोर ॥ तो एक मूर्ख जाणावा ॥२॥ मळीण वस्त्र अंग मळीण ॥ न करी कर पाद दंत धावन ॥ भक्ष भक्षी स्नानावीण ॥ तो एक मूर्ख जाणावा ॥ ३ ॥ गृह त्यागूनि मठाची माया ॥ शिष्यिणी करूनि त्यागी जाया ॥ सुहृद् त्यागूनि शिष्य समुदाया ॥ तो एक मूर्ख जाणावा ॥ ४ ॥ स्त्रियेचें वचन घेऊनि कानीं ॥ दुऱ्हावी पिता बंधू जननी ॥ वेगळा राहे सुहृदांतुनी ॥ तो एक मूर्ख जाणावा ॥ ५ ॥ झोंपी जातया कां ध्यानस्था ॥ दाटूनि बोलवी आग्रहता ॥ प्रभूतें पुसे राज वार्ता ॥ तो एक मूर्ख जाणावा ॥ ६ ॥ सभेमाजी खेळवी बाळ ॥ स्त्रियेशीं कटकट करी सर्व काळ ॥ आळस निद्रा कुसंगीं वेळ ॥ क्रमी तो एक मूर्ख ॥ ७ ॥ उपजोनिया संसारीं ॥ आयुष्य

वेंची विषयावरी ॥ आत्मप्राप्ती नव्हे पुरी ॥
हें नेणे तो एक मूर्ख ॥ ८ ॥ काशी मरणें
विष्णू स्मरणें ॥ मोक्ष प्राप्ती वेद वचनें ॥
यातें अर्थ दुर्गे ह्मणें ॥ तो एक मूर्ख जाणावा ॥९॥
सर्व भूतीं भगवंत परिपूर्ण ॥ सर्व दया हें ज्ञान
भूषण ॥ हें विश्वास न मानी ज्याचें मन ॥
तो एक मूर्ख जाणावा ॥ १० ॥

---

## आँग्लसुभाषितें.

१ स्नेह सर्वांशीं ठेव. विश्वास थोड्यांचाच धर. कोणाचीही हानि करूं नको. २ प्रमाणिकपणासारखें दुसरें मुबलक वेतन नाहीं. ३ अपहार केल्यानें कोणाचा जय झाला आहे काय? ४ प्रामाणिकपणा हा गुण अमूल्य आहे. ५ कपटी मनुष्यास स्वस्थता स्वप्नींही नसावयाची. ६ अपराध कबूल केल्यानें बहुतेक दोष उडून जातो. ७ विपत्तींत सहाय करितो तोच मित्र. ८ सुकीर्ति आपलें तेज अंधारांत देखील कायम ठेविते. ९ लबाडी पंगु आहे; परंतु निंदेला पंख आहेत. १० सत्यप्रिय मनुष्याचा ईश्वर कैवारी आहे. तो एकटा असला तरी त्याचें वचन सर्वांस मान्य होतें. ११ प्रामाणिकमनुष्याचें वचन ताम्र-पटावरील लेख होय. १२ संतति दुष्ट व कृतघ्न निपजणें हा ईश्वरी कोप होय. १३ दोन पैसे संग्रहीं ठेवणें ह्मणजे तेवढे मिळाल्याप्रमाणें होय.

१४ वेळेवर दिलेला एक पैसा शंभर रुपयांचें काम करितो. १५ अर्धवट केलेलें काम दोन वेळ करावें लागतें. १६ वचन देण्यास उतावीळ होऊं नको, तर तें पूर्ण करण्यास हो. १७ कुसंगतीपेक्षां एकांतवास बरा. १८ दुसऱ्यांकडून काम करविण्यापेक्षां स्वतःच करीत जा. १९ काळा दगड कधीं पांढरा होईल काय? २० उद्योग हा जीवाचा जिव्हाळा होय. २१ अती उंच चढूं नको. कारण, तेथून पडलास तर हाडूक मिळणें कठीण. २२ जिभली आळ्यांत ठेव, नाहींतर ती तुझा घात करील. २३ योग्य असेल तें कर, मग व्हावयाचें असेल तें होवो. २४ द्रव्याकडे पाहूं नको, तर अबरुकडे पहा. २५ यंव करा त्यंव करा, असें सांगण्यापेक्षां करून दाखविणें बरें. २६ प्रथम योग्यता अंगीं आण, नंतर मोठेपणाची आशा धर. ज्यास आपलीं व्यंगें तारुण्यांत समजतात, त्याची धन्य होय. २७ तरुणपणीं जेवढे श्रम करावे, तेवढ्या संपत्तीचा म्हातारपणीं सुखानें उपभोग घ्यावा. २८ ज्याला विनय नाहीं, त्याच्यांत आणि पशूंत कांहींच भेद नाहीं. २९ असंतोषास ज्यानें थारा दिला, त्याचा नाश खातरीनें होतो. ३० दिवस आणि रात्र यांत जितकें अंतर, तितकेंच सद्गुण आणि दुर्गुण यांमध्यें आहे. एक मनाची थोरवी वाढवितो; परंतु दुसरा क्षुद्रतेची वृद्धि करितो. ३१ उद्योगानें मन स्वच्छ आणि शरीर निरोगी राहतें. ३२ उद्यां काय काय संकटें येणार, हें मनुष्यास आज कळत नाहीं.

5

## श्रीमंत होण्याचा उपाय.

" यश व संपत्ति कशी मिळेल ? " तर पुढील गोष्टी पूर्णपणें ध्यानांत ठेवून त्याप्रमाणें वागत चला, ह्मणजे सर्व कार्यभाग होईलः—ह्या पुढील गोष्टी कित्येक गृहस्थांनीं आपल्या दिवाणखान्यांतील भिंतीवर लिहून ठेविल्या होत्या, व त्याप्रमाणें ते वर्तन ठेवीत असत. यामुळें त्यांची कीर्ति वाढून ते प्रसिद्ध नवकोटनारायण झाले. त्या गोष्टी अशाः—

१ मेहनतीनें व आस्थेवाईकबुद्धीनें आपापले धंदे पहात चला. २ कोणत्याही धंद्यांत आळस करूं नका, चापल्य असूं द्या. ३ कोणत्याही गोष्टीविषयीं पूर्ण विचार करा; व एकदांचा निश्चय करून जरूर काम उरका. ४ वरचेवर पुढचें पाऊल असूं द्या. ५ कोणच्याही कामीं धैर्य धरा, सोडूं नका. ६ प्रामाणिकपणा ठेवा. ७ लबाड बोलूं नका. ८ दुष्ट लोकांच्या ओळखी करूं नका. ९ भपका दाखवूं नका. १० कर्जबाजारी होऊं नका. ११ पैसा कसा मिळवावा हें शिका. १२ अमली होऊं नका. १३ वेळाचें महत्व जाणून सत्कारणीं वेळ खर्च करा. १४ प्रयत्नांतीं परमेश्वर आहे, सबब नशिबावर हवाला ठेवूं नका. १५ सर्वांशीं सभ्यपणानें वागा. १६ रोख जिन्नस ध्या. १७ व्यवहारांत थट्टा करूं नका. १८ ज्यावर त्यावर रागें भरूं नका. १९ स्वतःच्या विचारानें चाला. २० वेळापूर्वीं तयार व्हा, उशीर करूं नका. २१ कामाच्या वेळेस दुसऱ्या गोष्टी काढूं नका. २२ अनुक्रमानें, री-

तीनें, नियमानें व वेळच्या वेळीं काम करा. २३ दुसऱ्या कारभारांत व जें कळत नाहीं त्यांत हात घालूं नका. २४ दुसऱ्यावर अवलंबून राहूं नका. २५ वचनाचे धड रहा. २६ सहाय करा; पण लोकांनीं बरें ह्मणण्याकरितां शक्तीपलीकडे करूं नका. २७ नाहीं ह्मणण्यास भीड धरूं नका. २८ न्यायानें वागा, दया व प्रीति करा आणि देवाजवळ नम्रतेनें वर्ता. २९ तुह्मांला जें आज करितां येण्यासारखें आहे, तें उद्यांवर टाकूं नका. ३० वस्तु कितीही स्वस्त असो, पण जर तिजवांचून तुमचें अडलें नाहीं, तर ती विकत घेऊं नका. ३१ क्षुधा, तृषा, अथवा थंडी ह्यापेक्षां गर्व हा मनुष्याची हानि फारच करितो; ह्यास्तव तो सोडून द्या. ३२ अधिक खाल्ल्याचा पश्चात्ताप होऊं नये, असा खाण्याचा बेत ठेवावा. नेमस्तपणा हेंच आरोग्य आहे. ३३ अपरिहार्य भावी संकटें मनांत आणून चिंता करूं नका. ३४ राग आला तर बोलण्यापूर्वीं मनांत दहा अंक मोजा, आणि फारच आला तर त्याची शांति होईपर्यंत मोजा, ह्मणजे रागाच्या योगानें तुमच्या हातून असंभाव्य गोष्टी कधीं घडणार नाहींत; आणि तुह्मांला दुःखही कधीं होणार नाहीं.

सदर्हु गोष्टी ध्यानांत ठेवून मेहनत करा; ह्मणजे यश व संपत्ति घरीं चालत येईल, व त्यायोगें तुह्मी मोठ्या भरभराटीस चढाल.

---

## लक्ष्यांत ठेवण्यासारखे तीन.

तीन गोष्टी कराव्या— कुलीन स्त्री, सत्कृत्य आणि खरें भाषण.

**तीन गोष्टी स्वाधीन ठेवाव्या**—आपला राग, आपली जीभ व आपली इच्छा.

**तीन गोष्टी अंगीं असाव्या**—शहाणपणा, चांगुलपणा आणखी सहनशीलता.

**तीन गोष्टींवर भक्ति असावी**—धैर्य, शांति आणि परोपकार.

**तीन गोष्टींसाठीं भांडावें**—आपली अबरु, आपला देश व आपले मित्र.

**तीन गोष्टींचा तिटकारा करावा**—निर्दयपणा, गर्विष्टपणा आणखी कृतघ्नपणा.

**तीन गोष्टी शिकाव्या**—सत्यनिष्ठा, उद्योगीपणा आणि समाधानपणा.

**तीन गोष्टींविषयीं रसिकता व मर्मज्ञता असावी**—ज्ञान, मान व शोभा.

**तीन गोष्टी आवडाव्या**—निर्मळ मन, भलेपणा व आनंदी स्वभाव.

**तीन गोष्टींनीं आनंद व्हावा**—मनाचा मोकळेपणा, स्वतंत्रपणा आणि सौंदर्य.

**तीन गोष्टी टाकाव्या**—कुरठेपणा, रिकामी बडबड आणि वेडी वांकडी थट्टा.

**तीन गोष्टींची इच्छा धरावी**—आरोग्य, चांगले मित्र व संतुष्टवृत्ति.

**तीन गोष्टी जोडाव्या**—चांगलीं पुस्तकें, चांगली संगत आणि चांगला स्वभाव.

## यक्ष प्रश्न.

वैशंपायन ऋषी जन्मेजय राजास सांगतो---कोणे एके समयीं धर्म, भीम, अर्जुन, नकुळ व सहदेव हे पांच पांडव द्वैतवनीं रहात असतां, एक ब्राह्मण येऊन त्यांस बोलिला " हे महाराज, माझ्या अग्निहोत्राच्या अरणी ( विस्तव पाडावयाचीं लांकडें ) वृक्षावर ठेविल्या होत्या, त्या एक मृग घेऊन पळाला. त्याचा शोध करून अरणी मला आणून द्याव्या, नाहींतर माझ्या अग्निहोत्राचा भंग होतो." असें ब्राह्मणाचें वचन कानांत पडतांच पांचही पांडवांनीं धनुष्यबाण घेऊन सर्व रान शोधिलें; परंतु मृगाचा पत्ता लागला नाहीं. त्या वेळीं भुके-तहानेनें व्याकुळ झालेले पांचही पांडव एका वडाच्या झाडाखालीं विश्रांतीस्तव बसले असतां, धर्मराज बोलला " नकुळा, तृषेनें प्राण व्याकुळ झाले; कोठून तरी पाणी आण." तें ऐकून नकुळ एका उंच वृक्षावर चढला आणि चोंहोंकडे पाहूं लागला; तों दूर एक भलें मोठें पाण्याचें तळें त्याच्या दृष्टीस पडलें. त्यानें तेथें जाऊन पाण्यास हात लावतांच वृक्षावरून शब्द झाला, " अरे, माझ्या प्रश्नांचीं उत्तरें आधीं सांग आणि मग पाणी पी. न सांगतां पिशील, तर प्राणास मुकशील." तें भाषण न ऐकतां नकुळ पाणी प्याला व तेथेंच निचेष्टित पडला.

कांहीं वेळानें त्याच्या शोधार्थ धर्मानें भीमास पाठविलें. त्याचीही कथा नकुळाप्रमाणेंच झाली. याप्रमाणें अर्जुन व सहदेवसुद्धां चौघेही बंधु पाणी पिऊन मूर्च्छित पडले. इकडे धर्मराजानें या चौघांची बराच वेळ वाट पाहिली, व

बंधु येत नाहींत असें जाणून चिंताग्रस्त होत्साता अरण्य शोधीत त्या उदकाजवळ गेला; तों चौघेही बंधु अचेतन पडलेले आहेत, हें पाहून त्यास फारच दुःख झालें. तो नाना प्रकारें शोक करूं लागला. त्या वेळीं वृक्षावरून शब्द झाला कीं, "अरे, या स्थळाचा स्वामी मीं यक्ष आहें, तुझे बंधु मीं मारले. आतां तूं जर माझ्या प्रश्नांचीं उत्तरें सांगशील, तर दैवयोगानें ते पुनः जिवंत होतील! माझी आज्ञा मोडून जर तूं उदक प्यालास, तर त्यांच्यासारखीच तुझीही दशा होईल." यक्षाचीं अशीं वचनें श्रवण करून धर्मराज बोलतो, "यक्षा, तुझे काय प्रश्न आहेत ते विचार. मी यथाज्ञानें सांगतों." हें ऐकून यक्ष प्रश्न करितो, आणि धर्मराज उत्तर देतो. हे प्रश्न १०८ आहेत; पण त्यांपैकीं निवडकच आह्मीं येथें दिले आहेत.

प्र०—ब्राह्मणांस मोठेपणा कशानें मिळतो?

उ०—वेदशास्त्र जाणिल्यानें.

प्र०—सत्कीर्ति कशानें मिळते?

उ०—इंद्रियें स्वाधीन ठेविल्यानें.

प्र०—सुबुद्धि कशानें होते?

उ०—वडिलांची सेवा केल्यानें.

प्र०—ब्राह्मणांस दैवत कोण? उ०—वेद.

प्र०—क्षत्रियांस दैवत कोण? उ०—धनुष्यबाण.

प्र०—फळांमध्यें उत्तम फळ कोणतें?

उ०—सुपुत्रफळ.

प्र०—पृथ्वीपेक्षां थोर कोण? उ०—आई.

प्र०—आकाशापेक्षां उंच कोण? उ०—बाप.

प्र०—वायूपेक्षां चपळ कोण? उ०—मन.

प्र०—हृदय नाहीं कोणास? उ०—दगडास.
प्र०—आपल्या वेगानें वाढतें काय? उ०—नदी.
प्र०—गृहस्थास मित्र कोण? उ०—भार्या.
प्र०—रोग्यास मित्र कोण? उ०—औषध.
प्र०—या लोकीं अमृत कोणतें? उ०—दूध.
प्र०—सर्वांस स्थान कोणतें? उ०—पृथ्वी.
प्र०—स्वर्गाचें मुख्य स्थान कोणतें? उ०—सत्य.
प्र०—सुखाचें मुख्य स्थान कोणतें? उ०—सदाचरण.
प्र०—मनुष्याला आत्मा कोण? उ०—पुत्र.
प्र०—उपजीवन कोणतें? उ०—पर्जन्य.
प्र०—धनामध्यें उत्तम धन कोणतें? उ०—विद्याधन.
प्र०—लाभामध्यें उत्तम लाभ कोणता?
उ०—आरोग्य.
प्र०—सुखामध्यें थोर सुख कोणतें? उ०—संतोष.
प्र०—याचकांस कशासाठीं द्यावें?
उ०—पुण्यप्राप्तीसाठीं.
प्र०—स्वर्गी जात नाहीं कशानें? उ०—दुःसंगानें.
प्र०—जिवंत असून मेलेला कोण? उ०—दरिद्री.
प्र०—सर्वांत पूज्य कोण? उ०—गुरु.
प्र०—तप कोणतें? उ०—स्वधर्माचरण.
प्र०—दम कोणता? उ०—मन स्वाधीन ठेवणें.
प्र०—ज्ञान कोणतें? उ०—सारासार जाणणें.
प्र०—अतिशय व्याधि कोणती? उ०—लोभ.
प्र०—शोक करावयास योग्य काय? उ०—अज्ञान.
प्र०—ब्राह्मणाचे अंगीं ब्राह्मणत्व कशानें येतें?
उ०—सदाचरणानें.

प्र०—प्रियवचन बोलणारास काय लाभ होतो ?

उ०—प्रीति.

प्र०—बहुत मित्र करितो त्यास काय लाभ ?

उ०—सुख.

प्र०—सुखी कोण ? उ०—ऋणी नसून, मिळेल तीं भाजीभाकरी खाऊन असणारा.

---

## सुबोध प्रश्नावली.

प्र०—भवसागर पार होण्यास नौका कोणती ?

उ०—सद्गुरुवचनावर विश्वास ठेवून परमेश्वराची भक्ति करणें.

प्र०—बंधमुक्त कोण ? उ०—विषयानुरागी.

प्र०—घोर नरक कोणता ?

उ०—ज्यामध्यें सर्व दुर्वासना नांदत असतात, असा मनुष्यदेह.

प्र०—अत्यंत प्रौढ बंधन कोणतें ? उ०—ममता.

प्र०—दीर्घ रोग कोणता ? उ०—गर्भवास.

प्र०—हा रोग नाहींसा होण्यास उपाय काय ?

उ०—आत्मबोध.

प्र०—उत्तम विद्या कोणती ?

उ०—जिच्यामध्यें ब्रह्मज्ञान आहे ती.

प्र०—नरकाचें द्वार कोणतें ? उ०—परस्त्रीगमन.

प्र०—स्वर्गद्वार कोणतें ?

उ०—प्राणिमात्रावर दया व अहिंसा.

प्र०—शरिराचा शत्रु कोण ? उ०—आळस.

प्र०—मित्र कोण ?

उ०—उत्साह, साहस आणि उद्योग.

प्र०—दरिद्री कोण ? उ०—असंतोषी.

प्र०—जिवंत असून मृतवत् कोण ? उ०—निरुद्योगी.

प्र०—मनुष्यरूपी पिशाच्च कोणतें ?

उ०—निंदक आणि अपयशी.

प्र०— गुरु कोण ? उ०—हितोपदेशी.

प्र०—शिष्य कोण ? उ०—मन, वचन आणि कर्म.

प्र०—सुंदर अलंकार कोणता ? उ०—सुशीलता.

प्र०—उत्तम तीर्थ कोणतें ? उ०—शुद्धांतःकरण.

---

## लक्ष्यांत ठेवण्यासारखे बोल.

**पंडित कोण**—विद्या असून ज्याला गर्व नाहीं.

**ज्ञानी कोण**—ज्याला सर्व समजतें.

**तपस्वी कोण**—ज्याला संताप येत नाहीं.

**योगी कोण**—ज्यानें आपल्या दुर्वासना जिंकिल्या.

**श्रेष्ठ कोण**—न्यायास अनुसरून बोलणारा आणि त्याप्रमाणें वागणारा.

**वडील कोण**—जो आपल्यापेक्षां गुणांनीं अधिक.

**भलें माणूस कोणतें**—पतिव्रता स्त्री आणि एकपत्नि पुरुष.

**घामट कोण**—ज्याच्या जिभेंतून नेहमीं लोकांचीं घाणेरडीं कृत्यें बाहेर पडतात तो.

**कीर्ति कोणती**—जी ऐकतांना सत्पुरुष मान डोलवितात.

**पापी कोण**—दुसऱ्याला त्रास देणारा.

**पुण्यवान् कोण**—काडीमात्र आळस न करितां परोपकार करणारा.

**मित्र कोण**—जो प्रसंगीं आपलें सत्य भंगितो तो.

**मोठा कोण**—परदुःख जाणणारा.

**धनवान् कोण**—दीनाला योग्य मदत करणारा.

---

## सज्जन व दुर्जन.

कालमानाप्रमाणें सज्जन-दुर्जन यांची परीक्षा करणें फार दुर्घट झालें आहे. खऱ्या मार्गानें जाणारे सज्जन व खोऱ्या मार्गानें जाणारे दुर्जन, हा साधारण ठोक ताळा आहे. तरी, व्यवहारांत प्रसंगविशेषीं सज्जनांवर दुर्जन-पणाचा आरोप येतो. परिणामीं दूध तें दूध व पाणी तें पाणी ठरलें जातें; परंतु कांहीं दिवस अशा मुग्ध स्थितींत जातातच. खऱ्या सोन्यापेक्षां बेगडेला अधिक चमक असते. खऱ्या सोन्याला कधीं आंच द्यावी लागत नाहीं. सोनाराच्या विशेष कसबानें कधीं कधीं ढोक सोनेंही बावनकसी मुलाखताव दिसूं लागतें. परंतु, खऱ्या वस्तादाच्या हातीं पडल्यावर तें दोन तीन वेळ कडक अग्नीचीं पुटें देऊन तो मुळची पितळ बाहेर पाडितो. जोंवर तसा वस्ताद मिळत नाहीं, तोंवर बरेच ग्राहक खऱ्या सोन्याला बाजूस टाकून, आंच दिलेलें ढोक सोनें उत्तम समजतात. इतकेंच नाहीं, तर त्याला भरपूर किंमत देऊन फसतात.

ह्या वरील गोष्टी कालमानाप्रमाणें घडतात, असें आह्मीं वर ह्मटलें आहे. परंतु, अशीं उदाहरणें पुरातन काळच्या ग्रंथांतूनही कांहीं कमी आढळत नाहींत. निर्दोष मार्ग-

गामी सज्जनांला दुर्जनांनीं व्यसनांत पाडिलें व अल्प काल कां होईना, सत्याची हवेलंडी उडवून असत्यानें विजय मिळविला, अशा एक दोन गोष्टी येथें सांगूं.

दुर्योधन, दुःशासन आदिकरून दुर्जनांनीं पुण्यश्लोक युद्धिष्ठिरास कपटद्यूतांत जिंकून महासाध्वी द्रौपदी सती, तिच्या पांच पतींच्या देखत भर सभेंत केंश धरून आणून वस्त्रहरण केलें! व बारा वर्षें वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास भोगविला. अखेरीस दुष्टांचें निर्दालन होऊन सज्जनांचा विजय झाला. तरी, कांहीं काळपर्यंत दुष्टांच्या उपकृतीचें प्रायःश्चित्त सुष्टांनाही भोगणें प्राप्त झालें.

पंचवटींतून दशमुखानें सीतेचें हरण केलें, तेव्हां मार्गांत महाभगवद्भक्त जटायु नामक गृध्रराज भेटला व त्यानें चौर्यकर्म करणाऱ्या लंकाधिपाला अडवून स्वसामर्थ्यानें त्याचा पराभव केला. तेव्हां हताश होऊन रावणानें कपटजाल पसरिलें, व सलगीचे भाषणांनीं सत्य प्रतिज्ञा करून उभयतांनीं आपआपलें मरण कोणत्या अवयवांत आहे; हें सांगण्याचा घाट घातला. तेव्हां सात्विक जटायूनें खरोखर सांगितलें कीं, आपलें मरण पक्षद्वयांत आहे. हें ऐकून कपटपटू रावणानें सांगितलें कीं, माझें मरण माझ्या पायाच्या आंगठ्यांत आहे. अशीं शपथेवर भाषणें झाल्यावर पुनः दोघेही युद्धाला प्रवृत्त झाले. तेव्हां, जटायूनें नेम धरून रावणाच्या चरणांगुष्ठावर झडप घातली आणि आंगठा नाहींसा केला. त्याबरोबर रावणानें जटायूचे दोन्ही पंख उपटून घेतले. तेव्हां गृध्रराज अपंख होऊन जमिनीवर पडला; आणि रावण जनकजेला रथा-

वर घालून लंकापुरीकडे चालता झाला. 'सत्यसंकल्पाचा दाता नारायण' हा सिद्धांत जरी सर्वमान्य आहे, तरी वरील उदाहरणांत कपटपटु दुर्जनांनीं त्याला अपवाद आणिला व सत्यवक्त्या जटायूला व्यर्थ प्राणास मुकावें लागलें.

दुर्जनांची अपकृति, जे त्यांना त्रास देतात त्यांजवरच घडते असें नाहीं, तर ते आपल्यावर उपकार करणारांवरही अपकार केल्यावांचून राहत नाहींत. याबद्दल पुरातन काळचें उत्कृष्ठ उदाहरण भस्मासुराचें होय. चिताभस्म आणितांना भस्मासुराला त्रास होऊं नये, व त्याला दुसरे कोणी छळूं नये, ह्मणून भोळ्या शंकरांनीं त्याला वर दिला कीं, "तूं ज्याच्या शिरीं हात ठेवशील, तो भस्म होऊन जाईल." हा वर प्राप्त होतांच तो दुरात्मा भस्मासूर, जगन्माता पार्वती इच्याठायीं पापवासना धरून वरदात्या कैलासपतीच्या शिरीं हात ठेवण्यास तयार झाला. तेव्हां बहुतकालापूर्वींदेखील भस्मासुरासारख्याच्या अंगीं कृतघ्नताबुद्धि कितपत वास करीत होती हें स्पष्ट होतें. मग आतां कलियुगाच्या ऐन भरांत कोणी भस्मासुराच्या कृतीचें अवलंबन केलें किंवा कोणी दुर्योधन, दुःशासन व शकुनीमामाच्या कृतीचें अवलंबन केलें, तर त्यांत आश्चर्य काय ? आणि सज्जन व दुर्जन तरी निवडावे कसे ?

---

## बोधाचा एक सुरस मासला.

मि. हेनरी ऑर्थर जोन्स नांवाच्या एका इंग्रज गृहस्थानें आपल्या देशबांधवांला जो बोध केला आहे, तो आमच्या लोकांनीं तर अवश्यमेव ग्रहण करावा. त्याचें तात्पर्य

खालीं लिहिल्याप्रमाणें आहे.—" मी इंग्लंडचा रहिवासी आहें; आणि त्या देशाच्या मोठेपणावर व ख्यातीवर माझा वारसा आहे. माझ्या स्नायूंनीं, मज्जातंतूंनीं व रक्तबिंदूंनीं आपआपलें काम बरोबर बजाविलें ह्मणजे जसें माझें शरीर सुखी व निरोगी राहतें, तसेंच प्रत्येक नागरिकानें आपआपलें काम योग्य रीतीनें बजाविलें ह्मणजे देश सुखी व निरोगी होतो. मी अशी कोणतीही नोकरी धरणार नाहीं किंवा धंदा करणार नाहीं कीं, ज्यामुळें मला माझ्या बंधूंवर अवलंबून राहून त्यांच्या उपयोगीं पडतां यावयाचें नाहीं. कारण, त्यामुळें त्यांपैकीं कित्येकांना विपत्ति भोगावी लागेल, हें मला स्पष्ट दिसतें. ज्याप्रमाणें रणांगणांतून शिपायानें पळून जाणें हें भागूबाईचें लक्षण आहे, त्याचप्रमाणें नागरिकानें स्वदेशाच्या कल्याणांत भर न घालणें, हें भागूबाईचें लक्षण आहे. इंग्लंडनें मला जन्म दिला आहे व माझें पालनपोषण केलें आहे, त्याअर्थीं मी कर्तव्याला अनुसरून त्याची सेवा करीन. त्याची भूमि जेणेंकरून भ्रष्ट पावेल, त्याची हवा जेणेंकरून दूषित होईल व त्याचीं मुलेंबाळें ह्मणजे बहिणभावंडें जेणेंकरून अवनतीला जाऊन पोहोंचतील, असें मी बिलकूल करणार नाहीं. मी त्याचीं शहरें शोभिवंत करण्याचा, त्याचे रहिवाशी निरोगी व आनंदी करण्याचा प्रयत्न करीन; ह्मणजे त्याच्या भावी मुलांना तेथेंच राहणें आवडूं लागेल."

# घड्याळ कसें वाळगावें.

१ रोज नियमानें ठरीव वेळेसच किल्ली देण्याचा परिपाठ ठेवावा.

२ किल्ली देतांना अडत असल्यास अडण्याचें कारण नीटपणें पहावें. जोरानें तशीच किल्ली देऊं नये. कारण, स्प्रिंग व चक्रें यांना थोडासुद्धां हिसका बसल्यास त्यापासून घड्याळ बिघडतें.

३ उष्णतेनें प्रसरण पावणें, किंवा थंडीनें आकुंचन होणें हा सर्व धातूंचा धर्म आहे. अर्थात् घड्याळाच्या चक्ररचनेवरसुद्धां थंडी व उष्णता यांचा असा परिणाम होण्याचा संभव आहे. याकरितां घड्याळें नेहमीं एकाच समशीतोष्ण स्थलीं राहतील, अशी खबरदारी घेणें इष्ट आहे.

४ घड्याळास नेहमीं एकसारख्या एकाच स्थितींत ठेवावें. वरचेवर हालवूंडोलवूं नये.

५ घड्याळाचे कांटे सहसा कधीं मागेंपुढें फिरविण्याचा परिपाठ ठेवूं नये. त्यांत कप्प्यांतल्या लहान घड्याळांचे तर फिरवूंच नयेत.

६ घड्याळाच्या मागच्या अंगास जें कांचेचें झांकण असतें, तें कधीं काढूं नये.

७ घड्याळ 'स्लो' किंवा 'फास्ट' करितांना त्या त्या बाजूकडे कांटा ( रेग्युलेटर ) ढकलणें तो प्रत्येक वेळीं फारच थोडथोडा ढकलीत असावा. एकदम पुष्कळ ढकलूं नये.

८ घड्याळावर मळ न बसेल अशा विषयीं फार जपावें. त्याच्या चक्ररचनेंत केराचा एक कणदेखील बिघडाबिघड करण्यास कारण होतो. कप्प्यांतल्या घड्याळास

नेहमीं बनातीच्या किंवा 'शमाइसलेदर' च्या पिशवींत घालून ठेवावें.

९ घड्याळास किल्ली देतांना ती अगदीं पूर्ण देऊं नये. थोडी कमी ठेवावी. व घड्याळ वापरण्याचें जरी नाहीं, तरी त्यास किल्ली देण्याचें काम एक हातीं असावें.

१० घड्याळ हा कांहीं एक छातीवर मिरविण्यासाठीं केवळ शोभेचा दागिना नाहीं. तर तें, आपलें बहुमोल जें आयुष्य तें कसें भराभर चाललें आहे हें दाखवून त्याचा कांहीं तरी सत्कारणीं व्यय करा, असें सुचविणारें एक योग्य साधन आहे. असें समजून त्याच्या सूचनेचा उपयोग करून घेत असावा.

---

## कर्मणूक संग्रह.

ह्या संसारसमुद्रामध्यें प्रत्येक मनुष्यास आपल्या उपजीवनाकरितां, सुखाकरितां किंवा कीर्तिकरितां कांहीं तरी व्यवसाय व कष्ट करावे लागतात. व प्रायः ते केल्याशिवाय कोणाचेंही चालत नाहीं. प्रत्येकानें अंथरुणावरून उठल्यापासून तों पुनः अंथरुणावर पडेपर्यंत अगदीं कामांतच गढलेलें असावें; हें कांहीं शक्य व इष्ट होणार नाहीं. मधून मधून त्याला कर्मणूक करून घेतलीच पाहिजे. तेणेंकरून त्याच्या चित्तास विश्रांति मिळून तो आपलें काम आनंदानें करूं लागेल. मोल-मजूरी करून पोट भरणाऱ्या मजुरांपासून तों मोठ्या विद्वान् पदवीधरापर्यंत प्रत्येक जण आपल्या विश्रांतीच्या वेळांत कांहीं तरी कर्मणूक करून घेतच असतो. आणि असें जर नसतें, तर

संध्याकाळच्या प्रहरीं चव्हाट्यावर तुणतुण्याच्या सुरांत गाणें, गप्पा, गोष्टी, आणि पंडितांची भवतिनभवति ऐकूं आली नसती. तसेंच वर्तमानपत्रें, मासिकपुस्तकें व इतर ग्रंथ वाचण्याची चट लागलीच नसती. सारांश, प्रत्येका-स कर्मणूक करून घेतली पाहिजे व प्रत्येकजण घेतही आहे. कर्मणूक करून घेणें आवडत नाहीं, असा मनुष्य कोणत्याही देशांत नसावा व मागेंही झाला नसेल. ह्मटलें आहे:—

**सुभाषितेन गीतेन, युवतीनांच लीलया ॥**
**यस्य न द्रवते चित्तं, सवै मुक्तोऽथवा पशुः॥१॥**

"सुभाषित, गायन व तरुण स्त्रियांची लीला यांनीं ज्याचें चित्त मोह पावत नाहीं, तो एक मुक्त समजावा, किंवा पशु मानावा." अर्थात कर्मणूक हा विषय सर्वां-च्या विश्रांतीला कारण असून बोधप्रद आहे. याकरितां आह्मीं येथें कांहीं चुटक्यांचा संग्रह करितों.

* १ *

"शामभट्ट, आतां किती दिवस अविवाहित राहणार? लग्न घ्या एकदां करून." असें एका बाईनें ह्मटलें. शामभटजीनें उत्तर दिलें, "अहो, तुह्मीं एवढ्या बायका अहां तर खऱ्या, मग लग्नच कशाला पाहिजे?" वहा-वारे दीड शहाण्या!!

* २ *

एकदां एका मनुष्यास गाढवाची जरूर पडली. तेव्हां तो बाजारांत जाऊन गाढववाल्यास त्याची किंमत विचारूं

लागला. गाढववाला:—काय हो तुह्मांला बोलका गाढव पाहिजे कीं कसा ? गृहस्थास मोठा संताप येऊन त्यानें त्या गाढवविक्यास शिव्या दिल्या; त्यामुळें तें प्रकरण हाणामारीवर आलें. त्या गाढवविक्यानें ह्मटलें, "ज्याला मीं केलेली थट्टा समजेना, तो दुसरा कोण ? त्याला दुसरा गाढव विकत घेण्याचें प्रयोजन काय ? आपले कान लहान असल्याकारणानें मीं आपणास ओळखिलें नाहीं, तें आतां पूर्णपणें ओळखिलें.

* ३ *

**चमत्कारिक त्रैराशिक**—नुसती बोटभर सही करणारास जर दोनशें रुपये पगार मिळतो, तर सहीचे सर्व कागद लिहिणारास ओळीच्या मानावर काय पगार मिळावा ? असा एका मुलाचा प्रश्न आहे.

* ४ *

एकदां एक डोळस दुसऱ्या एकाचा एक डोळा फुटलेला पाहून त्यास ह्मणतो, "कायरे, तुला माझ्याहून कमी दिसत असेल नाहीं ?" तितक्यांत तो एकाक्ष त्यास उत्तर देतो, "बाबा, माझ्या एका डोळ्यानें तुझे दोन्ही डोळे दिसत आहेत, आणि तुझ्या दोन्ही डोळ्यांनीं माझा एकच डोळा तुला दिसतो. मग मला हिणविण्यांत अर्थ काय बरें ?"

* ५ *

एक लुच्चा मनुष्य एका यहुद्याला विचारितो कीं, "काय हो, पोर्टल्यांड देशांत गाढव आणि यहुदी यांना बरोबर फांशी देतात असें लोक सांगतात, तें खरें आहे

का ?" यहुदी ह्मणाला, "होय, खरें आहे. तुह्मी आणि मी तेथें नाहीं ह्मणून बरें आहे."

*  ६  *

साहेब—अहो तहशीलदार, तुमच्यावर तुमच्या हाताखालच्या लोकांची तुह्मी शिव्या देतां ह्मणून फिर्याद आहे.

तहशीलदार—कोण कोण फिर्यादी तो ? येऊंद्या त्या गाढवाला माझ्यासमोर.

सा०—हे पहा, येथेंच हजर आहेत.

तहशीलदार—काय रे बेशरम ! पाजी ! हरामखोरांनों ! कधीं रे तुह्मांला शिव्या देतों मी ? लेंकांनों माज आला काय तुह्मांला !

*  ७  *

प० गृ०—काय हो बायकादेखील नाटकाला येऊं लागल्या ! मित्रा ती समोर पोग्गी पहा कशी नखऱ्यानें उभी राहिली आहे ती.

दु० गृ०—कोण कोण, ती समोरची काय ? ती तर माझी बहीण !

प० गृ०—छे, छे, तिच्या उजव्या हाताकडे आहे ती.

दु० गृ०—अरे, ती माझी बायको !

*  ८  *

नाटकाचा एक अंक पुरा झाल्यावर बराच वेळ पडदा पडला. तेव्हां एक गृहस्थ मागें-पुढें वर-खालीं मधून मधून चोरून स्त्रीजनांकडे पहात होता. इतक्यांत दुसरा त्यास ह्मणतो, "अहो सभ्य, रंगभूमीवर जें काय दिसेल तेंच

पहाण्यासाठीं टिकीट दिलें आहे वरें!" गृहस्थ ओशाळून खालीं मान घालून गप्प बसला.

* ९ *

**नवरा**—( रात्रीं झोंपी जातांना बायकोस ) समजलीस? सकाळीं अगदीं रोजच्याप्रमाणें वेळेवर जागा कर, हो!

**बायको**—दसऱ्याची सुटी आहे ना उद्यां? ह्मापीसांत जावयाचें नाहीं, कांहीं नाहीं.

**नवरा**—नव्हे, पण जरा लोळून पुनः निजेन ह्मटलें!

* १० *

**मुलगा**—बाबा, लढाई कशी सुरू होते?

**बाप**—कधीं ह्या पक्षाकडून व कधीं विरुद्ध पक्षाकडून.

**मुलगा**—ह्मणजे कसें?

**बाप**—पहा परवांची ब्रह्मदेशाची लढाई.

**आई**—किंवा कालची मणिपूरची घे.

**बाप**—पहा, तूं मध्येंच बोलत जाऊं नको. मला त्याची मोठी चीड आहे.

**आई**—मला वाटतें आईलाच मुलाची समजूत चांगली करितां येईल.

**बाप**—अरे, पुनः तेंच! बोलूं नको ह्मणतों ना?

**आई**—पण,—

**बाप**—आतां बोललीस तर मारच!

**मुलगा**—( मध्येंच ) हरकत नाहीं; पण लढाई कशी सुरू होते, तें आतांच अगदीं बरोबर समजेल!

* ११ *

आमच्या गांवांतील विठोबा गोंधळी परवां आपल्या मुलाला उपदेश करीत होता:—" अर ल्योका, सकाळ-

च्या रामपाऱ्यांत धा इस घरं तरी मागून येत जा. आज मागायास ग्येला नाइंस तर झोर काय बामणं मांगत्यांत तशी मांधवगिरी मांगशील, कां उपाशी राहशील? कां भीक मांगशील? करशील तरी काय?

* १२ *

एका गृहस्थानें एका वर्तमानपत्रांत जाहिरात वाचली कीं, "लेखणी व शाईखेरीज लिहिण्याची युक्ति. किंमत रु० दोन." गृहस्थानें लागलेच दोन रुपये पत्रकर्त्याकडे पाठविले. दुसरे दिवशीं खालीं लिहिल्यप्रमाणें एका कार्डावर जबाब मिळाला कीं, "पेनसलीनें लिहावें." बिचारा गृहस्थ चुरमुरे खात बसला!

* १३ *

एकादशीचे दिवशीं एक गृहस्थ विडा खाऊन बाहेर पडला. पण, त्याचा परिचयी त्याला रस्त्यांत भेटला. तो त्याला ह्मणतो; "अरे, आज एकादशी आणि तूं विडा खाल्लास?

**गृहस्थ**—काय करावें, ह्मटलें कांद्याची घाण तोंडाची जाईल!

**परिचयी**—एकूण कांदाही खाल्लास?

**गृहस्थ**—काय करावें, शिळीभाकर कांद्याशिवाय गिळते कशी?

**परिचयी**—शिळीभाकर आणि कांदा खावयाचें असें काय अडलें होतें?

**गृहस्थ**—अहो, ह्मटलें ती नास होईल. घरांत कोणी पोरवाळसुद्धां ती खाईना. कारण, तिला कुत्रें शिवलें होतें!

* १४ *

**शिंप्याची जाहिरात**—हाताखालीं काम करण्या-करितां शिंपी पाहिजे. त्याला हात, मान वगैरे नीट कापतां आलीं पाहिजेत ! !

*　　१५　　*

**शौकी**—मजला फोटोग्राफ् काढविण्यास जाणें आहे.

**दुसरा**—तर मग त्या फोटोंत तुमचा चेहरा ओळखतां येणार नाहीं. कारण, मुळच्या चेहऱ्यांत आणि आजच्यांत घोटाघोटी व छपवाछपवी पुष्कळच केली आहे !

*　　१६　　*

**जज्ज**—तूं दोन बायका केल्यास, हा मोठा गुन्हा केलास. या अपराधांतून मुक्त होशील, अशीं कारणें असल्यास सांग.

**कैदी**—महाराज, मला दोन सासवांचा किती त्रास सोसावा लागतो व दोन बायकांच्या कोणत्या जाचांत रहावें लागतें, याची कल्पना केल्यास दगडासही माझ्याविषयीं दया येईल !

*　　१७　　*

दोघां मनुष्यांनीं एका देवतेला प्रसन्न करून घेऊन वरदान मागितलें. पहिला ह्मणाला, " मी चोरी तर करीनच; पण लोकांनीं उघडपणें चोर ह्मणूं नये ! त्यावर देवता हंसून ह्मणाली " जा तर तूं सोनार हो. "

दुसरा ह्मणाला, " मीं कुत्र्यासारखें हमेशा भोंकत तर रहावें; पण उघडपणें मला कोणी कुत्रें ह्मणूं नये ! त्यावर देवता ह्मणाली " अशीच इच्छा आहे तर जा भाट हो.

*　　१८　　*

कोणी एकानें एका वैद्याला विचारिलें कीं, जेवावयाची

वेळ कोणती ? वैद्यानें उत्तर दिलें; " श्रीमंताला ज्या वेळीं भूक लागेल ती, व गरिबाला मिळेल ती. ? "

* १९ *

एक सहा वर्षांचा मुलगा आपल्या पंतोजीस एक दिवस ह्मणाला, " मास्तर, मला तुह्मांस कांहीं विचारावयाचें आहे. "

**पंतोजी**—( आनंदांत असतांना ) तुला काय विचारावयाचें तें खुशाल विचार.

**मुलगा**—मास्तर, गाढवाला किती पाय असतात ?

**पं०**—( हंसून ) चार.

**मु०**—दोन पायांचा गाढव नसतो काय ?

**पं०**—गाढवा ! दोन पायांचा कोठें गाढव असतो ?

**मु०**—( नम्रपणें ) मास्तरसाहेब, काल रात्रीं माझ्या बाबानें माझी परीक्षा घेतली. मला थोडें वाचावयास, लिहावयास वगैरे दिलें; परंतु त्यांतील मला कांहींएक आलें नाहीं. ह्मणून " तुझा मास्तर केवळ गाढव असेल " असें तो ह्मणाला. यावरून मी समजलों कीं, दोन पायांचे गाढव एखादे वेळेस असतील ! !

* २० *

**मास्तर**—( इंग्रजी शिकवीत असतां ) रामा, व्हॉट् ह्मणजे काय ?

**रामा**—मास्तर काय.

**मा०**—( रागावून ) अरे, व्हॉट् ह्मणजे काय ?

**रामा**—मास्तर काय.

**मा०**—कांरे, तुला ऐकायाला येत नाहीं वाटतें ? अरे,

व्हॉट् ( इंग्रजी शब्द असून याचा अर्थ ' काय ' असा आहे. ) ह्मणजे काय ?

शा०—मास्तर व्हॉट् ह्मणजे काय.

मा०—( फळ्यावर लिहून दाखवितो. ) अरे, डब्ल्यू एच् ए टी=व्हॉट् याचा अर्थ काय ?

( मास्तराला शिकविणें बंद करावें लागलें. )

* २१ *

**बरा झालेला रोगी**—डाक्टरसाहेब, मला तुह्मी माझा जीव दान दिलात; त्याबद्दल मी तुमचा फार ऋणी आहें. कशी फेड होईल ती होवो !

**डॉक्टर**—जिवाबद्दलच्या ऋणाची फेड न झाली तरी हरकत नाहीं. पण, औषधें दिलीं त्यांच्या पैशाबद्दलची बरीक लवकर करा. कशी होईल ती होवो असें नका ह्मणूं ह्मणजे पावलें.

* २२ *

" कायहो, असा फाटका अंगरखा घालून रस्त्यांतून हिंडावयाला तुह्मांला लाज नाहीं का वाटत ? " " नाहीं. कारण, तो माझा नव्हे. दुसऱ्याचा मागून आणला आहे."

* २३ *

**न्यायाधीश**—( कैद्यास ) मी अशी आशा करितों कीं, पुनः तूं मजसमोर येणार नाहींस.

**कैदी**—महाराज, हें आपण काय ह्मणतां ? आपला न्यायाधीशपणा येथून गेल्यास उपाय नाहीं ! !

* २४ *

**मास्तर**—( विद्यार्थ्यास ) चल बोल, मी तुला कशाकरितां मारतों ?

**विद्यार्थी**—मास्तर, तुह्मी शाळेंत आलां तेव्हांच तें मीं ओळखिलें आहे. आज तुह्मी आलां ते रागांतच आलांत. आणि मला अनुभव आहे कीं, असे रागांत जेव्हां तुह्मी शाळेंत येतां, त्या दिवशीं खचित कोणी तरी मार खाल्यावांचून रहात नाहीं.

* २५ *

वासुदेवरावाच्या मनांतून गोविंदरावास भेटावयाचें नव्हतें, ह्मणून त्यानें आपल्या भाच्यास सांगितलें कीं, बाळ्या, कोणी मला विचारण्यास आलें तर असें सांग कीं, " माझे मामा गांवाला गेले आहेत. " असें शिकवून वासुदेवराव तिसऱ्या मजल्यावर जाऊन लपले. बाळ्या दारांत उभा आहे असें पाहून—

**गोविंदराव**—बाळ्या, तुझे मामा आहेत काय ?

**बाळ्या**—माझे मामा गांवाला गेले आहेत.

**गोविंदराव**—कोणच्या गांवाला गेले आहेत ?

**बाळ्या**—अहो, उभे रहा. ते घरांत लपले आहेत; तेथें जाऊन विचारून येतों.

* २६ *

नवरा-बायकोचें भांडण चाललें असतां तें सोडविण्यास नवऱ्याची सासु ( बायकोची आई ) आली. पण, ही ब्याद कशी तरी येथून घालवून द्यावी ह्मणून त्यानें पुढील युक्ति केली.

" मामी, काय सांगावें ? तुह्मी साखरेपेक्षां गोड, पण हिच्या ( बायकोच्या ) आईची मोडावी खोड. " असें ह्मणून बायकोच्या एक तोंडांत दिली.

पुनः सभ्यतेनें ह्मणतो. " मामी, तुह्मांस राग येऊं

देऊं नका; मी तुह्मांला बोलत नाहीं. अहो, तुमच्यासारखें माणूस नाहीं जगांत, पण हिच्या आईचे पाडावे दांत." असें ह्मणून दुसरी तोंडांत दिली.

हें ऐकून मामी कावरीबावरी पाहूं लागली. तेव्हां पुनः ह्मणतो, "मामी, खरोखरच तुह्मी फार शांत अहांत. तुमचें मन तर अगदीं निर्मळ गंगा, पण हिच्या आईचा उतरला नांगा." हें ऐकून मामी निमूटपणें चालत्या झाल्या.

* २७ *

कृष्णरावांनीं एक चवली देऊन आपल्या नव्या गड्यास कांहीं जिन्नस आणावयाला पाठविलें. गडी थोड्या वेळानें परत येऊन ह्मणतोः—

"ती चवली कुटवी चालनाय."

**कृष्णराव**—बरं, नाहीं तर नाहीं; आण इकडे ती दुसरी देतों.

**गडी**—ती चालनाय तवां गुत्त्यांत जाऊनशेनी दारू खाल्ली ! !

* २८ *

एक विठोबाचा भक्त होता. तो दररोज भोजनाचे पूर्वीं भक्तिपुरःसर ओल्या अन्नाचा विठोबास देवळांत जाऊन नैवेद्य दाखवीत असे. एके दिवशीं तो देवळांत जात असतां, देवळाचे बाहेरचे बाजूस एक रोडका भुकेलेला कुत्रा धापा टाकीत बसला होता. वरील गृहस्थास अन्न घेऊन जातांना पाहून तो कुत्रासुद्धां आशेनें देवळांत जाऊं लागला. तें पाहून पुजारी ह्मणतोः—अहो भक्तमहाराज,

देवळांत कुत्रा नेण्याची मनाई आहे. आपले कुत्र्याला बाहेर घालवून द्या कसा !

**भक्त**—तो कुत्रा माझा नव्हे.

**पुजारी**—तर तो आपले पाठीमागून कां जातो ?

**भक्त**—आपणसुद्धां माझे पाठीमागून येत आहां.

( पुजारी चुप झाला आणि मुकाट्यानें कुत्र्याला बाहेर लावून दिलें. )

* २९ *

**मास्तर**—नदीच्या कांठचा नकाशा काढावयाचा असल्यास प्रथम कोणत्या गोष्टीबद्दल सावधगिरी ठेविली पाहिजे ?

**उमेदवार**—घसरून न पडण्याविषयीं !

* ३० *

एक म्हातारा फकीर खोटा पैसा हातांत घेऊन जात होता. त्यास एकानें विचारिलें " बाबा, हें काय आपल्या हातांत ? " त्यानें उत्तर केलें " बेटा, हा खोटा पैसा आहे. " त्यावर तो म्हणाला, " तर मग तो फेंकून कां द्याना ? म्हातारा म्हणाला, " तुम्हांला ठाऊक नाहीं ? " खोटा पैसा व तुटका लेखदेखील वेळेवर कामीं पडतो. "

* ३१ *

एक शास्त्रीबुवा आपल्या शिष्यास शिकवीत असतां त्याच्या तोंडांतील तांबुलाचा टिपका पोथीवर पडला. तें पाहून शिष्यानें तो पुसून टाकला. तेव्हां, शास्त्रीबुवा आपल्या शिष्यास विचारतातः—

**शास्त्री**—कांरे पोथीचें पृष्ठ पुसलेंस ?

**शिष्य**—गुरुजी, त्याच्यावर आपल्या मुखांतील तांबुलाचा थेंब पडला ह्मणून.

**शास्त्री**—वेड्या त्यांत पुसून टाकण्याचें रे काय कारण? अरे, गुरूचें मुख ह्मणजे प्रत्यक्ष भागीर्थी होय.

शिष्यानें ही गोष्ट लक्ष्यांत ठेवून आपल्या पितामहाच्यां अस्थि भागीर्थींत सोडण्यास ह्मणून ठेवलेल्या होत्या. त्यांतील एकीचें चूर्ण करून आणलें आणि गुरुजीला जांभई देतांना पाहून, तें हळूच त्यांच्या तोंडांत सोडलें. तेव्हां:—

**शास्त्री**—( रागावून ) हें रे काय केलेंस?

**शिष्य**—गुरुजी, आमच्या आजोबाच्या अस्थि फार दिवसांपासून पडून राहिल्या होत्या. त्या अनायासेंच भागीर्थी सन्निध असल्यामुळें तींत सोडून दिल्या.

( गुरूला आपल्या दांभिक उपदेशाचा पश्चात्ताप झाला, हें सांगणें नकोच. )

* ३२ *

एके घरीं रात्रीं चोर आले. त्यांची चाहूल ऐकून घरांतील भोळवट ह्मातारी निजल्याजागेवरूनच उत्तर करिते "बाबांनो, तुह्मांस आमचे घरांत काय सांपडावयाचें आहे? देव्हाऱ्यावर सोन्याच्या मूर्ति मात्र आहेत, त्या तुह्मी कशाला न्याल?" तें ऐकून चोरांनीं तात्काळ त्या मूर्ति लांबविल्या. देवघरांत चोरांची चाहूल ऐकून ह्मातारी ह्मणते, "काय मेले चोर तरी लबाड आहेत; देवसुद्धां राहूं देईनात. बरें देवमूर्ति नेल्या तर नेल्या; पण तुळसीखालीं हंडा पुरला आहे, तो तरी नेऊं नका." तें ऐकून चोरांनीं आनंदानें तोही लांबविला. तें पाहून ह्मा-

तारी रागानें ह्मणते. " मेल्यांनो, मी नेऊं नका ह्मणून सांगत असतां ऐकत नाहीं ? बरें असो. घुसळ खांबाखालीं तांब्या आहे, तो तरी आह्मांस राहूंद्या. हें ऐकून चोरांनीं तोही लंबा केला ! व आणखी कांहीं ह्मातारी सांगते कीं काय ह्मणून ऐकत उभे राहिले. तें पाहून ह्मातारी ह्मणते " मेल्यांनो, होतें नव्हतें तेवढें नेऊन आणखी माझी झोंपमोड करण्यास उभे राहिलां काय ? लवकर चालते व्हा; नाहीं तर खोड्यांत पडाल. " तें ऐकून चोरांनीं पलायन केलें. सकाळीं उठल्यावर ह्मातारी आपले मुलग्यास रात्रींची हकीकत सांगूं लागली, तें ऐकून मुलानें कपाळावर हात मारून घेतला ! !

* ३३ *

१ ली—( दुसरीस ) तुमची गाय गाभण नाहीं वाटतें ?

२ री—( पहिलीस ) ती तर मेली गोठाणाचें दर्शनदेखील घेत नाहीं. मग कशानें ती गाभण राहणार ?

**बाळ्या**—( मध्येंच ) कांगे आई, माझे वेळेस तूं तरी पण गोठाणावरच जात होती असशील नाहीं ?

* ३४ *

एक मनुष्य तोंडल्याची भाजी तोडण्याच्या नादांत असतां एक लहानपणाचा स्नेही येऊन त्यास विचारितो " तुह्मांस मुलें किती आहेत ? " हा तोंडलीं तोडण्याच्या नादांत असल्यामुळें उत्तर करितो ' भाजी पुरतीं निघतात. '

* ३५ *

**मुलगी**—बाबा, माझें लग्न चांगल्या अनुभवी मनुष्याबरोबर करा. त्याला संसाराची चांगली माहिती असली पाहिजे.

**बाप**—अग, तुझ्या नवऱ्याचें वय साठ वर्षांचें आहे; त्याला संसाराची चांगली माहिती असून, तुजबद्दल पांचशें रुपये देण्यास त्याची तयारी आहे.

* ३६ *

एक बाई आपल्या मुलावर फारच रागावली आणि ती त्याला संतापानें म्हणाली; " चल नीच, गाढव मेला ! " मुलगा शांतपणानें उत्तर करितो, " आई गाढव मेला तर तुझेंगे काय जातें? "

* ३७ *

**न्यायाधीश**—( आरोपीस ) तूं अपराधी आहेस किंवा निरपराधी ?

**आरोपी**—महाराज, साक्षीदार काय सांगतात तें ऐकल्यानंतर सांगेन.

* ३८ *

एकदां एक स्त्री आपल्या मित्रास भेटावयास गेली असतां भेट झाली नाहीं. म्हणून दुःखी होऊन संतापानें " पाजी, विश्वासघातकी " असे शब्द सर्व खोलीभर लिहून चालती झाली. दुसरे दिवशीं तिचा मित्र तिला म्हणाला " काल तूं कां आली नाहींस ? " " अहो मी आल्याची खूण सर्व खोलीभर ठेविली होती. " " खरेंच तूं आपलें नांव लिहून ठेविलें असूनही तें मला समजलें नाहीं ! "

* ३९ *

कोणी एक हरदासबुवा वक्तृत्वकलेंत चांगले प्रवीण होते. एखादा विनोदपर चुटका बुवांनीं सांगितल्यास लोडतक्क्यांशीं बसलेली संभावित मंडळीदेखील पोट धरून हंसल्याखेरीज रहात नसे. त्याचप्रमाणें करुणरसाचा प्र-

संग आल्यास, आबालवृद्धांच्या नेत्रांतून अश्रुपात झाल्या-वांचून कधींही राहत नसत. बुवांची अशी अद्भुत वक्तृत्व-शक्ति पाहून कांहीं तरुण चैनी मंडळी बुवांकडे गेली आणि त्यांनीं अशी गोष्ट काढली कीं, आजच्या कीर्तनांत एकाच प्रसंगीं कांहीं मंडळींनीं रडावें व कांहींनीं हंसावें; असा प्रसंग आणाल काय? मंडळीकडून शालजोडी बक्षीस वेण्याचा ठराव करून बुवांनीं सदर गोष्ट कबूल केली.

रात्रौ कीर्तन सुरू झालें, श्रोत्यांची गर्दी इतकी झाली कीं, कीर्तनस्थळीं मुंगीचा प्रवेश होणेंदेखील कठीण झालें. बुवांनीं वेदांतनिरूपण संपवून करुणरसप्रधान असें चिल-याचें आख्यान लाविलें. चिलयाच्या मस्तकाच्या कांड-णाचा हृदयद्रावक प्रसंग निघाला. लोडाशीं बसलेल्या शास्त्रीमंडळीकडे पहात पहात व बोलत बोलत बुवा पुढें चारदोन पावलें गेले. सर्व श्रोतृसमाजाच्या डोळ्यांतून चांगुणामातेचें तें पुत्रविलापरूपी गीत ऐकून अश्रुपात होऊं लागला. इतक्यांत बुवांच्या डाव्या बाजूला बसलेली शें-पन्नास मंडळी एकदम खदखदां हंसूं लागली.

हंसण्याचें कारण इतकेंच कीं, बुवांनीं डाव्या पृष्ठा-वरील धोतर वर केलें ! !

* ४० *

**बाप**—बाळ्या, काल तूं पूजा केलीस ना? कांहीं दे-वांना गंध आणि कांहीं गंधाशिवाय असें कसें?

**बाळया**—घामानें त्यांचें गंध गेलें असेल!

**बाप**—वेड्या देवालारे कसचा घाम?

**बाळ्या**—रात्रीं उंदीर नेतील म्हणून घाबरून ते बाबा घामाघूम होतात, कोणकोणाला तो पहा येत असेल!

* ४१ *

**बाळ्या**—आई, नैवेद्यास दे.

**आई**—अरे, घे एवढें दूध.

**बाळ्या**—दूध नको, देवांना तोंड का आहे दूध प्यावयास? लाडूबिडू दे.

**आई**—लाडू खावयास तोंड आहे आणि दूध पिण्यास नाहीं कांरे लुच्या?

**बाळ्या**—लाडू देव न खातील तर मी तरी खाईन!

* ४२ *

**आई**—कारट्ये, तुझ्याबरोबर ओरडून माझा घसा दुखूं लागला.

**मुलगी**—म्हणूनच बाबा तुला सांगतात ते, कीं जरा हळू बोलत जा.

* ४३ *

रेलवेंतून प्रवास करितांना एक विधवा बाई बायकांच्या डब्यांत धाबळी नेसून फराळास बसली. तिला शेजारची दुसरी म्हणते, "बाई धाबळी कशाला नेसलीस?" सोंवळी म्हणाली "असें झाल्यापासून मी ओंवळ्यानें फराळ करणें सोडिलें आहे!"

* ४४ *

**नवरा**—मला आज स्वप्न पडलें, त्यांत मीं मुंबई पाहिली.

**बायको**—मला नव्हतें का बरोबर न्यावयाचें? मी मुंबईची मुंबई बघतें आणि दोन दिवस माहेरीं राहतें.

**नवरा**—काय चावट आहे, अग स्वप्नांत मुंबई पाहिली.

**बायको**—पण स्वप्नांत तरी एकटें कां जावें? जागृतींत खर्चाला भितां, स्वप्नांत तीही अडचण नव्हती.

**नवरा**—पुनः असें स्वप्न पडेल तेव्हां मी आपल्या लाडकीला जरूर नेईन.

* ४५ *

**प्रश्न**—पांडव किती आहेत?

**उत्तर**—बाजल्याच्या खुरांइतके तीन. ( बोटांनीं दाखवावे दोन ) म्हणजे पांडव ५, बाजल्याचे खूर ४, तोंडानें म्हणतो ३, हातांनीं दाखवितो २ कशास कांहीं मेळ नाहीं.

* ४६ *

चौघे भ्याड बसले असतां मधून एक मुंगूस पळालें. तेव्हां घाबरून एक म्हणतो, मुसंग. **दुसरा**—सुमंग. **तिसरा**—सुंगम. **चौथा**—ग्रुमस.

* ४७ *

**स्थूलमानाचे सिद्धांत**—पल्लेदार घेरा व चक्रीदार पागोटें ज्या डोक्यावर आढळेल, त्या डोक्यांत ज्ञानभांडार बरेंच कमी असण्याचा संभव आहे. घोळदार सदरा व तंगदार जॅकिट् ज्या अंगांत दिसेल, तेथें शक्ति कमी असावयाची. कल्लेदार मिशा व कमानदार भोंवया याच्या योगानें जी चेहेरेपट्टी खुलविलेली, तिच्यांत स्वाभाविक सौंदर्य मुळींच नसावयाचें. ऐटदार चालणें व कुर्रेदार बोलणें ज्या मनुष्याचें, तो बहुधा मेषपात्र असावयाचा. अणीदार जोडा व पट्टीदार ज्याच्या धोतराच्या निऱ्या, तो छाकटा असावयाचा. नुसता भपकेदार ज्याचा वरील पोषाख, त्याच्या घरीं वेळेस खाण्याचीदेखील पंचाईत. असें सामान्यतः समजावें.

४८

**सटवाजीराव ढमाळे** यांजकडे स्वामीभक्तितत्पर व एकनिष्ठ एक नोकर होता. एके दिवशीं कांहीं मित्रमंडळी घरीं जमली होती. सटवाजीरावांनीं नोकरास सांगितलें कीं, घरांतून चार सिताफळें घेऊन ये. नोकर 'जी सरकार' ह्मणून लगबगीनें जाऊन चार सिताफळें हातांतून घेऊन आला. तेव्हां सटवाजीरावांनीं उपदेश केला कीं, बाहेरील चार संभावीत मंडळी जमली असतां जिन्नस हातांतून कधींही आणूं नये. ताटांतून वगैरे घेऊन यावें. पुढें कांहीं दिवसांनीं आणखी कांहीं मंडळी जमली व सटवाजीरावास त्यांजबरोबर बाहेर जाण्याचें होतें. करितां सदर नोकरास हांक मारून शिकारीबुटाची जोडी लवकर आणण्यास सांगितलें. नोकरानें पूर्वीच्या उपदेशाप्रमाणें एका मोठ्या चांदीच्या ताटांत बुटांची जोडी ठेवून ताट सादर केलें. मग काय पुसावें? सर्वत्रांचा एकच हशा उडाला. नोकराची एकनिष्ठ सेवा खरी ! !

* ४९ *

**गिऱ्हाईक**—(दुकानदारापुढें पावली टाकून) पायलीभर गहूं दे पाहूं?

**दुकानदार**—आणखी एक आणा पाहिजे.

**गिऱ्हाईक**—कां बरें?

**दुकानदार**—किंमत चढली आहे.

**गिऱ्हाईक**—कधींपासून?

**दुकानदार**—सकाळपासून.

**गि-हाईक**—बरें तर आपल्याला कालच्यांतलेच गहूं दे !

* ९० *

**विद्यार्थी**—वकील ह्मणजे काय, मास्तर ?

**मास्तर**—( अनुभवीक ) तुमची जिनगी कायदेशीर रीतीनें दुसऱ्याचे ताब्यांतून काढून आपले ताब्यांत घेतो तो.

* ९१ *

**स्वातंत्र्य** जर अमोलीक आहे, तर लग्न करणें ह्मणजे मूर्खपणाच ह्मटला पाहिजे.

* ९२ *

**आज्ञाधारक बाळ्या**—आईनें आपल्या सात वर्षांच्या बाळ्याला असा उपदेश केला कीं, " आज जें काम तुला करितां येईल, तें तूं उद्यांवर ढकलूं नकोस " हा उपदेश ऐकून बाळ्या आईला ह्मणाला, " आई, तूं उद्यांकरितां जो गुळंबा राखून ठेवला आहेस, तो मग आतांच खाऊन टाकूं. "

* ९३ *

**कोणास काय पाहिजे**—श्रीमानास किताब. मद्यप्यास शराब. ( दारू. ) ह्मातान्यास काळे केंश. नाटकी पोरास स्त्रीचा वेष. आजाऱ्यास वांति. कुरूपास कांति. पारधकरणारांस शिकार. अलीकडच्या ग्राज्वेटांस कोटपाटलोन. दिवाळखोरास ऋण. विमानास धुर व एडिटरास मजकूर.

* ९४ *

**कोणामुळें कोणाची दुर्दशा**— उतारूंची रेलवेनें. ग्राहकांची दलालानें. हिंदु लोकांची दुहीनें. लिहिणारांची नोकरी न मिळाल्यानें. समाजाची कोरड्या वक्तृत्वानें.

रोग्याची कुपथ्यानें. प्रजेची कर व पोलिसानें. वेश्यांची निर्धन व आंबटशोकी लोकांनीं. चैनी श्रीमानाची वेश्येनें. देशी तेलाची रॉकआईलनें. मास्तराची वार्षिकपरिक्षेनें. एतद्देशीय राजेरजवाड्यांची पोलिटिकल एजंटांनीं.

* ९५ *

**शिक्षक**—( वर्गातील एका विद्यार्थ्यास ) रामा, अठराव्या शतकांत इंग्लिशांनीं किती लढाया मारिल्या ?

**विद्यार्थी**—सहा.

**शिक्षक**—सांग पाहूं कोणत्या त्या ?

**विद्यार्थी**—एक, दोन, तीन, चार, पांच आणि सहा.

* ९६ *

**व्यापारी**—( नोकरीसाठीं अर्ज घेऊन आलेल्या एका उमेदवारास ) बहुधा मी फक्त ज्याचें लग्न झालें असेल त्यासच नोकरीस ठेवितों.

**उमेदवार**—महाराज, आपणास एखादी मुलगी आहे काय ?

* ९७ *

**नवरा**—अग, गरीबी असणें यांत एक फायदाच आहे !

**बायको**—तो कोणता ? मला तर सांगा !

**नवरा**—आपणाला वर्षाचे घरभाड्याबद्दल शेंदोनशें रुपये द्यावे लागत नाहींत !

* ९८ *

एका मनुष्याला रेल्वेनें जावयाचें होतें; परंतु डब्यांत फार गर्दी असल्यामुळें त्याजवर उभें रहाण्याची पाळी आली. पुढें गाडी चालू झाल्यानंतर तो मनुष्य गाडींतील डब्याच्या तोंडाजवळ गेला व मोठ्यानें ओरडला “ अरेरे

हें काय ?" हे शब्द ऐकतांच पुष्कळ उतारू डब्याच्या तोंडाशीं जाऊन इकडे तिकडे पाहूं लागले. ही संधि साधून तो मोकळ्या जाग्यावर जाऊन बसला. हेंच तें प्रसंगावधानाचें लक्षण.

* ५९ *

चंद्राचे वपुलागिं लांछन असे, गंगा स्वयें
वांकडी ॥ शैलाची तनुजा कठोर गिरिजा
नंदी पशूची कुडी ॥ कंठीं वासुकि मीरवे
परिमुखीं कांटा विषाचा असे ॥ माझी दाद
सदाशिवा तुजपुढें देणार कोणी नसे ॥ १ ॥

कोणी गरीब ब्राह्मण सदाशिवास उद्देशून ह्मणतो, हे देवा! तुझ्याजवळ माझी दाद लागणें कठीण दिसतें? कारण, चंद्राचा आर्जव करावा, तर त्याच्या देहास कलंकाचें लांछन असल्यामुळें तो आपल्या चिंतेंत आहे. गंगेकडे जावें, पण ती तर स्वतःच वांकडी आहे. गिरिजेकडे जावें, तर ती पर्वताची कन्या असल्यामुळें तिचा स्वभाव क्रूर आहे आणि ह्मणूनच तिला चंडी म्हणतात. नंदीचे पाय धरावे, तर तो जात्या पशुच आहे. गळ्यासभोंवती गुंडाळलेल्या वासुकीची विनवणी करावी, तर त्याच्या तोंडांत विषाचा कांटा आहे. म्हणून माझी दाद आपल्या पायांजवळ लागणेंच कठीण!

* ६० *

एक बढाईखोर गृहस्थ आपल्या बरोबरीच्या मंडळींत मोठ्या ऐटीनें आपल्या महत्वाची गोष्ट सांगूं लागला. तो

ह्मणाला, " पूर्वी त्रेतायुगांत दाशरथी रामाचे लग्नांत मी मागील मंडपांत भोजनाचे पंक्तीमध्यें तूप वाढीत होतों. त्यावेळचा लग्नाचा थाट काय सांगावा ! " हें त्याचें पोकळ बढाईचें भाषण ऐकून त्या मंडळींतील एकानें त्याच्या श्रीमुखांत फाडकन् लगावून ह्मटलें, " अरे लुच्चा ! आज तूं मला भला सांपडलास. मी त्या पंक्तींत जेवावयाला बसलों होतों व तूं तूप वाढीत होतास; त्या वेळीं मीं तुला कित्येक वेळां हांका मारिल्या; परंतु तूं माझ्या पानाकडे तूप घेऊन आला नाहींस, त्यामुळें मला मुकी पोळी खावी लागली! "

* ६१ *

**बोलण्यांत चूक**—एका गृहस्थाचें मूल फार रडूं लागलें, ह्मणून त्यास थान पाजण्याविषयीं त्यानें आपल्या बायकोस सांगितलें. बायको ह्मणाली, याला काय झालें तें समजत नाहीं. सर्वांपासून याचप्रमाणें रडत आहे. व पाजूं लागलें तरी थान धरत नाहीं, गृहस्थ जरा रागावून ह्मणाला, पाज तर खरी, नाहीं धरत ह्मणजे काय त्याचा बाप धरील !

**नाटकावर चुटका**—सर्व तुनचें फाटकें, आणि घेड्यांनों कसलीं करतां नाटकें ?

सुखी लोकांचा जात नाहीं वेळ, ह्मणून त्यांचे हे खेळ! १

तुमच्या घरांत नाहीं दाणा, हें मनांत तरी आणा! २

इकडे चालला आहे प्राणसंहार, आणि कसलें करतां ३ वेणीसंहार ?

पैसा गेला सारा, तरी कशा सुचतात ह्या वाईट तारा ! आतां पुरे झालें संगीत, उद्योगानें व्हा पाहूं मंडीत ! किती घ्याल सोंगें ? जेवढीं कराल तेवढीं सर्व ढोंगें ! ६

नाटकांत जितके ह्मणून गेले, ते सर्व सडून मेले !
नाटकाचें महत्व ह्मणे मोठें, पण अनुभवीं सारें खोटें !
शेंकडों झाल्या नाटक-पार्टी, पण चावट झाली कार्टी !
वडिलांचा नाहीं जेथें मान, तेथें कसलें दुसरें भान ?
वीतभर गांवांत चार चार खेळ, पण कोणाला आहे पहावयाला वेळ ?
भिकारी झाली सारी सृष्टी, आणि इकडे नाटकांची झाली अति वृष्टि !
पडूं नका हो ह्या फंदा, काढा कांहीं तरी धंदा !
खरे असाल मर्द, तर घाळवा देशाचें दर्द !
उद्योगाचा आहे हा काळ, समजला कांहो बाळ ?
असाल मनाचे खोल, तर ऐकाल माझे बोल !

* ६२ *

**आडून बोल**—एके ठिकाणीं नवराबायकोचें भांडण चाललें असतां बायको रागावून नवऱ्यास म्हणाली, "तुम्ही मला गाडीभर बोललां तरी कांहींच नव्हे; आणि मी मात्र थोडें जरी बोललें तरी माझें तोंड दिसतें ?" नवऱ्याचा स्वभाव सभ्य व शांत असल्यामुळें तो म्हणाला "अग, तुला बोलायची हौसच असेल तर तोंडावर पदर घेऊन किंवा कवाडाच्या आडून तूं पाहिजे तसें मला बोल. म्हणजे तुझें तोंड मुळींच दिसणार नाहीं; आणि तुझी इच्छाही पूर्ण होईल रागजलीस !

* ६३ *

**मद्द झाला**—कोणी एक गृहस्थ पत्र लिहीत बसला असतां, त्याचा एक स्नेही मनुष्य त्याचे जवळ बसला होता व तो पत्र लिहिणाऱ्या गृहस्थाच्या पत्राकडे पहात

होता. तेव्हां पत्र लिहिणाऱ्या गृहस्थानें आपल्या मनांत म्हटलें 'याला पाहूं नको म्हणावें तर हा रागावेल, तर आपण आपले पत्रांत खुबी करूं म्हणजे झालें.' याप्रमाणें बेत करून मायना वगैरे लिहिला व ज्या गृहस्थास पत्र लिहावयाचें होतें त्यास असें लिहिलें कीं, "कोणी एक मूर्ख मनुष्य, मी पत्र लिहीत असतां माझेजवळ बसला होता, सबब या पत्रांत मला जो गुह्य मजकूर लिहावयाचा होता तो लिहितां आला नाहीं." हें पाहतांच पत्र लिहिणाराचा स्नेही म्हणतो कीं, "मी तुमचे पत्राकडे पहात नसतां मला मूर्ख म्हणून कां लिहिलेंत?" पत्र लिहिणारानें उत्तर दिलें कीं, जर तूं माझ्या पत्राकडे पहात नसतास, तर मीं तुलाच मूर्ख म्हटलें हें कशावरून समजलें? हें ऐकून स्नेही मुकाट्यानें घराकडे गेला.

* ६४ *

**खाशी खोड मोडली**—एका कृपण गृहस्थाची १०० रुपयांची थैली कोठेंशी सांडली. तेव्हां ती आणून देणारास १० रुपयांचें बक्षीस मिळेल. असें त्यानें सर्वत्र प्रसिद्ध केलें. एका भिकाऱ्यास ती सांपडली व त्यानें त्या गृहस्थास आणून देऊन माझें बक्षीस मला मिळावें अशी विनंति केली. परंतु, कृपणबुवा मूळस्वभावावर जाऊन म्हणतात 'अरे, तींत माझे ११० रुपये होते. दहा रुपये कोठें आहेत? सांग.' अखेरीस मोठें कडाकडीचें भांडण होऊन त्या भिकाऱ्यानें फिर्याद केली. खटला चालला असतां न्यायाधिशास आढळून आलें कीं, ती थैली जशीच्या तशीच मोहोरबंद आहे, तुटलेली नाहीं. शेवटीं न्यायाधिशानें कृपणबुवास प्रश्न केला, "काय हो, ज्या

वेळीं तुमची थैली सांडली त्या वेळीं तींत ११० रुपये होते हें खरें ना?

कृपण—होय सरकार.

न्याया०—तर मग तुमच्याच पुराव्यावरून ह्या थैलीवर मालकी तुमची नसली पाहिजे. कारण, हींत सारे १०० रुपयेच आहेत. माझा ठराव असा आहे कीं, खरा मालक सांपडेतोंपर्यंत ही थैली ह्या भिकाऱ्यानें आपल्याच जवळ ठेवावी.

* ६५ *

नवरा—तुला मीं गुप्त बातमी म्हणून सांगितली ती तूं लोकांस सांगितलीस काय? बायकांच्या पोटांत रहात नाहीं म्हणतात तें खरें!

बायको—तर मग ती बातमी तुम्हीं आपल्या पोटांतच कां नाहीं ठेविली?

* ६६ *

गोविंदराव—काय हो, मी ऐकतों कीं, तुमचा गणु नाटकांत जाऊन चांगलें नांव मिळवूं लागला आहे. खरेंच कीं काय?

लखोबा—तर!

गोविंद०—हल्लीं तो कोणता पार्ट करीत असतो?

ल०—इतके दिवस प्रेत होत होता. आतां पिशाच होऊं लागला आहे.

* ६७ *

म्याजिस्ट्रेट—तूं हें घड्याळ कां चोरलेंस?

**चोर**—वेळ समजावा म्हणून ! !

* ६८ *

**रागावलेली बायको**—मी आतां जाऊन जीव देईन समजलं ?

**नवरा**—जा, जा, आधीं जीव दे. जा आतां जा.

**बायको**—पण, आतां पावसानें कापड भिजेल. तो थांबला म्हणजे जातें की नाहीं पहा !

* ६९ *

**नवरा**—प्रिये ! आपलं लग्न लागल्यानंतर उपाध्यानें तुला "मी आजपासून तुमची झालें" असें म्हणण्यास सांगितलें तें तूं हळूच कां म्हणालीस ?

**बायको**—खरंच का, मी हळू म्हणालें ? बरं तर पुनः नाहीं अं हळू म्हणणार.

* ७० *

**विष्णुपंत**—( शिपायास ) शिपाईदादा, मला लढाईच्या गोष्टी ऐकण्यास फार आनंद वाटतो. परवां तुम्ही ब्रम्हदेशीं लढाईस गेलां होतां, तिथें कसा काय पराक्रम केलात?

**शिपाई**—( मोठ्या ऐटीनें ) रावसाहेब, ज्या वेळीं तरवारींची चकमक झडूं लागली, तेव्हां मीही मोठ्या त्वेषानें आंत शिरलों व चट्चट् प्रत्येकाचे हातच छाटीत गेलों.

**विष्णु०**—पण शिपाईदादा, त्यांचे हात छाटण्यापेक्षां त्यांचीं डोकींच कां नाहीं कापून काढलींत ?

**शिपाई**—तींही कापून काढायाला सोडलं नसतं रावसाहेब ! पण, तीं पूर्वींच कोणी कापून टाकिलीं होतीं !

* ७१ *

**सेवकाची रीत**—एकच चाकर असला, तर आपलें

काम होण्यास हरकत नाहीं; दोन असले, म्हणजे तें निम्में झालें म्हणून समजावें; तीन असले म्हणजे मग तें आपलें आपणच करावें हें बरें!

**सुधारणुकेची कमाल—**

सुधारलेल्या देशांतील एक पोष्टमास्तर आपलें काम करीत बसला असतां, खिडकींत कोणी ठोठावीत असल्याचा भास झाला. कोण ठोठावीत आहे म्हणून हातांतील जरूरीचें काम एकीकडे ठेवून खिडकी उघडून पहातात तों १६ वर्षांच्या वयाची तरुण व रूपवान् कुमारिका हास्यमुख केलेली दृष्टीस पडली.

मास्तर—( त्या तरुणीस उद्देशून ) काय काम आहे? खिडकीस धक्के तुम्हीच मारीत होतां वाटतें?

कुमारिका—( हास्यमुख करून ) होय. माझी मनिऑर्डर यावयाची होती. ती आली काय?

मास्तर—( तिचे रूपास मोहून ) आंत या. मी पाहून सांगतों.

कुमारिका—बरें. ( आंत जाऊन खुर्चीवर बसते. )

मास्तर—मनिऑर्डर पाठविणाराचें नांव सांगा?

कुमारिका—( मोठ्या उत्कंठेनें प्रेमयुक्त शब्दानें ) मि० पामर.

मास्तरसाहेब मनिऑर्डरपेटींतून तिचे नांवाची मनिऑर्डर काढून वाचून पहात असतां, कुपनावर लिहिलेला मजकूर दृष्टीस पडला. तो मनांत वाचून मोठा चकित झाला. आणि आपल्या मनाशीं विचार करूं लागला कीं:—हें असलें आपुकमापुक जोडपें एकमेकांवर प्रेम दाखविणारें

आहे, तर आतां आपल्यास ही संधि चांगली आहे. पहावें जुळेल तर थोडासा प्रसाद.

मास्तर—( मोठ्या उत्सुकतेनें ) हे घ्या; मनिऑर्डरचे रुपये ४०, आणि हें कुपन.

कुमारिकेनें ४० रुपये मोजून घेतले व मास्तरसाहेबांचा निरोप घेऊन जाण्याच्या बेतांत आहे; इतक्यांत—

मास्तर—कुपनवर काय लिहिलें आहे, तें वाचलें काय?

कुमारिका—नाहीं. कारण, तें मला बरोबर समजत नाहीं. करितां कृपाकरून तुह्मी वाचून दाखवा.

मास्तर—( वाचूं लागतात. ) “ मि० पामर यांनीं एक डझन चुंबन व ४० रुपये तुह्मांसाठीं पाठविले आहेत ते पावल्याबद्दल उत्तर यावें. ”

मास्तर—कुपनवर लिहिल्याप्रमाणें ४० रुपये तर तुह्मांस दिलेच. आतां एक डझन चुंबन (मुके) तुम्हांस मिळाले पाहिजेत; ते तुम्हांस आतांच पाहिजेत ना?

कुमारिका—( सलज्ज होऊन व किंचित् हास्यमुख करून ) होय. जर त्यांनीं मजसाठीं पाठविले असतील तर ते मला पाहिजेत.

अर्थात मास्तरसाहेबांस मोठा हर्ष झाला असेल व जे मुके तिला पाहिजे होते ते मास्तरसाहेबांनीं दिले. नंतर कुमारिका घरीं गेली आणि आपल्या आईस सांगूं लागली—

कुमारिका—आई, पोष्टासारखी सुधारणा कोणत्याच खात्यांत झालेली नाहीं.

आई—तें ग कसें?

कुमारिका—मि० पामरनें मजसाठीं ४० रुपये आणि एक डझन चुंबन पाठविले ते मला येथें पोष्टमास्तरनें

एक डझनच्या ऐवजीं २० चुंबन दिले. यावरून पहा कीं, मि० पामर किती दूर आहे? तरी त्यानें पाठविलेलें चुंबन मला याठिकाणीं मिळालें. सुधारक हो डोळे उघडा!

---

## व्यवहारीक शब्दज्ञान.

अक्षरशत्रु—निरक्षर जो पुरुष त्यास ह्मणतात.

अन्नास लावणें—निर्वाहाची सोय लावून देणें.

अर्धचंद्र देणें—गचांडी देणें.

अंडास लोणी लावणें—अति आर्जव करणें.

अंगवस्त्र—पांघरण्याचें धोतर, लग्नाशिवाय उपभोगार्थ ठेविलेली स्त्री.

आपलपोट्या—आपलें मात्र पोट भरलें ह्मणजे झालें. इतर जे आपण पोसण्यास योग्य त्यांची काळजी बाळगीत नाहीं तो.

आसन हलाळणें—खटलें आटपून स्थलांतर करणें.

औदुंबराचें फूल—एखाद्याची भेट फार दिवसांनीं होणें.

उचलबांगडी—कोणी हात, कोणी पाय, कोणी डोकें असें अनेकांनीं बलात्कारानें धरून कोणेकास उचलण्याचा प्रकार तो.

ऊब आहे—पदरीं द्रव्यसंचय बराच असला ह्मणजे ह्मणतात.

कर—राजा, प्रजेपासून नियमित द्रव्य घेतो तो. २ हात. ३ किरण. ४ ग्रहण, संक्रांत, वगैरेंचा उत्तरदिवस.

कवडीचुंबक—अति लोभी.

करदनकाळ—कृतांतकाळ, सर्वांनीं भ्यावें असा क्रूर मनुष्य.

कपाळकरंटा—दैवहीन.

कांखा वर करणें—दिवाळें काढणें.

कानास खडा लावणें—एखादा अपराध पुनः न करण्याविषयीं मनाचा निश्चय करणें.

कर्जबाजारी—ज्यास बहुत देणें आहे तो.

कुत्र्याचें शेंपूट—अनेक उपदेशादि केले तरी ज्याचा दुष्ट स्वभाव जात नाहीं असा.

क्रियानष्ट—कृतघ्न.

खाल्याघरचे वांसे मोजणें—ज्यानें आपलें बरें केलें, त्याचें वाईट करण्याविषयीं प्रवृत्त होणें.

खेंटरखाऊ—कांहीं कर्माविषयीं शिव्या दिल्या, खेंटरें मारिलीं, तरी ज्यास लाज नाहीं, व पुनः खेंटरें खाण्यास तयार तो.

गंडा घालणें—भुलथापीनें द्रव्य हरण करणें.

गंगाजमनी—ज्या वस्त्राचे दोहोंबाजूचे कांठ दोहों-रंगाचे असतात तें वस्त्र.

गुळाचा गणपती—स्वतः हातानें कांहीं एक काम करावयाचें नाहीं आणि दुसऱ्यास मात्र तूं आळशी आहेस, तुझ्या हातून कांहीं होत नाहीं, असें ह्मणणारा. २ थोडाबहुत अधिकार असून एखाद्या कारभाराविषयीं हें बरें कीं हें वाईट इ. कांहींच न बोलणारा.

गौडबंगाल— गारुडी इ. मंत्रसामर्थ्यानें कित्येक पदार्थ उत्पन्न करून नाहींसे करितात, अशा प्रकारचा

खेळ तें. २ कार्य दिसावें आणि कारण दिसूं नये, असा जो कोणेक स्थलीं व्यापार घडतो तो.

**घरधुणें**—घरांतील सर्व वस्तु नाहींशा करणें.

**घर खावयास येणें**—घरांतील मनुष्यें नाहींशीं झाल्यामुळें त्यांत भय वाटूं लागणें.

**घमंडानंद**—शरीरानें सदृढ असून जेवावयास मात्र यथास्थित मिळालें ह्मणजे मग इतर कोणतीही काळजी करीत नाहीं त्यास निंदेनें ह्मणतात.

**घागरगडचा सुभा**—पाणक्या.

**चंडाळ**—महार, मांग, चांभार इ. जो अत्यंत निर्दय अतिपापी त्यास ह्मणतात.

**चतुर्भुज**—ज्यास चार भुजा आहेत तो. २ ज्याच्या मुसक्या बांधिल्या त्यास संकेतानें ह्मणतात. ३ ज्याचें लग्न झालें त्यास ह्मणतात.

**चांडालचौकडी**—दुष्ट जनांची जूट ती.

**चिदडा**—कांहीं एक पदार्थ अनेकवार चिवडल्यामुळें त्याची जी दुर्दशा होते तो.

**चेवणें**—सभ्यरीत सोडल्यामुळें किंवा वेड लागल्यामुळें लोकांत अप्रतिष्ठा पावणें.

**छिःथूः**—सभादिकांत अप्रतिष्ठा होणें.

**झोटिंगपाच्छाइ**—जेथें एक नियंता नाहीं; बहु नायकी होऊन कामकारभारांत अव्यवस्था होते ती.

**डोक्यावर हात ठेवणें**—आशिर्वाद देणें.

**डोंबल**—डोचकें, शिव्या इ. देण्याचे प्रसंगीं ह्मणतात.

**तिळांजुळी**—कोणेकाच्या मरणानंतर पाण्याबरोबर तीळ देण्याचें एक कर्म आहे ती.

**तिरशिंगराव**—दुसऱ्याशीं मिळून राहूं नये आणि थोड्या कारणानें चिरडीस यावें असा तिरसट मनुष्य.

**तोंडघशीं**—ज्या आश्रयाच्या बळावर कांहीं एक व्यवहारीं कोणी प्रवृत्त झाला, तो आश्रय नाहींसा झाल्यामुळें त्याणें फशीं पडणें.

**तोरा**—संपत्ति, सौंदर्य इत्यादिकांचे अभिमानाचा जो अंगीं आविर्भाव दिसतो तो.

**दगडास पाझर आणणें**—आर्जवादि अनेक युक्तींनीं केवळ निर्दयास दया आणणें.

**दांत कोरून पोट भरणें**—अतिशय कंजुषपणा करणें.

**दिवा लावणें**—मोठी अपकीर्ति संपादणें.

**दांतीं तृण धरणें**—अभिमान सोडून शत्रूस शरण जाणें.

**द्राविडीप्राणायाम**—कांहीं भाषण, कार्य इ. सरळपणानें होण्याजोगें असतां उगीच लांबणीच्या प्रकारानें करण्याचा जो व्यापार त्यास ह्मणतात.

**धटिंगण**—शरीरानें सळकट, मोठा असून ज्यास दुसऱ्याची भीड मर्यादा नाहीं तो.

**धोंडभट्टी**—जलस्नान न करितां स्नान केल्यासारिखें दिसावें ह्मणून भस्म, गंध इत्यादिकांचें धारण करितात ती.

**निमकहराम**—कृतघ्न.

**नाकास चुना लावणें**—सर्वांमध्यें आपली फजीति होणें.

**नाकीं नऊ येणें**—काम करितां करितां थकणें, क्लेश पावणें.

**नाक घांसणें**—अति नम्रतापूर्वक प्रार्थना करणें.

**निर्माल्य**—देवादिकांवर वाहिला जो पुष्पादि पदार्थ

तो. २ ज्या मनुष्यादिकांत तेज राहिलें नाहीं किंवा मूळ-चेंच नाहीं तो.

पाजी—सभ्य पुरुषास उचित नव्हे, असें जें कर्म करावयास लाजत नाहीं तो.

पेशजी—वर्तमानकाळाचे पूर्वी.

पांघरूण धारण करणें—पांघरणें.

पांढरे पायांचा मनुष्य—जेथें जाईल तेथें वाटोळें होई अशा अपयशाचा मनुष्य.

पोटभरू—पोट भरावयाच्या उद्देशानें प्रवासास गेला तो.

फुकटचोट—कोणेक कार्यांत करावा लागतो जो खर्च तेंच, किंवा अंगमेहनत तें न करितां त्या विषयींच्या फुकट गोष्टी मात्र सांगाव्या आणि लाभास पुढें व्हावें अशा स्वभावाचा जो त्यास ह्मणतात.

बद्लौकिक— दुष्कर्मादि आचरणमूलक जी अपकीर्ति तो.

बागुल—मुलांस भय दाखवितेसमयीं भयंकर जे सर्प-व्याघ्रापासून किडा, मुंगी इ. सर्व पदार्थ त्यास ह्मणतात. किंवा तोंच शरीरावरील फोड, क्षत इत्यादि त्यास म्हणतात.

बाईलबुद्ध्या—बाईलेचे बुद्धीनें वागणारा.

बाजारबातमी—बाजार अफवा.

बाशिंगबळ—कोणेकाचा विवाह होण्यास प्रयोजक जें दैवबळ तें.

बाळगोपाळ—ग्रामादिकांतील सर्व लहान थोर जे मनुष्य त्यांस म्हणतात.

बिजवर—दुसरें लग्न करावयास जो नवरा झाला तो.

**भुरटा चोर**—केवळ दरोडेखोर नव्हे, मनुष्याची दृष्टि चुकवून निजलेलें पाहून हळूच चोरी करून जाणारा जो चोर तो.

**बोडेफकीर**—निर्धन किंवा ज्याचे मागें कुटुंबादि कांहींएक नाहीं तो.

**भरपाई**—हुंडी इत्यादिकांचा पैसा पदरांत घेऊन त्याच हुंडी इत्यादिकांवर भरून पावलों इ. रूप जो लेख लिहून देतात तो. २ कोणेएक गोष्टीविषयीं तो लाभ नको आणि ती कटकटही नको असा त्रास आला असतां आतां याची भरपाई झाली, भरपाई लिहून देतों, इत्यादि प्रयोग करितात.

**भागूबाई**—केवळ अपराक्रमी जो पुरुष तो. २ भित्रा.

**भुरळ**—कोणी आपणावर मंत्रप्रयोग किंवा गोडगोड भाषण किंवा आर्जव इत्यादि केल्यामुळें केवळ त्यास वश व्हावें, असा पडतो जो मोह तो.

**मरतमडें**—केवळ जो अशक्त तो.

**मुष्टिमोदक**—कोणेकास प्रहार करावयाकरितां केला जो मुष्टि त्यास ह्मणतात.

**लठ्ठनिरंजन**—निरक्षर होत्साता शरीरानें धष्टपुष्ट असून जो दांडगा त्यास ह्मणतात.

**लाट्यागंगाजी**—लाटालाट करण्याचा स्वभाव ज्याचा त्यास ह्मणतात.

**लांडीलबाडी**—चहाडी, चुगली इत्यादि जी लहान मोठी लबाडी ती.

**बकूब**—मोठा एखादा व्यवहार अंगावर घेऊन सांभाळावा, सभा, दरबार इत्यादि स्थळीं न भितां, न घस-

रतां, उत्तर, प्रत्युत्तर करावें; इत्यादि विषयीं उपयुक्त जें ज्ञान आणि धैर्य मिळून अंगीं प्रभाव विशेष असतो तो. किंवा अंगीं स्वभावसिद्ध जी अक्कल असते तो.

**वाळीत**—कोणी व्यभिचारादि दुष्कर्म केलेलें प्रकट झालें असतां स्वजातीय मिळून बहिष्कार घालतात तें.

**वेडापिर**—वेडगळ, छांदिष्ट, असा जो तो.

**शंखध्वनि**—शंखाचा जो ध्वनि तो. २ बोंबलण्याचा जो शब्द तो.

**शरीरसंबंध**— आपली मुलगी दुसऱ्याकडे दिली किंवा त्याची आपण केली, अशा प्रकारें साक्षात् किंवा परंपरेनें होतो जो परस्परांचा संबंध तो.

**शानिशा**—होतें कीं नाहीं होत, मिळतें कीं नाहीं मिळत, इत्यादिरूप संदेह विषय तो.

**सराफ**—हुंडी, नाणें, रोकड, यांची दे, घे करणारा. २ खर्चवेंच करण्याविषयीं फार बारकाईनें कसर पाहणा-रास निंदेनें ह्मणतात.

**संध्या**—ब्राह्मणांनीं प्रतिदिनीं त्रिकाळ करावयाचें एक कर्म आहे.

**सांब**—भोळ्या मनुष्यास ह्मणतात.

**सोक्षमोक्ष**—कांहीं एक गुंतून पडलेल्या व्यवहाराचा बरा किंवा वाईट परिणाम होऊन कसा तरी जो उलगडा तो.

**हात धुऊन पाठीस लागणें**—नाश करण्याविषयीं प्रवृत्त होणें.

**हातावर तुरी देणें**—फसवून पळून जाणें.

**हात पाय गाळणें**—भयादि कारणानें कोणत्याही कामाविषयीं धरलेला उत्साह सोडून माघार घेणें.

**हातचलाखी**—दुसऱ्याला टकविण्याविषयीं गारुडी, सराफ, वाणी इत्यादि लोक हातांत पदार्थ प्रथम घेतात केव्हां, टाकतात केव्हां, दुसरा बदलतात केव्हां इ० कर्म न समजण्याजोगें जें कसब तीं.

**झांनबली**—भांगेस ह्मणतात.

---

## दृष्टिसंरक्षणाचे नियम.

आपल्या देशामध्यें अलीकडे उपनेत्र लावणारी तरुण मंडळी चोंहोंकडे दृष्टीस पडते. याबद्दल आपल्या देशां-तील लोकांच्या दृष्टीस पूर्वीपेक्षां जास्त विकृति होत चा-लली आहे, असें ह्मणणें भाग पडतें. डोळ्यांचा योग्य रीतीनें उपयोग केल्यास व त्यांच्यासंबंधीं ज्या अवश्य गोष्टी आहेत, त्यांकडे चांगलें लक्ष्य पुरविल्यास बहुतांस चष्मा लावण्याची पाळी येणार नाहीं. दृष्टी कायम राखण्यासाठीं पुढील सात ठोकळ नियमांस अनुसरून चाललें पाहिजे.

१ लिहिण्याचें अथवा वाचण्याचें किंवा ज्यांत डो-ळ्यांचा सूक्ष्म रीतीनें उपयोग करावा लागतो असें एखादें काम करीत असतां डोळ्यांस थकवा आला, अथवा ते दुखूं लागले, त्यांना पाणी आलें व त्यांस बरोबर दिसेना-सें झालें, तर ताबडतोब तें काम बंद करावें; आणि कांहीं वेळ डोळ्यांस पूर्ण विश्रांति मिळाल्यावर मग पाहिजे तर जास्त वेळ काम करावें. पण, पुनः डोळे थकल्याबरो-बर तें काम अगदीं बंद करावें.

२ जेथें तुह्मी काम करितां तेथें पुरता प्रकाश असा-

वा. आणि तो जें काम करितां त्यावर पडावा. काम करितांना उजेडाकडे दृष्टि करून बसूं नये. कामाचे ठिकाणीं पाठीमागून, वरून किंवा बाजूनें उजेड पडेल अशी व्यवस्था ठेवावी. भरसंध्याकाळीं जेव्हां धुंदूक उजेड असतो, अशा वेळीं वाचूं किंवा लिहूं नका. रात्रीं ज्या दिव्याचा आपण उपयोग करितों, तो चांगला प्रकाशमान व स्थिर जळणारा असला पाहिजे. अशा दिव्याच्या उजेडांत काम करणें अपायकारक नाहीं. पण, अशा प्रकाशानें डोळ्यांस इजा होते असें वाटल्यास, लिहिणें वाचणें हें दिवसा करणें हितकर आहे.

३ घोड्यांच्या गाडींत बसून जात असतां अगदीं वाचूं नका. कारण, अशा वेळीं पुस्तकांतील अक्षरांवर नजर ठेवण्यास डोळ्यांस फार श्रम पडतात.

४ निजून कधीं वाचूं नका. त्याच्या योगानें नेत्रांचे अंगीं क्षीणता येते. रात्रीं बिछान्यावर पडून वाचण्याच्या घातक संवयीमुळें पुष्कळांच्या डोळ्यांस विकृति झाली, असें शोधांतीं अनुभवास आलें आहे.

५ दुखण्यांतून बरें होऊं लागलें असतां पुष्कळ वाचूं नये. कारण, शरीराची एकंदर शक्ति सुधारल्याखेरीज दृष्टि बळकट व्हावयाची नाहीं. हातापायांतील स्नायूंस बळकटी आल्याखेरीज नेत्रांतील शिरांस शक्ति व स्थिरता यावयाची नाहीं.

६ पौष्टिक अन्न, पुरती निद्रा, मोकळी हवा, यथास्थित व्यायाम व योग्य मनोरंजन इत्यादि गोष्टींकडे विशेष लक्ष्य दिलें पाहिजे. कठीण काम नियमित रीतीनें करण्याचीही संवय ठेवावी.

७ भरपूर झोंप घ्या. ज्यांची दृष्टि अशक्त आहे, त्यांस झोंप ही सर्वोत्तम उपाय आहे. रात्रीं लौकर निजावें. डोळ्यांस त्रास होणाऱ्या दिव्यांचा उपयोग करूं नये. ज्यांचे डोळे अशक्त आहेत, त्यांनीं ८ तासांपेक्षां १० तास झोंप घेणें बरें.

---

## अंकानुक्रम शब्दबोध.

शून्यकान—सर्प.
शून्यचरण—सर्प.
शून्यशरीर—खेंकडा.
एकदृष्टि—कावळा.
दोन मति—सुमति, कुमति.
दोन प्रवासी—चंद्र, सूर्य.
द्विजराज—चंद्र, गरूड, ब्राह्मणश्रेष्ठ.
द्विजिव्ह—सर्प, चहाडखोर.
त्रिनेत्र—सदाशिव.
त्रिपथगा—भागीरथी.
त्रिलोक—स्वर्ग, मृत्यु, पाताळ.
त्रिपद—अग्नीचें नाम.
त्रिविध पाप—कायिक, वाचिक, मानसिक.
त्रिभुवन—स्वर्ग, मृत्यु, पाताळ.
त्रिराम—दाशरथीराम, परशुराम, बलराम.
त्रिवेणी—गंगा, यमुना, सरस्वती.
त्रयावस्था—बाल्यावस्था, तारुण्यावस्था, वार्धक्यावस्था.
साडेतीन शहाणे—सखारामबापु, रामशास्त्री परभु-

णे, रामचंद्रबाबा सुखठाणकर, आणि अर्धा नाना-फडणवीस.

**चतुरंगसेना**—हत्ती, वाजी, रथी, पदाती.

**चार दंत**—इंद्राच्या ऐरावतीस.

**आनंदाचे प्रकार चार**—आत्मानंद, ब्रह्मानंद, विषयानंद, विद्यानंद.

**चार पुरुषार्थ**—अर्थ, धर्म, काम, मोक्ष.

**चार वीररस**—विद्या, युद्ध, दया, दान.

**पंच गंगा**—कृष्णा, वेण्णा, कोयना, गायत्री, सावित्री.

**पंच प्राण**—प्राण, अपान, समान, उदान, व्यान, हेच पांच वायु.

**पंच हत्यारें**—ढाल, तरवार, तीरकमान, बंदुक, भाला.

**पंचगव्य**—गोमूत्र, गोमय, दही, दूध, तूप.

**पंच देवी**—दुर्गा, पार्वती, सावित्री, सरस्वती, राधिका.

**पंच मकार**—मद्य, मांस, मध, मत्स्य, मैथुन.

**पंच माता**—स्वमाता, स्वपत्नीची माता, भ्रातृपत्नी, गुरुपत्नी, राजपत्नी.

**पंच विषय**—शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध.

**पंच ज्ञानेंद्रियें**—श्रोत्र, त्वचा, चक्षु, घ्राण, जिव्हा.

**पंचांगुलें**— अंगुष्ठ, अनामिका, मध्यमा, तर्जनी, कनिष्ठिका.

**पंचोपचार**—गंध, अक्षता, पुष्प, नैवेद्य, मंत्रांजुली.

**निष्ठा नसली तर व्यर्थ गोष्टी पांच**—शरीर चांगलें, रूप उत्कृष्ट, बायको मनरंजनी, द्रव्य पुष्कळ, सर्व कर्मांमध्यें यश, या पांच गोष्टी अनुकूल असून जर देव ब्राह्मणांचे ठिकाणीं निष्ठा नसेल, तर तें सर्व व्यर्थ आहे.

**आयुष्यवर्धनाचे गुण पांच**—जमिनीवर बिछाना घालून निजणें, नित्य दोन वेळ जेवणें, सहा वेळ लघुशंका करणें, तीन वेळ शौचास जाणें, स्त्रीसंग अल्प करणें, हे पांच गुण आयुष्य वाढविणारे आहेत.

**सदा आनंद देणारे पदार्थ पांच**—सुस्वर गायन, सुवासिक विडा, पुराण श्रवण, बायको मर्जीप्रमाणें वागणारी व सन्मित्र हे पांच पदार्थ सार्वकाळ आनंद देणारे होत.

**आयुष्यनाशाचीं कारणें पांच**—वृद्ध स्त्रियेचा संग, सकाळचें ऊन, प्रेतांचा धूर, सांचलेलें पाणी, रात्रीं दहीं भक्षण, ह्या पांच कारणांनीं आयुष्य क्षीग होतें.

**असभ्यता घडण्याचीं कारणें सहा**—गर्विष्टपणा, अविचार व हयगय, आपल्यावरून जगाची ओळख करण्यास विसरणें, अंगीं सद्गुण नसतां तो दाखविणें, विद्याहीन असणें.

**नारीदूषणें सहा**—अनृत, साहस, माया, मूर्खत्व, अति लोभ, अपवित्रत्व.

**रोगमूलक कारणें सहा**—बहुत पाणी पिणें, बहुत संभोग करणें, बहुत जागणें, दिवसा निजणें, मूत्र कोंडणें, शौचास वेळच्या वेळीं न जाणें.

**मौन्य धरण्याच्या जागा सहा**—लघुशंका, दीर्घशंका, दंतधावन, भोजन करते वेळीं, मैथुनसमयीं व देवतार्चनाचे वेळीं.

**षड्गुणैश्वर्य**—यश, श्री, कीर्ति, विज्ञान, औदार्य, वैराग्य.

**नकार चिन्हें सहा**—मौन्यधरणें, काल विलंब क-

रणें, भृकुटी वक्र करणें, खाली पहाणें, निघून जाणें, दुसरी गोष्ट बोलणें.

**साष्टांग**—ऊर, दोन पाय, दोन हात, शिर, दोन गुडघे.

**कीर्तिलक्षणें सात**—दान, पुण्य, विद्या, वक्तृत्व, काव्य, आर्जव, शौर्य.

**पातक नाशास तीर्थें सात**—पंडितांस विद्यादान तीर्थ, साधुसंतांस सत्य, पाप्यांस गंगा, योग्यांस ईश्वराचें ध्यान, क्षत्रियांस युद्धांत मृत्यु, द्रव्यनाशास दानकरणें, कुलीन स्त्रियांस लाज. यावर श्लोक—

**विद्या तीर्थे जगति विबुधाः साधवः सत्य तीर्थे ॥**
**गंगातीर्थे मलिन मनसो योगिनो ध्यान तीर्थे ॥**
**धारातीर्थे धरणि पतयो दानतीर्थे धनाढ्या ॥**
**लज्जातीर्थे कुलयुवतयः पातकं क्षालयंती ॥ १ ॥**

**इंग्रजी स्वर सात**—आपल्या इकडे ज्याप्रमाणें गायनामध्यें सा रीं ग म प ध नी सा असे सप्त स्वर आहेत, त्याचप्रमाणें डो रे मी फा सो ला सी असे पाश्चिमात्य देशांत सप्त स्वर आहेत.

**सप्त चिरंजीव**—अश्वत्थामा, बळी, व्यास, हनुमंत, बिभिषण, कृपाचार्य, परशुराम.

**सप्त पुऱ्या**—अयोध्या, मथुरा, माया, काशी, कांची, अवंतिका, द्वारावती.

**वर परीक्षेचे प्रकार सात**—कुल, शील, वपु, वय, विद्या, वित्त, सनाथता.

**पेशवे सात** --बाळाजी विश्वनाथ, बाजीराव बल्लाळ, बाळाजी बाजीराव, माधवराव बल्लाळ, नारायणराव, सवाईमाधवराव, दुसरे बाजीराव.

**खोटीं शास्त्रें सात**---जादू, किमया, फलज्योतिष, जारण, मारण, देवचार, शकून आणि पिशाच्य. "

**मौक्तिकस्थानें सात**—शिंप, डुकर, सर्प, शंख, मत्स्य, बेडूक, हत्ती.

**ऋषी सात**—कश्यप, अत्रि, भारद्वाज, विश्वामित्र, गौतम, जमदग्नि, वसिष्ठ.

**अष्टदिक्पाळ**—इंद्र, वन्हि, यम, नैऋति, वरुण, मारुत, कुबेर, ईशान्य.

**अष्टनायका**—( कृष्णाच्या ) रुक्मी, जांबवंती, भामा, सत्या, भद्रा, लक्ष्मणा, कालिंदी, मित्रविंदा.

**कंठवाद्यें आठ**—पांवा, अलगुज, शिंग, कर्णा, शंख, शीळ, चंग.

**अष्टप्रधान**— श्लोक—

**प्रधान अमात्य सचीव मंत्री ॥**
**डबीर न्यायाधिश न्यायशास्त्री ॥**
**सेनापती त्यांत असे सुजाणा ॥**
**अष्टप्रधानी नृप मुख्य माना ॥ १ ॥**

**अष्टाक्षरी मंत्र**—" कसें करूं, काय करूं. "

**अष्टभोग**—सुगंध, वनिता, वस्त्र, गायन, तांबूल, भोजन, शय्या, द्रव्य.

**अष्टवायन**—हळकुंड, सुपारी, दक्षिणा, खण, सूप, काकण, धान्य, मणी.

**अष्टधातु**—सोनें, रुपें, तांबें, कथिल, शिसें, पितळ, लोखंड, तिखें.

**गणिताचे प्रकार आठ**—मिळवणी, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, वर्ग, वर्गमूळ, घन, घनमूळ.

**नऊ वस्तु**—जो कोणी न्यायकचेरींत पाय ठेवील, त्याजपाशीं नऊ गोष्टी पाहिजेत. पैसा विपुल पाहिजे, मनस्वी दम पाहिजे, सबळ पुरावा पाहिजे, वकील चांगला पाहिजे, पोक्त मसलत पाहिजे, साक्षी उत्तम पाहिजेत, पंच हुशार पाहिजेत, निःपक्षपाती न्यायाधीश पाहिजे, आणि प्रारब्ध अनुकूल पाहिजे.

**नवगोप्य**—आयुष्य, वित्त, गृहछिद्र, मंत्र, मैथुन, औषध, दान, मान, अपमान.

**नवदरवाजे**—दोन डोळे, दोन कान, दोन नाकपुड्या, एक तोंड, एक गुद, एक उपस्थ.

**हस्तवाद्यें नऊ**—झांज, टाळ, चिपळी, करटाळ, जलतरंग, घुंगरू, घागरी, घंटा, तास.

**नवविधा भक्ति**—श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य, आत्मनिवेदन.

**दशनामें अर्जुनाचीं**—अर्जुन, फाल्गुन, जिष्णु, कीरटी, श्वेतवाहन, विवत्स, विजय, पार्थ, सवीसाची, धनंजय.

**दश व्यसनें**—मृगया, द्यूत, दिवसा निजणें, अमत् व्यापार, स्त्रीव्यसन, मद्यपान, नृत्य, गायन, क्रीडा, दंभ.

**दश अवतार**—मत्स्य, कूर्म, वराह, नृसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण, बौध्य, कल्की.

**चर्मवाद्यें अकरा**—मृदंग, तबला, डफ, संमेळ, खंजिरी, नौबत, तासा, मर्फा, चौघडा, डंका, ढोल.

**द्वादश ज्योतिर्लिंगें**—सोमनाथ, महाकाळ, केदार, विश्वेश्वर, ओंकारेश्वर, त्र्यंबकेश्वर, घृष्णेश्वर, नागनाथ, वैजनाथ, भीमाशंकर, मल्लिकार्जुन, रामेश्वर, ( ह्यांचीं स्थानें ) सोरट, उज्जनी, बदरी, काशी, महेश्वर, त्र्यंबक, वेरूळ, अवंडें, परळी, भीमा, श्रीशैल्य, सेतुबंध.

**चित्तपावनांचीं गोत्रें चौदा**—कपील, बाभ्रव्य, कौशिक, गार्ग्य, नित्युंदन, विष्णुवर्धन, शांडिल्य, काश्यप, वात्स, भारद्वाज, जामदग्न्य, वासिष्ठ, अत्रि, कौंडिण्य.

**तंतुवाद्यें चौदा**—वीणा, बीन, रुद्रवीणा, एकतारी-वीणा, सारंगी, सतार, सारमंडळ, तंबुरी, सरोद, कोंका, रबाब, मदमंडळ, ताडस, तुंतुणें.

**चौदा रत्नें**—लक्ष्मी, कौस्तुभ, पारिजातक, सुरा, धन्वंतरी, चंद्र, कामधेनु, ऐरावत, अप्सरा, सप्तमुखी घोडा, विष, हरिधनु, शंख, अमृत. यावर श्लोक—

**लक्ष्मी कौस्तुभ पारिजातक सुरा धन्वंतरी श्चंद्रमा ॥ गावःकामदुधा सुरेश्वरगजो रंभा-दिदेवांगना ॥ अश्वसप्तमुखो विषं हरिधनुः शंखोमृतं चांबुधे ॥ रत्नानीह चतुर्दश प्राति-दिनं कुर्यात्सदा मंगलं ॥ १ ॥**

**विभुतिस्थानें पंधरा**—( स्मार्त ) १ मस्तक, १

गळा, १ कपाळ, ६ ठिकाणीं हातास, २ ठिकाणीं कुक्षीस, २ ठिकाणीं खांद्यास, १ मुखास, १ नेत्रास.

**तुळशीचीं नांवें सोळा**—तुळस, श्री, अवश्यक, लक्ष्मी, विद्या, यशश्री, धर्माधर्म, देवी, देवदेवी, सखी, शुभ, भूमी, अचल, अमिला, अमला, श्रीलक्ष्मी.

**त्रेचाळीस भूमीचीं नांवें**—भू, भूमी, पृथ्वी, पृथिवी, वसुधा, ऊर्वी, वसुंधरा, धात्री, धरित्री, धरणी, विश्वा, विश्वंभरा, धरा, क्षिति, क्षोणी, क्ष्मा, गंधमाता, अचला, अवनि, सर्वसहा, रत्नगर्भा, जगती, मेदिनी, रसा, काश्यपी, पर्वताधारा, स्थिरा, इला, रत्नसू, बीजसू, विपुला, सागरनेमि, सागरमेखला, सागरांबरा.

**पुराणांतले ५६ देश**—नैषध—बंगाला, पांचाल—पंजाब, मरु—मारवाड, किरात पूर्वसमुद्रकांठ, कनोज, कर्नाटक, कोमल—अयोध्या, नेपाळ, पारिसिक—इराण, पांड्य—मद्रासभोंवतालचा प्रदेश, पुलिंद—बलुचिस्थान, कामरूप—आसाम, बर्बर—बार्बरी ( आफ्रिका खंड ) कैकेय—काबूल, गांधार—कंदाहार, बाल्हिक—आर्बस्थान, सिंधु—सिंध, मालव—माळवा, मत्स्यदेश—कानपूर वगैरे, मलियाळ—मलबार, कांबोज—रोहिलखंड, कलिंग—ओढिसा, आनर्त्त—द्वारकाप्रांत, आन्ध्र—तैलंगण, मागध—ब्रह्मदेश, हूण—तिबेट, सौवीर—सुरत, विदर्भ—वऱ्हाड, चैद्य—पूर्वहिंदुस्थान, जालंदर—पंजाब, मेदपाट—मेवाड, केरळ—मलबार, द्रवीड—त्रावणकोर वगैरे, महाराष्ट्र—हल्लींचा महाराष्ट्रदेश, अवंति—उज्जनी, पानात—काल्पी वगैरे, अंग—बहार, कुंतल—कलबुर्गा वगैरे, टंकण—कुर्ग, सौराष्ट्र—काठेवाड, नैध्रुव—दिल्ली वगैरे, चोल—तंजावर वगैरे, गुर्जर—गुजराथ, कुरू—आग्रा

वगैरे, यवन-ग्रीस, वंग-बंगाल, करहाट-खानदेश, भद्र-मिसर, काश्मिर, भोजकोट, कच्छ, दशार्णव-काठेवाडा-पैकीं भाग, मैथील-गोरखपूर प्रांत, लाट-वेरूळ वगैरे, सिंहलद्वीप-लंका, भोज-काशी प्रांत.

चौऱ्यांशी लक्ष योनी.—९ लक्ष सर्प मुंगी इत्यादि, ४ लक्ष जलचरांत, ८ लक्ष पक्षीकुळांत, ९ लक्ष द्वीपद योनी, ४ लक्ष चतुष्पादांत, ८ लक्ष श्वापद योनी, ९ लक्ष अन्नधान्यादिक, ४ लक्ष सुगंधादि पदार्थ, ८ लक्ष वृक्ष, तृण इत्यादि, ९ लक्ष तारांगणादिक, ४ लक्ष मेघमाला, ८ लक्ष हिरे, रत्न माणिकादि.

---

## प्रश्नोत्तर-रत्न-माला.

### आर्या.

प्रश्नोत्तर मणिमाला हे केवळ होय हो सुधा
धारा ॥ खळ राहुलाचि न जिरे त्यांस
जिरे भजति जे बुधा[१] धारा ॥ १ ॥

स्वामी काय ग्राह्य स्वमुखें सांगा करा दया
पूर्ण ॥ शिष्या स्वीकारावें गुरुवचन प्रण-
ति पूर्व अति तूर्ण[२] ॥ २ ॥

काय त्यागावें तें स्वामी सांगा अजाणत्यास
मज ॥ शिष्या अकार्य सारें टाकावें हें मनीं
बरें समज ॥ ३ ॥

---

१ ज्ञानाचा आश्रय. २ सत्वर.

हाळाहळापरिसही दारुण विष कोणतें अ-
जी स्वामी ॥ अपमानिलें गुरूतें वत्सा तें
गरळ जाणतों आह्मी ॥ ४ ॥
तस्कर कोण स्वामी वत्सा जे विषय दस्यु[३]
ते जाण ॥ कोण भयाची वल्ली शिष्या तृ-
ष्णाचिरे तुझी आण ॥ ५ ॥
जात्यंधाहुनि अधिक कोण कथा जी गुरो
तुह्मी ज्ञानी ॥ शिष्या अंधापरिसहि का-
मी बहु अंध हें मनीं मानीं ॥ ६ ॥
स्वामी शूर ह्मणावें कोणाला हें मला तुह्मी
बोधा ॥ शिष्या स्त्री नेत्रशरें पावेना जो
व्यथेसि तो योधा ॥ ७ ॥
देवा हेंही सांगा त्रैलोक्यामाजि काय हो
गहन ॥ बापा चरित्र स्त्रीचें नेणति विधि-
शक्र-गुरू-शशी-दहन ॥ ८ ॥
दारिद्र्य कोण सांगा बहु पुसतों कीं तुह्मां
नसे रोष ॥ शिष्या बरवें पुशिलें दरिद्रपण
तेंचि जो असंतोष ॥ ९ ॥
मित्र कवण हें सांगा संशय न तुह्मांविना
दुजा छेदी ॥ तो मित्र होय बापा पापा-
चारांत जो बुडों नेदी ॥ १० ॥

---

३ चोर.

गुरुजी मरण कवण हें सांगुनि मजला नि-
वृत्ति द्या विपुला ॥ बाळा मूर्खत्वचि रे नि-
धन मह्रा तें नसो नसो रिपुला ॥ ११ ॥
अवहेळणा करावी कोठें तीचीं वदा गुरो
स्थानें ॥ खळ, परभार्या, परधन, निंदाचीं
विहित सर्वदा स्थानें ॥ १२ ॥

स्वामी पुरुषें कवणें न करुनि आयास जिं-
किलें त्रिजगा ॥ सत्य क्षमा गुणाढ्यें जग
जिंकिलें तूंहि त्या गुणा भजगा ॥ १३ ॥
ज्वरितासि शर्करा जसि कटु होय खळांसि
सुरस ही कविता ॥ शिष्टां पद्यां सुख दे
दुष्टा घूकांसि ताप दे सविता ॥ १४ ॥
या आर्या आर्यांनीं गाव्या ह्याच्या जशा
सुधा धारा ॥ कीं अर्पिल्या मयुरें श्रीरामा
राघवा बुधा धारा ॥ १५ ॥

---

## प्रासंगिक युक्ति.

कोणत्या वेळेस काय बोलावें याचें तारतम्यज्ञान नस-
लें ह्मणजे मोठा अनर्थ होतो.

कोणा एका गृहस्थाचे घरीं लग्नाचें मोठें प्रयोजन चा-

---

४ घुबड. ५ सूर्य.

ल्लें असतां श्लोक, आर्या इत्यादि ह्मणून सीताकांतस्मरणाची मोठी गर्दी उडत होती. इतक्यांत एका मूर्ख मनुष्यानें आर्या ह्मणण्यास प्रारंभ केला—

प्रभुनें यापरि तुमचा जांवाई, आणि खपविला व्याही ॥—हें आर्येचें अर्ध संपलें नाहीं, तोंच त्या मनुष्यावर सर्वांनीं शिव्यांचा वर्षाव केला, व कित्येक तर त्याला हांकून लावण्यास तयार झाले. कोणत्या प्रसंगाची आर्या कोणत्या प्रसंगीं ह्मणावयाची याचें बिचाऱ्यास ज्ञान नसल्यामुळें अशी फजिती झाली. याकरितां प्रत्येकानें वेळ, प्रसंग, योग्यता जाणून वागत असावें. अशा मंगल कार्यांत इतर श्लोक, आर्या वगैरे ह्मणण्यापेक्षां ईश्वरस्तुतिपर पद्यें ह्मणणें फार चांगलें. खालीं दिले आहेत अशा प्रकारचे श्लोकही अप्रशस्त होणार नाहींत. कारण, यांत प्रसंगाला योग्य असे अलंकार आहेत. मासल्याकरितां एक, दोन श्लोक—

द्वारीं झुलोत गजसंघ हिंसोत वाजी ॥
गाजी तुला सकल लोक असोत राजी ॥
सोमाभिराम वदना सदनांतरंगीं ॥
क्रीडा करो तुजसवें ललना पलंगीं ॥१॥

झालें लग्न तुझें यथाविधि तुला आली पहा बायको ॥ काला व्यर्थ फिरोनि हिंडुनि

---

१ हत्तींचे समुदाय. २ घोडे. ३ श्रेष्ठ–मर्द. ४ सोम + अभिराम + वदना = चंद्रासारखें सुंदर मुख जिचें अशी. ५ सदन + अंतरंगीं = घराच्या आंतल्या भागांत. ६ सुंदर स्त्री.

अतां वा घालवूं तूं नको ॥ संसारास हळू हळू तव खरा आरंभ कीं जाहला ॥ याचा तूं कर बा विचार हृदयीं वेळीं कसा तो भला ॥ २ ॥ मोतीचूर अनारसे कडबुळें लाडू करंज्या पुऱ्या ॥ सांजोऱ्या जिलब्या शिरा कणकिचे लाडू खिरी शेवया ॥ बासुंदी दळ बेसनादि करुनी जामात बोलाविला ॥ नेत्रीं सुंदर थाट तो बघुनियां चित्तीं बहू तोषला ॥ ३ ॥

आर्या.

कृष्णानुजा सुभद्रा लग्नाला योग्य जाहली आहे ॥ तीतें स्वमतें हलधर धृतराष्ट्रसुतासि द्यावया पाहे ॥ ४ ॥

---

## सुगंधी कामाची माहिती.

मित्रहो, आपणांस उदबत्ती, अगरबत्ती वगैरे सुगंधी सामानाची नेहमीं जरूरी लागते, ह्मणून आतां तुह्मांला अवश्य लागणारें सुगंधी व अत्तारी सामान कसें करावें याची थोडक्यांत कृतीसह माहिती करून देतों. प्रसंगविशेषीं तिचा उपयोग करून घ्या ह्मणजे झालें.

### कातगोळ्या करण्याची कृति.

| | |
|---|---|
| सफेत कात ३६ तोळे. | जायफळ -।- तोळा. |
| लवंगांचें चूर्ण २। तोळे. | केशर -।- तोळा. |

| | | | |
|---|---|---|---|
| दालचिनी | २। तोळे. | जायपत्री | ·।· तोळा. |
| वेलदोडे | २। तोळे. | कस्तुरी | ·॥· मासा. |
| उदफूल | ·॥· तोळा. | | |

याप्रमाणें तोळेवार जिनसा घेऊन, प्रथम कात बारीक वस्त्रगाळ करावा व एक सोनकेवड्याचें कणीस घेऊन त्याच्या पानांत तो कात ७ दिवस ठेवावा. नंतर बाकीच्या जिनसांची वस्त्रगाळ पूड करून तींत तो कात मिळवावा, आणि तो मसाला गुलाबाच्या अथवा नुसत्या पाण्यांत कालवावा, आणि गोळ्या करते वेळीं हातास चमेलीचें तेल लावून कराव्या व त्या सावलींत सुकवाव्या; ह्मणजे उत्तम प्रकारच्या सुवासिक कातगोळ्या होतात.

प्रकार दुसरा—अस्सल पांढरा कात ९ तोळे, वेलचीदाणे अर्धा तोळा, दालचिनी अर्धा तोळा, जायफळ आणि उदफूल दीड दीड मासा, ह्या सर्व जिनसा बारीक कुटून वस्त्रगाळ कराव्या आणि तें गुलाबपाण्यांत कालवून त्यांत दोन गुंजा कस्तुरीचें पाणी घालून मिश्रण करावें आणि हातास अत्तर लावून बारीक गोळ्या करून सुकवाव्या ह्मणजे उत्तम कातगोळी तयार होते.

## अगरबत्ती करण्याची कृति.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| कस्तुरी | गुंज | १ | ऊद | तोळा | ·।॥· |
| अंबर | गुंजा | २ | शिलारस | तोळे | २ |
| चंदन | तोळा | ·॥· | नखला | तोळा | १ |
| केशर | तोळा | १ | वेलदोडे | तोळा | १ |

| | | | |
|---|---|---|---|
| तगर तोळे | १ | जायफळ तोळा | ।। |
| कंकोळ तोळा | -।।- | कोष्टकोळिंजन तो. | -।।- |
| लवंगफूल तोळा | -।।- | गूळ तोळा | १ |
| गवला तोळा | -।।- | अगरु तोळे | २ |

सदर्हू पैकीं कस्तुरी आणि शिलारस शिवाय करून बाकीच्या सर्व जिनसा बारीक वस्त्रगाळ करून त्यांत कस्तुरीची पूड करून मिळवावी. मग तें सर्व मिश्रण शिलारसांत मिळवावें. नंतर चोया घेऊन त्यावर अगरबत्त्या वळून त्या सावलींत वाळवाव्या ह्मणजे अगरबत्त्या तयार होतात.

**सुगंधी उटणें करण्याची कृति**—नागरमोथे, जटामाशी, सोनकेवडा, वाळहिरडे, आंवळकांठी हे जिन्नस समान घेऊन बारीक वांटून पाण्यांत कालवावे आणि हें उटणें शरिरास लावून स्नान करावें ह्मणजे अंगास व केंसांस सुगंध सुटतो.

**प्रकार दुसरा**—वेलचीदाणे, जटामासी, नागरमोथा, वाळा, नखला, कचोरा, सोनकेवडा, तमालपत्र हे जिन्नस पाण्यांत एकत्र वांटून त्याचें उटणें अंगास लावून स्नान केलें असतां पुष्कळ दिवसपर्यंत सुगंध येतो.

**कस्तुरीअंगराज करण्याची कृति**—नागरमोथा १ भाग. हिरडा ४ भाग. शिलारस ९ भाग. लोहबाण २ भाग. कोष्ट २ भाग. कापूर २ भाग. नखला ९ भाग. हे जिन्नस एकत्र पाण्यांत वांटून अंगास लावून स्नान करावें. हें उटणें फारच सुगंधी आहे.

**चंदनीअत्तर करण्याची कृति**—अस्सल चंदनाचा

करवतकीस स्वच्छ पाण्यांत भिजत घालावा, व तो चांगला भिजला ह्मणजे एका भांड्यांत घालून मंदाग्नीवर शिजविला असतां पाण्यावर तेल येईल, तें काढून घ्यावें हेंच चंदनी-अत्तर होय.

**अंगास लावण्याचीं उत्कृष्ट उटणीं**—कापूर, नागरमोथा, जायफळ, जटामासी, नखला, लोहबाण, हरडा, अगर, कस्तुरी, वेखंड, शोक, करंज्याचें बीं व चंदन हे जिन्नस प्रत्येकीं तीन तीन तोळे व सोनकेवड्याचें पाणी ४ तोळे हे सर्व पदार्थ एकत्र वांटून अंगास लावावे ह्मणजे अंगास उत्तम प्रकारचा सुवास येतो.

**प्रकार दुसरा**—काळा वाळा, नागरमोथा, अगर, लोहबाण, लोध्र, कापूर, जटामासी व चंदन हे सर्व जिन्नस समभाग घेऊन बारीक वांटावे. हें उटणें लाविलें असतां अंगास चांगला वास येतो.

**उदबत्ती करण्याचा प्रकार**—कवड्या ऊद २ तोळे, कृष्णागर ३ तोळे, पांढरा सुवासिक चंदन ५ तोळे, नागरमोथा ४ तोळे, देवदार २ तोळे, मैदालकडी २॥ तोळे, गूळ चिकीचा २ तोळे, व शिलारस १ तोळा येणेंप्रमाणें द्रव्यांचें बारीक चूर्ण करून अगरबत्तीच्या कृतीप्रमाणें उदबत्त्या कराव्या.

**अष्टगंध**—१ कस्तुरी, २ केशर, ३ कृष्णागर, ४ गोरोचन, ५ चंदन, ६ रक्तचंदन, ७ गोपीचंदन, ८ मलयागर हीं आठ द्रव्यें सम भाग घेतलीं असतां अष्टगंध होतो.

**उदेल**—उदाचा एक तोळा अर्क घेऊन त्यांत तिळां-

चें तेल पावशेर घालून कढविलें ह्मणजे उदाचें तेल तयार होतें.

**केशराची गोळी**—चांगलें उंची केशर आणून त्यास उन्हांत वाळवावें. नंतर त्याची वस्त्रगाळ पूड करून त्यांत गुलाबपाणी घालून घोटावें. चांगलें बारीक झाल्यावर त्याच्या गोळ्या करते वेळीं हातास सुवासिक अत्तर लावून त्याच्या गोळ्या कराव्या.

**त्वचा मृदु राहून गौरवर्ण होण्यास उपाय**—शुद्ध केलेल्या गंधकाची पूड घेऊन थोड्या दुधांत मिसळावी, व दोन तासपर्यंत तें दूध तसेंच राहूं द्यावें. पुढें न हालवितां तें दूध स्नानाचे आधीं अंगास लावावें. ह्याप्रमाणें बरेच दिवस केलें पाहिजे. दररोज मिश्रण ताजें करावें.

---

## बोधामृतसार.

श्रीमंत बाजीरावसाहेब पेशवे यांनीं आपला वडील मुलगा बाळाजीराव ऊर्फ नानासाहेब हा १४।१५ वर्षांचा असतां, त्याला प्रपंच कसा करावा हें कळावें, त्याच्या अंगीं राजकीय चातुर्य यावें, आणि त्याला बालबोध वळण लागावें ह्मणून अनुभवशीर व बोधपर अशा कांहीं गोष्टी लिहून हा बोध तयार केला आहे. त्यापैकीं कांहीं गोड वेंचे वरील पुरुषाच्या चरित्राधारें येथें देतों—

" ज्या मनुष्याला स्वदेशाभिमान नाहीं, तो जिवंत आणि मेला सारखाच समजावा. माझ्या एकट्याच्या हातून काय होणार आहे? असें रें रें करीत बसूं नये. ' दसकी लकडी एकका बोजा ' हा न्याय लक्षांत ठेवावा.

आंधळ्याच्या एका कणसांत फार तर पसाभर धान्य असतें. पण, अशा पसा पसा धान्याची जमवाजमव केली, तर राशीच्या राशी पडतात. तसेंच एक एक जुळतां जुळतां हजारों स्वदेशाभिमानी होतात, आणि त्यांपासून उत्तम फळ निष्पन्न होतें."

"जे लोक आपल्यास आपल्या देशांतच कोंडून घेतात, कधीं बाहेर पडत नाहींत, ते सर्वदां जंगली, दरिद्री, अज्ञानी, दुःखी आणि अभागी राहतात; हें पक्कें समजावें. प्रवास करण्यांत पातकाचा लेश नाहीं. असत्य भाषण, असत्याचरण अथवा दुसऱ्यास विनाकारण दुःख देणें, अशीं कर्में मात्र वर्जावीं."

"उद्योगानें सर्व कांहीं साध्य होतें. नशिबावर हवाला ठेवून स्वस्थ बसूं नये. वेळ आणिल्याखेरीज येत नाहीं. साखर ही कधीं कडू लागली आहे काय? अमक्या मुहूर्तावर खाल्ली असतां ती गोड व अमक्यावर खाल्ली तर ती कडू असें कधीं घडत नाहीं. तसेंच दृढनिश्चयपूर्वक चांगला उद्योग केव्हांही करा; त्यापासून सुफळ प्राप्त झाल्याविना राहावयाचें नाहीं; हें निःसंशय समजावें."

"आंधळे, बहिरे, मुके, पांगळे, रोगी, थोटे, म्हातारेकोतारे, अशा अनाथांस आश्रय देऊन सनाथ करावें. या सत्कर्मापासून जो आनंद आहे, तो इतरांस कळावयाचा नाहीं. ज्यानें तीं कामें केलीं असतील, त्यांसच तो पुसावा. आंधळ्यापुढें सुरेख तसबीर आणून ठेविली, अथवा बहिऱ्यापुढें खुद्द तानसेनानें मंजुळ गायन केलें, तर तज्जन्य सुखाचा आनंद त्या बिचाऱ्यास काय कळणार आहे?"

"जो ज्या कामांत वाकब असतो, त्याला तें काम रावल्यामुळें चांगलें करितां येतें. गुराख्याच्या हवाली मोठी फौज केली, तर तो लढाईचें काम करील का? नाहीं. ज्याला ज्या गोष्टीची वाकबगारी, त्यालाच तिचीं कारणें, तिचे उपयोग, ती सिद्धीस नेण्यासाठीं तिचे भाग कसे पाडावे, आरंभ कोठें करावा, साधनें कोणतीं योजावीं, व मधलीं विघ्नें कशीं टाळावीं हें सर्व कळतें. यासाठीं कोणता मनुष्य कोणत्या कामास योग्य आहे याचा आधीं विचार करावा."

"एकच युक्ति सर्वत्र लागू पडते, असें नाहीं. काल, देश, वर्तमान, पात्रापात्र वगैरे पाहून साधनांची योजना करावी. दूध हा पदार्थ इतका मिष्ट व पुष्टिकारक आहे कीं, त्याला मृत्युलोकाचें अमृत ह्मटलें आहे, तरी तेंच दूध सर्वत्र सारखें उपयोगीं पडत नाहीं. 'धारोष्णममृतोपमम्' असें वैद्यशास्त्राचें ह्मणणें आहे, परंतु तें अमृत कोणाला? निरोग्याला. तेंच दूध ज्याला सन्निपात किंवा कफदोष झाला असेल, त्याला पाजिलें तर तें विषरूप होऊन तो दुखणाईत पटकर प्राणास मुकेल."

"अमुक एक संकट पडलें असतां अमुक अमुक युक्ति योजावी, अथवा अमुक एक उद्योग केला असतां अमुक अमुक लाभ होतात, असें आपण पुष्कळांच्या तोंडून ऐकतों व अनेक ग्रंथांत अनेक वेळां वाचितों, व त्या युक्ति आपल्या आठवणींतही असतात. परंतु, त्यांचा उपयोग कोठें कोणत्या प्रकारें करावा याचें व्यवहारज्ञान नसल्यामुळें कित्येक शहाणे असून अडाणी लोकांपेक्षांही अधिक विपत्ति भोगितात. वैद्य खासा पढिक आहे, त्या-

हा सर्व रोगांची लक्षणें व निदानें मुखोद्गत, जवळ रसाय-नाचे बटवेचेबटवे भरले आहेत, तरी त्याच्या हातून रोगी बरे होत नाहींत ! हें पुष्कळांस माहित आहे. तात्पर्य, नुस्ती पुस्तकी विद्या उपयोगी नाहीं. तिला व्यवहारज्ञा-नाची जोड पाहिजे."

"दूरदृष्टि, समयस्फूर्ति, पाताळयंत्रीपणा, रसिकता, कुशाग्रता, धूर्तता, इत्यादिक सद्गुण प्राप्त होण्यास इतिहा-स, बखरी, काव्यें, गणित, धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, तर्कशास्त्र हीं अवलोकन करीत जावीं, श्रवण करावीं किंवा निदान त्यांचा अनुगम तरी असावा."

"राज्यकारभाराचा बोजा ज्यानें आपल्या शिरीं घेतला आहे, त्याला आपल्यावर पुष्कळ लोक प्रीति क-रितात असें वाटतें, परंतु तें केवळ भ्रांतिमूलक आहे. स्व-हित साधण्यासाठीं कार्यवादू लोक तोंडपुजेपणा करितात, व कितीएक आपलें नुकसान न व्हावें ह्मणून मर्जी राख-तात. परंतु, या अलम दुनियेंत खरा मित्र शोधूं गेलें अ-सतां विरळा. प्रसंगीं उपयोगीं पडणारा असा फारच वि-रळा. हें आधीं खरें वाटत नाहीं, परंतु अनुभवांतीं कळ-तें. यास्तव धूर्त पुरुषानें पहिल्यापासून फार सावधगिरीनें राहावें. फारसें लोकांच्या भिस्तीवर जाऊं नये. सदाचर-ण ठेवावें. कोणास निष्कारण दुखवूं नये. स्वदेशाचें हित शोधीत जावें. हा ऐहिक पसारा व्यर्थ समजून एकाग्र-चित्तानें श्रीजगदीश्वराचें स्मरण करावें. 'भगवन्, मला सद्बुद्धि दे.' अशी त्याची सदैव प्रार्थना करावी. मीं नरजन्मास येऊन केलें काय, करीत आहें काय, कराव-

याचें काय, हें आपल्या अंतरात्म्यास अहर्निश विचारीत जावें."

"मोठमोठीं राष्ट्रें, राज्यें, हवेल्या, कुटुंबें व धनराशी ज्या काळचक्राखालीं पिचून गेल्या, तेथें आपला पाड काय? संसार व संपत्ति ही दोनप्रहरची क्षणिक सांवली आहे. ती केव्हां पाठमोरी वळेल याचा नियम नाहीं. सर्व क्षणिक व अशाश्वत आहे, असा विचार करून ताठा, गर्व, मीपणा व अभिमान सोडून द्यावा. तथापि, प्रापंचिकांत योग्य स्वाभिमान असला पाहिजे. परमेश्वरानें एकास एक वर्म करून ठेविलें आहे. 'शेरास सवाशेर' जिकडे तिकडे आहेतच, मग रिकामा गर्वाचा फुगा कां धरावा?"

"लोक आपल्या सभोंवतीं जसे रोज मरत आहेत, तसेंच आपल्यालाही हा भवपसारा येथचा येथेंच ठेवून एक दिवस जाणें आहे; याचें स्मरण ठेवून यावज्जीव दुःखित लोकांस यथाशक्ति साह्य देत जावें."

"जन त्रिविध आहे. त्याची दोषांकडे जशी दृष्टि, तशी गुणांकडे नसते. ह्या संसारांत जनाकडून चांगलें म्हणवून घेण्यासारिखें दुसरें कोणतेंही काम कठिण नाहीं. या पृथ्वींत कोणाची निंदा झाली नाहीं, असा एकाही प्राणी आढळावयाचा नाहीं. तर, तिकडे लक्ष्य न देतां, प्रत्येक मनुष्यानें असा निर्धार करावा कीं, कदाचित् सुईच्या नेढ्यांतून हत्ती पार होईल, पण मी प्राण गेला तरी नीतिभ्रष्ट होणार नाहीं. ह्या जगांत चांगली वस्तु अशी थोडी. वाईटाचाच भरणा मोठा. राजकारणी पुरुषांच्या सन्निध लहान, मोठे, विद्वान्, अविद्वान्, उंच, नीच, सज्जन, दुर्जन हे सर्व मासले प्रसंगोपात् येतात. परंतु, को-

णावर वाग्बाण सोडूं नये. व कोणाची निंदा होत असल्यास ती एका कानानें ऐकून दुसऱ्या कानानें सोडून द्यावी. ही एक लोकप्रिय होण्याची गुरुकिल्ली आहे."

---

## ऐंद्रजाल प्रकरण.

**वीट बनविणें**—मेण पातळ करून वाळूवर ओतावें व ती वाळू बारीक कुटावी; तें चूर्ण पाण्यांत टाकिलें कीं, एक वीट तयार होते.

**केंस भराभर कापण्यास**—निवडुंगाचा चीक व धोत्र्याच्या बियांचें चूर्ण हीं एकत्र करून वस्त्रास लेप द्यावा. मग तें वस्त्र वस्तऱ्यास गुंडाळावें म्हणजे तें गुंडाळलेलें वस्त्र न फाटतां मोठ्या मजेनें केंस मात्र भराभर कापले जातात.

**पाणी पिणारा कुंभ**—ज्याच्या पोटांत धूर भरला आहे, असा कुंभ खालीं तोंड करून पाण्यांत घातला तर पाणी पितो.

**दिवा पेटविणें**—ज्याची ज्योत नष्ट झाली असा दिवा थोडासा गंधक घातल्यानें पुनः पेटतो.

**केशरासारखा दिवा**—हळद व टांकणखार हे जिन्नस वातींत घालून पेटविले असतां तो दिवा केशरासारखा दिसेल.

**सापच साप**—बेडकाच्या चरबीचा दिवा लाविला असतां सर्व सापासारखें दिसतें.

**रक्त निघतें**—जासवंदीचे फुलांच्या रसानें सुरी माखून

तिनें लिंबू कापिलें असतां तें पिळतांच त्यांतून रक्तासारखा रस निघतो.

**गुळासारखी माती**—गुंजेचीं पानें चावून माती खाल्ली तर गुळासारखी लागते.

**पाणी बांधणें**—भोंकराचें चूर्ण अर्धकच्च्या वाळलेल्या मडक्यास आंतील बाजूस एक बोट जाड असा लेप होईपर्यंत लिंपून वाळवावें, व मग त्यांत पाणी घालावें म्हणजे एका क्षणांत मडकें फुटतें व पाणी बंद होऊन राहतें.

**शस्त्रस्तंभन**—( १ ) केवड्याचें मूळ मस्तकावर व नेत्रांवर, ताडाचें मूळ तोंडांत, खजुरीचें मूळ हृदयाशीं, हीं तीन मुळें धारण केलीं असतां तरवारीचा वार लागू होत नाहीं. याप्रमाणेंच या तीन मुळ्यांचें चूर्ण करून खाल्लें असतां मरेपर्यंत शस्त्रापासून उपद्रव होत नाहीं. चूर्ण तुपाबरोबर तीन दिवस खावें. ( २ ) मूळ, पत्रें व फांद्या यांसहित विष्णुक्रांत काढून आणावी व तिचें चूर्ण करून तें तेलांत तळून सर्वांगास चोळावें म्हणजे तरवारीचा घाव लागणार नाहीं.

**अग्निचमत्कार**—( १ ) माका व केळीचा कांदा बोकडाच्या चरबींत मंदाग्नीवर शिजवून दोहों पायांस लावून विस्तवावर खुशाल चालावें. कांहीं भय नाहीं. ( २ ) प्रथम तुळशीचें व सांवरीचें लांकूड जाळून त्यावर गाढवाचें मूत शिंपून ते कोळसे पेटलेल्या चुलींत घालावे, म्हणजे किती लांकडें घातलीं तरी भात शिजणार नाहीं. ( ३ ) पिंपळी, मिरें, सुंठ हीं पुनः पुनः चावून पेटलेले कोळसे खाल्ले तरी तोंड भाजणार नाहीं. ( ४ ) सुंठ,

मिरें, पिंपळी चावून तो कल्क व मनुष्याचें मूत्र एकत्र करून मस्तकावर लेप करावा व पेटलेला कांकडा मस्तकावर ठेवावा एकही केंस जळणार नाहीं.

**गुप्तलिखित**—पांढऱ्या शुभ्र कपड्यावर लवंगाच्या पाण्यानें कांहीं तरी लिहून वाळवावें तें दिसणार नाहीं. तेंच पाण्यांत घातलें असतां दिसूं लागेल.

**मांसाचा गोळा होतो**—कुऱ्हाडीनें तोडलेले मांसाचे अनेक तुकडे त्यांत गंधकाचें चूर्ण मिसळून पांढऱ्या वस्त्रांत बांधून ठेविले ह्मणजे त्यांचा एक गोळा होतो.

**वीर्यस्तंभन**—( १ ) वानराच्या लिंगाचा मणी करून कमळाचे तातूनें कमरेस बांधावा ह्मणजे वीर्यस्तंभन होतें. ( २ ) काळ्यामांजराचे केंस रतिकाळीं कमरेस खोंविल्यानें वीर्यस्तंभन होतें. ( ३ ) सुरण किंवा तुळशीचें मूळ यापैकीं कोणतेंही एक तोळाभर विड्याशीं खावें. वीर्यस्तंभन होईल. ( ४ ) निळे व पांढरे कमळाचें केशर, मध, साखर यांचा बेंबीवर लेप केला असतां दृढेंद्रिय होत्साता फार वेळ रतिसौख्य भोगितो.

**बुद्धिवर्धन**—( १ ) अघाडा, वेखंड, सुंठ, वावडिंग, बडीशेप, शतावरी, गुळवेल व हिरडे हे जिन्नस समभाग घेऊन चूर्ण करून तुपाशीं नित्य एक तोळा खात जावें ह्मणजे दररोज १०० श्लोक पाठ करण्याइतकी बुद्धि प्राप्त होते. ( २ ) सुंठ, अजमोदा, हळद, दारुहळद, जिरें, कोष्टकोळिंजन, पिंपळी, जेष्टमध, सैंधव, वेखंड, यांचें चूर्ण करून पहांटेस तुपाबरोबर खावें ह्मणजे बरीच बुद्धि प्राप्त होते. ( ३ ) गुळवेल, आघाडा, वावडिंग, ना-

गरमोथें, वेखंड, हिरडे; सुंठ; पिंपळमूळ यांचें चूर्ण करून तें तुपाशीं चाटावें ह्मणजे बुद्धिवर्धन होतें.

**वाद करणारा मुका होतो**—( १ ) पळसाचें मूळ रुप्याच्या पत्र्यांत गुंडाळून तोंडांत धरावें; ह्मणजे आपणांशीं वाद करणारा मुका होतो. ( २ ) पांढऱ्या गुंजेचें मूळ तोंडांत धरलें असतां दुष्टाचें तोंड बंद होतें.

**मांजरासारखा मनुष्य**—काळ्या मांजराच्या तोंडांत एरंडाचें बीं घालून तें पेरावें, त्या झाडापासून जें बीं उत्पन्न होईल, त्यांतील एक दाणा तोंडांत धरावा ह्मणजे सर्व लोकांस तो मनुष्य मांजरासारखा दिसेल.

**मासे जिवंत करणें**—मेलेल्या माशांस बिब्याचें तेल लावावें व ते पाण्यांत सोडावे ह्मणजे जिवंत होतात. मात्र ते मासे नुक्ते पाण्यांतून धरलेले असावेत.

**बेडूक उत्पन्न करणें**—नदीच्या शेवाळाचें चूर्ण ह्मशीच्या दह्यांत मिसळून तें घुसळून ओतावें ह्मणजे एका प्रहरांत बेडुक उत्पन्न होतात.

**उंदीर पळून जाण्यास**—( १ ) गंधक, हरताळ, ब्राह्मी ( कारिवणा, ) त्रिकटु ( सुंठ, मिरें व पिंपळी ) हीं समभाग घेऊन रविवारीं मनुष्याचे मुतांत वांटून उंदरास लेप करावा ह्मणजे त्याच्या घाणीनें उंदीर निघून जातात. ( २ ) हरताळ, बोकडाच्या लेंड्या, नरमूत्र व कांदे हे एकत्र करून वांटावे, व त्याचा एका उंदराचे अंगास लेप करून त्यास सोडून द्यावें ह्मणजे त्यास पाहून उंदीर पळून जातात. ( ३ ) धोत्र्याच्या बियांचें चूर्ण किंवा बचनागचूर्ण तिळांशीं खलून त्याची गोळी करून ती, अथवा तिळांशीं आणि त्याचे तेलाशीं सोमल खलून

त्याची गोळी करून ती घरांत ठेवावी व घरांतलें पाणी रात्रीं बंद करावें ह्मणजे ती गोळी खाऊन तहानेनें व्याकूळ होऊन उंदीरनाश होतो. ( ४ ) मांजराची विष्टा, हरताळ, हे जिन्नस एकत्र वांटून उंदरास लेप करावा, व त्यास सोडून द्यावें. त्याचा वास घेऊन तत्काळ घरांतून उंदीर पळून जातील.

**ढेंकणांवर उपाय**—देशी दारू अर्धशेर, कापूर पांच तोळे, टरपेन तेल अतपाव व रसकापूर अडीच तोळे घेऊन सर्वांचें मिश्रण करावें व ढेंकूण असलेल्या जागीं व सामानसुमानास लावावें, ह्मणजे असलेले ढेंकूण नाहींसे होऊन पुनः बरेच दिवस त्या जागीं ढेंकूण होत नाहींत. सरासरी आठवड्यांतून एकदां औषधाचा उपयोग केल्यास पुरे.

**प्रकार दुसरा**—( १ ) कुंभ्याचें ( कुंभया ) मूळ अंथरुणाखालीं अथवा पलंगास बांधून निजावें ह्मणजे ढेंकूण नाहींसे होतात. ( २ ) बाहव्याची शेंग खाटेस बांधावी. ती ढेंकणांचा नाश करिते. ( ३ ) गूळ, हळद, बिबवे, वावडिंग, हिरडा, बेहरडा, आंवळकाठी, लाख, लसूण, कोष्टकोळिंजन, यांची धुरी दिली असतां माशा, डांस, ढेंकूण, साप, विंचू यांचा नाश होतो.

**आंगठी निघते**—बोटांत घट्ट बसलेली आंगठी निघत नसल्यास तिच्यावर थोडासा पारा चोळावा ह्मणजे ती सहज काढितां येते.

**आंगठीचा नाच**—एक पोकळ आंगठी करून तीस एक भोंक ठेवावें, आणि त्या वाटे तींत पारा भरून तें भोंक चिखलानें बंद करावें, मग ती आंगठी अमळ मेण-

वत्तीच्या दिव्यावर शेकावी आणि टेबलावर ठेवावी ह्मणजे तिच्यांतील पारा थंड होईपर्यंत ती नाचूं लागेल.

**जादूचा रुमाल**—आंड्यांतील पांढरा बलक आणि तुरटी एकत्र करून हातरुमालास त्याचा पातळ लेप करावा; तो रुमाल सुकल्यावर मिठाच्या पाण्यांत बुचकळून काढावा, आणि चांगला सुकल्यावर आगींत टाकावा. जळणार नाहीं.

**सूत न जळणें**—कोरफडीचे रसाचीं सात पुटें द्यावीं ह्मणजे सूत जळत नाहीं.

**काळोख्यांत पुस्तक वाचणें**—तुपाचा दिवा लावून त्याचें काजळ घुबडाच्या डोकीचे करटींत धरावें, त्या काजळाचें अंजन दोन्ही डोळ्यांस केलें असतां रात्रीं अंधारांत वाचतां येतें.

**फुलें पांढरीं करणें**—गंधकाच्या धुरावर फूल धरावें ह्मणजे तें पांढरें होतें. तेंच पुनः पूर्ववत करणें आहे तर साहा भाग पाण्यांत एक भाग गंधकाचा अर्क मिसळून त्यांत तें टाकावें.

**तत्काळ आंब्याचें झाड करणें**—( १ ) आंब्याच्या कोयीस अंकोल्याच्या तेलाचीं सात पुटें देऊन ती सुकवावी. ही कोय आळ्यांत घालून वर माती व पाणी घातलें ह्मणजे लागलेंच लहानसें झाड तयार होतें. ( २ ) हरभऱ्याच्या आंबींत आंब्याची कोय कांहीं दिवस भिजूं द्यावी व वाळवून ठेवावी. चमत्कार करतांना वरप्रमाणें कृति करावी.

**पाण्यावर ज्वाला उत्पन्न करण्याची कृति**—पाण्यानें भरलेल्या एका भांड्यांत कापराचा एक तुकडा टा-

कावा. नंतर त्याजला पेटवावा ह्मणजे सफेत रंगाची ज्वाला निघून तो कापराचा तुकडा पाण्यावर विलक्षण रीतीनें फिरेल.

**कृति दुसरी**—एक लहानसें ग्लास ज्याला वाईनग्लास असें ह्मणतात, तें थंड पाण्यानें तुडुंब भरावें व त्यावर मद्याच्या अर्काचे दोन तीन थेंब हळूच सोडावे. मग कागदाच्या तुकड्यांनीं आग लावावी ह्मणजे त्यावर जाळ होईल.

---

## पदार्थांचे गुणदोष.

प्रत्येक वस्तूमध्यें कांहीं गुण व कांहीं अवगुण असतातच. पण, सर्वांसच ह्मणजे ह्याची माहिती असते असें नाहीं. ह्याकरितां कांहीं पदार्थांच्या गुणदोषांचें विवेचन येथें करितों.

**अमसूल**—रुचिकर, आंबट, ग्राहक व मधुर असून व्रण, वायु, अतिसार, संग्रहणी, रक्तदोष, मूळव्याध, पित्त, शूळ, गुल्म, कृमि वगैरे रोगांचा नाश करितें.

**अळू**—शीत, अग्निदीपक, मलस्तंभक, वीर्यवृद्धिकर, रक्तपित्त नाशकर, दुध, मल, मूत्र, कफ, वायु वगैरे वाढविणारें आहे.

**आंबा**—मधुर, शीतळ, बलवर्धक, पुष्टिकर, कफकर, अग्निदीपक व मलस्तंभक असून वायु, तृषा, दाह, अरुचि, व पित्त ह्यांचा नाश करितो.

**आंवळा**—शीत, वीर्यवर्धक व सारक असून रक्तपि-

त्त, प्रमेह, वीष, ज्वर, वांती, अजीर्ण, सूज, तृषा, रक्तवि-
कार, व त्रिदोष यांचा नाश करितो.

**आलें**—अग्निदीपक, पाचक व सारक असून सूज, अरुचि, कफ, वायु, दमा, खोकला, वांती, व शूल ह्यांचा नाश करितें.

**अंजीर**—थंड असून रक्तदोष, दाह, वायु, व पित्त ह्यांचा नाश करितो.

**ओंवा**—तिखट, ऊष्ण, अग्निदीपक, पाचक, पित्तकर, सारक, आणि वीर्यवृद्धिकर असून मूळव्याध, कफ, शूल, वांती, कृमि, उदर, गुल्म व आमवात ह्यांचा नाश करितो. ओंव्याचें झाड हात दीड हात उंच होतें. त्याचीं पानें औषधास उपयोगीं पडतात. जंतांचा उपद्रव झाला असतां मुलांस याचा रस काढून द्यावा. ह्याच्या पानाचीं भजीं उत्कृष्ट होतात तीं अशीं–हरभऱ्याच्या पिठांत जिरें मिरें यांची बुकणी कालवून त्यांत पानें बुडवून तुपांत किंवा खोबऱ्याच्या अथवा गोड्या तेलांत तळावीं.

**ऊंस**—मधुर, वातकर, जड, शीत, सारक, बलवर्धक, कफ व कृमी करणारा असून रक्तदोष, वायु आणि पित्त ह्यांचा नाश करितो.

**कांदा**—बलवर्धक, वीर्यवृद्धिकर, वांती, अरुचि, रक्तपित्त, मूळव्याध, सूज व रक्तदोष ह्यांचा नाश करितो. ( १ ) मुलांच्या आंकडी रोगावर—पांढरा कांदा फोडून हुंगण्यास द्यावा. ( २ ) उन्माद रोगावर—पांढऱ्या कांद्याच्या रसाचें अंजन करावें. ( ३ ) उन्हानें कपाळ उठलें तर—कांदा फोडून हुंगावा. ( ४ ) नाकांतून रक्त पडतें त्यावर—कांद्याच्या रसाचें नस्य करावें. ( ५ )

मुलांस मोडशी व जंत झाल्यास—कांद्याचा रस पाजावा. ( ६ ) उन्हाची झळ न लागण्यास—गांवास जातांना जवळ कांदा बाळगावा ह्मणजे झळ लागत नाहीं. ( ७ ) तंबाकू लागला तर—कांद्याचा रस पाजावा. ( ८ ) वीर्यवृद्धीवर—कांद्याचा रस व मध विषम भागानें एकत्र करून २१ दिवस घेणें.

**कांकडी**—थंड, जड, वातकर, कफकर असून दाह, श्रम, मूत्रकृच्छ्र, मूत्रावरोध व मूतखडा ह्यांचा नाश करिते.

**केळें**—बळकारक, शीत, शुक्रवर्धक, आणि कफकारक, असून तृषा व ग्लानि, पित्त, रक्तविकार, क्षुधा ह्यांचा नाश करितें.

**केळ**—( १ ) उन्हाळीवर—केळीचें पाणी काढून त्यांत साखर घालून पावशेर पावशेर वारंवार दिलें असतां खास गुण येतो. कोणी यांतच वेलदोडे वांटूनही देतात. ( २ ) तांबड्या आंवेवर—केळीचें पाणी ९ टांक, जिरें ९ तोळे, खसखस २ मासे आणि सुंठीची बुकी ४ गुंजा, सदर पाण्यांत हे जिन्नस नाजूक वांटून वस्त्रगाळ करून सकाळीं व सायंकाळीं याप्रमाणें तीन दिवस खावें ह्मणजे गुण येतो. ( ३ ) आम्लपित्तावर—गाईचें दूध पावशेर, केळीचें पाणी पावशेर, मिसळून देतात पण गुण फार थोडा येतो. यांतच "सूतशेखर" मात्रा उगाळून दिल्यास गुण चांगला येतो. ( ४ ) केळीच्या पानांचा रस काढून अंगास लाविला असतां अंगाचा मळ, तेलाचा बुळबुळीतपणा जाऊन कंडू, खरूज हीं नाश पावतात. व अंग स्वच्छ होतें.

**बोंडीची भाजी**—पोटांतील वायूचा नाश करिते व

अमांश पडत असल्यास तो बंद करिते व अग्नी प्रदिप्त करिते. ( १ ) कफावर—ह्या फुलांच्या रसांत खडीसाखर व थोडेंसें सैंधव मिळवून पोटांत दिलें असतां कफाचें शमन होतें. ( २ ) ह्याचे रसांत चोरओंव्याची किंचित् पूड आणि सैंधव घालून पोटांत घेतल्यास जंतांमुळें पोट दुखतें तें लागलेंच बंद होतें. ( ३ ) तोंड फुटतें त्यावर—केळफुलाचा चीक दिवसांतून चार वेळां जिभेला लाविला असतां गुण येतो.

**खजूर**—वीर्यवृद्धिकर, शीत व पुष्टकारक असून रक्तपित्त, दाह, श्वास, कफ, श्रम, क्षय, तृषा, आम्लपित्त ह्यांचा नाश करणारा आहे.

**गहूं**—शीत, जड, धातुवर्धक, बलकर, कफकर आणि सारक असून वायु व पित्त ह्यांचा नाश करणारे आहेत.

**गाजर**—पित्तकर, उष्ण व दीपक असून नेत्रविकारी आहे, तसेंच अजीर्ण, शूल, मूळव्याध, कृमी, संग्रहणी, पित्त, कफ, तहान, शुक्र ह्यांचा नाश करितें.

**गूळ**—जड, ऊष्ण, मूत्रशोधक आणि सारक असून कृमी, मेद, शुक्र मज्जा, मांस व रक्त ह्यांना वाढविणारा असून दीपक, वात, श्वास, खोकला, कफ ह्यांचा नाश करणारें आहे.

**चंदन**—( १ ) दाह शमन होण्यास—चंदन व कापूर अथवा वाळा उगाळून त्याची सर्वांगास उटी लावावी. ( २ ) खरजेस—चंदनीअत्तर नुस्तें किंवा लिंबाच्या रसांतून लावावें. अथवा तांदुळांच्या धुणांत चंदन उगाळून त्यांत मध व खडीसाखर घालून द्यावें. ( ३ ) मुलांस घा-

मोठें येतें त्यास—चंदन, धणे, वाळा, यांचा गुलाबपाण्यांतून लेप करावा.

**चिंच**—खारट, आंबट, स्तंभक, दीपक आणि बस्तिशोधक असून कफ व वायु ह्यांचा नाश करणारी आहे.

**जायफळ**—वीर्यवृद्धिकर, दीपक व उष्ण असून कंठरोग, कफ, वायु, मेघा, वातातिसार, कृमी, खोकला, वांती व पिनस वगैरे रोगांचा नाश करणारें आहे.

**तांबूल**—कटु, तिक्त, क्षार, उष्ण, मधुर, कामोद्दीपक, कांतिवर्धक, वीर्यवृद्धिकर असून आळस, कृमी, कफवात, कंठरोग, दंतरोग व पीनस यांचा नाश करितें. विड्यांत सुपारी अधिक झाली तर ती कफकारक, चुना अधिक झाला तर पित्तकारक, कात अधिक झाला असतां वीर्यनाशक.

**तूप**—धातुवर्धक, प्राणशोधक, कांतिवर्धक, कफकारक, अग्निदीपक, बुद्धि, मेधा, स्मृति, प्रज्ञा ह्यांना उत्पन्न करणारें, अजीर्ण, उन्माद, शूल, क्षय, रक्तपित्त, वात, पित्त, व्रण, दाह, योनीरोग, नेत्ररोग, कर्णरोग, शिरोरोग, सूज वगैरे रोगांचा नाश करणारें आहे प्राणशोधन व नस्य ह्या कामी जितकें जुनें तूप असेल, तितकें हितावह आहे.

**तुरटी**—हा पदार्थ हवा तेथें मिळण्याजोगा असून फारच स्वस्त आहे. त्यापासून पुष्कळ व्याधींवर कमा उपयोग होतो हें खालीं थोडक्यांत दिलें आहे.

( १ ) नाकांतून रक्त वाहूं लागल्यास—तुरटीची पूड करून ती नाकांत वरचेवर ओढावी, किंवा तोळाभर पूड अडीच तोळे पाण्यांत विरघळून त्या पाण्याची नाकांत

पिचकारी मारावी. ( २ ) अंग बाहेर येतें त्यावर—पांच गुंजा तुरटी अडीच तोळे पाण्यांत विरघळून त्यानें अंग वरचेवर धुवावें. किंवा त्या पाण्यांत चिरगुटाची वडी भिजवून ती वडी गुदाजवळ ठेवून वर लंगोटा बांधावा. ह्याप्रमाणें गुण येईपर्यंत करावें. ( ३ ) लहान मुलांच्या गुप्त भागास सूज येऊन त्यांतून पू येतो त्यावर—तुरटीसारखें दुसरें औषधच नाहीं. सुमारें वीस गुंजा तुरटी पावशेर पाण्यांत विरघळून त्या पाण्याच्या पिचकारीनें वरचेवर इजा झालेला भाग धुवावा. किंवा ऊन पाण्यानें ती जागा धुवून तुरटीचे पाण्यांत भिजविलेलें चिरगूट त्या जागीं सारखें ठेवावें. क्वचित् वरचेप्रमाणें सोसत नाहींसें दिसल्यास तें निम्में करावें. ( ४ ) कान फुटल्यास—तुरटीच्या पाण्याची ( २ गुंजा तुरटी व २॥ तोळे पाणी ) रोज दोनदां कानांत पिचकारी मारून कान धून जावा. ( ५ ) लहान मुलांचे डोळे आल्यास—तुरटी ४ गुंजा घेऊन २॥ तोळे स्वच्छ पाण्यांत विरघळावी व त्या पाण्यानें डोळे चांगले पाव पाव तासानें धुवावे. वरचेवर डोळे धुतल्याखेरीज गुण लौकर यावयाचा नाहीं. नुसत्या पाण्यानेंसुद्धां डोळे वरचेवर धुतल्यानें ते बरे होतात. ( ६ ) तोंड आल्यावर—तुरटीची पूड बोटानें क्षत पडलेल्या जागीं वरचेवर लावावी. ( ७ ) दम्यावर—दमा सुरू होणार असें वाटतांच दमेकऱ्यानें पांच गुंजा तुरटीची पूड जिभेवर कोरडीच सोडावी, ह्मणजे दमा येण्याचें तात्काळ बंद होतें. ( ८ ) नाकांत खपली धरून पू येतो व नाक घाणतें त्यावर—पावशेर पाण्यांत १५ गुंजा तु-

रटी घालून त्या पाण्याच्या पिचकारीनें नाक दोन वेळां चांगलें धुवावें.

दूध—बलवर्धक, कांतीकर, पुष्टि, वीर्य व शुक्रवर्धक असून वात, रक्त, विष, दाह, अतिसार, पित्त, पांडु, अजीर्ण, ज्वर, मूत्रकृच्छ्र, क्षय, व नेत्ररोग ह्यांचा नाश करितें.

**दुधाविषयीं दोहरा—**

**धात करन बल धारन मोकूं पूछें जोय ॥**
**पयसमान तीन लोकमें ओखद नहीं कोय ॥**

दुधासारखा आणि त्यांतही गाईच्या दुधासारखा सर्व गुणकारी दुसरा पदार्थ कोणताच नाहीं. लहान मुलांचा निर्वाह व शरिराची वाढ दुधावर होते. दूध पचण्यास २–२॥ तास लागतात. ( १ ) मुलांस थंडीनें हगवण लागते त्यास—गाईच्या दुधांत जायफळ व सुंठ उगाळून चाटण द्यावें. ( २ ) पडशावर—गाईच्या दुधांत अफु कोळावी व त्यांत जायफळ गंधाप्रमाणें उगाळून नाकास व मस्तकास लेप द्यावा. नुसतें जायफळ दुधांत उगाळून गरम करून मस्तकास लावावें. ताप, खोकला इत्यादि रोग असतां दूध अन्नाबरोबर खाणें अथवा नुसतें दूध पिणें हें अपायकारक आहे. इतकेंच नव्हे; तर त्यापासून रोग बळकावतो असें आपल्या लोकांस व वैद्यांसही वाटतें. दुधाच्या संबंधानें ही जी लोकांची समजूत आहे ती चुकीची आहे. कोणत्याही स्थितींत अथवा रोगांत दूध हें सर्वांत उत्तम अन्न व पेय आहे. विशेषेंकरून जेव्हां मनुष्यास कसलेंही अन्न पचन होत नाहीं, तेव्हां दूध पचतें.

इतकेंच नव्हे, तर तें शक्तिवर्धक आहे. लहान मुलांस व वृद्ध मनुष्यांस तर हें योग्य रीतीनें दिल्यास अमृततुल्य आहे, असें खात्रीनें ह्मणतां येतें. आतां हें खरें कीं, कधीं कधीं कोठ्यांतील विकृतीमुळें तें पचत नाहीं, तेव्हां त्यांत थोडासा बर्फ टाकला असतां तें उलटत नाहीं. तसेंच ज्यास दूध पिण्याची संवय नसते, त्यास प्रथमतः तें प्यालें असतां पोट फुगतें व पोटांत गडगडूं लागतें. अशांनीं त्यांत थोडें मीठ टाकून तें प्यावें. तसेंच ज्यांस पित्त होतें ह्मणजे ज्यांच्या छातींत जळतें, त्यांनीं त्यांत थोडासा ह्मणजे चिमूट दोन चिमूट सोडा टाकून प्यावें. चुन्याची स्वच्छ निवळी टाकिली असतांही तें चांगलें पचतें.

ज्यास शारीरिक श्रम जास्त पडतात, त्यास तर हें अवश्य पाहिजे. दुधांत शरिराच्या पोषणासाठीं जे अवश्य पदार्थ लागतात, ते सर्व असून तें पचण्यास फार सोपें आहे. एकाच वेळीं जेव्हां पुष्कळ दूध पचत नाहीं, तेव्हां तें थोडें थोडें आणि वारंवार प्यावें. जीं मनुष्यें चांगलीं शक्तिमान असून दीर्घायु असतात, त्यांचें खाणें-पिणें साधें असतें आणि ते मुख्यत्वेंकरून दुधाचा उपयोग करितात. सारांश, दूध हें एक उत्तम व पौष्टिक अन्न आहे. अलीकडे दुधाचा उपयोग जखमेवर करूं लागले आहेत. नुकतीच जखम झाली असल्यास त्यावर दूध लावलें असतां ती तावडतोब बरी होते. भाजलेल्या जागेवर तर दूध लावलें असतां चांगलाच गुण येतो. भाजलेल्या जागेवर दुधानें भिजविलेल्या चिंध्या सकाळीं व संध्याकाळीं ठेविल्या असतां एक दोन दिवसांनीं जखम बरी होते.

पाणी—हें संपूर्ण प्राण्याचें जीवन असून शीतळ, आनंदकारक, बुद्धि व ज्ञानदायक असून अमृततुल्य आहे. नदी किंवा झरा, ज्यांतील पाणी जोरानें वहातें तें पाणी हलकें व विशेष हितावह आहे. ज्या विहिरींतील किंवा तळ्यांतील पाण्यावर सूर्य चंद्राचे किरण नेहमीं पडतात व ज्याला सदोदित उपसा असून चांगली हवा लागते असें पाणी वस्त्रगाळ करून पीत जावें. पिण्याचें पाणी नेहमीं शुद्ध असलें पाहिजे. सांथीच्या बहुतेक रोगांचा प्रसार बहुधा पिण्याचे पाण्याचे द्वारें होत असतो असा अनुभव आहे. शिवाय एक घातक चीज अशी आहे कीं, जें जें ह्मणून अशुद्ध पाणी असतें, त्याची चेटी चवही मोठी रुचकर लागते! त्यामुळें मनुष्य फसण्याचा संभव फार. आपण जें पाणी पितों, तें शुद्ध आहे किंवा कसें हें पाहण्याची अति सोपी युक्ति पुढें दिल्याप्रमाणें आहे. एक ग्लासभर पाणी घेऊन तें कांचेच्या किंवा कथलाच्या भांड्यांत घालून उकळावें. त्यांत अशुद्ध पदार्थ असल्यास उकळल्यावर त्या पाण्याला काळा किंवा जर्द हिरवा रंग येतो. ही कृति लोखंडाच्या भांड्यांत करूं नये. कारण, त्यांत रंग दिसत नाहीं. पाणी उकळल्यावर असा रंग दिसल्यास तें पाणी विषकारक समजून पिऊं नये. रेती किंवा मातीमिश्रीत पाणी असेल तर त्या पाण्यांत तुरटीचा खडा अगर पूड टाकावी; अथवा बदामाचा गीर कुटून तो फडक्यांत घालून गढूळ पाण्यांत टाकिला असतां पाणी स्वच्छ होतें. ऊन करून पिलेलें पाणी पाचक, कंठास हितकर, हलकें, बस्तिशोधक असें असून पडसें, वातरोग, उचकी, पोट दुखणें, खोकला, या

रोगांस हितकर आहे. तापवून थंड केलेलें पाणी कफ, रक्तपित्त, ओकारी, घेरी, ताप, दांह, तृषा, धातुक्षीणता यांस हितकारक आहे.

**पोपई**—ह्या झाडाच्या फळाचा ताजा चीक जंतांच्या उपद्रवास उपयोगी आहे. कच्च्या पोपईला चिरल्यानें जें दूध निघतें तें मोठ्या मनुष्याला एक चमचा बस्स आहे. तें ताजे असतांच त्यांत तितकाच मध व चार चमचे कढत पाणी घालावें आणि चांगलें ढवळावें; व थंड झाल्यावर एका घोंटांत प्यावें; नंतर दोन तासांनीं अर्धा चमचा लिंबाचा रसमिश्रित एक औंस एरंडेल घ्यावें. याप्रमाणें दोन दिवस लागोपाठ करावें. तीनपासून सात वर्षांपर्यंतच्या मुलांस ह्याची अर्धी मात्रा पुरे. आणि ३ वर्षांच्या खालच्या वयाच्या मुलांस चहाचा चमचाभर द्यावें. हें घेतल्यावर पोटांत दुखूं लागेल तर साखरपाणी किंवा दूध-पाणी वरचेवर पिण्यास द्यावें.

**मीठ**—हा अत्यंत उपयोगी व अवश्य असा पदार्थ आहे. त्यावांचून आरोग्यरक्षण कदापिही व्हावयाचें नाहीं व मनुष्य सदृढ आणि दीर्घायुषी होणार नाहीं. अन्नांत मिठाची उणीव असल्यानें दुसरे पुष्कळ रोग होण्याचा संभव आहे. तथापि, जंतांचा उपद्रव झाल्यावांचून तर रहातच नाहीं. जंत झाले असतांना थोडेंसें मीठ पाण्याशीं मिश्र करून पोटांत दिल्यास ते मरतात. हालंडमध्यें पूर्वी कैद्यांना मिठाशिवाय नुसती भाकर देण्याची शिक्षा करीत असत, व ही शिक्षा फार कडक मानत असत. कारण, मिठाच्या अभावामुळें पोटांत जंत फार उत्पन्न होऊन त्या दुर्दैवी प्राण्यांना ते खाऊन टाकीत. आमच्या दयाळू

इंग्रजसरकारानें मिठावर कर ( पूर्वी आमच्या जुलमी ह्मणविणाऱ्या राजांच्या स्वप्नांतसुद्धां जो कर नव्हता ) बसवून व हळूहळू तो वाढवून गोरगरीबांचें मीठ तोडलें ह्मणजे अर्थातच गोरगरीबांचें आरोग्य हिरावून घेतलें. ह्या पलीकडे जुलुमाचें व क्रूरपणाचें वर्तन तें कोणतें! मीठ नसल्यानें अन्नाचें पचन चांगलें होत नाहीं. व तें अंगीं लागत नाहीं. प्रत्येक मनुष्यास वर्षास निदान आठपासून दहा शेर तरी मीठ लागतें.

मिठाचा उपयोग— कोणा मनुष्याला अकस्मात कांहीं लागून तो बेशुद्ध झाला असतां, त्याला मीठ आणि पाणी पाजावें ह्मणजे त्याला आराम वाटतो. उलटी करविणें असलें तर ऊन पाण्यांत थोडें मीठ टाकून तें पाणी पिण्यास द्यावें ह्मणजे तात्काळ उलटी होते. मद्य पिऊन चढलेलें विष जर उतरविणें असेल तर त्या मनुष्यास वारंवार ऊष्ण पाण्यांत थोडें मीठ घालून पाजावें ह्मणजे उलट्या होऊन त्याची दारू उतरते. पोटांत दुखत असलें तर एक प्यालाभर पाण्यांत लहान चमचाभर मीठ घालून तें प्यावें ह्मणजे पोट दुखणें बंद होऊन अन्न पचन होतें. डोळे सुजले तर मीठ मिश्रित ऊन पाण्यानें धुवावे. ह्मणजे डोळ्यांवरील सूज तात्काळ कमी होते. मीठ आणि पाणी एकत्र करून वारंवार डोळे धुतले असतां केंस गळून पडत नाहींत.

मध — शीत, नेत्रांस हितावह, अग्निदीपक व व्रणशोधक असून खोकला, ज्वर, रक्तदोष, कृमि, वांती, दाह, क्षय, आणि त्रिदोष ( वात–पित्त–कफ ) ह्यांचा नाश करितो.

लिंबू — उष्ण, पाचक, आंबट, दीपक व नेत्रांस हितावह असून कफ, वायु, वांती, खोकला, कंठरोग, पित्त शूल, त्रिदोष, आणि गुल्म ह्यांचा नाश करणारें आहे.

वेलदोडे — शीतल, पित्तकर व सुगंधी असून मुख व मस्तक ह्यांचें शोधन करणारे आणि गर्भपातकारक, दमा, कफ, खोकला, मूळव्याध, क्षय, कंठरोग, मूत्रकृच्छ, व्रण व कंडू ह्यांचा नाश करणारे आहेत.

सुंठ — औषधाच्या कामांत आल्यापेक्षां सुंठ विशेष उपयोगी आहे. परंतु जर ती मिळत नसली, तर आलेंच लावावें. सुंठेचा काढा फार गुणकारी आहे. एक औंस ( २॥ तोळे) सुंठ ठेंचून एक पाईंट (अर्धी काळी बाटली ) कढत पाण्यांत झांकलेल्या भांड्यांत एक तास भिजत ठेवावी नंतर तें पाणी गाळून घ्यावें तें १ औंसापासून २ औंस पर्यंत दर खेपेस घ्यावें. एक पाईंट ब्रांडींत ३ औंस ठेंचलेली सुंठ दाहा दिवस भिजत घालून जो काढा करितात, तोही फार उपयोगी आहे. ज्याला फार दिवसांचा संधिवायूचा उपद्रव आहे, त्यानें रात्रीस निजतें वेळीं सुंठेचा ऊनऊन काढा घेऊन अंगावर गरम पांघरूण घेऊन निजावें. त्याला घाम आला ह्मणजे फार बरें वाटेल. हा काढा ६ औंस कढन पाण्यांत सुमारें पाऊण तोळा सुंठ घालून करावा.

कपाळदुखीस सुंठ उगाळून लावल्यानें गुण येतो हें तर सर्वांस माहीतच आहे. तसेंच दांतदुखी व तोंडदुखीचे रोगही उगाळलेली सुंठ तोंडास व दांतांस लावल्यानें बरे होतात. घसा बसला किंवा सुजला तर सुंठेचा तुकडा चावून पुष्कळ लाळ जावूं द्यावी ह्मणजे बरा होतो.

हळद — पडसें किंवा डोक्यामध्यें जबर सर्दी झाली

असली तर हळकुंड जाळून धूर नाकांत घ्यावा. तेणेंकरून शेंबूड गळून डोकें हलकें होतें.

---

## बोधसुधा.

कोणते पदार्थ खावे आणि कोणते न खावे हें समजून घेणें जसें रोग्यास अवश्य आहे, तसेंच आपली वर्तणूक कशी असावी आणि कशी नसावी हें समजून घेणें मनुष्यमात्रास अवश्यक आहे. मनुष्याचीं सर्व कर्तव्यकर्मे तीन प्रकारचीं आहेत, तीं अशीं---१ आपला उत्पन्नकर्ता जो ईश्वर तत्प्रीत्यर्थ जीं कर्तव्यकर्मे तीं. २ स्वप्रीत्यर्थ जीं कर्तव्यकर्मे तीं. आणि ३ परप्रीत्यर्थ जीं कर्तव्यकर्मे तीं.

कर्तव्यकर्मे ह्मणजे मनुष्यमात्रास ईश्वरानें जे नियम लावून दिले आहेत तेच, दुसरें कांहीं नाहीं. जसें प्राणाचें आणि शरिराचें रक्षण होण्यास अन्नवस्त्र पाहिजे, तसेंच आत्म्याचें तारण, प्रपंचसुख व सुकीर्ति प्राप्त होण्यास ईश्वरी नियमाप्रमाणें आपली वर्तणूक ठेवणें अवश्य आहे. वर ज्या सर्व कर्तव्यकर्मांच्या तीन कोटी आहेत ह्मणून सांगितलें त्या अशाः---

१. ईश्वर परम पवित्र, अति न्यायी, परम दयाळू असून सर्वज्ञ, सर्वव्यापी, आणि अनंत पराक्रमी आहे असें मानून त्याच्या आज्ञांचें पालन करून सर्वकाळ त्याची आराधना करणें, सत्य बोलणें, त्याला भिऊन वागणें, त्याणें जे नियम लावून दिले आहेत त्यांचें पालन करणें इत्यादि, हीं सर्व कर्तव्यकर्मे आपणास आपला उत्पन्नकर्ता जो ईश्वर त्याविषयीं करावीं लागतात.

२ आपल्या वासना आणि आचरण यांचें निर्बंध ठेवणें, शांति, क्षमा, दया, हीं अंगीं असणें, अहंकार न करणें, सर्वांशीं लीनतेनें वागणें, आपल्या सर्व इंद्रियांचें दमन करणें, शरीर पवित्र ठेवणें, अधाशीपणा व आत्मस्तुति न करणें, आणि ज्या स्थितींत आपणास ईश्वरानें ठेविलें आहे, तींतच तृप्त असणें; मिताहारी राहणें, आणि शरीरप्रकृति चांगली ठेवणें, शरीरास व्यायम देणें, हीं सर्व कर्तव्यकर्में स्वप्रीत्यर्थ आहेत.

३ आईबापांची सेवा करणें, सर्व चांगल्या वर्तणूकींत त्यांच्या आज्ञा पालन करणें, भाऊबंदांवर प्रीति ठेवणें, व त्यांशीं प्रमाणिकपणानें वागणें, आपल्या बायकोशीं प्रमाणिकपणा ठेवणें, व तिजवर प्रीति करणें, सोयऱ्या संबंध्याशीं स्नेहानें वागणें, शेजाऱ्यांशीं, गरीबगुरिबांशीं, व मनुष्यमात्राशीं नीतीनें असणें, त्यांचें कल्याण इच्छिणें; त्यांजवर उपकार करणें, दुसऱ्यास न ठकविणें, चोरी न करणें, दुसऱ्याचें अंतःकरण न दुखाविणें, कोणाच्या शरीरास, अब्रूस व बुद्धीस उपद्रव न करणें, कोणी दुराचरणांत पडला असतां त्यास सुमार्गास लाविणें, कोणाचा खून न करणें, हीं सर्व कर्तव्यकर्में आपणास दुसऱ्याविषयीं करावीं लागतात. ह्या कर्तव्यकर्मांचें सार हेंच आहे कीं, जसें दुसऱ्यानें आपणास करावें असें आह्मी इच्छितों तसें दुसऱ्यास करणें.

जगांतील सर्व गोष्टी एखाद्यास कळल्या तरी त्याच्या ठायीं नम्रता, परोपकारबुद्धि व औदार्य यांचा अभाव असला तर त्याच्या त्या सर्व ज्ञानाचा काय उपयोग बरें? परोपकारबुद्धीच्या अभावीं त्याचें ज्ञान त्यांच्यापाशींच रा-

हील. जगास कोणत्याही प्रकारें त्यापासून फायदा होणार नाहीं; कदाचित् झाली तर पीडा मात्र होईल. तो आपल्या ज्ञानेंकरून जगाचें सुख किंचितही वाढविण्यास कारणीभूत होणार नाहीं. अशाचा जन्म व्यर्थ! म्हणूनच म्हटलें आहे कीं, "परोपकारः पुण्याय पापाय परपीडनं" हीच गोष्ट धनवान्, बलवान्, सत्ताधीश इत्यादि सर्व लोकांनींसुद्धां लक्ष्यांत ठेवावी.

* * *

आपण सर्व चुकीस पात्र आहों. तरी मजहून अधिक चुकीस पात्र कोणीही नाहीं असेंच समजून प्रत्येकानें आपलें वर्तन ठेवावें. अशानें मनुष्य सदां सावध राहून सुरळीतपणें संसार चालविण्यास विशेष योग्य होतो.

* * *

'आपण एकमेकांचा पडाव करण्याविषयीं सवाल जबाब शोधून काढण्यास जेवढे परिश्रम घेतों, तेवढेच परिश्रम जर त्या दुर्गुणांचें निर्मूल व सद्गुणांचें बीजारोपण करण्यासाठीं घेऊं तर जगामध्यें जीं हल्लीं इतकीं अघोर व लाजीरवाणीं कृत्यें घडत आहेत तितकीं कदापि घडणार नाहींत. आणि त्याचप्रमाणें धर्माश्रमामध्यें जे इतके दुराचार होतात तेही होणार नाहींत.

* * *

जे कोणी मरणानंतर न्यायाचा दिवस येईल असा भरंवसा बाळगतात, त्यांनीं पक्कें लक्ष्यांत ठेवावें कीं, 'तुह्मी काय वाचलें' असा प्रश्न त्या वेळीं तुह्मांला विचारला जाणार नाहीं, तर 'तुह्मीं काय केलें' असें विचारलें जाईल. आणि त्याचप्रमाणें 'तुह्मीं अमक्या सभेमध्यें किती विद्वत्ता लढ

विली ' असा प्रश्न विचारला न जातां ' तुह्मी कसें नीतीनें आयुष्य क्रमण केलें ' हें विचारलें जाईल.

*          *          *

साधुसंतांनीं जें कांहीं ह्मटलें आहे त्याचा आनंदानें शोध करावा. व त्यांच्या ह्मणण्याचें शांतपणानें मनन करावें. कारण, त्यांनीं तें कांहीं कारणाशिवाय ह्मटलें असेल असें नाहीं. तरी पण त्यांच्या ह्मणण्याच्या संबंधानेंही क्षीरनीर न्याय जागृत ठेवावा. कालिदासांनीं एके ठिकाणीं ह्मटलें आहे:—

पुराणमित्येव न साधु सर्वं न चापि
काव्यं नवमित्यवद्यं ॥ सन्तः परीक्षान्य-
तरद्भजन्ते मूढः परप्रत्ययनेय बुद्धिः ॥ १ ॥

जुनें ह्मणूनच सर्व चांगलें ह्मणतां येत नाहीं. नवें ह्मणून वाईट म्हणतां येत नाहीं. शहाणे लोक परीक्षा करून कोणतेंही ग्रहण करितात. मूर्ख लोक दुसऱ्याच्या सांगण्यावर जातात.

*          *          *

पुष्कळ धन प्राप्त झालें असलें किंवा सामर्थ्यवान्, धनवान्, व सत्ताधीश असे मित्र जरी असले, तरी त्याबद्दल मनुष्यानें गर्व न वाहतां, नम्रपणानें आपल्या धनाचा व वगवशिल्याचा विनियोग लोकहितार्थ व जनसुखवर्धनार्थ करावा. त्याचप्रमाणें आपल्या शरीराच्या ठेवणदार बांध्याचा अथवा सौंदर्याचा कोणीही गर्व वाहू नये. कारण, तें सारें एखाद्या रोगराईनें बिघडून जाऊन कुरूपता केव्हां प्राप्त होईल याचा नियम नाहीं. तें सारें क्षणभंगुर

आहे. तसाच आपल्या बुद्धिसामर्थ्याविषयींही गर्व वाहूं नये. कारण, तेंमुद्धां क्षणभंगुर आहे.

*　　*　　*

इतर सर्व हलके, मुर्ख, आणि मीच कायतो श्रेष्ठ, शहाणा असें मानून घेण्याचा मोह आपणास कधीं पडूं नये. ह्यापेक्षां मीच सर्वांहून उणा, अल्पज्ञ आहें असें समजणें बरें.

*　　*　　*

आपल्या दुःखाचें रडगाणें व सुखाचें चऱ्हाट ज्याच्या त्याच्याजवळ सांगत बसण्यांत कित्येकांला मोटी हौस वाटते. परंतु, त्यांत कांहीं अर्थ नाहीं. ह्यांत अमोल काळाचा अपव्यय होऊन दुसऱ्यांस तें ऐकण्याला त्रास मात्र येतो. ह्याकरितां आपलें मनोगत आपल्या जिवलग मित्रांस व आपलें दुःख निवारण करण्याचें ज्यांस सामर्थ्य व इच्छा आहे त्यांस मात्र कळवावें.

*　　*　　*

बहुतकरून प्रत्येकास असें वाटतें कीं, आपण दुसऱ्यावर ताबा चालवावा. आपणावर कोणी चालवूं नये. परंतु, ही इच्छा चांगली नाहीं. जगांत मनुष्यांमध्यें कनिष्ट वरिष्ट हा संबंध स्वभावतःच आढळतो. हा संबंध जर लोक चांगल्या प्रकारें समजून यथायोग्य रीतीनें पाळतील तर हा अत्यंत हितावह व सुखकारक आहे असें दिसून येईल. वरिष्ठपणा संपादण्यांतच केवळ थोरपणा आहे असें कोणी समजूं नये. वरिष्ठाच्या हाताखालीं राहून आपलें कर्तव्य यथास्थितपणें बजावणें हेंदेखील मोठ्या

योग्यतेचें व भूषणप्रद असून शिवाय निर्भयही आहे.

*        *        *

आपणावर जीं संकटें वेळोवेळीं येतात, त्यांपासून कांहीं तरी बोध घेत असावें; ह्मणजे दुसरीं संकटें आपल्यास टाळतां येतील. याचप्रमाणें दुसऱ्या लोकांवर आलेल्या संकटांपासूनही आपणास बोध घेतां येईल. दुसऱ्यांवर आलेलीं संकटें पाहून आपल्यावरचीं तसलीं संकटें टाळतां येणें यांत मोठेंच शहाणपण आहे. "पुढच्यास ठेंच मागचा शहाणा" ही ह्मण ध्यानांत ठेवून वागलें असतां अनेक संकटें टळतील. प्राचीन व अर्वाचीन इतिहास, व्यक्तीमात्रांचीं चरित्रें वगैरे वाचण्याचा हेतु हाच आहे कीं, आपल्या पूर्वीं होऊन गेलेल्या लोकांचें बरेंवाईट कशानें झालें हें जाणून आपण सावध व्हावें. मनुष्य अल्पायु असल्यामुळें प्रत्येकास आपआपल्या आयुष्यांत घडणाऱ्या गोष्टीवरूनच व्यवहारास अवश्य असणाऱ्या सर्व गोष्टींविषयीं अनुभव होणें अशक्य आहे. तथापि, बहुतेक गोष्टींविषयीं दुसऱ्यांनीं घेतलेले अनुभव पाहून किंवा वाचून स्वतःचें ज्ञान वाढवितां येईल. जर लेखनवाचनाची कला प्रचारांत नसती, तर मनुष्यास आपआपले अनुभव आपल्या पश्चात् दुसऱ्यास कळवितां आले नसते. कारण, प्रत्येकानें संपादलेली विद्या, ज्ञान, अनुभव व शहाणपण हीं तो मेल्यावर त्यास गेलीं असतीं. आणि मग मनुष्य हल्लींप्रमाणें परंपरागत चालत आलेल्या फार दिवसांच्या इतिहासजन्य ज्ञानास मुकून त्याचें फारच नुकसान झालें असतें. परंतु, हा इतिहासजन्य ज्ञानाचा ठेवा जर मनुष्य प्राप्त करून घेईल, तरच त्याज-

आहे. तसाच आपल्या बुद्धिसामर्थ्याविषयींही गर्व वाहूं नये. कारण, तेंसुद्धां क्षणभंगुर आहे.

* * *

इतर सर्व हलके, मुर्ख, आणि मीच कायतो श्रेष्ठ, शहाणा असें मानून घेण्याचा मोह आपणास कधीं पडूं नये. ह्यापेक्षां मीच सर्वांहून उणा, अल्पज्ञ आहें असें समजणें बरें.

* * *

आपल्या दुःखाचें रडगाणें व सुखाचें चऱ्हाट ज्याच्या त्याच्याजवळ सांगत बसण्यांत कित्येकांला मोठी हौस वाटते. परंतु, त्यांत कांहीं अर्थ नाहीं. ह्यांत अमोल काळाचा अपव्यय होऊन दुसऱ्यांस तें ऐकण्याला त्रास मात्र येतो. ह्याकरितां आपलें मनोगत आपल्या जिवलग मित्रांस व आपलें दुःख निवारण करण्याचें ज्यांस सामर्थ्य व इच्छा आहे त्यांस मात्र कळवावें.

* * *

बहुतकरून प्रत्येकास असें वाटतें कीं, आपण दुसऱ्यावर ताबा चालवावा. आपणावर कोणी चालवूं नयें. परंतु, ही इच्छा चांगली नाहीं. जगांत मनुष्यांमध्यें कनिष्ट वरिष्ट हा संबंध स्वभावतःच आढळतो. हा संबंध जर लोक चांगल्या प्रकारें समजून यथायोग्य रीतीनें पाळतील तर हा अत्यंत हितावह व सुखकारक आहे असें दिसून येईल. वरिष्टपणा संपादण्यांतच केवळ थोरपणा आहे असें कोणी समजूं नये. वरिष्ठाच्या हाताखालीं राहून आपलें कर्तव्य यथास्थितपणें बजावणें हेंदेखील मोठ्या

योग्यतेचें व भूषणप्रद असून शिवाय निर्भयही आहे.

*   *   *

आपणावर जीं संकटें वेळोवेळीं येतात, त्यांपासून कांहीं तरी बोध घेत असावें; ह्मणजे दुसरीं संकटें आपल्यास टाळतां येतील. याचप्रमाणें दुसऱ्या लोकांवर आलेल्या संकटांपासूनही आपणास बोध घेतां येईल. दुसऱ्यांवर आलेलीं संकटें पाहून आपल्यावरचीं तसलीं संकटें टाळतां येणें यांत मोठेंच शहाणपण आहे. "पुढच्यास ठेंच मागचा शहाणा" ही ह्मण ध्यानांत ठेवून वागलें असतां अनेक संकटें टळतील. प्राचीन व अर्वाचीन इतिहास, व्यक्तीमात्रांचीं चरित्रें वगैरे वाचण्याचा हेतु हाच आहे कीं, आपल्या पूर्वीं होऊन गेलेल्या लोकांचें बरेंवाईट कशानें झालें हें जाणून आपण सावध व्हावें. मनुष्य अल्पायु असल्यामुळें प्रत्येकास आपआपल्या आयुष्यांत घडणाऱ्या गोष्टींवरूनच व्यवहारास अवश्य असणाऱ्या सर्व गोष्टींविषयीं अनुभव होणें अशक्य आहे. तथापि, बहुतेक गोष्टींविषयीं दुसऱ्यांनीं घेतलेले अनुभव पाहून किंवा वाचून स्वतःचें ज्ञान वाढवितां येईल. जर लेखनवाचनाची कला प्रचारांत नसती, तर मनुष्यास आपआपले अनुभव आपल्या पश्चात् दुसऱ्यास कळवितां आले नसते. कारण, प्रत्येकानें संपादलेली विद्या, ज्ञान, अनुभव व शहाणपण हीं तो मेल्यावर लयास गेलीं असतीं. आणि मग मनुष्य हल्लींप्रमाणें परंपरागत चालत आलेल्या फार दिवसांच्या इतिहासजन्य ज्ञानास मुकून त्याचें फारच नुकसान झालें असतें. परंतु, हा इतिहासजन्य ज्ञानाचा ठेवा जर मनुष्य प्राप्त करून घेईल, तरच त्याज-

पासून त्याला लाभ होईल. नाहींपेक्षां जगांतले सर्व इतिहास त्यास असून नसून सारखेच.

*　　　*　　　*

आपली चुकी आपणास कळणें ह्यापरता दुसरा लाभ नाहीं. मनुष्यमात्राचें कल्याण त्याच्या चुका दुरुस्त झाल्यानें होणार आहे. परंतु, चुका सुधारण्याची पहिली पायरी त्या कळणें ही होय. मानभावी मित्र आपल्या तोंडावर आपली व्याजस्तुति करितो, व खरा मित्र एकांतांत आपले दोष दाखवितो. कारण, तो आपलें कल्याण इच्छितो असें एका ठिकाणीं जें ह्मटलें आहे, तें खरें आहे. आपणास जसे दुसऱ्याचे दोष कळतात, तसे स्वतःचे कळत नाहींत ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. ह्मणून दुसऱ्यांनीं ते आपणास दाखविण्याची विशेष अवश्यकता आहे. ह्याकरितां कोणी ते दाखविल्यास उपकार मानावे, विषाद मानूं नये.

*　　　*　　　*

मनाचें चांचल्य हें मोहाचें उगमस्थान असें समजावें. ज्याप्रमाणें एकादें जहाज सुकाणूशिवाय वादळामध्यें लाटांबरोबर सैरावैरा वाहत जातें, त्याप्रमाणें चंचल मनाचा मनुष्य संसारसागरांत उत्पन्न होणाऱ्या वादळांतील प्रत्येक मोहरूपी लहरींबरोबर सैरावैरा वाहत जाऊन व त्याचें चित्त भ्रांत होऊन तो कोणीकडच्या कोणीकडे बहकून जातो.

*　　　*　　　*

आडमार्गानें चालणाऱ्या एकाद्या मनुष्यास आपण एक दोन वेळां चांगलें वागण्याविषयीं सांगितलें व त्याच्या त्या वागणुकीच्या परिणामाविषयीं त्यास सावध केलें, आणि इ-

तर्क करूनही जर तो आपलें ऐकत नाहीं, तर त्याच्यामागें वारंवार टोंचणी लावण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आपण आपलें कर्तव्य केलें यांतच तृप्ति मानून रहावें. तथापि, दुसऱ्या कोणाकडून तो सुधारण्यासारखा असला तर साधल्यास प्रयत्न करून पाहावा.

*  *  *

आपल्या धर्मासाठीं लोक खूप कष्ट करितात. ग्रंथांवर ग्रंथ लिहितात, व्याख्यानें झोडतात, मोठ्या ईर्षेस चढून लढाया करितात, किंबहुना आपले प्राणही देण्यास तयार होतात. पण, एक मात्र गोष्ट त्यांच्यांत कमी असते. ती ही कीं, धर्मांत सांगितलेल्या सदाचरणाप्रमाणें त्यांचें वर्तन नसतें.

*  *  *

ज्यास आपण स्वतः आपल्या वरिष्टाच्या आधीन राहून कसें वागावें हें समजत असेल, तोच दुसऱ्यांवर आपली सत्ता यथायोग्यपणें चालवूं शकेल. जो स्वतः आज्ञाधारकपणानें वागण्यास शिकला आहे, त्यासच यथायोग्य रीतीनें दुसऱ्यास आपल्या हुकुमांत ठेवितां येईल. जो मनुष्य शिष्यपणांत नीट वागला असेल, त्यासच गुरूपद यथायोग्य रीतीनें चालवितां येईल. ज्या मनुष्याचें अंतःकरण निर्मळ आहे, त्यासच खऱ्या सुखाचा अनुभव प्राप्त होईल.

*  *  *

जगामध्यें आपण कितीही संभाळून व सौजन्यानें वागलों, तरी आपल्याविरुद्ध बोलणारे, आपली निंदा करणारे असे कोणी निवणार नाहींत असें नाहीं. मोठमोठे साधुसंत, जनहितकर्ते ह्यांचीसुद्धां निंदा केल्यावांचून लो-

क राहिले नाहींत. मग आपली निंदा करणारे कोणीहीं नसतील असें ह्मणणें अज्ञानपणाचें काम होय.

* * *

दुसऱ्यांनीं आपले दोष जाणून त्यांजबद्दल आपणांस बोल लाविला असतां रागावूं नये. आपल्या ठायीं नम्रता व शांति धरावी. मनुष्यस्वभाव असा आहे कीं, एकाद्याकडून अपराध घडला असतां त्यानें जर नम्रता धारण केली, तर दुसऱ्याचा राग नाहींसा होऊन शांत होतो.

* * *

आत्मोन्नतीच्या कामीं दिवसानुदिवस आपलें पाऊल पुढेंपुढें सरकावें अशी जर कोणाची इच्छा असेल, तर त्यानें निष्काळजीनें न वागतां आत्मसंयमनपूर्वक वागण्याविषयीं सतत सावधगिरी ठेवावी. मूर्खत्वानें थट्टामस्करी व विनोद करण्याचें सोडून द्यावें. एक संवय दुसऱ्या संवयीनें घालवावी.

* * *

आपली सतत सुधारणा व्हावी असें जर आपण इच्छीत असलों, तर दुसऱ्याच्या ज्या आचरणानें आपण नाखूश होतों, तशा प्रकारचें आचरण आपण कधीं करूं नये. जे जे कांहीं आपणांवर बरेवाईट प्रसंग येतील, त्या सर्वांचा सद्गुणवर्धनार्थ उपयोग करून घ्यावा. तसेंच कोणा मनुष्याचा ( मग तो मनुष्य यःकश्चित कां असेना ) सद्गुण दृष्टीस पडल्यास त्याचें अनुकरण करावें. परंतु, कितीही थोर मानलेल्या मनुष्यांत आढळणाऱ्या दुर्गुणांचा कदापि अंगीकार करूं नये. ज्याप्रमाणें आपण लोकांच्या गुणावगुणाविषयीं चर्चा करीत असतों, तसेच लोकही आ-

पल्याविषयीं चर्चा करीत असतात. दुसऱ्यांच्या दुर्गुणांचा आपणास वीट येतो तसा आपल्या दुर्गुणांचाही त्यांस येतो.

* * *

एका मनुष्यानें एका गृहस्थाला 'कशांत काय असावें?' ह्मणून विचारिलें, त्या वेळीं तो ह्मणाला—जेवणांत नेमस्तपणा आणि सावकाशपणा; पोषाखांत स्वच्छता आणि साधेपणा; बोलण्यांत आवेश आणि प्रौढपणा; व्यवहारांत उद्योगशीलता आणि निष्कलंकपणा; मसलतींत कौशल्य आणि दूरदृष्टि; विपत्तींत शौर्य आणि विवेक; भाग्यांत नम्रता आणि औदार्य; उपकारांत कृतज्ञता आणि पूज्यबुद्धि; नजरेंत सौजन्यता आणि प्रसन्नता; दुःखांत धैर्य आणि सहनशीलता; कृतींत सत्य आणि समजूत; धर्मांत परमेश्वरभक्ति आणि परोपकार.

* * *

एकदां सदोबानें रामचंद्राला विचारिलें कीं, उद्योग केल्यापासून काय काय लाभ होतात? त्या वेळीं रामचंद्र ह्मणाला—

उद्योगानें विद्या प्राप्त होते; विद्येपासून द्रव्य; द्रव्यानें सत्कर्म; सत्कर्माच्यायोगानें लौकिक; आणि लौकिकानें सुख याप्रमाणें फलप्राप्ति होत असते.

"कशानें काय वश होतें?" याबद्दल एका पुराणग्रंथामध्यें सांगितलें आहे कीं,—खरेपणानें मित्र; द्रव्यानें लोभी; भक्तीनें ईश्वर; आदरानें ब्राह्मण; प्रीतीनें बायको; स्तुतीनें क्रोधी; वंदनानें वडील; विद्येनें पंडित; कुशलतेनें राजा; कृपेनें पुत्र; आणि ज्ञानानें मोक्ष.

* * *

तसेंच " कोणाला काय सांगावें ? " याबद्दलही त्याच पौराणिक ग्रंथामध्यें सांगितलें आहे, तें असें—आयुष्य बायकोस; द्रव्य पुत्रास; गृहछिद्र मित्रास; मंत्र पुत्रास अथवा शिष्यास; मैथुन दासीस; दान शत्रूस; मान बंधूस; अपमान साधूस; औषध देवास.

---

## चमत्कारिक गोष्टी.

### गोष्ट १.

एका गृहस्थास तिजांत्रे हींव सुमारें अडीच वर्षें येत असे. त्यानें पुष्कळ औषधें व ताडगे तोडगे केले. पण गूण येईना; शेवटीं तो त्रासला. प्रत्येक पाळी जशी बोलावून आणावीशी वेळच्यावेळेस येई ! पाळीच्या दिवशीं हा रोगी कांहीं उद्योग न करितां घरीं आपल्या खोलींत बसत असे. त्या खोलींत तिसरे प्रहरीं उन्हाचा कवडसा पडत असे; व तो पडला ह्मणजे यास हींव भरे.

याचे घरीं एके दिवशीं एक वैद्य पाहुणा आला. तो दिवस याच्या पाळीचा होता. जेवण वगैरे आटपल्यावर रोग्यानें आपल्या क्रमाप्रमाणें डोकेंबिकें बांधलें; अंगांत एक बंडी घातली; आणि बिछान्यावर गोष्टी सांगत बसले. तेव्हां रोग्यानें सहज थट्टेनें ह्मटलें, " कां वैद्यबोवा! याजवर कांहीं तुमची मात्रा आहे? आतां पहा कसें अमच्या अंगांत येईल! त्या खांबापाशीं उन्हाची तिरीप येऊन पडली कीं, आह्मांस पछाडलेंच. मग सारी रात्र ताप रहातो. नंतर पहांटेस घाम निघून दुसरे दिवसास साफ मोकळा ! मग

हवें असेल तर बारा कोसांची मजल मारूं! पण हें प्रत्यहीं तिसऱ्या दिवशीं आहेच." हें ऐकून वैद्य ह्मणतो, "ओहो! वेळ घालवली! जरा सकाळीं बोललां असतां तर ठीक होतें. हींव येतें! बरें, पाहूं आतां पुढच्या पाळीस! तुह्मांला तरी एक चमत्कार कळेल."

असें बोलून बुद्धिबळें खेळत बसले. खेळतां खेळतां वारंवार रोगी त्या उन्हाच्या जागेकडे पाही, आणि ह्मणे, "वैद्यबोवा! इतका डाव झाला ह्मणजे पुरे. आमची वेळ भरत आली." वैद्यानें ह्मणावें, "चालूंद्या हो! असे भितां काय? फारतर डाव अपुरता राहील, दुसरें काय होणार?" असें बोलत आहेत व खेळत आहेत तों पटकन् तेथें कवडसा पडला. व या बोवांस हींव भरलें. वैद्य फार धूर्त होता. त्यानें हें सर्व पाहून दुसऱ्या दिवशीं सकाळीं रोग्यास सांगितलें कीं, तुझें हींव पुढच्या पाळीस हटकून बरें करतों. मला एके ठाकरानें एक जंगली वनस्पतीचें औषध दाखवून दिलें आहे. पहातर खरें. तें चावल्याबरोबर असें वाटतें कीं, यापुढें हींव टिकणार नाहीं. आणि तें खावयाचेंही नाहीं. चावून अमळसें तोंडांत धरावयाचें व थुंकावयाचें. असें ह्मणून आपल्या बटव्यांतून पिंपळमुळाच्या काड्या तीन चार गुंजा त्यास चावण्यास दिल्या. त्या चावल्याबरोबर तिखट लागल्यामुळें तोंडाचा भडका झाला, कान झणावले, तेव्हां यास वाटलें कीं, कदाचित् थंडी वाजते वेळेस हें औषध चावलें तर अंमळ थंडी थांबेल. पण कां हींव रहातें? वैद्य ह्मणाला "बरें, पहाल आतां परवांचे दिवशीं याचा अनुभव. हातच्या कांकणांस आरसा कशाला?"

अस्तु. याप्रमाणें दोन दिवस सकाळीं औषध देत व दुपारीं खेळत बसत. पुढें तिसरे दिवशीं वैद्यानें कोणास न कळूं देतां मोठ्या पहांटेस घरावर जाऊन कवडसा पडण्याची वाट बंद केली; आणि रोजच्याप्रमाणें सकाळीं औषध दिलें व जेवण झाल्यावर बुद्धिबळें खेळत बसले. त्या दिवशीं वैद्यानें डाव आपल्या आंगावर घेतला, आणि त्यास खेळण्याच्या नादांत अगदीं गर्क केलें. तरी तो वारंवार त्या कवडसाच्या जागेकडे पाही; आणि खेळावयास लागे. त्या दिवशीं तेथें कवडसाही पडला नाहीं व रोग्यास हींवही आलें नाहीं. हें पाहून त्या रोग्यानें त्या औषधाची फारच तारीफ केली.

दुसऱ्या दिवशीं वैद्यानें सांगितलें कीं, ह्या औषधानें एखादे वेळेस हींव जातें व हें विद्यांत खाण्यासही देतात. परंतु, तुमचीं मुख्य औषधें कवडसा बंद करणें, तुमची औषधांवर श्रद्धा बसविणें व तुह्मांस खेळण्याच्या नादांत गुंतविणें हीं होत. तेव्हां रोगी ह्मणाला हें कसें? त्यावर वैद्य ह्मणतो—

ज्वरकालस्मृतिंचास्य हारिभिर्विषयैर्हरेत् ॥

असें आहे. मीं जाणलें कीं, तुमचें लक्ष्य अक्षयीं त्या कवडशावर असे, व तो पडला ह्मणजे तुह्मांस हींव भरे. ह्मणून प्रथमतः तो कवडसा बंद केला. तसेंच तुमचें मन मीं आपल्या आंगावर डाव घेऊन खेळण्याकडे गुंतविलें, आणि तुह्मांस पाळीचा थोडा विसर पडला तेव्हां हींव गेलें. कित्येक रोग असे असतात कीं, रोग्याचे मनावर त्याचें कमजास्त होणें असतें. त्या वेळेस त्या रोग्याच्या

मनाची समजूत अनुकूल असी पाडणें हेंच वैद्याचें काम.

अस्तु. त्या दिवशीं जें त्याचें हींव गेलें तें पुनः आलें नाहीं. सबब रोग्यानें त्याचे फार आभार मानले. व वैद्यही त्याचें काम होतांच आपल्या गांवीं गेला.

---

## गोष्ट २ री.

दिल्ली येथें एके सामान्य अशक्त मनुष्यास चार पांच दिवस फार मलावष्टंभ झाला. तेव्हां इतर वैद्यांनीं पुष्कळ रेचकें वगैरे दिलीं परंतु जुलाब लागू होईना. कोणाचीही कल्पना चालेना कीं, ह्यास अमुक तऱ्हेनें जुलाब करितां येईल. इतक्यांत एक प्रसिद्ध व कीर्तिमान हकीमास एकानें बोलावून आणलें. त्यानें सर्व हकीकत समजून घेतली; रोगी पाहिला आणि सांगितलें कीं, यास एक औषध केलें पाहिजे; चार भारे लांकडें लौकर आणावा. मी औषधें आणतों. असें ह्मणून घरीं गेला आणि सुमारें अर्ध घटकेनें चार भले दांडगे असामी बरोबर घेऊन आला.

इकडे यांनीं लांकडें आणून ठेविलींच होतीं. सर्व मंडळी, तो रोगी व आपण असे ओटीवर गप्पा सांगत बसले आणि चौकांत लांकडांचा ढिगार पेटविला. ज्या वेळेस तो चांगला पेटला व मोठमोठ्या ज्वाळा निघूं लागल्या, त्या वेळेस त्यानें बरोबर आणलेल्या चौघांस इषारत केली आणि ह्मणाला, "क्यौं अभ्भी क्या देखतेहो ? अहमक ! यह बीमार हमारे सामने पायखाना नहीं होना ऐसा कहताहै. इसको पकडो और आगमें फेंकदेव."

इतकें बोलतांच चौघांनीं उचलला व आगीजवळ घेऊन जाऊं लागले. इतक्यांत आधीं पुष्कळ रेचकें पोटांत गेलीं होतींच आणि वर ही दहशत! मग काय? असा सपाटून झाडा झाला कीं, त्याची खात्रीच झाली! नंतर त्या चौघांनीं पुनः त्यास जागेवर आणून ठेविलें.

तेव्हां हकीम ह्मणाला कीं, हेंच याजवर औषध. दुसऱ्या वैद्यांनीं औषधें देण्यांत कांहीं कमती का केलें असेल? परंतु तोंडाशीं झालेल्या प्रतिबंधास हीच युक्ती. असें बोलून तो आपल्या घरीं गेला. व लोकांनींही त्याच्या अकलेची पुष्कळ स्तुति केली व आपआपल्या घरीं गेले.

---

## गोष्ट ३ री.

**वैद्य आणि त्याचा शिष्य**—एका रोग्यास शैत्य अतिशय झाल्यामुळें वैद्यबुवांनीं सोमलाच्या मात्रेचा एक वेढा उगाळून दिला त्या औषधानें रोगी तेव्हांच बरा झाला. हें वैद्यबुवांच्या शिष्यानें पाहून त्यास वाटलें कीं, ही मात्रा फार उत्तम आहे, तेव्हां एवढी उपटून व आणखी आपल्यास ठाऊक असलेल्या माहितीवरून आपण वेगळा धंदा करण्यास कांहीं हरकत नाहीं. अशा विचारानें संधि पाहून त्यानें ती मात्रा ज्यांत होती तो झोळणाच उपटला. नंतर दुसऱ्या एका गांवीं जाऊन एक शिप्या ठेवला आणि वैद्याचा धंदा सुरू केला. तेथें एक मनुष्य तापानें बेजार असतां सदर वैद्यास बोलावून नेलें. नवीन वैद्यबुवांनीं आपल्या खात्रीची मात्रा उगाळून दिल्याबरोबर रोगी थंडा झाला! गांवांत दुसरीं ब्राह्मणांचीं घरें नसल्यामुळें या दो-

यां गुरुशिष्यासच खांदीं लागणें भाग पडलें. वैद्यबुवा पुढें होऊन शिष्यास मागल्या बाजूस लावलें. पाठीमागें ओझें फार ह्मणून शिष्य अगदीं थकून गेला; परंतु उपयोग काय! कसें तरी जागेवर जाऊन सर्व विधी उरकला. नंतर त्या गावांतून वैद्यबुवांनीं लवकरच यःपलाय करून सशिष्य दुसऱ्या गांवीं गेले. 'वैद्य आहे' असें समजल्यावर गिऱ्हाइकें यायचींच! तेथें एकाचे घरचे बोलावणें आलें. त्या वेळीं या प्रति धन्वंतरानें जाऊन नाडी वगैरे पाहिली व शिष्यास मात्रा काढावयास सांगितली. शिष्य ह्मणाला मात्रा काढतों, परंतु मीं आतां मागच्या बाजूस साफ लागणार नाहीं!! तुह्मांला राग आला तरी बेहत्तर आहे. हा त्यांचा विचित्र संवाद घरच्या माणसांस कांहींच कळेना. ते ह्मणाले हें काय भांडण आहे? तेव्हां शिष्यबुवांनीं पाठीमागल्या गांवची सर्व हकीकत सांगितली. तेव्हां दोघांसही अर्धचंद्रप्रयोगानें हांकून दिलें!

---

### गोष्ट ४ थी.

**वर मागण्याचें चातुर्य**—कोणी एक ब्राह्मण अति दरिद्री व अंध होता. त्याच्या मनांत आलें कीं, आपण जन्मास येऊन प्रापंचीक सुखाचा मुळींच अनुभव घेतला नाहीं, व परमार्थाचेंही कांहींएक साधन केलें नाहीं; तस्मात आपला जन्म व्यर्थ आहे. अशा प्रकारें फार खिन्न होऊन, आतां कांहीं तरी देवाची आराधना करावी व पुण्य जोडावें असें मनांत आणून, गांवाबाहेर एक देवीचें देवालय होतें, तेथें जाऊन एकनिष्ठेनें तप करीत बसला.

त्यामुळें गवय्याचे सुरास वाफेच्या सूर कांहींकेल्या मिळेना. तेव्हां त्या बेसूर गाणाऱ्या मडक्याचा गवईबावांस इतका राग आला कीं, स्वारी उभी राहिली; आणि त्यास एक लाथ मारून चुलीवरून खालीं पाडलें. त्यासरसें त्याचे दहापांच तुकडे होऊन आंतील कुळीथ चुलींत व जमिनीवर पडले. इकडे जोशीबावांनीं घोडीला चरण्याकरितां मोकळी सोडिली होती. कांहीं वेळानें घोडी चरतां चरतां लांबवर जाऊन दिसेनाशी झाली. तेव्हां एक रुईचें पान व करवंदीचा कांटा घेऊन एका दगडावर बसून घोडीची कुंडलिका करूं लागले, आणि कुंडलिका वर्तविल्यावर तिजवरून असें सिद्ध झालें कीं, ती राजसेवकांनीं धरून नेली; दुसरे कोठें गेली नाहीं. अशी खात्री झाल्यावर मग तेही आपल्या समदुःखी सोबत्यांत येऊन बसले.

**तात्पर्य**—केवळ एखाद्या विद्येंत आपण निपुण झालों ह्मणजे कृतकृत्य झालों असें समजूं नये. व्यवहारज्ञान हें कांहीं एखाद्या विद्येंत निष्णांत झाल्यानें येत नाहीं. असे पुष्कळ लोक आढळतात कीं, त्यांस कोणतीही विद्या पुरी अवगत नसतांही ते केवळ व्यवहारचातुर्यानें आपलें हित करून घेतात. मिठावांचून जशी भाजी अळणी, तशी व्यवहारज्ञानावांचून सगळी विद्या. ह्मणून सर्वांनीं व्यवहारचतुर होण्याचा यत्न करावा.

---

## गोष्ट ६ वी.

**समयोचित भाषण.**—मनुष्य लोकप्रिय होण्यास त्याच्या अंगीं जे गुण असावे लागतात, त्यांतलाच "सम-

योचित भाषण " हा एक गुण होय. हा गुण ज्यांच्या अं-
गीं असतो, त्यांची लोकांत मान-मान्यता बरी असते. उघ-
डच. आहे; समयास योग्य असें सयुक्तिक संभाषण करणें
हें कांहीं सामान्य कृत्य नव्हे. तर, ही व्यवहारांतील एक
उपयुक्त व कठीण अशी विद्याच ह्मटली पाहिजे. ही वि-
द्या साध्य व्हावी व लोकांस ती साध्य करून घेण्याची
हौस लागावी, ह्मणून आमच्या इकडे पूर्वीपासून कथा,
पुराणें, नाटकें वगैरे मनोरंजनाचे प्रकार योजिले आहेत.
समयोचित भाषणामध्यें मर्मभेदकपणा नसला पाहिजे.
कांहीं कांहीं लोकांच्या बोलण्यांत मर्मभेदकपणा असल्या
कारणानें त्यापासून मनरंजन न होतां उलटा द्वेष मात्र
उत्पन्न होतो व मर्मभेदक भाषण मनुष्याच्या ऱ्हदयास स-
दोदित टोंचत असल्याकारणानें सूड उगविण्याची इच्छा
उत्पन्न होते; आणि त्यामुळें कोणाचा तरी नाश होतोच! मग
अशा भाषणामध्यें मनोरंजन कसें यावें? सांप्रत आमची
तरुण व होतकरू मंडळी पाहिली असतां त्यांना समयो-
चित भाषणाचा गंधही नाहीं. खुबीदार संभाषण करणें,
दुसऱ्याचें मन रंजविणें, दुसऱ्यास संतोष देणें, ह्या गोष्टी
तर मुळींच साधत नाहींत. एवढेंच नव्हे; तर लोकांना तुच्छ
मानणें, लोकांचा तिरस्कार करणें, घरसोडीनें बोलणें ह्या
गोष्टींची मात्र अगदीं रेलचेल दृष्टीस पडते.

नारायणराव आणि माधवराव या नावांचे दोघे बंधु,
मोठे बुद्धिमान् आणि बहुश्रुत होते. समयोचित उत्तर दे-
ण्याविषयीं तर त्यांची सर्वत्र ख्याती होती. त्यांची परीक्षा
पाहण्याच्या हेतूनेंच एकदां एका कुशल गृहस्थानें नारायण-
रावास प्रश्न केला कीं, नारायणराव, मीं विचारतों त्या गो-

ष्टीचें आपण योग्य उत्तर देऊं शकाल काय? त्यावर नारायणराव ह्मणाले, "आपण प्रश्न कळविल्यास मी आपली यथामति सेवा करण्यास तयार आहें." हें ऐकतांच त्या गृहस्थानें त्यांना विचारिलें कीं, हे आमचे स्नेही मोंहनसिंग आहेत ना? यांच्या डोक्याचे केंश अगदीं काळेभोर आहेत; पण दाढीमिशीचेच केंश इतक्यांत पिकले याचें कारण काय?" त्या गृहस्थाचा हा प्रश्न ऐकतांच नारायणरावानें उत्तर दिलें कीं, "अहो, यांत काय आहे? याचें कारण उघडच आहे; तें असें कीं, तोंड धुतांना किंवा तोंडावरून हात फिरवितांना दाढीमिशीच्या केंसांस दिवसांतून पुष्कळ वेळ पाणी मिळतें; पण डोक्यावरच्या केंसांस सगळ्या दिवसांतून एकदां किंवा तीन तीन दिवसांनीं एकदांच ओलावा मिळतो. आणि ही गोष्ट अनुभवसिद्ध आहे कीं, कोणत्याही शेतास वारंवार पाणी मिळत गेलें ह्मणजे तें शेत आपोआप लवकरच भरून पिकतें. त्याचप्रमाणें दाढीमिशीस नित्य पाणी मिळत असल्यामुळें तेथले केंश अगोदर पिकतात; यांत मुळींच आश्चर्य नाहीं." हें ऐकतांच त्या गृहस्थाचें बोलणें खुंटलें. नंतर माधवरावाकडे पाहून त्यांना त्यानें विचारिलें कीं, आपण माझ्या दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर देतां काय? तेव्हां माधवरावांनींही 'होय' ह्मणून कळवितांच त्या गृहस्थानें असा प्रश्न केला कीं, "माझ्या दाढी-मिशीचे केंश पिकण्याचे पूर्वींच डोक्याचे बहुतेक केंश पांढरे झाले आहेत, याचें कारण काय असावें?" त्यावर माधवरावानें तत्क्षणीं उत्तर दिलें कीं, हाच काय मोठा कठीण प्रश्न आपण विचारणार होतां? अहो, याचें कारण असें आहे कीं, कोणत्याही वस्तूला वृद्धदशा वयपरत्वेंच प्राप्त होते.

डोक्यावरचे केंश जन्मापासून जावळाच्या रूपानें बोट बोट लांब वाढलेले असतात, व त्या वेळेस दाढी-मिशीला तर ठावठिकाणही नसतें. इतकेंच नव्हे; पण पुढें सोळा सतरा वर्षांनीं ओंठावर आणि हनुवटीवर कोंवळे अंकुर फुटतात, तेंव्हां डोक्यावरचे केंश दाढी-मिशीहून बरेच वयोवृद्ध असल्यामुळें ते प्रथम पांढरे होतात; यांत नवल तें कोणतें? हें उत्तर ऐकतांच त्या गृहस्थानें दोघां भावांची समयोचित भाषण करण्याची शैली पाहून भारीच प्रशंसा केली.

---

## गोष्ट ७ वी.

**युक्तीनें वेळ मारून नेणें**—एका गांवांत **मिठेखां** नांवाचा गरीब यवन रहात असे. त्याच्या बिबिसाहेबांची स्वारी धाकट्या दोन मुलांस घेऊन माहेरास लग्नाकरितां गेली होती. तिला मुलांसह परत आणण्याकरितां मिठेखां आपल्या सासुरवाडीस गेला. जातांना खांसाहेब पायींच गेला; परंतु येतांना कुटुंबास तेथून पायीं कसें आणावें? कारण, तसें केल्यानें लोकांत आपली फजिती होईल. अशा चिंतेंत मिठेखां होता; तोंच त्यास एक युक्ति सुचली कीं, आपण भाड्यानें घोडें ठरवून पहावें. ह्मणून त्यानें एका भाडेकऱ्याकडे जाऊन त्याला आपलें घोडें दोन दिवस भाड्यानें देशील काय? असें विचारिलें. त्यावर भाडेकऱ्यानें ओझें किती आणि बसणार कोण? हें प्रथम कळल्यावांचून भाडें कसें ठरवितां येईल? असें उत्तर केलें. त्यावर मिठेखां मिठ्या शब्दांनीं ह्मणाला, “ अबे सुन्. तवा और नगारी,

चार मन जवारी, बिबिकी सवारी, आगे हसन, पिछे हुसन, और जागा मिलगयीतो मेराभी आसन" "मार्गांत स्वयंपाक करण्याकरितां तवा पाहिजेच. तव्यानें एका बाजूची जागा आटपली ! मिठखांचा तासे वाजविण्याचा धंदा असल्यामुळें त्याला निरंतर नगारी बरोबर ठेवणेंच पडलें. दुसरी जागा नगारीनें व्यापिली ! सासऱ्यानें जांवयाची गरीबी पाहून यथाशक्ति चार मण जवारी दिली; तीही पडशींत टाकलीच पाहिजे ! बिबीच्या जिवाकरितां तर भाडेंच केलें आहे. तेव्हां ती घोड्यावर बसणारच ! ल्हान मुलगा हसन पुढें; आणि हुसेन पाठीमागें बसेल. आणि कांहीं जागा राहिली तर मीही बसेन. कारण, पैसा खर्चून पायांला व्यर्थ श्रम कशाला ? या ओझ्याचा तपशील ऐकून कोणी भाडेवाला कबूल होईना. तेव्हां अर्थात् मिठखांचें कार्य साधलें. कारण, त्यानें गांवांत सवारी मिळत नाहीं अशी सासऱ्याची खात्री करून, आपली इज्जतही कायम ठेवून बिबिसाहेबांस पायींच परत नेलें ! याला ह्मणतात युक्तीनें वेळ मारून नेणें !

---

## गोष्ट ८ वी.

**दोन शिष्य**—एका पंडितापाशीं दोघे शिष्य होते. त्यांपैकीं व्याकरणांत एक हुशार असून, दुसरा तर्कज्ञानी होता. पंडितजी तर्कवानावर विशेष प्रीति करून चारचौघांत त्याची वाहवा करीत. हें पाहून वैयाकरणास फार वाईट वाटे. त्यानें एके दिवशीं पंडितास एकांतीं गांठून ह्याचें कारण विचारिलें. पंडित ह्मणाले कीं, "त्याजब-

ह्याचें उत्तर एखाद्या वेळीं देऊन तुझें समाधान करूं. ” कांहीं दिवस लोटल्यावर पंडितास शेजारील एका गांवीं जाणें भाग पडलें. तेथें गेल्यावर त्यानें आपल्या दोघां शिष्यांस पत्रें लिहिलीं कीं, “ आह्मी ह्या गांवीं येऊन सुखरूप पोंहोंचलों होतों, पण दोनप्रहरीं सखारामशास्त्री यांच्या घरीं भोजन करीत असतां भाताच्या घांसाबरोबर एक सव्वा हात काडीचा तुकडा घशांत जाऊन आमचें प्राणोत्क्रमण झालें. ” हें पत्र वाचून तर्कवाल्यानें विचार केला कीं, “ जेवणांत सव्वा हात काडीचा तुकडा सांपडून पंडिताचें देहावसान झालें ही असंभवनीय गोष्ट आहे. तशांतून आपल्या मरणाबद्दल आपणाच मजकूर लिहितात. तेव्हां हें सर्व थोतांड आहे, असें पक्कें मनांत आणून तो स्वस्थ बसला. इकडे वैयाकरणानें हें आपल्या गुरुजीच्या हातचें पत्र आहे व ह्यांतील वाक्यरचना शुद्ध आहे, असें पाहून पंडित खचित स्वर्गस्थ झाले असा तर्क करून त्याचें उत्तरकार्य करण्याकरितां त्या गांवीं गेला. पंडित खुशाल चार विद्वान् गृहस्थांबरोबर भवति न भवति करीत बसले होते. पंडितांनीं ह्या वैयाकरणास येण्याचें कारण विचारिलें; तेव्हां त्यानें पत्रांतील मजकूर कळवून येण्याचा उद्देश सांगितला. तें ऐकून पंडित ह्मणाले कीं, “ बाबा ज्या नेहमींच्या भांड्यांत भात शिजतो, त्यांत सव्वा हात काडीचा तुकडा मावेल तरी कसा ? आणि जो घांस पांच बोटांत मावून तोंडांत जातो, त्याबरोबर तो तुकडा माझ्या पोटांत जाऊन प्राण तरी कसा जाईल ? ह्याचा तूं बिलकुल विचार केला नाहींस, आणि आमचें उत्तरकार्य करण्याकरितां आलास त्या तुला काय ह्मणावें बरें ? असेंच

पत्र त्या दुसऱ्या शिष्यास मीं पाठविलें होतें, पण त्यानें तर्क चालविला असेल कीं, हें घडणें अशक्य आहे व ह्मणूनच तो आला नाहीं. तुला अगदीं तर्क नाहीं ह्मणूनच तुजपेक्षां आह्मी तर्कवानावर विशेष प्रीति करितों. दुसरें कांहीं कारण नाहीं. हें ऐकून वैयाकरणी फार लज्जित झाला.

**सारांश**—केवळ व्याकरणादि शास्त्राध्ययन पुस्तकावरून झालेलें असलें म्हणजे तो मनुष्य व्यवहारचतुर होतो असें नाहीं. जर तो तर्कविहीन आहे, तर तो कोणत्याही कामास अगदीं निरुपयोगी आहे असें समजावें. तर्कज्ञानाची योग्यता फार मोठी आहे. अंगीं विद्वत्ता कमी असूनही जर तो मनुष्य चांगला तर्कवान असला, तर कोणत्याही प्रसंगीं तो डगमगणार नाहीं. नुस्ती पुस्तकी विद्या कांहीं उपयोगाची नाहीं. विद्येचें काम फक्त मार्ग दाखविण्याचें आहे. मग इतकें अवश्यक जें व्यवहारज्ञान त्याची शाळा अगोदर घालावयाला पाहिजे होती; परंतु त्याबद्दल विद्यालयाची योजना केलेली कोठें दृष्टीस पडत नाहीं. हें व्यवहारज्ञान सहवासानें व अनुभवानेंच मनुष्यास प्राप्त होत असतें.

## गोष्ट ९ वी.

**युक्तीचें काम**—कार्यसाधु लोक आपल्यापेक्षां जे बलवान् आहेत, त्यांच्यांत भेद पाडून आपला मतलब कसा साधून घेत असतात हें पुढील चुटक्यावरून चांगलें लक्षांत येईल. एकदां असें झालें कीं, एक ब्राह्मण, एक रजपूत,

एक वाणी आणि एक हजाम असे चौघे मिळून एका उंसाच्या मळ्यांत गेले; आणि लागतील तितके ऊंस खाऊन चार भले भक्कम भारे बांधून घेऊन नुक्तेच निघाले आहेत; इतक्यांत मळ्याचा मालक त्या ठिकाणीं आला. मग चौघांस पाहून तो मनांत ह्मणतो कीं, " आतां जर ह्या चोरांशीं मी लढालढी करीन, तर हे चौघे असल्यामुळें आपणासच कदाचित् मार खावा लागेल, त्यापेक्षां एखाद्या युक्तीनें ह्या चौघांची जूट फोडून उंसाचे भारे परत घेतले पाहिजेत. " असें मनांत आणून तो त्यांजपाशीं गेला आणि त्यांस रामराम करून ह्मणाला कीं, " दादाहो, ऐकलंत कां, आपणांचौघांपैकीं ब्राह्मण माझे गुरु, रजपूत भाईबंद, आणि वाणी तर गांवचे महाजन! तेव्हां तुह्मी तिघांस हे उंसाचे भारे नेण्यास हरकत नाहीं, पण ह्या हजामाला कां ह्मणून ऊंस नेऊं द्या? ह्याचा तुह्मीच विचार करा " असें ह्मणून त्यानें त्या हजामास चांगलें बक्षीस देऊन जवळचा भारा हिसकून घेऊन त्यास हांकून लाविलें. तो बराच लांब गेल्यावर मग ह्या तिघांजवळ येऊन पुनः ह्मणतो कीं, " काय हो? ब्राह्मण तर आपला गुरु आणि रजपूत भाईबंद, तेव्हां तुह्मी ऊंस खाल्लात ह्मणून हरकत नाहीं; पण ह्या वाण्यानें काय ह्मणून खाल्ला? हा तर व्यापारी, ह्यानें पाहिजे तर विकत घ्यावा. " असें ह्मणून त्यास दोनचार गचांड्या देऊन भारा हिस्कून घेतला व त्यास बरेंच लांब जाऊं दिलें. मग रजपुताकडे वळून म्हणतो कीं, " तुम्ही आम्ही भाईबंद तुम्ही हा उंसाचा भारा खुशाल घरीं घेऊन जा; पण हा ब्राम्हण काय म्हणून ऊंस नेणार? " असें म्हणून त्यानें त्या भ-

टास चारपांच चापट्या देऊन हांकून दिलें. मग रजपूत विचारा एकटा राहिला. तेव्हां ही स्वारी त्याजवळ येऊन म्हणते कीं, " कायरे चोरा? ठेव उंसाचा भारा तुला माहीत नाहीं काय? कीं जुगांतीस सुटलेली सोंगटी मेल्यावांचून रहात नाहीं." असें म्हणून त्यानें त्या रजपुतासही खूप मार देऊन त्यापासून आपला राहिलेला भारा हिसकून घेतला.

वाचकहो, लक्ष्यांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. तुमच्यांत कोणी जातिद्वेष माजवीत असले तर त्यांतल्या प्रवर्तकांचा मतलब असेल तो तात्काळ ताडून आपसांत भेद पडूं देऊं नका बरें! नाहीं तर वरील चौघां सोबत्यांप्रमाणें हातची जिन्नस जाऊन वर मारही खावा लागेल!!!

---

## गोष्ट १० वी.

एके दिवशीं बादशहा कचेरींत बसला असतां त्यानें बिरबलास असा हुकूम केला कीं, एक शहाणा मनुष्य आणावा. बिरबल ह्मणाला बरें आहे; परंतु यास दहा हजार रुपये लागतील. तेव्हां बादशहानें रुपये देण्यास हुकूम दिला. नंतर बिरबलानें ते रुपये घेऊन घरीं नेऊन ठेविले; आणि शहाण्याचा शोध करण्यास बाजारांत गेला. तेथें त्यास एक धनगर आढळला. त्यास तो ह्मणाला, मी सांगतों तसें करशील तर तुला शंभर रुपये देईन. धनगरानें त्याचें बोलणें मान्य केलें. तेव्हां बिरबलानें त्यास चांगला पोषाख दिला आणि सांगितलें कीं, मी तुला बाद-

शहाजवळ घेऊन जातों. तिकडे गेल्यावर तुला कोणी कितीही विचारिलें तरी कोणाशीं कांहींच बोलूं नको. मग तो कचेरीस गेल्यावर बिरबलानें बादशहास कळविलें कीं, खुदावंताच्या हुकुमाप्रमाणें शहाणा मनुष्य आणिला आहे. बादशहानें त्या दोघांसही आपल्याजवळ बोलावून बसावयास सांगितलें आणि धनगरास विचारिलें--तुम कहांसे आये? क्या तुमारा नाम? क्या खबर है? वगैरे पुष्कळ प्रश्न विचारिले, परंतु तो कांहींच जबाब न देतां गप्प राहिला. तेव्हां बादशहास राग आला आणि त्यानें बिरबलाकडे पाहून ह्मटलें—मुरखसे गांठ पडीतो क्या करना बिरबल? बिरबलानें उत्तर केलें—चूप रहना. तेव्हां अर्थात् धनगर शहाणा आणि बादशहा मूर्ख ठरला.

---

## गोष्ट ११ वी.

बादशहानें बिरबलास विचारलें कीं, खरें आणि खोटें यामध्यें किती अंतर आहे? बिरबलानें जबाब दिला कीं, चार आंगळांचें अंतर आहे. तें कसें ह्मणून बादशहानें विचारल्यावर बिरबल ह्मणाला—जें डोळ्यांनीं पाहिलें तें खरें व कानांनीं ऐकिलें तें खोटें.

---

## गोष्ट १२ वी.

बादशहानें एका कागदावर रेघ ओढून ती न पुसतां लहान करून द्या असें पुष्कळांस सांगितलें. परंतु कसें करावें

गव्या तरवारींचा पहारा!! मग त्यांच्या भीतीस पारावार कसचा? नंतर या टोपीवाल्यांना थेट श्रीमंतांकडे नेलें!! पुढें ह्या संबंधानें दरबारामध्यें विचार होऊन अखेर "परवानगीवांचून शहरांत आले" या अपराधाबद्दल २००० रुपये दंड घेऊन सुटका केली! खरोखर ही आख्याइका ऐकिल्याबरोबर कोणास बरें वाईट वाटणार नाहीं!! आमचा पेशव्यांचा दरबार ह्मणजे शुद्ध रामजी पाटलाची चावडी (!!) इंग्रज सरकारचा इतका बंदोबस्त असतांना प्रत्यक्ष मामलेदारसाहेबांच्या घरीं चोऱ्या होतात, कलेक्टरच्या बंगल्यावर दरवडे पडतात, आणि पेशवाई दरबारांत वेष पालटून आलेल्या मनुष्यांस धरून आणून कैद करण्याची कशी व्यवस्था होती हरी जाणे!

---

**हिऱ्याची परिक्षा**—नाना फडणविसांचे वेळीं दिल्लीच्या बादशहानें पेशवाईंत शहाणे कामदार आहेत कीं नाहीं; ह्याची परीक्षा पहावी ह्मणून मुद्दाम एका कारागिराकडून खडीसाखरेच्या खड्यास चांगल्या तऱ्हतऱ्हेचे पैलू पाडवून तो एका आंगठीवर बसवून ती आंगठी कसली व किती मोलाची ह्मणतात, हें पाहाण्यास्तव पुण्यास पाठवून दिली. त्यावेळीं पुष्कळांनीं ती आंगठी पाहिली. परंतु कोणासही ती खडीसाखरेच्या खड्याची आहे अशी परीक्षा झाली नाहीं. नंतर श्रीमंतांनीं ती आंगठी नानाचे वाड्यांत पाठवून दिली. नानांनीं ती पाहिली, परंतु पक्कीशी परिक्षा झाली नाहीं, ह्मणून तशीच आपल्या

पुढें ठेविली, आणि अमळशानें पाहिलें तों त्या खड्यावर माशी बसलेली दृष्टीस पडली, त्या वेळींच ही आंगठी खडीसाखरेच्या खड्याची हिऱ्याप्रमाणें आकृती बनवून केली आहे असें त्यांच्या लक्ष्यांत आलें. मग आपली परीक्षा खरी करून दाखविण्याकारितां त्यांनीं त्या खडी-साखरेच्या खड्यावर पाण्याचा थेंब टाकिला. तेव्हां तो खडा कांहीं वेळानें विरघळूं लागला. तें पाहून जो मनुष्य ती आंगठी घेऊन आला होता, त्यानें ती सर्व हकीगत बादशहास कळविली. तेव्हां नानाचे शहाणपणाविषयीं बादशहाची खात्री झाली!

---

**परत भेट**—नाना फडणविसाचें शहाणपण पहाण्या-करितां टिपुमुलतानानें थोडेसे निवडक चांगलें जोंधळे त्यास नजर पाठविले. ती भेट पाहून नानास फार आश्चर्य वाटलें व या भेटींत कांहीं तरी मतलब असावा, असा त्यास संशय येऊन लगेच त्यानें आपल्या एका आश्रितास बोलावून आणलें; आणि त्या जोंधळ्यांच्या लाह्या करून आलेल्या मनुष्याबरोबर मुलतानास परत पाठविल्या. टिपुमुलतान दरबारांत बसला असतां नाना-कडून लाह्या घेऊन जासूद आला. नानानें परत पाठ-विलेली भेट पाहून दरबारीमंडळीस नानाच्या वेडेपणाबद्दल वाईट वाटलें. पण, मुलतानास याचा राग वगैरे न येतां तो उलट नानाच्या शहापणाची तारीफ करूं लागला. पुढें मंडळींनें यांतला अर्थ काय ह्मणून विचारितां सुलता-नानें सांगितलें कीं, मी नानास जोंधळे पाठवून दिले त्यांत

माझ्या पदरीं कसे निवडक लोक आहेत हें दर्शविण्याचा भाव होता. तो जाणून नानानें लाह्या पाठविण्यांत मला असें दर्शविलें कीं, त्या लोकांच्या मीं क्षणांत लाह्या करून टाकीन.

---

**ऐश्वर्याचा कळस**—एकदां दिल्लीचा बादशहा अंबारींत बसून लवाजम्यासह मोठ्या थाटानें शहरांतून फिरत असतां जवळ पेशव्यांचे वकील होते. त्यांस बादशहा विचारूं लागले "वकील, आह्मीं मोठे कि, तुमचे पेशवे मोठे?" बादशहास आपल्या ऐश्वर्याचा गर्व झाला आहे, असें जाणून वकिलानें मोठ्या खुबीनें उत्तर दिलें. तो ह्मणाला, "सरकार, आपण पौर्णिमेच्या चंद्रासारखे आहां आणि आमचे पेशवेसरकार द्वितीयेच्या चंद्रासारखे आहेत." बादशहा त्याचें तें समर्पक उत्तर ऐकून खजील झाला.

---

**पाणिग्रहण**— शाहू महाराज बादशहाचे कैदेंत असतां एकदां बादशहा शाहूचे दोन्ही हात धरून ह्मणाला, "शाहू आतां तुझें संरक्षण कोण करील?" शाहू फार धूर्त व समयोचीत भाषण करणारा होता. त्यानें सांगितले— "खाविंद, आजपर्यंत मला संरक्षणाची काळजी होती; पण आतां ती अगदीं दूर झाली. कारण, स्त्रियेचा फक्त एक हात धरला तर तिचें जन्म पर्यंत संरक्षण करावें लागतें आपण तर माझे दोनही हात धरलेत, तेव्हां आतां मी निष्काळजी झालों आहें." हें ऐकून बादशहा फार खुष झाला. अशा चतुरपणामुळें त्याची शाहूवर फारच प्रीति बसली होती.

---

**योग्य तयारी**—एकदां निजामउल्मुलुखास कैद करून आणण्याविषयीं दिल्लीच्या बादशहाकडून फौज रवाना झाली. तेव्हां त्या संकटांतून आपलें संरक्षण व्हावें, याकरितां नबाब निजामउल्मुलुख याणें शाहू महाराज यांजकडे मदत मागितली. शाहू महाराज यांनीं बाजीराव बल्लाळ पेशवे यांस नबाबाचे मदतीस जाण्याविषयीं आज्ञा केली; त्यावरून बाजीराव साहेब हे नबाबाचे मदतीस गेले. औरंगाबादेजवळ बाजीरावाचे लष्काराचा तळ पडला. बाजीराव हा फार देखणा व उमदा पुरुष होता. नबाबाच्या जनानखान्यांत जेव्हां ही गोष्ट समजली, तेव्हां बाजीरावास एक वेळ दृष्टीनें पहावें असें नबाबाच्या बायकांचे मनांत येऊन त्यांनीं ही गोष्ट नबाबास कळविली. नबाबाचे मनांतही बाजीराव साहेबांची भेट घ्यावी असें होतेंच, तेव्हां त्यानें या गोष्टीस रुकार देऊन पेशव्यांकडे वकील पाठविला व गांवाबाहेर जागा तयार करवून तेथें उभयतांची भेट होण्याचीही सोय केली. बाजीराव साहेबांनीं सड्या पांच खिजमतगारांनिशीं भेटीस यावें असें ठरलें होतें, त्याप्रमाणें बाजीराव साहेबांनीं निवडक पांच सरदारांस खिजमतगारांचा पोशाख देऊन त्यांस बरोबर घेतलें. नंतर नबाबानें डेरे दिले होते त्या ठिकाणीं येऊन उभयतांच्या भेटी झाल्या. नबाबाच्या बायकांनीं बाजीराव साहेब यांस पाहून त्या फार खुष झाल्या व त्यांणीं पेशव्यांवर दोन पायली मोत्यें उधळण्यास सांगितलें असो, नबाब पेशव्यांस ह्मणाले "आतां कसें काय? हल्लीं आमचे हातांत सांपडलां. या वेळीं आह्मी एखादा दगा

केला तर कसें होईल? तुमचे होळकर, शिंदेवगैरे सरदार आतां कोठें आहेत?" हें ऐकून बाजीराव ह्मणाले "जेथें आह्मीं तेथेंच आमची सरदारमंडळी" असें ह्मणून नेलेल्या खिजमतगारांस नेत्रसंकेत करितांच ते आवेशानें उठून उभे राहिले. ते सरदार आहेत' 'असें नबाबास समजतांच बाजीरावाची हिकमत आणि योग्य तयारी पाहून तो खूष झाला. "आह्मांस या वेळीं तुमची गरज आहे, तेव्हां दगा करणार नाहीं" असें नबाब ह्मणाले व परस्परांची आणखी कांहीं बोलणी होऊन पेशवे परत आले.

---

**समर्पक उत्तर**—एकदां हैदराबादचे नबाब स्वारीसह रस्त्यांतून जात असतां दोहोंबाजूनें पैसा उधळीत चालले होते. व कंगाल लोक तो पैसा गोळा करीत होते. बादशहास आपले औदार्याची धन्यता वाटून जवळ पेशव्यांचा वकील होता त्यास गर्वानें विचारूं लागले. "वकील, तुमचे पुण्यांत अशी खैरात होते काय?" वकिलानें बादशहाचा तो सगर्व प्रश्न ऐकून त्यावर योग्य जबाब दिला. तो ह्मणाला "सरकार, असा जमिनीवर टाकलेला पैसा उचलून घेण्यासारखी कंगाल रयतच पुण्यांत नाहीं." हें उत्तर ऐकून बादशहा खजील झाला व आपल्या गर्वाचा त्यास मोठा पश्चात्ताप वाटला.

---

**खरा खजिना व फौज**—एकदां बादशहानें नाना फडनविसास विचारिलें, "तुमच्या सरकारचा फौज व खजिना किती आहे?" बादशहास आपले बळाचा व दौल-

तीचा गर्व झाला आहे, हें मनांत आणून नानानें समर्पक उत्तर दिलें. "आमची सर्व रयत एकदिल व राजभक्त असून सुखी आहे." हा जबाब पाहून आपले प्रश्नांशीं यांचा मेळ कसा मिळतो हें बादशहास समजेना, ह्मणून त्यानें आपल्या पदरच्या एका चतुर मुत्सद्यास विचारिलें. तो ह्मणाला "सरकार हें उत्तर समर्पक आहे. राजभक्त प्रजा हीच आमचें सैन्य आणि त्यांची संपत्ति हाच आमचा खजिना, असें नानाचें ह्मणणें असून तें खरें आहे. प्रजा कंगाल असून जर बेदिल असेल तर राजाजवळ कितीही सैन्य व पैसा असला तरी तो व्यर्थ होय. याकरिता महाराज, आपण आपल्या रयतेची प्रीति संपादन करावी. हेंच आपलें बल होय."

---

**एका कवीचें चातुर्य व माधवराव पेशव्यांचें गुणग्राहित्व**—पुणें येथें थोरले माधवराव उर्फ रावसाहेब पेशवे यांची कारकीर्द चालू असतां त्यांचे पदरीं रामशास्त्री प्रभुणे माहुलीकर या नांवाचा एक अत्यंत निस्पृही आणि न्यायनिपुण ब्राह्मण होता. राज्यांतील मुख्य न्यायाधिशाचें काम याच न्यायमूर्तीकडे होतें. तसेंच कोणी एखादा विद्वान्, शास्त्री किंवा पंडित तेथें आल्यास रामशास्त्री हे स्वतः त्याची परीक्षा घेत. व त्या परीक्षेंत तो पसंत ठरल्यास त्यास सरकारांतून इनाम मिळे. द्रव्याच्या आशेनें कोणी एखादा अर्धवट शिकलेला मनुष्य त्यांचेकडे गेला, तर त्यास खात्रीनें वाटण्याच्या अक्षता मिळत. कोणाही विद्वानाची खरी परीक्षा होऊन त्याच्या

योग्यतेनुरूप त्यास संभावना व्हावी; असा रामशास्त्री यांचा उद्देश असल्यामुळें, ते नेहमीं फार कडक परीक्षा घेत. ती इतकी कीं, त्यामुळें कित्येक वेळां परिक्षेस गेलेले लोक रडकुंडीस येत. आणि त्यांतच जर एखादा अर्धाकच्चा असला तर त्यानें प्रत्यक्ष अश्रूच गाळावे! त्यांच्या परिक्षेंत पसंत ठरून संभावना मिळविण्याचें भाग्य फारच थोड्या लोकांच्या वांट्यास येई.

अशी स्थिति असतां एक मोठा विद्वान् कवि शास्त्रीबुवांचा परीक्षादुर्ग सर करून श्रीमंतांचे भेटीस गेला. श्रीमंतांनीं त्याच्या कवित्वाची तारीफ शास्त्रीबुवांच्या तोंडून पूर्वीं ऐकलीच होती. तेव्हां त्याच्या कवित्वाचा चमत्कार प्रत्यक्ष अवलोकन करावा ह्मणून त्यांनीं त्यास आपल्या समक्ष एखादी कविता करून दाखविण्यास सांगितलें. त्या वेळीं त्या मार्मिक, विनोदी आणि रसिक कवीनें लागलींच पुढील कविता नवीन रचून ह्मणून दाखविली.

> वृष्टिं विना पंक महो विचित्रं ॥ स्थल
> द्वये तिष्ठति सर्व काले ॥ दानांबुभि-
> र्माधवरायमंदिरे ॥ विप्रस्य बाष्पैः
> खलु रामशास्त्रिणां ॥ १ ॥

**अर्थः**—पर्जन्यवृष्टीवांचून विचित्र असा चिखल दोन ठिकाणीं नेहमीं दृष्टीस पडतो. एक सतत गळणाऱ्या दानोदकानें माधवरायांच्या मंदिरांत, आणि दुसरा ब्राह्मणांच्या डोळ्यांतून गळालेल्या अश्रूंनीं रामशास्त्र्यांच्या घरीं!

याप्रमाणें त्या विद्वान् व विनोदी कवीनें, आपल्या समोर असलेल्या दात्याचा गौरव आणि तो रामशास्त्री यांचे घरीं परिक्षेस गेला असतां तेथें आलेला त्यास अनुभव, ह्या दोन्ही गोष्टी एकाच श्लोकानें वर्णन केल्या. ही त्या कवीची कविताशक्ति आणि वर्णनचातुर्य पाहून गुणग्राही माधवरावही फार खुष झाले. व त्यानीं त्याची योग्य संभावना केली.

---

**प्रसंगावधान**—एकदां कांहीं कामाकरितां पेशवे सरकार याणी आपला वकील **निजामाकडे** पाठविला होता. तो वकील प्रथमच **निजामाकडे** गेला असल्यामुळें, त्याची बुद्धिमता किती आहे याची परीक्षा करण्याकरितां, **निजामानें** आपला महाल त्यास दाखविण्यार्चें मनांत आणून, आपल्या स्वतःच्या शौचकूपा समोर पेशव्याची एक तसबीर टांगून ठेविली. नंतर एके दिवशीं **निजाम** आपला महाल त्या वकिलास दाखवितां दाखवितां सदरील शौचकूपाजवळ वकिलासह आला. त्यावेळेस निजामाचें व वकिलाचें त्या चित्रा संबंधानें जें भाषण झालें, त्याचा सारांश असा— निजाम ह्मणाला "वकीलसाहेब! आपले राजे येथेंच सर्वकाळ रममाण आहेत! हें आश्चर्य नव्हे काय?" हें ऐकतांच वकिलानें लागलेंच निजामास मोठ्यानें उत्तर दिलें कीं, साहेब! आपणांस शौचविधि साफ व्हावा ह्मणूनच मुद्दाम ही योजना आहे!! '

**स्पष्टार्थ**—ह्मणजे आमच्या सरकाराचा इतका द-रारा कीं, त्यांच्या तसबिरीकडे पाहिल्याबरोबर लागला-च शौचविधि होतो. आणि तेवढ्याच करितां अशा ठि-काणीं आपण ही तसबीर मुद्दाम टांगून ठेविली आहे; कीं, तिकडे पाहिल्याबरोबर आपणास शौचविधि होण्यास-स वेळ लागूं नये.

---

## आपला विश्रांतीचा वेळ कसा घालावा.

सध्यांचा काळ ह्मणजे मोठा गर्दीचा आणि मेहनत कर-ण्याचा आहे. ज्याला ह्मणून आपलें व आपल्या कुटुंबाचें पोषण करणें भाग आहे, त्याला सडकून मेहनत करावीच लागते. अर्थात मेहनतीच्या मानानें विश्रांति व मन र-मेल असे खेळ पाहिजेत ह्मणजे बरें असतें. मुलें व मुली शाळेंत जाऊन अभ्यासानें दमतात. तेव्हां त्यांना नियमितपणें सुट्या व रोज खेळायाला वेळ हीं मिळालींच पाहिजेत.

त्यांनीं सुट्टीचा वेळ केवळ कांहीं न करण्यांत ह्मणजे आळसांत घालवावा असें नाही. आपण नेहमीं जो उ-द्योग करितों, त्याहून निराळा उद्योग काढून त्यांत चित्त घातलें, तरी सुद्धां मनाला विश्रांति होऊन हुशारी येते. मुलांना, विटिदांडू, आट्यापाट्या, क्रिकेट वगैरे फार उत्तम खेळ आहेत, त्याप्रमाणें मुलींना नाहींत; परंतु त्यां-चीही सोय दिवसानुदिवस लागत जाईल असें दिसतें.

जे शरीरश्रमाचेच धंदे करितात, त्यांस व्यायामाची

वस्तुतः जरूर नसते. त्यांचा धंदाच त्यांस तितका व्यायाम पुरवितो. तेव्हां त्यांनीं आपला इतर वेळ लिहिण्यांत-वाचण्यांत घालवावा हें चांगलें.

आपल्या इकडील लोकांचीं उदाहरणें तितकीं उपलब्ध नाहींत; परंतु इंग्लंडांत मजूर लोक पुढें विद्वान झाले,—आणि तेही आपल्या खासगी वेळांत गमती दाखल केलेल्या वाचनानें—अशा बद्दल पुष्कळ उदाहरणें आहेत. न्यू इंग्लंडांत **एलिहबरीट** नांवाचा एक चांभाराचा मुलगा होता. त्या बिचाऱ्याला शाळेंतलें शिक्षण काय तें तीनच महिने मिळालें; आणि ताबडतोब एका घिसाडखान्यांत घिसाडकाम शिकण्यास जावें लागलें. अर्थात पुढें त्याच धंद्यांत त्याचें आयुष्य गेलें; परंतु ज्ञानाची तहान फार, यामुळें त्यानें आपल्या विश्रांतीच्या वेळांत खूब अभ्यास करून गांवांतील पुस्तकालयांतलीं सगळीं पुस्तकें वाचलीं! मरेपर्यंत तो जबरदस्त अभ्यासी होता. त्या कालच्या अतिश्रेष्ट विद्वानांत त्याची गणना होत असे. त्या विद्वत्तेचा पुढें त्यानें उपयोगही केला. शिद्दी गुलामांना स्वतंत्रता देण्यांत, आपल्या समाजांत दारूचें व्यसन नाहींसें करण्यांत व तंटेबखेडे नष्ट करून टाकण्यांत त्यानें अतोनात श्रम केले.

दुसरें असेंच विलक्षण उदाहरण **ह्युमिलर** याचें—हा स्कातलंदांतला एक पाथरवट होता. भिकार अन्न तेंही अपुरें असें खाऊन आडदांड सोबत्यांबरोबर काम करण्याचे प्रसंग त्याला नेहमीं येत. परंतु त्यानें आपल्या नजरेस जें जें पडेल त्याचें त्यानें टिपण करून ठेवण्याचा प्रघात ठेविला. आणि विश्रांतीचा सर्व वेळ वाचनांत व

अभ्यासांत घालविला. याप्रमाणें क्रम असल्यामुळें थोडेच वर्षांत तो नामांकित भूशास्त्रज्ञांत व ग्रंथकारांत मोडूं लागला !

आतां अशा तऱ्हेनें उत्तम ग्रंथकार बनण्याची व शास्त्रज्ञता संपादण्याची अलौकिक बुद्धि थोडक्यांतच असते; परंतु आपला फालतु वेळ एखाद्या उत्तम पुस्तकाच्या वाचनांत घालवावयाचें सर्वांच्या हातीं आहे. एखाद्या चांगल्या वर्तमानपत्रापासूनही सहजगत्या उत्तम ज्ञान होऊन जातें. जे लोक मानसिक श्रम विशेष करितात. त्यांस शरीरव्यायामाची फार आवश्यकता असते, तेव्हां त्यापैकीं कित्येक एखाद्या कारखान्यांत जाऊन कांहीं तरी हात काम करीत असतात. हें त्यांचें करणें खरोखर प्रशंसनीय आहे. हातकाम करण्याबद्दल कोणासही लाज वाटूं नये. रशिआचा अत्यंत सुप्रसिद्ध राजा पिटर धि ग्रेट कांहीं काळपर्यंत आपलें सिंहासन सोडून हालंड व इंग्लंड या देशांत तारवांवरील सुताराचें काम शिकण्यास गेला. हें त्यानें आपला विश्रांतीचा वेळ कसा तरी घालवावा ह्मणून केलें नाहीं, तर आपण तो धंदा शिकून आपल्या लोकांस शिकवावा ह्मणून केलें. आतां त्याच्या या करण्यानें आपण एवढेंच समजावयाचें कीं, धंदा कोणचा जरी असला तरी त्याच्या योगानें मनुष्याच्या मान्यतेस कांहीं कमीपणा येत नाहीं ! तेव्हां कोणच्याही स्थितींत मनुष्य असो. त्यानें आपल्या मनाच्या करमणुकीकरितां व आरोग्याकरितां पाहिजे तो धंदा करावा.

## मनुस्मृतिपैकीं उपयुक्त वेंचे.

स्मृति हा शब्द ' स्मृ ' ( चिंतन करणें ) या धातू-पासून निघालेला आहे. ह्मणजे पूर्वी ऐकलेली अथवा पाहिलेली किंवा दुसऱ्या रीतीनें ज्ञानारूढ झालेली गोष्ट पुनः मनांत आणणें अथवा येणें.

स्मृतींत विषय ह्मटले ह्मणजे आचार, व्यवहार व प्रायश्चित हे तीन असतात. आचार ह्मणजे धर्मसंबंधी कर्तव्यकर्में. तीं मनुष्याचे चार वर्ग व त्यांच्या आयुष्याचे चार भाग अथवा आश्रम कल्पून त्या त्या वर्णांच्या व आश्रमाच्या संबंधानें निरनिराळीं सांगितलीं आहेत. व्यवहारामध्यें लौकिककर्में अथवा मनुष्याच्या परस्पर संबंधापासून उत्पन्न होणारीं कर्में, राजा व त्याचीं प्रजेच्या संबंधानें कर्में, प्रजेचीं राजाच्या संबंधाचीं कर्में, हीं सांगितलीं आहेत. आणि प्रायश्चितामध्यें जीं धर्मसंबंधीं कर्में करावयाचीं किंवा न करावयाचीं तीं त्या प्रकारानें न करतां अन्य प्रकारानें केलीं, तर त्याबद्दल पाप अथवा दोष लागतो. त्या दोषांच्या निराकरणार्थ उपाय सांगितले आहेत.

सर्व स्मृतींत मनुस्मृति ही आद्य आहे व तिची वजनदारीही सर्व स्मृतींत विशेष आहे. ब्रह्मदेवानें आपल्या देहाचे दोन भाग ह्मणजे एक स्त्री व एक पुरुष असे केले. त्या स्त्रीपुरुषांनीं सृष्टीनियमास अनुसरून विराट पुरुष उत्पन्न केला. विराटानें गहन तप करून या सर्व सृष्टीचा उत्पादक असा पुरुष उत्पन्न केला. तोच मी ( मनु ) असें या स्मृतीच्या प्रथमाध्यायीं ३२ । ३३ श्लोकांत सांगितलें आहे. असो.

"जो अक्षय स्वर्गसुखाची इच्छा करणारा, व इहलोकीं स्त्रीसंभोग, मिष्टान्नादि भोजन निरंतर इच्छिणारा त्यानें जो गृहस्थाश्रम इंद्रियदमन रहितास धारण करण्याला शक्य नाहीं तो मोठ्या यत्नेंकरून धारण करावा."

"गृहस्थाश्रमी ज्या कालीं आपल्या देहाची त्वचा शिथिल झाली, केंश पांढरे झाले, पुत्राला पुत्र झाला, असें पाहील तेव्हां त्यानें विषयांचे ठायीं वैराग्य धरून परमार्थसाधन करावें."

"जो सर्व लोकप्रियत्वातें इच्छितो, त्यानें सर्वांचें परोक्ष किंवा अपरोक्ष गुणवर्णनच करावें. तेणेंकरून तो लोकप्रिय होतो."

"मनुष्य आपण कितीही पीडित असला, तथापि त्यानें जेणेंकरून दुसऱ्याच्या मनाला चटका लागेल असें मर्मभेदक भाषण कदापि करूं नये. तसेंच दुसऱ्याला द्रोह उत्पन्न होईल असें कर्म करण्याविषयीं कदापि बुद्धि धरूं नये. दुसऱ्याचें मर्म भेदणारी अशी वाणी मुखापासून निघाली असतां ती स्वर्गप्राप्तीचा नाश करिते."

"ज्या द्विजोत्तमाला तप करण्याची इच्छा असेल त्यानें वेदाचाच सर्वदां अभ्यास करावा. कारण कीं, वेदाभ्यास हें ब्राह्मणाचें इहलोकीं उत्तम तप असें ऋषींनीं सांगितलें आहे."

"तप, ज्ञान, यज्ञ आणि दान हीं जरी सर्व युगांचे ठायीं करण्यास योग्य आहेत, तथापि सत्ययुगाचे ठायीं तप प्रधान; त्रेतायुगाचे ठायीं आत्मज्ञान प्रधान; द्वापार-

युगीं यज्ञ प्रधान आणि कलियुगीं दान प्रधान असें सांगितलें आहे. "

" नित्य द्विजानें ( ब्राह्मण, क्षत्रिय किंवा वैश्य यानें ) आचमन करून स्वस्थांतःकरणें करून भोजन करावें. व भोजन केल्यानंतर यथाविधि हस्तपादादि प्रक्षालन करून आचमन केल्यानंतर नासिका, नेत्र व कर्ण ह्या सहा स्थानीं उदकस्पर्श करावा. "

" सर्वदां अन्नाची पूजा करावी, ह्मणजे प्रागार्थित्वें-करून त्याचें ध्यान करावें, तें पाहून आनंद मानावा व प्रसन्नवृत्ति व्हावें. व हें अन्न नित्य आह्मांला प्राप्त असो, असें ह्मणून त्याला नमस्कार करावा, आणि त्याची निंदा न करितां तें भक्षण करावें. "

" माता, पिता आणि आचार्य ह्या तिघांची सेवा करणें हेंच उत्तम तप ह्मटलें आहे. कारण, त्यांच्या सेवेपासून सर्व तपांची फलप्राप्ति आहे. यास्तव जर कांहीं इतर धर्माचरण कर्तव्य असेल, तर तें तिघांच्या संमतीवांचून करूं नये. "

" आपल्यापासून कनिष्ट किंवा समान वयाचा अथवा अभिवादन न करणारा असा ब्राह्मण भेटला असतां त्याला कुशल ( तुह्मीं कुशल आहां ना ? ) असें विचारून नंतर दुसरी गोष्ट विचारावी. क्षत्रिय किंवा शूद्र भेटला असतां क्षेम आहे ? असें विचारावें. "

" आपलें निरंतर कल्याण असावें अशी ज्याला इच्छा असेल त्यानें क्षत्रिय, सर्प आणि विद्वान ब्राह्मण हे जरी दुर्बल असले. तथापि त्यांचा कदापि अवमान करूं नये. "

" जसें पाहिलें असेल किंवा श्रवण केलें असेल, तसें

सत्य बोलावें. तसेंच जेणेंकरून संतोष होईल असें बोलावें; ह्मणजे तुला पुत्र झाला इत्यादि संतोषकारक भाषण बोलावें. प्रत्यक्ष पाहिलेलें अथवा श्रुत झालेलें, परंतु अप्रिय असें बोलूं नये. ह्मणजे तुझा पुत्र मृत झाला इत्यादि बोलूं नये. प्रिय परंतु मिथ्या असेंही बोलूं नये. हा वेदमूलत्वेंकरून नित्यधर्म जाणावा."

"जो मनुष्य सदाचारसंपन्न, श्रद्धायुक्त व दुसऱ्याचे दोष न बोलणारा तो शुभसूचक लक्षणांनीं जरी शून्य असला, तथापि शंभर वर्षें वांचतो."

उदक दान करणारा तृप्ति पावतो, अन्न दान करणारा अक्षय सुख पावतो, तील दान करणारा इष्ट संतति पावतो, ब्राह्मण इत्यादिकांच्या गृहीं दीप लावणारा निर्दोष चक्षु पावतो. सुवर्ण दानकर्ता चिरंजिवित्व पावतो. गृह दानकर्ता श्रेष्ठ मंदिरातें पावतो. रौप्य दानकर्ता मनोहर अशा रूपातें पावतो. वस्त्र दानकर्ता चंद्रासारखा ऐश्वर्यवान होतो. अश्व दानकर्ता अश्विनीकुमारांसारखा संपत्तिमान होतो. वृषभ दानकर्ता प्रचुर संपत्ति पावतो. आणि गो दानकर्ता सूर्यलोकातें पावतो."

"जो ब्राह्मण श्राद्धीं भोजन करून त्या अहोरात्रीमध्यें स्त्रीसंग करितो, त्याचे पितर एक मासपर्यंत त्या स्त्रियेच्या विष्टेमध्यें शयन करितात. तस्मात् तो करूं नये."

"पतिताशीं समागम, परस्त्रीसेवन, ब्राह्मणाचें सुवर्ण चोरणें यांतून कोणतेंही करणारा ब्रह्मराक्षस होतो."

"धान्य, कांस्य, जल, मध, दूध, रस ( गुड लव-

णादि व्यतिरिक्त इक्ष्वादि रस ) घृत यांची चोरी करणारा क्रमेंकरून उंदीर, हंस, प्लव नामक पक्षी, दंश ( वनमाक्षिका ), कावळा, कुत्रा, व मुंगूस यांच्या योनिप्रत जातो."

" खरी साक्ष देणारा साक्षीदार इहलोकीं उत्तम कीर्ति पावून उत्कृष्ट ( ब्रह्मलोकादिक ) लोक पावतो, आणि त्याची वाणी ब्रह्मदेवापर्यंत पूजित होते."

" साक्षी सांगतांना मिथ्या बोलणारा साक्षीदार पराधीन होऊन दारुण पाशांनीं बांधला जाऊन शंभर जन्मपर्यंत अत्यंत पीडा पावतो. तस्मात् साक्षीदारानें खरी साक्ष द्यावी, मिथ्या बोलूं नये."

" स्वसंतोषानें अतिथि घरीं आला असतां त्याला आसन, उदक, हीं द्यावीं. आणि विधिपूर्वक सत्कार करून यथाशक्ति अन्नदानही करावें. "

" परक्याचे घरीं पाहुण्याप्रमाणें केवळ एकच रात्रं राहणारा जो ब्राह्मण तो अतिथि होय. ज्याला दुसरी तिथि नाहीं तो अतिथि. "

" सुख व संपत्ति हीं आपणांस मिळावीं अशी इच्छा करणारे जे पिते, भ्राते, पति, दीर इत्यादि लोक यांनीं स्त्रियांस सन्मान द्यावा. उत्तम प्रकारचीं वस्त्रप्रावरणें व अलंकार भूषणांनीं त्या सुशोभित कराव्या. ज्या कुटुंबांत स्त्रियांस उत्तम मान मिळतो, त्यांत सर्व देवता संतुष्ट होऊन राहतात. परंतु, ज्या कुटुंबांत स्त्रियांस सन्मान मिळत नाहीं. त्यांत मोठमोठाले यज्ञयाग, तपश्चर्या, दान, धर्म वगैरे सर्व पुण्यकारक कर्में अगदीं निष्फळ होतात. ज्या कुटुंबांत स्त्रिया दुःखित असतात तें कुटुंब लवकरच नाश पावतें. आणि ज्यांत स्त्रिया सुखी अशा ठेवलेल्या

असतात, त्यांत सुख व संपत्ति यांची सर्वदां वृद्धि होत असते. स्त्रियांस योग्य सन्मान न मिळाल्यामुळें त्या ज्या कुटुंबास शाप देतात, त्यांस अवदशा लागून तीं सर्वथा नष्ट होतात. यास्तव आपल्या कुलाचें कल्याण व्हावें अशी ज्या पुरुषांची इच्छा असेल त्यांनीं सण, वार वगैरे कांहीं यत्किंचित् विशेष झाला कीं, स्त्रियांस उत्तम प्रकारें जेवणखाण, वस्त्रप्रावरण, डागदागिने वगैरे देऊन सर्वदां त्यांस उत्तम प्रकारें मान द्यावा. ज्या कुटुंबांत नवरा बायकोवर संतुष्ट असतो, ह्मणजे दुसऱ्या स्त्रीची इच्छा वगैरे करीत नाहीं व बायकोही नवऱ्यावर संतुष्ट असते, तीं जोडपीं सदासर्वकाल सुखानें नांदतात. जर वस्त्र, अलंकार इत्यादिकांनीं स्त्री शोभायमान न केली तर ती पुरुषाच्या चित्तास अल्हाद देणारी अशी होणार नाहीं. आणि अल्हाद देणारी नसेल तर तिजपासून वंशवृद्धि होणार नाहीं. स्त्री जर कुटुंबांत सुशोभित अशी ठेविली, तरच तें सर्व कुटुंब शोभतें, आणि ती जर विशोभित ठेविली, तर सर्व कुटुंब विशोभित दिसतें."

"कदाचित् कोणी असें ह्मणतील कीं, संततीवांचून स्वर्गप्राप्ति होत नाहीं, यास्तव पुत्राकरितां दुसऱ्या पुरुषाचा आश्रय करावा. त्याविषयीं स्मृतिवाक्य असें आहे कीं, सनक वालखिल्यादिक ब्रह्मचारी कुमार कुलवृद्ध्यर्थ संतती उत्पन्न केल्यावांचून स्वर्गास पावले आहेत. असें जाणून स्त्रीनें संततिवांचूनही नियमानें रहावें."

"आचारसंपन्न अशी साध्वी स्त्री पति मृत झाल्या-

नंतर ब्रह्मचर्यानें राहील तर ती अपुत्रा असतांही जसे ते ब्रह्मचारी कुमार स्वर्गाप्रत गेले, तद्वत ती स्वर्गास जाते. "

" व्यभिचारकर्म करणारी स्त्री परपुरुषाच्या उपभोगेंकरून इहलोकीं निंदेतें पावते व मृत झाल्यानंतर कोल्ही होते, आणि कुष्टादि रोगांनीं पीडित होते. "

" जी स्त्री काया वाचा मन यांहीं करून व्यभिचार करीत नाहीं, तिला साधु लोक साध्वी असें ह्मणतात; आणि भर्त्यासहवर्तमानि ती संपादित लोकांप्रत पावते. "

" ज्या स्त्रिया दुराचरणापासून आपलें आपण रक्षण करीत नाहींत, त्या आप्त व सुशील अशा पुरुषांनीं जरी कोंडून ठेविल्या, तथापि रक्षित होत नाहींत. आणि ज्या धर्मबुद्धीनें आपलें आपण रक्षण करितात, त्याच सुरक्षित होतात. तस्मात् धर्मेंकरून स्वर्ग व अधर्मेंकरून नरक प्राप्त होतात •इत्यादिक उपदेश स्त्रियांना करून त्यांचा निग्रह करावा, हा रक्षणाचा मुख्य उपाय आहे. "

" मद्यपान, दुर्जनसमागम, भर्त्याचा विरह, इकडे तिकडे भ्रमण, अकालीं निद्रा, आणि दुसऱ्याचे घरीं जाणें, हे सहा प्रकार स्त्रियांला व्यभिचारदोष उत्पन्न करणारे आहेत. याकरितां त्यांपासून स्त्रियांचें रक्षण करावें. स्त्रियांचा विवाहविधि हाच उपनयनसंस्कार असें मन्वादिकांनीं सांगितलें आहे. पतीची सेवा ही गुरुकालीं वेदाध्ययनाकरितां वास करण्याऐवजीं आहे, आणि घरांतील प्रापंचिक काम करणें हें प्रातःसायंकाळीं होमरूप अग्निसेवा आहे, यास्तव विवाह हा उपनयन स्थानापन्न असल्यामुळें स्त्रियांस उपनयनसंस्कार नाहीं."

" घरांतील कामकाजाविषयीं स्त्रियेनें दक्ष असावें. व भर्ता विरुद्ध असला तथापि सर्वदां आनंदित रहावें, घरांतील सर्व जिनसा व्यवस्थितपणें ठेवाव्या आणि रोजचा खर्च काटकसरीनें करावा. उदार हातानें करूं नये. "

" "परपत्नी अथवा जिच्याशीं कोणतें नातें नाहीं अशी स्त्री, तिच्याशीं भाषण करणें तर " हे भगिनी " असें प्रथम बोलून भाषण करावें."

" स्त्री व पुरुष ह्या दोघांसही व्युत्क्रमानें पुरुषास परस्त्रीगमन व स्त्रियांस परपुरुषगमन यांचा दोष शास्त्रांत सारखाच सांगितला आहे. पुरुष त्या दोषातें पहात नाहींत व स्त्रिया पाहतात. यास्तव विचार केला असतां स्त्रियाच श्रेष्ठ होत. "

---

## गंगास्तव.

श्लोक.

वंदीती नगजा सपत्नि पृथ्वी शृंगार रत्नावली ॥
स्वर्गारोहण मार्ग साधन करी गंगाजना जाहली ॥
त्वत्तीरीं वसणें, तुझें जल पिणें, पात्रीं तुझ्या पोहणें॥
कर्मै हीं बरवीं, सुपाद भजणें त्वन्नाम तें घोकणें ॥१॥
त्वत्तीरीं तरुकोटरीं वसतसे पक्षी गमे तो बरा ॥
राहे जो नरकांत कारण जलीं तो मीन देवी खरा ॥
किंवा कच्छ, रणीं बहूनृप वधी ऐसा नको भूपती ॥
पादाक्रांत समस्तशत्रु वनिता गाती जयाची स्तुती ।२।

विष्णू-सुपादकमलोद्भव हो जिचेचा ॥
आहे सदां शिवशिरीं बघ वास जीचा ॥
" मंदाकिनी " जन जिला ह्मणती ह्मणोनी ॥
ती यांस पावन करी मज उद्धरोनी ॥ ३ ॥
वदे ज्ञाता मुक्त त्वरित तुज गंगा करिल गा ॥
मला नाहीं संताहुनि इतर या भूवरि लगा ॥
तुला आलों आहें जननि कर जोडूनि शरण ॥
स्वतीरीं त्वां द्यावें द्रवुनि मज काशींत मरण ॥४॥
तुझ्या तीरीं नीरीं हृदय रमतें दुःख शमतें ॥
यशोगानें पानें कुमत गळतें विघ्न टळतें ॥
कळी भंगे गंगे षडरी झुरती दोष नुरती ॥
दिली रामें नामें तसिच जगतीला निजगती ॥ ५ ॥
श्री भागीरथि शेवटीं निजतटीं देवास या हाकिती॥
कोणीही शरणागता सदय-जे ज्ञाते न ते हाकिती॥
माता धांवुनि आलिया स्वनिकट ग्रीष्मातपीं-
तापल्या ॥ आधीं कीं कुरवाळिती निववि़ती-
स्नेहें मुला आपल्या ॥ ६ ॥

---

कलिप्रशंसा.

श्लोक.

सत्वें हीन रसा तरूगण तसा झाला फळें-हीनसा ॥
गोडी नाहिं रस तसेंच पयही देतात गाई पसा ॥

संध्या आठदिसां कशामग पुसा आचारहो फारसा॥ होळ्यांला अरसा विशींत महिमा आहे कलीचा असा ॥ १ ॥

राजा करें त्रास करी प्रजेला ॥
आचार विप्रां सजूनीच गेला ॥
स्त्रिया विरोधा करिती पतीशीं ॥
आहे कलीची महिमाच ऐशी ॥ २ ॥

---

## गृहस्थाश्रम.

भार्या रूपगुणान्विता सुत सुधी द्रव्यास संपादिता ॥
ऐसा मित्र जरी प्रसंग पडला प्राणासही वेंचिता ॥
न्यायें वर्तन ईशपादकमलीं भक्तीहि सत्संगमी ॥
सत्पात्रीं करि दान धन्य नर जो ऐसा गृहस्थाश्रमी १
भार्या निष्ठुर भापिणी सुत तरी मूर्खांमधें अग्रणी ॥
जेवाया बहुमित्र एकहि परी कार्या न कोणी धणी ॥
माना सोडुनि मान नम्र करुनी दुष्टां सदाही नमी ॥
जाळाया उदरा फिरे घरघरा धिग्धिग् गृहस्थाश्रमी २

---

## सुखाचें इंगित.

बेंजामिन फ्रांकलीनचें नांव सर्वांस ठाऊक आहेच. तो ज्या घरांत रहात असे, त्याच्या समोरच एक माठी

थोरली इमारत बांधली जात होती, आणि त्यांत एक मजूर काम करीत असे. हा मजूर नेहमीं आपला आनंदांत असे. कोणी त्याला भेटो, त्याच्याकडे मोठ्या आनंदानें हंसत पहावयाचा. सगळ्यांशीं हंसून खेळून आपलें काम चोख करावयाचा. दिवस कसाही असो, आकाश ढगांनीं व्यापून जाऊन जिकडे तिकडे काळोख पडलेला असो, कीं सूर्याचा सुंदर प्रकाश पडून जिकडे तिकडे लकलकाट झालेला असो, याचें मन अगदीं खुलें व आनंदी असून चेहरा नेहमीं प्रफुल्लित असावयाचा. इतरांच्यांत व याच्यांत मोठा फरक; यामुळें फ्रांक्लीन साहेबांस मोठें आश्चर्य वाटे. एक दिवस त्या मजुरास भेटून त्याच्या अशा वृत्तिबद्दल त्यास प्रश्न विचारण्याचा त्यांनीं बेत केला होता. त्यांच्या बेताप्रमाणें त्याची व त्यांची गांठ एके दिवशीं पडली असतां, त्यांनीं त्याला प्रश्नही विचारला. तेव्हां तो आनंदी मजूर हंसून त्यांस ह्मणालाः—

" डाक्टरसाहेब, माझी बायको उत्तमांतली उत्तम आहे. मी इकडे कामावर येण्यास निघालों ह्मणजे ती माझी भाकर नीटनेटकी बांधून देऊन प्रेमानें कितीतरी गोड बोलते; आणि इथलें काम संपून मी घरीं गेलों कीं ती आपल्या त्या हंसत्या व सुंदर मुखानें माझें स्वागत करण्याला दारांत अगदीं हजर असायचीच. घरांत जावें तों जी ती गोष्ट जिथल्या तिथें असून चहा वगैरे तयार असायचाच; आणि तो आह्मीं घ्यायला बसलों ह्मणजे साऱ्या दिवसांत आपण केलेल्या बारीकसारीक गोष्टींची हकीगत मला सांगायची; आणि माझ्यापासून विचारून घ्यायची. एकंदरींत माझ्या सुखाकरितां ती किती ह्मणून

झटत असते ह्मणतां? आणि त्यामुळें कोणाकडे त्रासानें बवण्याचें मला कधींही ठाऊक नाहीं. मग त्रासाच्या शब्दाचें नांव कशाला?" डाक्टर फ्रांक्लिनांनीं तें ऐकून त्यांना काय वाटलें, हें त्यांच्या पुढील उद्गारांवरून स्पष्ट दिसणार आहे. ते ह्मणतातः— "यावरून पुरुषांच्या हृदयावर सुशील स्त्रीचें केवढें वजन पडतें हें पहा बरें! पुरुषांचें हृदय मृदु करून त्यास आनंदवृत्तीचें व सुखसमाधानाचें आगर बनविणें हें स्त्रियांच्या हातीं आहे." तर स्त्रियांनो, आनंदानें व गोडपणें बोलत जा. सगळा दिवस श्रम करून नवरा घरीं आला ह्मणजे गोड हंसून बोलून त्याच्या सर्व श्रमांचा परिहार केलात तर सुखाला पारावार नाहींसा होईल. गोड बोलणें आणि हंसणें त्याला खर्च कांहीं नाहीं; फायदा किती! तर सर्व संसारसुख शांतीनें मिळून आयुष्य मोठ्या मौजेंत घालविण्यास सांपडतें.

---

## वाचनाविषयीं.

आजपर्यंत जेवढे ह्मणून विद्वान लोक होऊन गेले, त्या सर्वांनीं लक्ष्यपूर्वक वाचनाविषयीं परिश्रम केले आहेत. आणि खरोखर, ह्याखेरीज ह्मणण्यासारखी योग्यता मनुष्यास कदापि प्राप्त होणार नाहीं. लॉर्ड बेकन् साहेब ह्मणतात, "वाचनानें मनुष्याच्या आंगीं बहुश्रुतपणा येतो, संभाषणानें समयसूचकता येते, आणि लिहिण्याची संवय असल्यानें त्याला ठाकठीक साधते." तेव्हां "बहुश्रुतपणा" ह्मणून जो काय ह्मणतात, तो अनेक ग्रंथांच्या

पूर्ण परिचयावांचून मनुष्यांत कधींही येणार नाहीं, हें उघड दिसतें. केवढाही बुद्धिमान् कसाही नवीन कल्पना आणि युक्ति शोधून काढणारा मनुष्य असला, तरी वरील अपूर्णतेची संपादणूक इतर कोणत्याही साधनानें त्याजकडून होणार नाहीं. आपलीं मतें आणि समज निर्दोष आणि यथार्थ असे होण्यास आपणांला जुन्या काळचे इतिहास वाचून पूर्वींच्या आणि हल्लींच्या काळाच्या गोष्टींचा पडताळा पाहिला पाहिजे. अंतःकरणास हिंमत आणि हुशारी येण्यासाठीं आपणापूर्वीं होऊन गेलेल्या महात्म्यांचे जे चिरस्थाई विचार आणि तर्क त्यांचे मागें राहिले आहेत, ते वाचनद्वारें आपणांस चांगले समजले पाहिजेत. तसेंच अंतःकरणाची नेहमीं नवीन कल्पना करण्याकडे प्रवृत्ति व्हावी, निदान चांगले विचार करण्याकडे तरी त्यांचा सर्वकाळ कल असावा, ह्मणून अनेक विषयांवरचे चांगले चांगले ग्रंथ आपणाला अवश्य वाचले पाहिजेत. ज्याप्रमाणें रक्ताची वृद्धि करणारें अन्न होय, त्याचप्रमाणें मनास वाचन हें होय. जो कोणी लक्ष्यपूर्वक ग्रंथवाचन सतत करणार नाहीं, त्याच्या हातून अंतःकरणांत विशेष सुधारणा होण्याची आशाच नको.

नेहमीं असें आढळण्यांत येतें कीं, जे भराभर पुस्तकें वाचतात, त्यांपैकीं थोडक्यांसच उपयुक्त असें ज्ञान प्राप्त होतें. घाईनें वाचणाऱ्या लोकांस बहुधा जें आपण वाचलें त्याचा पूर्वापार संबंध कळत नाहीं. घाईघाईनें फक्त पुष्कळ पुस्तकें वाचून टाकणारा, आणि खरा विद्वान यांजमध्यें फार मोठी तफावत असते. कदाचित् असें ह्मणतां येईल कीं, ज्यानें थोडे ग्रंथ, पण ते चांगले लक्ष्य देऊन व

विचारपूर्वक वाचलें आहेत, त्यालाच बुद्धिविशिष्ट कार्यें करण्याची चांगली शक्ति येते.

मोठ्या घाईघाईनें जेवण जेवलें असतां अन्नाचें पचन होऊन शरीरास त्यापासून पुष्टता कधींतरी येईल काय? कधींही येणार नाहीं. त्याप्रमाणेंच मनुष्याची मानसिक स्थिति आहे. कोणतीही घाईची गोष्ट ह्मटली ह्मणजे ती मनांत बिलकुल भरत नाहीं, व तिजपासून मग अर्थातच फायदाही होत नाहीं.

पुष्कळ वाचलें ह्मणजे विद्वान होतो असें नाहीं. तर जें कांहीं वाचावयाचें असेल तें लक्ष लावून वाचलें असतां, वाचलेलें ध्यानांत धरलें असतां, व त्यावर सावकाश विचार केला असतां, आज नाहीं उद्यां, उद्यां नाहीं परवां सहज विद्वान होतां येईल. वाचावयाचें तें थोडें कां असेना, तें लक्ष लावून वाचलें ह्मणजे पुरे. दर दिवशीं एखाद्या पुस्तकाचें एक पान वाचलें तरी पुष्कळ काम होईल. मात्र तें विचार करून वाचलें पाहिजे. आतां एक दिवसच वाचलें तर त्यानें कांहींच होणार नाहीं हें सांगावयाला नकोच. एका दिवसाच्या खटपटीनें कोठें घरें बांधलीं जातात? छे, त्याला कांहीं दिवस दररोज खटपट करावी लागते. विद्वान होण्याचेंही असेंच आहे. दररोज एक एक पान या नियमानें दररोज वाचीत गेलें असतां पुष्कळ काम होईल. सात दिवसांचा एक आठवडा होतो. चार आठवड्यांचा एक महिना होतो व बारा महिन्यांचें एक वर्ष होतें. एका वर्षाचे दिवस ३६५ असतात. तेव्हां दररोज एक पान वाचीत गेलें असतां एका वर्षांत ३६५ पानांचें मोठें

पुस्तक वाचून होईल. तीनशें पानांचें एक पुस्तक धरलें तर दहा वर्षांत मोठमोठीं बारा पुस्तकें वाचून होतील. जो दहा वर्षे याप्रमाणें वाचतो तो साधारण मनुष्य होईल असें नाहीं. पंधरावीस पळें वाचल्यावर जे विचार मनांत येतात, त्यांहून कितीतरी जास्त व चांगले विचार एका आठवड्यांत येतील. आठवडा वाचल्यावर जे विचार सुचतील, त्यांहून कितीतरी जास्त व चांगले विचार एका महिन्यांत सुचतील. एका महिन्यांत जितके विचार सुचतील, त्यांहून जास्त व चांगले विचार एका वर्षांत सुचतील. दहा वर्षांत आपले विचार फार मजबूत व चांगले होतील यांत शंकाच नाहीं. तेव्हां दररोज काळजीनें व फार विचार करून एकच पान वाचलें तरी केवढें मोठें काम होतें तें सहज ध्यानांत येईल. निष्काळजीनें पुष्कळ पानें वाचलीं तरी त्याचा कांहींच उपयोग होणार नाहीं. विचारानें वाचल्यास दररोज एक पान पुरे.

ग्ल्याड्स्टन साहेब कसे वाचतात ?—ते वाचतात तेव्हां त्यांच्या हातांत नेहमीं एक पेनसिल असते. त्यांस जें आवडतें, त्याच्या बाजूस ते रेघ ओढतात; संशय येतो तेथें ( ? ) असें प्रश्नचिन्ह करितात, आणि बरोबर वाटत नाहीं तेथें ( × ) अशी फुली करितात. तेव्हां तात्पर्य काय कीं, प्रत्येक मनुष्यानें वाचते वेळीं अर्थज्ञानाकडे विशेष लक्ष्य पुरवून वाचीत असावें म्हणजे त्याचा योग्य मोबदला मिळाल्याशिवाय राहणार नाहीं.

# ग्रंथकर्त्याची प्रार्थना.

पद–सुंदर मुख तुंदिल० तनु या. चा.

नागनिकुर भूषित श्री शिव सुभामिनी ॥
राजिवाक्ष दुरित हरे भव विमोचनी ॥ धृ० ॥
यक्ष भूत सुरवरनर वंद्य ईश्वरी ॥
नगदुहिते चार्वानन दक्षकुमरी ॥
सदयांतःकरण ज्ञान-विटपमंजिरी ॥
दावीं । देवी । वरवीं । पदकमलें । गे सुशिले ।
शिवविमले । विश्वस्वामिनी ॥ १ ॥
शिणलें मन बहुपरि भव भव्य सागरीं ॥
वश जहालों मायेप्रती शंभुसुंदरी ॥
दारुण हे षडरि देति त्रास अंतरीं ॥
मज या । समया । हृदया । सदय करुनी ।
मुक्ति भुवनिं । त्वच्चरणीं । ने तमोहनी ॥ २ ॥
लेखर्षि स्तवित रम्य पदसरोरुहा ॥
कृत्तिवास रमणि दावि करि पुनीत हा ॥
तव पदनत वनितेसह भगवती महा ॥
माते । याते । दयिते । नच त्राता । तुजपरता ।
ने पतिता । पदिं सुखासनीं ॥ ३ ॥

**समाप्त.**

## या पुस्तकास ज्या सद्गृहस्थांनीं अगाऊ आश्रय दिला त्यांचीं नांवें.

एकापेक्षां जास्त प्रतीस ज्यांनीं आश्रय दिला आहे त्यांच्या नांवापुढें आंकडे घातले आहेतच. बाकी राहिलेले सर्व एकेक प्रतीचे वर्गणीदार समजावे.

मि. ॲडन मल जी. हेडमास्तर बडा .... .... ....
रा. अण्णाजी गोविंद, सिन्नर
,, अण्णाजी पांडुरंग, अथणी
,, अण्णाजी रावजी स्टे. मा. बोरगांव .... .... ....
,, अंताजी बाळलींग, मेहलाव
,, अनंत अमृत, अहमदनगर
,, अनंत केशव, इंदुर
,, अनंत खंडेराव, बडोदा
,, अनंत गणेश, शेंदुर्णी
,, अनंत बाबाजी, आकोला
,, अनंत रघुनाथ, बोरीवल
,, अनंत रामचंद्र, चिणगें
,, अनंत संतराम, ओलपाड
,, अब्राहीम डेव्हीड, पुणा
,, अमृत व्यंकटेश, थुगांव
,, अमोलीक उर्फ तुकाराम, बानगें .... .... ....
,, आदपा भवानी, अकोला
,, आनंद कृष्ण, कारवार
,, आनंद बालकृष्ण, नागपूर
,, आनंदराव गणेश, माहिंदर
,, आनंदराव व्ही. रा. मुंबई
,, आपासाहेब गोंडा, अरळें
,, आबाजी भैराळ, आकोला
,, आत्माराम आपाजी, नागपूर .... .... ....
,, आत्माराम भाकु, मुंबई २
,, आत्माराम रामचंद्र, जबलपूर .... .... ....
,, आत्माराम रामचंद्र, साजापूर
,, आत्माराम लक्ष्मणराव, देवगड .... .... ....
,, आर. बी. किर्तीकर, मुंबई
,, आर. बी. भागवत, अहमदनगर .... .... २
,, आर. भिमाजीराव, हैद्राबाद

,, आर. एच. लेले, पुणें
,, आर एम देसाई, निपाणी
,, आर. एन. जोगळेकर, इस-लामपूर .... .... ....
,, आर. एस. होनाजी, भंडारा
,, आर. व्यंकटराव, मिलापूर
,, उपेंद्र महाबळभट, हळदीपूर
,, एकनाथ केशव, मांडवगण
,, एकनाथ बल्लाळ, उरण
,, ए. एन. वर्धराज, डिंसा
,, ए. व्ही. पिसोळकर, चाद-रघाट .... .... ....
,; एच. एच. इंदुरकर, नागपूर
,, एच. व्ही. करंदीकर, खां-डाड .... .... ....
,, एम डी कुंठे, उमेरिया
,, एम. जी. मुळे, वर्धा
,, एम. एच. खान, अलिबाग
,, एम. पांडुरंग, भंडारा
,, एन. बी. रास्ते, उज्जयनी
,, एस. बी. कदम, उजैनी
,, एन. रामण्णा, वर्धा
,, एस. के. जोगळेकर, पो खारयन .... .... ....
,, एस. आर. पारखी, नागपूर
,, एम. आर. लछुमनराव, सि-रगुजा .... .... ....
,, एस. आर. वेंडर, चिखली
,, कन्हयालाल सुकलाल भुव-नगिरी .... .... ....
,; कमळाकर सखाराम, अंधेरी
,, कस्तुरचंद बेचरचंद, इंडी
सौ. कावेरीबाई, तंजावर २
,, काशीनाथ गणेश, भोर
,, काशीनाथ गंगाधर, कोल्हा-पूर .... .... ....
,, काशीनाथ राघव, कानीवाडा २
,, काशीनाथराव रामचंद्र, इं-दूर .... .... ....
,, काशीनाथ वामन, कल्याण
,, काशीनाथ वासुदेव, मुंबई २
,, काशीराम बाने, चिना
,, केशव गणपत, नागपूर
,, केशव नरहर, सेंद्री
,, केशव बळवंत, बडोदा
,, केशव बळवंत, पुणें
,, केशव बापुजी, संगमनेर
,, केशव रामचंद्र, करबजून
,, केशव लक्ष्मण, कांदळगांव
,, केशव शामराव, इंदुर
,, कृ. ब. नाडगोंडा, बेडग

,, कृष्णराव खंडेराव, देलवाडा
,, कृष्णराव तिनईकर सांब्राणी
,, कृष्णराव नारायण, हरदा
,, कृष्णराव रामचंद्र, आगर
,, कृष्णराव हरी, उंझा
,, कृष्णशास्त्री खरे, गुहागर
,, कृष्णाचार्य, हरद्वार
,, कृष्णाजी गोपाळ, कुरोली
,, कृष्णाजी तुकाराम, कारंजा
,, कृष्णाजी नारायण, बडोदें
,, कृष्णाजी नारायण, मुरगोड
,, कृष्णाजी बळवंत, नेपाळ
,, कृष्णाजी बळवंत, चापोरा
,, कृष्णाजी वहीरबा, औरंगाबाद .... .... ....
,, कृष्णाजी माधव, यवतमाळ
,, कृष्णाजी मंगेश, हल्याळ
,, कृष्णाजी रामचंद्र, करंजाळ
,, कृष्णाजी रामचंद्र, नवलीहाळ .... .... २
,, कृष्णाजी विठ्ठल, वर्धा
,, कृष्णाजी विश्वनाथ, केशोनगर .... .... ....
,, कृष्णाजी विश्राम, मुंबई
,, कृष्णाजी शेपो, चेटगेरा
,, कृष्णाजी सांबाजी, होसकोट

,, कृष्णाप्पा संजीवी, मद्रू
,, कृष्णा त्रिन ह्यातारचा, जमखंडी .... .... ....
,, कोंडाजी दुळाजी, कराची २
,, कोंडाजी विठुजी, इंदुर
,, कोंडो राणोजी, अहमदनगर
,, कोंडो बाळकृष्ण मांजरीबुद्रूक .... .... ....
,, खंडेराव गणेश, वेलापूर
,, गजानन मोरेश्वर, बोलुठाण
,, गजानन सखाराम, जैतापूर
,, गणपत एकनाथ, सोलापूर
,, गणपतराव आनंद, साकोली
,, गणपतरावजी राणेराव, इगतपुरी .... .... ....
,, गणपतरावजी साहेब कोठा
,, गणपतराव विठ्ठलराव, बडोदा .... .... ....
,, गणपत विनायक, अहमदनगर .... .... ....
,, गणपती हरी, ओझरतांबेट
,, गणेश चिंतामण, लोणीकाळभोर .... ....
,, गणेश नागोराव, तल्हारा
,, गणेश बळवंत, भाडणे
,, गणेश बाबाजी, आचेगांव

,, जॉ. डब्ल्यु. स्कूलमास्तर टाकवेबुद्रूख .... ....
,, जे. मुनस्वामी, हिंगाजिया
,, टिकासिंग पटवारी, पैजनवाडा .... .... ....
,, टि. श्रीनिवास पै, चेरतलें
,, टि. डि. पटवर्धन आणि कंपनी बुलढाणें .... ....
,, डी. नारायण स्टे. मास्तर क्यासलरॉक .... .... ....
,, डोंगरसिंग बकत्यावर मन्यारवाडी .... .... ....
,, तखंडकर सेक्रेटरी, नाशीक
,, तानबा सेटे खेडेकर, लाखनी .... .... ....
,, तुकाराम आत्माराम, आनंद
,, तुकाराम गणेश, हुशंगाबाद .... .... ....
,, तुकाराम बगलाजी, तळेगांव दशसहस्र.... .... ....
,, तोताराम व० गोविंद, लोहारे .... .... ....
,, त्र्यंबक गंगाधर, आमरेली
,, त्र्यंबक तोताराम, धामणगांव
,, त्र्यंबक नागनाथ, महेश्वर
,, त्र्यंबक नारायण, पाऊड
,, त्र्यंबक बाळाजी, गोकाक
,, त्र्यंबक भिकाजी, नेर
,, त्र्यंबक भिकाजी, नागडे
,, त्र्यंबक रामचंद्र, उत्तण
,, त्र्यंबकराव नागेश, मोहोळ
,, त्र्यंबक रामचंद्र, मानसहिवरें
,, त्र्यंबक परशराम, कोल्हापूर
,, त्र्यंबक हरी, बडोदा
,, दगडू खंडूजी, मुंबई
,, दगडू त्रिंबक, हिवरे बुद्रूख .... .... ....
,, दगु बापूजी, फत्तेहाबाद
,, दत्ताजी बालकृष्ण, ठाणें
,, दत्तात्रय गुंडो, संकेश्वर
,, दत्तात्रय धोंडदेव, ब्राह्मणवाडाथडी .... .... ....
,, दत्तात्रय नारायण, धारासीव .... .... ....
,, दत्तात्रय लिंगो, सावनूर
,, दत्तात्रय वामन, परशराम
,, दत्तात्रय व्ही. गोखले, कोल्हापूर .... .... ....
,, दत्तात्रय विठ्ठल टिळक, जाल्ना .... .... ....
,, दत्तो विनायक, नागपूर
,, दरीबा नारायण, मुंबई

,, दाजी अनंत, कासगांव
,, दादाजी जीवन, मुंबई
,, दामोधर गणेशजी, मुंबई
,, दामोधर दादाजी, कळवें-
माहीम .... .... ....
,, दामोधर वामन, बडोदें
,, दामोधर विठ्ठल, पंढरपूर
,, दामोधर विनायक, मुंबई
,, दामोधर शंकर, भुसावळ
,, दामोधर हरी, बडोदा
,, दामोधर हरी, मोहपाडा
,, दिनकर रघुनाथ, मूर्तिजापूर
,, दिवऱ्या कान पाटील, खां-
बाळें
सौ. दुर्गाबाई भांडारकर,
कोल्हापूर
,, दुलबा सदाशीव, फोंडा
,, देवराव सयाजी, कामठी २
,, दौलतराम आत्माराम, सां-
गली
,, धर्माजीराव, बुळवी
,, धोंडी गुणवंत, नागपूर
,, धोंडु काशीनाथ, मुंबई
,, धोंडो आत्माराम, कडगांव
,, धोंडो चिमणाजी, ऐनपूर
,, धोंडो जनार्दन, मालवण
,, नथमूळ दलिचंद, अहमदन-
गर .... .... २
,, नथु गणेश, इंदूर
,, नथु भिकाजी, सजामुठवली
बुद्रूख .... ....
,, नथु लक्ष्मण, भिलसा
,, नरसनगौडा लिंगनगौडा,
होसूर .... .... ....
,, नरसाप्पा कोपल, सोलापूर
,, नरसिंगराव पांडुरंग सिवणी,
,, नरसो रामचंद्र, बागलकोट
,, नरहर गणेश, साकुं
,, नरहर गंगाधर, इचलकरंजी
,, नरहर बाळाजी, हरदा
,, नरहर मल्हार, सिवणी
,, नागोराव मारुती, सिरसगां-
व .... .... ....
,, नानाजी विठ्ठल, यावल
,, नाना जोती पाटील, सोला-
पूर .... .... ....
,, नामदेव तुकाराम, चित्तगांव
,, नारायण आबाजी, मुंबई
,, नारायण काशीनाथ, झांशी
,, नारायण केशव, घोसाळें
,, नारायण कृष्ण, केशर
,, नारायण गणेश, जमखंडी

,, बाळकृष्ण महादेव, निफाड
,, बाळकृष्ण मोरेश्वर, पडघा
,, बाळकृष्ण रघु, आर्वी
,, बाळकृष्ण रामचंद्र, राजपिंपळा .... ....
,, बाळकृष्ण रामचंद्र देवबाग
,, बाळकृष्ण रुद्रप्पा, कातेली
,, बाळकृष्ण लक्ष्मण, धारवाड
,, बाळकृष्ण वामन, डुघणी
,, बाळकृष्ण वासुदेव, धामणसें
,, बाळकृष्ण हरसेट, संगमेश्वर
,, बाळाचार्य बसापा, ब्रह्मावर्त ७
,, बाळाजी नाना भाई, मुंबई
,, बाळाजी धोंडीबा कनीय मन्नाडी ....
,, बाळाजी भिकाजी, गदग
,, बाळाजी येशवंत, मुंबई
,, बाळाजी रामचंद्र, ओझर
,, बाळाजी श्रीनिवास, मनगोळी .... ....
श्री. बाळासाहेब पंत, औंध
रा. बिनयामिन सालोम, देवळाली
,, बुध्दू किसनराव, नागपूर
,, बी. डी. चोहाण, काठेवाड
,, बी. एम. काकड, मंडालें
,, बी. पी. देशपांडे, सोलापूर
,, बी. एस. मोदी, नेरपर्सोपंत
,, बेंडु सुबराव, गुडस
,, भगवंत गोविंद, कर्जत
,, भगवंत बळवंत, पुणें
,, भगवंतराव अमृतराव, बडोदें
,, भगवंत शिवराम, सतार
,, भगवानदास मुनीम, साजापूर
,, भगवानदीन दीक्षित, जलालखेडा
,, भाऊ अनंत, कळवण
,, भाऊ बरडे, भंडारा
,, भाऊ भागूसेट, पिंपळगांव वसंत
,, भाऊलाल दलाल, जायखेडा
,, भार्गव कृष्ण, अजिंठा
,, भानाजी आत्माराम, हरीहर
,, भास्कर आत्माराम, वेंगुर्ले २
,, भास्कर गणेश, बेळगांव
,, भास्कर दामोधर, मुंबई
,, भास्कर सखाराम, उमरावती
,, भिकाजी चिमणाजी, कापोली
,, भिकाजी लक्ष्मण, पथरोट
,, भिकाजी लक्ष्मण, सुपा
,, भिकाजी वासुदेव, धुळें
,, भिकू अनंत, असोळणें

,, भिमराव हुईलगोळ, बेळगांव
,, भिमाजी परशराम, तोरगल
,, भिवा रामजी, मुंबई
,, भुमया शिवया, मुंबई
,, भैरव बापु, बनारस
,, मनोहर विष्णु, अमळनेर
,, मलकाजी रावजी सूर्यवंशी,
६ . गरग ....
,, मल्लया चन्नया, नवलीहाळ
,, मल्लया वेंकटेश, नवसारी
श्री. मलापा बसापा बारद,
सोलापूर ....
रा. मल्हार गजानन, अलीबाग
,, मल्हारराव माधव, ग्वालेर
,, महादु रंगाजी, मातगांव
,, महादु विठु देवलेकर, मुंबई
,, महादेव भोगले, कामठी
,, महादेव रामचंद्र, मुंबई १०
,, महादेवरावजी महाजन, मुंबई
,, महादेव विष्णु, वराड
,, माधव बळवंत, राजुरे
,, माधव रघुनाथ, दारव्हा
,, माधवराव गोविंद, बिलासपूर
,, माधवराव भास्कर, मुंबई
,, माधवराव राघवेंद्र, बंकापूर,
,, माधवराव सखाराम, उज्जयनी
,, मार्तंड आनंदराव, भानपुरा
,, मार्तंड पांडुरंग, वडगांव
,, मार्तंड बापुजी, बडोदें
,, मार्तंड भगवंत, धार
,, मार्तंड लक्ष्मण, आकोला
,, मारुती कृष्ण, मुर्तिजापूर
,, मारुती चिन कुशाबा, मुंढवा
,, मारुती चिमाजी, सिन्नर
,, मारुती नारायण, पुणें
,, मुकुंदराव कृष्ण, मुंगावली
,, मुकुंद सिताराम, पुऊ
,, मुरारराव कृष्णाजी, मुंबई
,, मुल्लु बुटलर, एडन
,, मेजर रामसिंगजी, इंदूर
,, मंगेश निळकंठ पुणेकर,
बेळगांव ....
,, यशवंत अनंत, मुंबई
,, यशवंत गणेश, पटण
,, यशवंत गोविंद, बाळापूर
,, यशवंत रामचंद्र, सागर
,, यशवंतराव रघुनाथ, कसवण
,, यशवंतराव विनायक, अह-
मदनगर ....
,, यादव संतु, देवळाली
,, रघुजिलाल हरकिसनदास,
पुणें ....

,, रघुनाथ आत्माराम, टांक
,, रघुनाथ गोविंद, मुंबई
,, रघुनाथ जानुजी, पुबगांव
,, रघुनाथ बालकृष्ण, शिकंदरावाद ....
,, रघुनाथ भिमाजी, इंदूर
,, रघुनाथराव गोपाळ, अत्री
,, रघुनाथ श्रीधर, विटें
,, रघुनाथ श्रीनीवास, क्यादगी ....
,, रतनचंद गंभीरमल, पाचोरा
,, रहिमान शमशोद्दीन, रेण
,, राघवेंद्र सिदो कुलकर्णी, कितूर ....
,, रावोबा देशमुख, वेढापूर
,, राचापा गुरपादपा, दुधणी
,, राजीव पंपेश्वर, गदग-बेटगेरी
श्री. राणीसाहेब, सावंतवाडी
रा. राणोजी मुनाजी, कुटरें
,, रामकृष्ण मोरेश्वर, पुणें
,, रामकृष्ण लक्ष्मण, मुंबई
,, रामकृष्ण वासुदेव, राजनादगांव ....
,, रामकृष्णशिंग ठाकूर मालगुजर, मांडगांव ....
,, रामचंद्र आपाजी, कोल्हापूर
,, रामचंद्र आबाजी, लोणार
,, रामचंद्र कृष्ण, कोल्हापूर
,, रामचंद्र कृष्ण, माढा
,, रामचंद्र गोपाळ. रामदुर्ग
,, रामचंद्र गोविंद, सासवड
,, रामचंद्र गोविंदराव, कुलाबा
,, रामचंद्र गोविंद, वेंगुर्ले
,, रामचंद्र चिंतामण, कोल्हापूर २
,, रामचंद्र तुकाराम, मोहोळ
,, रामचंद्र दामोधर, गुंडें
,, रामचंद्र नारायण, मुंबई
,, रामचंद्र बल्लाळ, पेण
,, रामचंद्र बालकृष्ण, मुरगोड
,, रामचंद्र भगवंत, बेळगांव
,, रामचंद्र भास्कर, अंकलखोप ....
,, रामचंद्र भिकाजी, अलीबाग २ ....
,, रामचंद्र महादेव, सोगड
,, रामचंद्र मोरेश्वर, कणकवली २ ....
,, रामचंद्र मोरेश्वर, छिंदवाडा
,, रामचंद्र यशवंत, वसई
,, रामचंद्र रघुनाथ, नारिंग्रे
,, रामचंद्रराव मानाजी, मनमाड ....

रा. रामचंद्रराव सिन्नलर, आगर
,, रामचंद्रराव हेडमास्तर, पोहरा
,, रामचंद्र लक्ष्मण, परतवाडा
,, रामचंद्र वासुदेव, हिंगणघाट .... ....
,, रामचंद्र विठोबा, ठाणें
,, रामचंद्र विष्णु, वरखेड
,, रामचंद्र शाबाजी, बोबरवाडा .... ....
,, रामचंद्र सदाशीव, राई
,, रामचंद्र सदाशीव, वेणेगांव
,, रामचंद्र हरी, उमेळा
,, रामचंद्र हरी, बडोदा
,, रामचंद्र हरी, शिरोळ
,, रामजी करवंकर, खडकी
,, रामजी नटवाजी, बेलखेड
,, रामय्या धर्माजी, मुंबई
,, रामराव दिवेंकर, धारवाड
,, रावजी आबाजी, कटकोळ
,, रावजी गणेश, मुंबई
,, ललु खुशालचंद, कोंडोली
,, लक्ष्मण कृष्णशेट, कणकवली .... ....
,, लक्ष्मण खेंकर, कायथा
,, लक्ष्मण गणेश, गदग
,, लक्ष्मण गुंडो, कातूर
,, लक्ष्मण गोविंद, निगमपल्ली
,, लक्ष्मण जनार्दन, ठाणें
,, लक्ष्मण नारायण, मुंबई
,, लक्ष्मण बळवंत, गुंजी
,, लक्ष्मण भाईचंद, गोरेगांव
,, लक्ष्मण महादेव, बेळगांव
,, लक्ष्मण मोरेश्वर, तिरोसा
,, लक्ष्मणराव मास्तर, औरंगाबाद .... ....
,, लक्ष्मण व्यंकाजी, खानापूर
,, लक्ष्मण विठ्ठल, धुळें
,, लक्ष्मण सिताराम, धुळें
,, लक्ष्मण शिवराम, टाकरखेड
,, लक्ष्मण हरी, इंदूर
,, लक्ष्मण हरी, धारवाड
,, लालशंकर उमियाशंकर, अहमदाबाद ....
,, व्यंकट नरसो, रायचूर
,, व्यंकटेश आपाजी, गोकाक
,, व्यंकटेश बचापा, पौंड
,, व्यंकाजी गणेश, मुद्देबीहाळ
,, व्यंकाजी रामचंद्र, वसतापूर
,, व्यंकु बाळुजी, मुंबई
,, व्यं. वा. जायदे, हजारमाची
,, वनमाळी लाधाभाई, अहमदाबाद .... ....

,, वसंतराव आनंदराव, मुंबई
,, वामन कृष्ण, सातारा
,, वामन त्रिंबक, चित्तागांग
,, वामन नारायण, सातारा
,, वामन बळवंत, आकोला
,, वामन मार्तंड, सोनवाड
,, वामन राजाराम, चिचघर २
,, वामनराव बळवंत, इंगळी
,, वामन शंकर, मोरवी
,, वामन सिताराम, आकोला
,, वासुदेव गोपाळ, नाशिक
,, वासुदेव गोविंद, नांदगांव
,, वासुदेव जनार्दन, मिरज
,, वासुदेव नरहर, यवतमाळ
,, वासुदेव बाळकृष्ण, बोदवाड
,, वासुदेव भगवंत, मलकापूर
,, वासुदेवराव अनंत, कोले-वाडी .... २
,, वासुदेव लक्ष्मण, मुंबई
,, वासुदेव विनायक, नागपूर २
,, वासुदेव विश्वनाथ, खानापूर
,, वासुदेव विष्णु बिना
,, विठ्ठल आत्माराम, मुर्तिजा-पूर .... ....
,, विठ्ठल तात्या, बार्शी
,, विठ्ठल दयाराम, धारवाड
,, विठ्ठलदास काशीशेट, माल-वण .... ....
,, विठ्ठल नारायण, बेळगांव
,, विठ्ठलराव वकील, गुलबर्गा
,, विठ्ठलसिंग बळीराम, सिन्नर
,, विठ्ठल सिवराम, वडाळी
,, विठु खंडूजी, जांबुळ
,, विद्याधर श्रीकृष्ण, पंचमढी
,, विनायक अनंत, बुलढाणे
,, विनायक गणेश कुंभराज
,, विनायक गणेश, इंदूर
,, विनायक गोविंद, मुंबई
,, पिनायक गोविंद, हिपरगी
,, विनायक नारायण, करेली
,, विनायक रघुनाथ, बंकीपूर
,, विनायक विष्णु, आटपाडी
,, विनायक सखाराम, वजी-डीपा .... ....
,, विश्वनाथ मंजितराव, लोणार
,, विश्वनाथ रघुनाथ, पिंपळ-गांव बसंत ....
,, विश्वनाथ लक्ष्मण, डोंगरगड
,, विश्वनाथ विनायक, जमखंडी
,, विश्राम माळी, कनेरे जला-ल खेडा .... ....
,, विष्णु कृष्ण, अंकलेश्वर

,, विष्णु कृष्ण, निमच्र
,, विष्णु परशराम, साजापूर
,, विष्णु बाबाजी, मालेगांव
,, विष्णु बी. गोखले, नागपूर
,, विष्णु भगवंत, आंवळी
,, विष्णु रमाकांत, नगर
,, विष्णु रामकृष्ण, पैठण
,, विष्णु लक्ष्मण, सातारा
,, विष्णु व्यंकाजी, शहादें
,, विष्णु वामन, रोपेठणी
,, विष्णु वासुदेव इंदूर
,, विष्णु विठ्ठल, आजरें
,, विष्णु सदाशीव, पुणें
,, विष्णु सिताराम, पिंपळनेर २
,, व्ही. डी. दातार, सोलापूर .... ....२
,, व्ही. जी. बडनेरकर, छोटाउदेपूर .... ....
,, व्ही. के. क्लार्क, झांशी
,, व्ही. के. द्रवीड, सातारा
,, वाय. एन. आपटे, पुणें
,, शांताराम नारायण, वसई
,, शाबाजी रघुनाथ, कणकुंबी
,, शाबा रामचंद्र, बोरी
,, शामजी धोंडो. उमदी
,, शामराव रामचंद्र, गोहद
,, शिवबकस चुतुर्भुज, पुणें
,, शिवराम गंगाधर, टाकळी
,, शिवराम वामन, गुलबर्गा
,, शिवशंकरदास, नंदुरबार
,, शेषो कृष्ण, विजापूर
,, शंकर अछया, टाकवडें
,, शंकर केशव, मलकापूर
,, शंकरगीर गुरू नागेंद्रगीर, पुणें .... ....
,, शंकर गोपाळ, उरई
,, शंकर गोपाळ, नागपूर
,, शंकर गंगाधर, वाकला
,, शंकर जनार्दन, धानमंडी
,, शंकर नारायण, मांडवा
,, शंकर बापुजी, विजापूर
,, शंकर भगवंत, मंडेसूर
,, शंकर महादेव, कामरेज
,, शंकरराव गंगाधर, बडोदा
,, शंकरराव जाधव, टिमार्नी
,, शंकरराव नारायण, हंडीया
,, शंकरराव रामजी, सौंदत्ती
,, शंकर व्यंकाजी, सावर्डे
,, शंकर विठ्ठल, बेळगांव
,, शंकर विष्णु, मंचर
,, शंकर विष्णु, बडोदें
,, शंकर श्रीकृष्ण, धुळें

## जाहिरात.

# लोकमित्र.

ह्या नियमित निघणाऱ्या सुंदर मासिकपुस्तकांत निरनिराळीं चरित्रें, अनेक विषयांवर निबंध, सुंदर काव्यें, मार्थसुभाषितें, पुण्यक्षेत्रवर्णनें, आख्यायिका, ऐतिहासिक करमणूक, उपयुक्त कला, पुराणोक्त वेंचे, मनोरंजक चुटके, स्फुट लेख, मजेदार कूटप्रश्न, निवडक बातम्या. इ० इ० विषय येत असतात. आजमितीस याचा खप साडेतीन हजार आहे. याचा प्रसार पंजाब, बंगाल, नेपाळ, बलुचिस्थान, अरेबिया, मणिपूर, ब्रह्मदेश वगैरे प्रांतांमध्यें आहे. यांत लेख लिहिणारे अनेक असून ते विद्वान आहेत.

याचीं दरमहा रंगीत कव्हरासह पृष्टें ३६ असून वर्षाची टपालखर्चासह वर्गणी ८११ आणे आहे शिवाय दरसाल इनाम बूक मिळतें तें निराळेंच.

**मागील सालाचीं पुस्तकें विक्रीस तयार.**

| वर्ष. | पृष्ठें. | किं. | वर्ष. | पृष्ठें. | किंमत. |
|---|---|---|---|---|---|
| पहिलें | १४४ | ·।· | तिसरें | २८८ | ·॥· |
| दुसरें | २८८ | ·॥· | चौथें | २८८ | ·॥· |

हीं ४ ही पुस्तकें घेणारांस १८= किमतीचीं २ पुस्तकें तिसऱ्या आणि चौथ्या वर्षाबद्दल बक्षीस ठेविलीं होतीं तींही मिळतील. ट. ख. नि.

# सर्वसंग्रह.

यांत—श्रीगणेशायनमः याचा अर्थ, प्रातःकालीं केव्हां उठावें व कायकाय करावें वगैरे, भूपाळीसंग्रह, प्रातःस्मरण, शौचविधी, अंगाला सुवास येणारीं उटणीं, स्नानविधी, सूर्यनमस्कार, पंचायतनध्यानें, नारायणस्तोत्र, नामरामायण, गंगाष्टक, शिवपंचाक्षरस्तोत्र, गणपतित्रिश्लोक, भीमाष्टक, शन्याष्टक, गोविंदाष्टक, रेणुकाष्टक, रामस्तुती, शिवस्तुती, सूर्यस्तुती, करुणाष्टक, मारुतीस्तोत्र, लक्ष्मीस्तव, सूर्याष्टक, दुर्गापंचक, पांडुरंगाष्टक, दुर्गास्तोत्र, रामाष्टक, भोजनसंबंधीं माहिती, शयनप्रकार, स्त्रीसेवन, सदाचार, प्रपंच आणि परमार्थ, विचारमाला, संसारांत कसें वागावें, संसारीमनुष्यानें कायकाय करूं नये, राममंत्राचे श्लोक, उमारमा संवाद, सखूचें चरित्र, नित्यपाठ, पतिव्रताधर्म, प्रश्नोत्तरबोध, कृष्णशिष्टाई, नौकाक्रीडन, विद्याप्रशंसा, दोहरेसंग्रह, प्रपंची मनुष्याचीं स्थिती, मूर्खकोण, कलियुगपंचक, प्रार्थनापंचक, कैकई प्रार्थना, अशौचसंबंधीं माहिती, करपल्लवी भाषा, अनेकबोधरत्नें, फंदीफटका, कलंकीअवतारकथा, कुंजवनक्रीडा, संगति बाराखड्या, पार्वतीविलास, लक्ष्मीपार्वतीसंवाद, गारूडी लोक करतात त्या नमुन्याचे खेळ, उपयुक्त कला, बगीच्यासंबंधीं माहिती, स्थूल देहाची उत्पत्ती, वेणूसुधा श्लोक, संसार, कालीयामर्दन, प्रपंचीमनुष्यास उपदेश, रामदासीमनाचे श्लोक, कृष्णावतार कथा, वामनी श्लोक, वेंचे ज्ञानेश्वरींतील, सीतास्वयंवर, काळ फिरल्याचीं लक्षणें, अहिल्योद्धार, गरुडगर्वहरण, वामनचरित्रांतील श्लोक, वेंचे वनसुधा, वेंचे शबरीआख्यान, वेंचे

**कृष्ण** व **भीष्म**, आणि भीम व **सुयोधन** जसे समरोत्सुक झाले, तसेच पानिपतच्या घनघोर प्रसंगांतही अनेक अतिरथी महारथी होते. **अभिमन्युसारखा** शरसंधान करणारा **विश्वासराव** पेशवा, धृष्टद्युम्नाप्रमाणें खड्गपटु **जनकोजी शिंदा**, **भीमार्जुनाप्रमाणें** एक बाजू स्वतः संभाळणारे व युद्धकलाकुशल **यशवंतराव** पवार-**घटोत्कचाच्या** पर्वतवृष्टीप्रमाणें अनिवार जाज्वल्य लोहगोलांचा वर्षाव करणारा **इब्राहीमखान** गार्दी, **अश्वत्थामा** व **कृपाचार्य** ह्यांप्रमाणें समरनिपुण **विंचूरकर** व मेहेंदळे, **कर्णाप्रमाणें** स्वामिसेवक व चतुर **महादाजी** शिंदा, **द्रोणाचार्यासारखा** वृद्ध **मल्हारराव** होळकर, **सुयोधनाप्रमाणें** मानधनाग्रगणी व आकाश कोंसळलें तरी न डगमगणारा, उदार सत्यप्रतिज्ञ, रणधीर-वीर शिरोमणी **सदाशिवराव भाऊसाहेब पेशवा** इत्यादि अनेक वीरश्रेष्ठांच्या हिकमती, सयुक्तिक कावेबाजपणा, शौर्य, धैर्य प्रसंगावधान, स्वहितदक्षता, मारीन किंवा मरेन असा बाणेदारपणा या पुस्तकांत फारच योग्य रीतीनें प्रदर्शित केला आहे. तसेंच **लालन** **बैरागिणीचें** **महादाजी** शिंद्यावरील अलौकिक प्रेम, स्त्रिया प्रेमानें कशा मोहित होतात, प्रेमबद्ध स्त्रीचें आचरण कसें असतें, तो तिजकरितां काय काय घोर कृत्यें करावयास धजतो, विषयासक्त पुरुष पापाचरणांत निमग्न झाला कीं, त्यास कसें दुःख सोसावें लागतें, घातक मनुष्य स्वकार्यसाधनास कशीं अधमाधम कृत्यें करितो, इत्यादि गोष्टी चांगल्या ध्यानांत येतील. भाऊसाहेब व **गोपिकाबाईचें** वीरश्रीयुक्त भाषण, **सुजाउद्दवला** व **नजीबउद्दवला** यांचीं कापट्य-

प्राचुर्य, स्वहितदक्ष आणि लावालावीचीं कर्में, मराठ्यांचा पराजय होण्याचें कारण, मल्हाररावाची कपटी वर्तणूक त्याला भाऊसाहेब पेशव्याचा शाप, महादाजी शिंद्याचें सरळ व दृढनिश्चयी आचरण, महिपतरावाचें लालनवरील प्रेम, मराठी दरबारचा थाट, प्राणांताच्या वेळीं भाऊसाहेबांची आणि विश्वासरावाची भेट व भाषण, जनकोजी शिंदा, अंताजी माणकेश्वर व इब्राहिम-खान गार्दी, ह्यांचें शौर्य व शेवट, महादाजीवरील आणीबाणीचा प्रसंग इत्यादि अनेक उपयुक्त व विचारणीय गोष्टींचा ह्या पुस्तकांत चांगला संग्रह केला आहे. इतकेंच नव्हे तर या कादंबरींत वीररस प्राधान्य असून शृंगार, करुण वगैरे रसांचीही पुष्कळ झांक आहे. ग्रांटडफ, मालकम, एलिफन्स्टन, वगैरेंनीं लिहिलेले हिंदुस्थानचे इतिहास व विशेषतः काशीरायानें लिहिलेल्या सोनपत-पानपतच्या युद्धसंग्रामाची बखर ह्या कादंबरीस मुख्य आधार आहे. 'लोकमित्र' साच्याचीं पृष्ठें सुमारें ३२९ वर आहेत. बाईंडिंग जाड पुठ्याचें कपड्यानें मढविलेलें सोनेरी अक्षरांसह सुरेख केलें आहे. किंमत १। रु.

---

## मित्रबोध.

लहान मुलांसच नव्हे तर थोरांससुद्धां बोधपर व उपयुक्त असे १०४ वेंचीव चुटके यांत सांगितले आहेत. आपलीं मुलें सुमार्गी व्हावीं अशी ज्यांची इच्छा असेल त्यानीं आपापल्या प्रत्येक मुलास हें एक पुस्तक घेऊन द्यावें.

त्यायोगें त्यांच्या मनांत सुबोधामृताचा चांगला ठसा उमटेल. किंमत ८२.

---

## संगीत रासक्रीडा नाटक

या नाटकाची रचना बहुतेक जणाच्या शाकुंतल सौभद्राप्रमाणेंच आहे. त्यामुळें आंतील सुरस पदें ह्मणतांना अगदीं कठीण जात नाहींत. किं. ८८.

---

## अनंतरंग.

वाजीकरणादि औषधांच्या पूर्ण माहितीनें भरलेलें. किंमत ८१२.

---

## संगीत शृंगार रहस्य.

हें अगदीं नवीन असून फारच चटकदार आहे. नांवावरून आंतील विषयांची परीक्षा होईलच. किंमत ८२

---

## ऋणविमोचन.

कर्जापासून कशा तऱ्हेनें मुक्त व्हावें, खर्च कसा केला असतां कर्ज होणार नाहीं, नेहमीं थोडथोडी शिल्लक बुकींत गेल्यापासून प्रसंगीं किती उपयोग होतो, मारवाडी लोक कुळांना कशा प्रकारें नाडतात इत्यादि बऱ्याच विषयांवर निबंधरूपानें निरूपण केलें आहे. किंमत. ८२

---